

# तीन चिनी प्रवासी

मा. श. मोरे

# तीन चिनी प्रवासी

मा. शं. मोरे
एलएल. एम; आय. आर. एस

सुगावा प्रकाशन, पुणे
१९८९

बौधाचार्य, आयु. विष्णू अहिरे
दिक्षीत आमणेर भन्ते प्रियदर्शी
तथा धम्मादीक्षक
-भारतीय बौद्ध महासभा
दि० २४ सप्टें. ९५

बौद्ध ग्रंथमाला- ६

Teen Chinee Pravasi- M. S. Moray
(Marathi)



प्रथमावृत्ती- १९८३
द्वितीयावृत्ती- मार्च १९८९

किमत ३० रु.

प्रकाशक
उषा वाघ
सुगावा प्रकाशन
८६१/१, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रक
विलास वाघ
८६१/१ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ
रंगमुद्रा प्रिंटर्स
१६१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ
अनंत साककर

लेखकाने मानधन स्वीकारले नाही, म्हणून या पुस्तकाची किमत कमी ठेवणे शक्य झाले.

–प्रकाशक

# अनुक्रमणिका

# प्रस्तावना

अनेक चिनी पौराणिक कथांतून 'पश्चिम स्वर्गा'चे वर्णन वाचावयास मिळते. त्या स्वर्गात सर्वत्र सुख आणि शांती आहे. तेथील सर्व वस्तू सोन्या-रूप्याने आणि मौल्यवान जड-जवाहिरांनी सुशोभित केलेल्या आहेत. तेथील निर्झर स्वच्छ पाण्याचे असून ते सोनेरी वाळूवरून वाहतात. तलावात सर्वत्र कमळांची फुले आहेत. आजूबाजूच्या पाऊलवाटा आल्हादकारक आहेत. तेथे कर्णमधुर संगीत नेहमी ऐकू येते आणि दिवसातून तीनदा फुलांचा वर्षाव होतो. तेथे जन्मलेले सुखी प्राणी आपल्या वस्त्रांसह दुसऱ्या जगात जाऊन तेथे राहात असलेल्या अगणित बुद्धांच्या पुढे पुष्पांची आदरांजली वाहू शकतात. हा 'पश्चिमेचा स्वर्ग' म्हणजेच जम्बुद्वीप किंवा भारतवर्ष आहे अशी ठाम समजूत जुन्या चिनी वाङ्मयात आढळून येते.

चिनी लोकांना भारताबद्दल इतका आदर वाटण्याचे एकमेव कारण म्हणजे हा देश शाक्यमुनी गौतम बुद्धांचा आहे, ह्याच देशात त्यांचा जन्म झाला, येथेच त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि येथेच मानवाच्या कल्याणासाठी त्यांनी धम्मज्ञान दिले.

चीनमध्ये बुद्धधम्माचा शिरकाव केव्हा आणि कसा झाला हे निश्चितपणे सांगता येणे कठीण आहे. असे म्हणतात की, एका राजाच्या फॉन नावाच्या मंत्र्याने कन्फुशियसला एकदा विचारले की, 'जगात सर्वात सुज्ञ मनुष्य कोण आहे?' कन्फुशियसने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले की, 'पश्चिमेच्या देशात राहात असलेल्या एका स्वर्गीय तत्त्वज्ञानी माणसाबद्दल मी ऐकले आहे.' ह्या कथेचा संदर्भ देऊन बहुतेक सर्व चिनी बौद्ध असे अनुमान काढतात की, कन्फुशियसला गौतम बुद्धाबद्दल माहिती होती.

'वुई-लिआओ' ह्या नावाचा ऐतिहासिक ग्रंथ इ. स. २३९ साली लिहिला गेला. त्यात गौतम बुद्धाच्या जन्माबद्दल माहिती दिली आहे. त्यात असे म्हटले आहे की, इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात चिनी सम्राटाने चिंग-चिंग नावाच्या राजदूताला युह–ची येथे बुद्धधम्माची शिकवण घेण्यासाठी पाठविले होते तेथे गेल्यावर चिंग–चिंगने बुद्धधम्माची काही सूत्रे मुखोद्गत केली.

चीह-पँग ह्या बौद्ध भिक्खूने 'Records of Lineage of the Buddha and Petriarches' नावाच्या बौद्धांच्या इतिहासासंबंधी लिहिलेल्या ग्रंथात पुढील माहिती आढळते.

'पूर्व दिशेच्या हॅन वंशातील मिंग-टी ह्या चिनी सम्राटाला तो गादीवर आल्यापासून सातव्या वर्षी एक स्वप्न पडले की, सुवर्णकांतीचा एक मनुष्य उडत उडत राजवाड्यात आला. त्या माणसाच्या मानेवरून सूर्यकिरणे प्रकाशमान होत होती. दुसऱ्या दिवशी सम्राटाने 'त्या स्वप्नाचा अर्थ काय आहे' असे आपल्या दरबारातील लोकांना विचारले. तेव्हा फू–इ नावाच्या माणसाने त्याला सांगितले की, स्वप्नातील सुवर्णकांतीचा मनुष्य म्हणजेच पश्चिमेच्या देशातील बुद्ध होय. जेव्हा चौव् वंशाचे राज्य होते, तेव्हा तो होऊन गेला. त्या स्वप्नाचा मिंग-टी वर इतका परिणाम झाला की, त्याने जनरल त्साई-इनच्या बरोबर चिंग-चिंग, वँग-त्सँग इत्यादी

अठरा विद्वानांना बुद्धधम्माचे ग्रंथ आणि बौद्ध विद्वान आणण्यासाठी जम्बुद्वीपाकडे पाठविले.

दोन वर्षांनंतर, जनरल त्साई-इन आणि इतरांना किया-येह-मो-तान (काश्यप मातंग) आणि चू-फा-लान (धर्मरक्ष) हे दोन भारतीय बौद्ध भिक्खू युह-ची येथे (मध्य आशियातील खोतानजवळ) भेटले. त्यांच्याजवळ बुद्धाच्या मूर्ती आणि साठ लाख शब्दांपेक्षा जास्त शब्द असलेले संस्कृत भाषेतील बुद्धधम्म-ग्रंथ होते. त्या दोन भारतीय भिक्खूंसहित त्यांनी ते ग्रंथ लो-याङग येथे इसवी सन ६७ मध्ये आणले. ते दोन भारतीय भिक्खू पांढऱ्या घोड्यांवर बसून आले होते. त्यांनी सम्राटाला अभिवादन केल्यावर हो-लू येथील विहारात त्यांची राहाण्याची सोय केली गेली. एक वर्षानंतर त्यांना राहाण्यासाठी लो-याङ्ग शहराच्या पश्चिमेच्या दरवाजाबाहेर 'श्वेत अश्व' नावाचा विहार बांधण्याची आज्ञा सम्राटाने दिली. काश्यप मातंगाने त्या ठिकाणी 'बेचाळीस सूत्रांचे' चिनी भाषेत भाषांतर केले.

अशा तऱ्हेने इसवी सन ६७ मध्ये सम्राटाच्या अनुमतीने चीनमध्ये बुद्ध-धम्माच्या प्रचाराचे काम सुरू झाले. तेव्हापासून धम्मप्रचारासाठी अनेक भारतीय बौद्ध चीन देशात गेले. त्याचप्रमाणे ग्रंथप्राप्तीसाठी किंवा केवळ पवित्र स्थळांचे दर्शन घेण्यासाठी अनेक चिनी बौद्ध 'पश्चिमेकडच्या देशात' म्हणजे भारतात आले.

(फा-हियान, ह्यू-एन-त्सँग आणि इ-त्सिंग यांच्या वर्णनातून भारताला सर्व-साधारणपणे 'पश्चिमेचा देश,' 'पाच प्रदेशांचा देश', 'आर्य देश', 'मध्य देश,' 'ब्रह्म-राष्ट्र' किंवा 'जम्बुद्वीप' या नावांनी संबोधण्यात आले आहे. इ-त्सिंग आणि ह्यू-एन-त्सँग म्हणतात की, 'हिन्दू' हे नाव फक्त उत्तरेकडील जमातीत वापरतात आणि खुद्द भारतातील लोकांना मात्र त्याची काहीच माहिती नाही. ते म्हणतात की, 'हिन्दू' ची व्युत्पत्ती काहींनी चन्द्रापासून काढली आहे. ह्यू-एन-त्सँगच्या काळापासून चीनमध्ये भारताला 'इन्दू' असे म्हटले जाऊ लागले. तो म्हणतो की, 'चंद्राला अनेक नावे आहेत. त्यांपैकी 'इन्दू' हे नाव आहे. असे म्हटले जाते की सर्व प्राणी भवचक्रात अज्ञानाच्या अंधःकारात फिरत असतात. त्यांना (ज्ञान) प्रकाश देणारा सूर्य मावळल्यामुळे, चंद्रासारखा शांत आणि स्वच्छ प्रकाश देऊन सर्वांना मार्गदर्शन करणारा हा देश आहे. म्हणून ह्या देशाचे नाव 'इन्दू' असे आहे.' बुद्ध-धम्मामुळे इतर देशांतील लोकांत भारताबद्दल किती आदर होता, हे यावरून दिसून येईल.)

'सिंधू' पासून अपभ्रंश झालेले 'ताइनचू' आणि 'चुआन-तु' अशी भारताची नावे चीनमध्ये बुद्धधम्माचा प्रवेश झाल्यापासून चिनी लोकांना माहीत होती.

सुरुवातीला बुद्धधम्म भारतातून सरळ चीनमध्ये गेला नसून, तो मध्य आशियातून चीनमध्ये गेला. मध्य आशिया आणि चीन ह्यांच्यामध्ये चालू असलेल्या व्यापारी संबंधांमुळे चीनमध्ये बुद्धधम्माच्या प्रसाराचे काम सुरळीत झाले. पण त्याचबरोबर धम्मात अनेक त्रुटी राहून गेल्या. त्या त्रुटी भरून काढण्यासाठी,



विशेषतः भिक्खूंच्या नियमांतील म्हणजे विनयांतील त्रुटी भरून काढण्यासाठी अनेक चिनी बौद्धांनी जिवाची बाजी लावून भारताचा प्रवास अंगीकारला.

इ-त्सिंग आपल्या प्रवास-वर्णनात लिहितो की, '५०० वर्षांपूर्वी २० चिनी प्रवासी भारतात बोधिवृक्षाजवळ राहात होते. श्रीगुप्त नावाच्या एका राजाने त्यांच्यासाठी बुद्धगया येथे विहार बांधला होता. त्या विहाराला 'चीना विहार' असे नाव होते.' इ. स. ६७१ मध्ये इ-त्सिंगने जेव्हा तो विहार पाहिला, तेव्हा तो पडलेल्या अवस्थेत होता.

अलिकडेच बुद्धगया येथे चिनी भाषेतील शिलालेख असलेले अनेक शिलाखंड सापडले आहेत. त्यांतील काहींवर चिनी प्रवाशांची नावे कोरलेली आहेत. यावरून सिद्ध होते की, फार पूर्वीपासून चिनी लोक धम्मज्ञानासाठी भारतात येत असत. अशाच चिनी प्रवाशांपैकी फा-हियान, ह्यू-एन-त्सँग आणि इ-त्सिंग हे तीन चिनी प्रवासी आहेत. भारतातून परत गेल्यावर त्यांनी आपले प्रवासातील अनुभव लिहून काढले. त्यांच्या लिखाणातून भारताबद्दल मिळत असलेली ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक आणि सांस्कृतिक माहिती इतकी मोलाची आहे की, त्या काळाच्या भारतीय परिस्थितीचे स्वतंत्ररीत्या दर्शन घडविणारे ते एकमेव साधन आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. त्या दृष्टीने ही प्रवासवर्णने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

चिनी आणि भारतीय बौद्धांनी हजारो भारतीय बौद्धग्रंथांच्या प्रती भारतातून चीनमध्ये नेल्या. संस्कृत भाषेतून चिनी भाषेत त्यांचे अनुवाद करण्याचे पद्धतशीर काम अनेक शतके चालले होते. त्या विद्वानांचे भारतावर कोटी-कोटी उपकार झाले आहेत. कारण 'मंजुश्रीमूलकल्प' या ग्रंथासारखा एखादा अपवाद सोडला तर भारतात एकही बौद्ध ग्रंथ गेल्या शतकात उपलब्ध नव्हता. आता त्याच अनुवादित चिनी ग्रंथांची युरोपियन भाषेतील भाषांतरे आपणास उपलब्ध झाली आहेत.

'बुद्धधम्माचे संदेशवाहक' या मालिकेतील पहिला भाग म्हणून फा-हियान, ह्यू-एन-त्सँग आणि इ-त्सिंग यांची थोडक्यात माहिती या पुस्तकात दिली आहे. त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाचे हे शब्दशः भाषांतर नाही. त्यांच्या वर्णनात आलेल्या, त्या काळी प्रचलित असलेल्या अनेक कथा विस्तारभयास्तव गाळल्या आहेत. ह्या पुस्तकात अनेक परिच्छेद अवतरणचिन्हांत देण्यात आले आहेत. मूळ ग्रंथातील माहिती किती मनोरंजक आणि बोधप्रद असली पाहिजे, असे कुतूहल वाटून वाचकांनी अभ्यासू वृत्तीने मूळ ग्रंथ वाचावेत. ह्या उद्देशाने ते दिले आहेत. ह्या पुस्तकात दिलेली माहिती अनेक ग्रंथांतून घेतली आहे. त्यांपैकी काही ग्रंथांची सूची पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे. फा-हियान, ह्यू-एन-त्सँग आणि इ-त्सिंग यांच्या प्रवासमार्गांची नीट कल्पना यावी म्हणून '2500 years of Buddhism' ह्या श्री. पी. व्ही. बापटांनी संपादित केलेल्या ग्रंथातील नकाशा सोबत दिला आहे.

**– मा. शं. मोरे**

## बौद्ध ग्रंथमाला

१) भ. बुद्धांचा मध्यम मार्ग
२) मज्झिम निकाय भाग १
३) मज्झिम निकाय भाग २
४) दीघनिकाय भाग १
५) मज्झिम निकाय भाग ३
६) तीन चिनी प्रवासी

## आगामी

१) दीघनिकाय भाग २
२) दीघनिकाय भाग ३
३) उदान
४) अंगुत्तरनिकाय

# १. फा-हियान

(प्रवासकाळ इ. स. ३९९ ते ४१४)

फा–हियानचा जन्म चीनच्या पिंगयांग प्रदेशातील उचंग येथे झाला. त्याचे पहिले नाव कुंग असे होते. कुंग हा त्याच्या आईवडिलांचे चौथे अपत्य. त्याच्यापूर्वी झालेली त्यांची तीनही मुले लहानपणीच वारली. म्हणून कुंगच्या वडिलांनी कुंग केवळ तीन वर्षांचा असतानाच त्याला भिक्खूसंघाला अर्पण केले होते. भिक्खूसंघाला अर्पण करूनसुद्धा त्याचे वडील, अपत्यप्रेमामुळे, कुंगला आपल्या घरीच ठेवीत असत. पुढे कुंग जेव्हा दहा वर्षांचा झाला तेव्हा तो भयंकर रोगाने आजारी पडला. आजाराने कुंगची अवस्था इतकी चिंतनीय झाली की, त्याच्या वडिलांना त्याच्या जगण्याची काहीच आशा राहिली नाही. तेव्हा घाबरून जाऊन कुंगच्या वडिलांनी कुंगला एका सुप्रसिद्ध बौद्ध विहारात ठेवले. विहारात प्रवेश केल्यावर कुंगच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली आणि काही दिवसातच त्याचा रोग पूर्णपणे बरा झाला. चांगला झाल्यावर कुंगच्या वडिलांनी कुंगला परत घरी चलण्याचा आग्रह केला. परंतु कुंगने त्यांना साफ नकार दिला.

काही दिवसांनी कुंगचे वडील वारले. तेव्हा त्याच्या काकांनी त्याला पुन्हा घरी चलण्याचा खूप आग्रह केला; परंतु तेव्हासुद्धा, कुंगने घरी जाण्याचे साफ नाकारले. तो त्याच्या काकांना म्हणाला की, 'मी माझ्या वडिलांच्या सांगण्यावरून भिक्खूसंघात गेलो नसून, कोणत्या तरी अज्ञात शक्तीच्या प्रेरणेने मला भिक्खूसंघात एकरूप होण्याची इच्छा झाली आहे. हे जीवन माझ्या प्रकृतीला अगदी अनुकूल असे आहे म्हणून आपल्या आज्ञेचे मी पालन करू शकत नाही.' कुंगच्या ह्या उत्तराने त्याच्या काकांना संतोष वाटला आणि ते आपल्या घरी परत गेले. काही दिवसानंतर कुंगची आई निवर्तली. आईच्या मृत्यूची बातमी समजल्यावर कुंग घरी आला आणि आईचा अंत्यसंस्कार करून परत विहारात गेला.

एके दिवशी कुंग आपल्या सहकाऱ्यांबरोबर विहाराच्या शेतातील धान्याची कापणी करीत होता. त्या वेळी तेथे काही लुटारू आले आणि जबरदस्तीने धान्याची लुटालूट करू लागले. कुंगचे साथीदार डाकूंना घाबरून पळून गेले. परंतु कुंग निर्भीडपणे शेतातच उभा राहिला. कुंगला अशा तऱ्हेने एकटा उभा राहिलेला पाहून डाकूंना मोठा अचंबा वाटला आणि ते मोठ्या आश्चर्याने कुंगकडे पाहू लागले.

तेव्हा कुंग त्यांना म्हणाला, 'तुम्हाला धान्य पाहिजे असेल तर ते खुशाल घेऊन जा. दान, इत्यादी सत्कर्माकडे दुर्लक्ष केल्यामुळे तुमची ही अशी दयनीय अवस्था झाली आहे. ती पाहून मला फार वाईट वाटते. परंतु तुम्ही आता जे दुष्कर्म करीत आहात, त्याचे फळ तुम्हाला इतके कष्टदायक होणार आहे की, तुम्ही ते कसे सहन करू शकाल याचीच मला मोठी चिंता वाटते.' इतके बोलून कुंग विहाराच्या दिशेने चालू लागला. कुंगच्या बोलण्याचा त्या लुटारूंच्या मनावर इतका परिणाम झाला की, लुटलेले सर्व धान्य शेतात तसेच ठेवून ते निघून गेले.

'श्रामणेर' अवस्था संपल्यावर कुंगने 'प्रव्रज्या' घेतली. प्रव्रज्या घेतल्यावर त्याचे नाव 'फा–हियान' असे ठेवले गेले. फा–हियानचा अर्थ भारतीय भाषेत 'धर्म-गुरू' असा होतो. 'फा' म्हणजे 'धम्म' आणि हियान' म्हणजे 'आचार्य' म्हणून फा-हियानचा अर्थ 'धम्माचार्य' किंवा 'धम्मगुरू' असा होतो.

## भारतभेटीचा दृढसंकल्प

भिक्खू झाल्यावर फा–हियानने त्रिपिटकाचा अभ्यास सुरू केला. विनयपिटकाचे अध्ययन चालू असताना फा–हियानला दिसून आले की, त्याच्या चिनी अनुवादात फार त्रुटी आहेत. तेव्हा भारतात जाऊन विनयपिटकाची[1] मूळ प्रत आणण्याचा फा–हियानने निर्धार केला. त्याच वेळी व्हे–किंग, ताव-चिंग व्हे–चिंग आणि व्हे-वीई नावाच्या चार भिक्खूंची आणि त्याची भेट झाली. त्या भिक्खूंनी सुद्धा भारतात जाऊन विनयपिटकाचा अभ्यास करण्याचा निश्चय केला होता. साधारणपणे इ. स. ३९९ साली वर सांगितलेल्या सोबत्यांबरोबर फा-हियानने चीनच्या सुप्रसिद्ध चांग-गान या विहारापासून भारताच्या प्रवासास सुरुवात केली. फा-हियानने आपले प्रवासवृत्त थोडक्यात लिहून ठेवले आहे. ते (A Record of the Buddhist Countries") 'बौद्ध देशांचे वृत्तांत' म्हणून प्रसिद्ध आहे. फा–हियानच्या प्रवास-वृत्ताची पुढील माहिती त्याच्या या छोट्या वृत्तांतावरून घेतली आहे.

## वाळवंटातील खडतर प्रवास

चांग–गान येथून निघून लुंगमार्गे फा–हियान कोन–क्वीची येथे आला. तेथे त्याने आपला पहिला वर्षावास केला. वर्षावासानंतर आपल्या चार, साथीदारांसह फा–हियान लिचंग मार्गाने चांगलो पर्वत ओलांडून चांगई येथे पोहोचला. चांगई त्या वेळी चीनची एक सुप्रसिद्ध व्यापारी पेठ होती. चांगईच्या राजाने फा–हियानचा मोठा आदरसत्कार केला. येथे फा–हियानला व्हे–किन, चिहू–येन सांगकिन, सांग्-शाओ आणि पाउयन या नावाचे आणखी पाच चिनी भिक्खू मिळाले. ते सुद्धा भार-

१. त्रिपिटकात १) सुत्तपिटक २) विनयपिटक आणि ३) अभिधम्मपिटक असे तीन मुख्य भाग आहेत.



ताच्या प्रवासास निघाले होते. ज्या रस्त्याने हे सर्वजण भारताकडे निघाले होते तो रस्ता त्या वेळी प्रवासासाठी सुरक्षित नव्हता. तेथे मोठी अंदाधुंदी माजली होती. म्हणून चांगईच्या राजाने त्या चिनी प्रवाशांना पुढे जाऊ दिले नाही. फा-हियानला मोठ्या नाइलाजाने तेथे एक वर्षभर राहावे लागले. एक वर्ष चांगई येथे राहिल्यावर तो तुनव्हेंग येथे आला. त्या प्रांताचा गव्हर्नर लि-हाओ हा होता. त्याने फा–हियानला लोपच्या वाळवंटातून प्रवासासाठी लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा केला. तुनव्हेंग येथे एक महिनाभर राहिल्यावर फा–हियान आपल्या चार साथी-दारांबरोबर वाळवंटातून पुढील प्रवासास निघाला.

वाळवंटातील खडतर प्रवासाचे वर्णन करताना फा–हियान म्हणतो. 'तेथील दुष्ट भुताटकीपासून आणि उष्ण वाऱ्याच्या वादळापासून कोणीही जिवंत राहू शकत नाही. तेथे ना आकाशात उडणारे पक्षी आहेत; ना जमिनीवर चालणारे पशू! क्षितिजापर्यंत दृष्टिक्षेपात फक्त भयाण वाळवंट दिसते. वाटेत अधूनमधून पडलेले हाडांचे सांगाडे मार्ग दाखविण्याचे काम करतात. ते हाडांचे सांगाडे पूर्वी ह्या वाळवंटातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे आणि त्यांच्याबरोबर असलेल्या प्राण्यांचे असावेत.' अशा तऱ्हेने सतरा दिवस अत्यंत खडतर प्रवास करून अंदाजे १५०० ली[1] अंतर तोडल्यावर तो शेनशेन येथे पोहोचला.

शेनशेनचा प्रदेश खडकाळ आणि ओसाड असा होता. तेथील राजाने बुद्ध-धम्म स्वीकारला होता आणि हीनयान पंथांचे तेथे अदाजे ४००० भिक्खू होते. शेन–शेन येथे एक महिना राहिल्यावर त्याने वायव्य दिशेला पंधरा दिवस प्रवास केला व तो 'उए' किंवा 'अग्नि' ह्या देशाला पोहोचला. तेथेसुद्धा हीनयान पंथाचे जवळ जवळ ४००० भिक्खु होते. ते विनयाच्या नियमांचे पालन कडकरीत्या करीत असत. येथे फू—कुंगसन नावाच्या ओव्हरसियरने (उद्देशिकाने) फा–हियानचे दोन महिने आदरातिथ्य केले. उएहून निघून पस्तीस दिवस अग्नेय दिशेने प्रवास केल्यावर तो खोतान येथे पोहोचला. उएपासून खोतानपर्यंतचा फा–हियानचा प्रवास अत्यंत कष्टदायक झाला. फा–हियानने लिहिले आहे की, 'इतके कष्ट क्वचितच एकाद्याला भोगावे लागत असतील.'

## खोतान प्रांत

खोतान हे एक बौद्धांचे प्रमुख स्थान होते. फा-हियानने लिहिले आहे की, हा प्रदेश सर्व दृष्टीने सुखी आणि संपन्न असा आहे. येथील रहिवासी धम्माचे मोठ्या श्रद्धेने पालन करीत असतात. ते श्रमणांचा मनःपूर्वक आदरसत्कार करतात. प्रत्येक घरासमोर एक स्तूप आहे. विहारात चतुःदिशेच्या भिक्खूंना राहण्यासाठी स्वतंत्र खोल्या बांधलेल्या असतात, खोतानच्या राजाने फा–हियानचे स्वागत केले आणि

१. साधारणपणे पाच किंवा सहा 'ली' म्हणजे एक मैल असे प्रमाण आहे.

गोमती नावाच्या विहारात त्याची राहण्याची व्यवस्था केली. हा विहार महायानी पंथाच्या भिक्खूंचा होता. तेथे जवळजवळ तीन हजार भिक्खू राहात होते. जेवणाच्या वेळेला घंटानाद होत असे. जेव्हा भिक्खू भोजनगृहात प्रवेश करीत असत तेव्हा त्यांची मुद्रा धीरगंभीर असे. सर्वत्र शांतता असून तेथे कसल्याच प्रकारचा आवाज होत नसे. जेवताना सर्व भिक्खू मौन पाळीत असत. भोजनगृहात भिक्षापात्रांचा किंवा इतर भांड्यांचासुद्धा आवाज होत नसे. ह्या सात्त्विक भिक्खूंना जेवताना जेव्हा काही लागत असे, तेव्हा ते काहीही न बोलता फक्त हाताने खूण करून मागत असत.

खोताना येथून व्हे-किंग, ताव-चिंग, व्हे-यिंग आणि व्हे-वीई यांनी किंचाच्या दिशेने आपला प्रवास पुढे चालू केला. पण खोतानची रथयात्रा पाहाण्यासाठी फा-हियान खोतान येथे आणखी तीन महिने राहिला. खोतान येथे चौदा मोठे संघाराम आणि अनेक लहान-मोठे विहार होते. चौथ्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून रस्ते झाडून स्वच्छ केले गेले. शहराच्या वेशीच्या दरवाजांवर सुशोभित मंडप उभारले गेले. तेथे राजा आणि राणी आपल्या दासदासींच्या समवेत थांबले होते. राजा महायानी पंथाचा फार आदर करीत असल्यामुळे रथयात्रा सुरू करण्याचा पहिला मान गोमती संघारामात राहणाऱ्या भिक्खूंना मिळाला. चार चाकांच्या रथाची ऊंची तीस फुटापेक्षा जास्त होती. त्याला सप्तधातूंनी मढविलेले होते. रथात रेशमी कपड्यांची आच्छादने पसरली होती आणि वरून रेशमी झालरी लावल्या होत्या. सबंध रथ जणू काही चार चाकांवर फिरणारा राजवाडाच आहे असे वाटत होते! बुद्धरूप रथाच्या मध्यभागी होते. त्याच्या आजूबाजूला बोधिसत्त्व आणि इतर महायानी पंथाच्या देवदेवता होत्या. शहरापासून दोन-तीन ली अंतरापासून रथयात्रा सुरू झाली. वेशीपासून सुमारे शंभर पावलांच्यां अंतरावर जेव्हा रथ आला तेव्हा राजाने आपला राजमुकुट काढून नवीन कपडे घातले. हातात फुले आणि अगरबत्ती घेऊन अनवाणी पायाने चालत जाऊन राजाने बुद्धरूपाचे स्वागत केले. त्याने बुद्धरूपाची आणि इतर मूर्तींची पूजा केली. त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली आणि त्यांच्यासमोर अगरबत्ती लावली. जेव्हा वेशीच्या दरवाजातून रथयात्रा शहरात प्रवेश करू लागली, तेव्हा राणीने आणि तिच्याबरोबर असलेल्या स्त्रियांनी रथावर सर्व प्रकारच्या सुगंधी फुलांचा वर्षाव केला. प्रत्येक विधि—समारंभासाठी निरनिराळ्या प्रकारचा रथ असे. चौथ्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून त्या महिन्याच्या पौर्णिमेपर्यंत दररोज रथयात्रा निघत असे आणि प्रत्येक संघारामाला आपापल्या मूर्तींची रथयात्रा काढण्यासाठी एकेक दिवस नेमून दिलेला असे.

खोतान शहराच्या पश्चिमेला सात किंवा आठ ली अंतरावर असलेला एक संघाराम फा-हियानने पाहिला. त्याला 'राजाचा नवीन संघाराम' असे म्हणत असत. त्याचे बांधकाम सतत ऐंशी वर्षे म्हणजे तेथील राज्यकर्त्यांच्या तीन पिढ्यापर्यंत चालले होते. विहार दोनशे फूट उंच असून त्याच्यावरचे शिल्पकाम अप्रतिम



होते. सोने-चांदी आणि इतर जडजवाहिरांनी तो सुशोभित केला होता. विहारातील सभामंडपाचे खांब, दरवाजे, खिडक्या आणि तुळ्या सोन्याच्या पत्र्याने मढविल्या होत्या. भिक्खूंच्या राहण्याच्या खोल्यासुद्धा इतक्या सुशोभित केल्या होत्या की त्याचे शब्दांनी वर्णन करता येणे शक्य नाही असे फा-हियान म्हणतो. पामीरच्या पूर्वेकडील सहा देशांच्या राजांनी त्यांचे बरेचसे मौल्यवान जडजवाहिर ह्या संघारामाला दान केले होते.

## चालुका ते पामीर

रथयात्रा पाहून झाल्यावर फा-हियान खोतानपासून चाकुकाला गेला. खोतानहून चाकुकाला जाण्यास फा-हियानला पंचवीस दिवस लागले. चाकुकाचा राजा श्रद्धावान बुद्धधम्मीय होता. तेथे महायानी पंथाचे एक हजारापेक्षा जास्त भिक्खू होते. चाकुका येथे पंधरा दिवस राहिल्यावर फा-हियानने दक्षिणेकडे पामीरच्या दिशेने प्रवास सुरू केला. चार दिवसांच्या प्रवासानंतर तो अग्झी येथे पोहोचला. तेथे त्याने आपला तिसरा वर्षावास केला. वर्षावासानंतर उत्तरेकडे पचवीस दिवस प्रवास केल्यावर तो कीचा येथे आला. इथे त्याची व्हे-चिंग आणि इतर साथीदारांची परत भेट झाली. फा-हियान जेव्हा कीचाला पोहोचला, तेव्हा तेथील राजा 'पंचवर्षीय' –म्हणजे बौद्धपद्धतीप्रमाणे पाच वर्षातून एकदा भरविली जाणारी– मोठी धम्मसभा भरवीत होता. 'कीचा येथे एक पिकदान आहे. ते एकदा भगवान बुद्धांनी वापरले होते. त्याचा रंग भगवान बुद्धांच्या भिक्षापात्राच्या रंगासारखाच आहे. येथे भगवान बुद्धांचा एक दात आहे. त्याच्यासाठीच लोकांनी येथे एक स्तूप बांधला आहे. कीचा येथे हीनयानी पंथाचे एक हजारावर भिक्खू आहेत.'- असे फा-हियान लिहितो.

कीचाहून फा-हियान पश्चिमेच्या दिशेने उत्तर जम्बुद्वीपाकडे चालला. पामीरचे पठार ओलांडण्यास त्याला एक महिना लागला. तेथे उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात बाराही महिने बर्फ असते. फा-हियान म्हणतो की, 'हा प्रवास अत्यंत खडतर होता. दहा हजार माणसांतून एखादाच मनुष्य अशा प्रवासातून वाचू शकतो.'

पामीरचे पठार ओलांडल्यावर फा-हियान आणि त्याचे साथीदार उत्तर हिंदुस्थानच्या सीमेला लागून असलेल्या दारदा नावाच्या एका छोट्या देशात पोहोचले. येथील बहुतेक भिक्खू हीनयानी पंथाचे होते. फा-हियानने येथे एक ऐंशी फूट उंचीचा मैत्रेय बोधिसत्त्वाचा लाकडी पुतळा पाहिला.

## सिन्धू नदीचे पार

दारदाहून नैऋत्य दिशेला पंधरा दिवसांच्या प्रवासात त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. पर्वतराजीतून जाणाऱ्या ह्या रस्त्यावर अनेक चढ-उतार होते. चढण इतकी अवघड आणि भीतिदायक होती की, खाली पाहिले असता जवळ–

जवळ दहा हजार हात[1] खोल सरळ भिंतीसारखे खडक दिसायचे. रस्त्याच्या किनाऱ्यावर उभे राहून खाली पाहिले तर डोळे गरगरायला लागायचे. खाली नदी वाहात होती. फा-हियानने ह्या नदीचे नाव 'हिन्तू' असे लिहिले आहे. ह्या सिन्धू नदीची रुंदी तेथे ऐंशी फूट होती. फा-हियानने ही नदी दोरखंडाच्या पुलाच्या साहाय्याने पार केली.

सिन्धू नदी पार केल्यावर फा-हियान उद्यान देशात पोहोचला. फा-हियान म्हणतो, 'उद्यान देश भारताच्या उत्तरेच्या सीमेजवळील भाग आहे. पण तेथील रहिवासी मध्य भारतातील भाषा बोलतात. त्याचप्रमाणे त्यांचे कपडेलत्ते आणि जेवणखाणसुद्धा मध्य देशातील लोकांच्यासारखेच आहे. येथे हीनयान पंथाचे पाचशे संघाराम आहेत. तेथे बाहेरून कोठूनही भिक्खू आला तर त्याचा पाहुणचार तीन दिवस होतो. तिसऱ्या दिवसानंतर त्याला स्वतःची राहण्याची जागा पहावी लागते. असे म्हटले जाते की भगवान बुद्ध येथे आले होते. येथे भगवान बुद्धाची पदचिन्हे आहेत. त्यांच्या दर्शनासाठी खूप लांबून लोक येत असतात.'

## गांधार, तक्षशीला, पेशावर

व्हे-किंग, ताव-चिंग आणि व्हे-यिंग येथून नगरहारा देशाकडे गेले आणि फा-हियानने बाकीच्यांच्याबरोबर उद्यान येथे वर्षावास केला. वर्षावासानंतर फा-हियान सुवस्तु देशात गेला. ह्या ठिकाणी पूर्वीच्या जन्मी शुक्राने बोधिसत्त्वाची परीक्षा घेण्यासाठी बहिरी ससाण्याचे आणि कबुतराचे रूप घेतले होते आणि कबुतराचा जीव वाचविण्यासाठी बुद्धांनी स्वतःची मांडी कापून बहिरी ससाण्याला दिली होती.[2] येथील लोक बुद्धधम्माचे श्रद्धापूर्वक पालन करीत असत. येथून पूर्वेच्या दिशेने पाच दिवस प्रवास केल्यावर फा-हियान गांधार देशात पोहोचला. त्यावेळी सम्राट अशोकाचा वंशज धर्मवर्धन इथे राज्य करीत होता. बोधिसत्त्वाने ज्या ठिकाणी आपले डोळे काढून दान केले होते,[3] तेथे लोकांनी एक मोठा स्तूप बांधला होता. येथील बहुतेक लोक हीनयान पंथाचे पालन करीत होते.

येथून पूर्व दिशेला सात दिवस प्रवास केल्यावर ते 'तक्षशीरा' किंवा 'तक्षशीला' येथे पोहोचले. तक्षशीर म्हणजे शिरच्छेद. पूर्वीच्या जन्मी बोधिसत्त्वाने आपले शीर इथे दान केले होते,[4] म्हणून ह्या शहराला तक्षशीरा असे नाव पडले. पुढे दोन दिवस प्रवास केल्यावर ज्या ठिकाणी बोधिसत्त्वाने आपले शरीर भुकेलेल्या वाघाला खाण्यासाठी दिले होते,[5] त्या ठिकाणी फा-हियान पोहोचला. ह्या दोन्ही ठिकाणी मोठ मोठे स्तूप बांधलेले होते. राजे, महाराजे, मंत्री अधिकारी आणि

१. फा-हियानने येथे 'चौऊ' हा शब्द वापरला आहे. चौऊ म्हणजे हाताच्या कोपरापासून मधल्या बोटापर्यंतचे अंतर.

२. ते ५. हे सर्व संदर्भ जातक कथांतील आहेत.



सामान्य लोक या स्तूपांना आदरांजली वाहण्यासाठी नेहमी येत असत.

गांधारापासून दक्षिणेकडे चार दिवस प्रवास केल्यावर पुरुषपूर म्हणजे पेशावर येथे पोहोचला. फा-हियान म्हणतो, 'जेव्हा बुद्ध आपल्या शिष्यांबरोबर येथून चालले होते तेव्हा आनंदाला म्हणाले, माझ्या परिनिर्वाणानंतर कनिष्क नावाचा राजा इथे स्तूप बांधील. सम्राट कनिष्काने येथे चारशे फूट उंचीचा भव्य स्तूप बांधला आहे.' फा-हियानने आतापर्यंत पाहिलेल्या स्तूपात कोणताच स्तूप कनिष्काने बांधलेल्या स्तूपाची भव्यतेत बरोबरी करू शकत नव्हता. असे म्हटले जाते की, 'सर्व जम्बुद्वीपात[1] हा स्तूप भव्य आणि सुंदर आहे,' असे फा-हियानने नमूद केले आहे.

तथागताच्या पेशावर येथील भिक्षापात्रासंबंधी फा-हियान म्हणतो, 'भगवान बुद्धांचे पवित्र भिक्षापात्र[2] पुरुषपूर येथे आहे. येथे अंदाजे सातशे भिक्खू आहेत. दुपारच्या भोजनाच्या वेळी ते तथागताचे भिक्षापात्र बाहेर काढीत. त्या वेळी उपासक त्या भिक्षापात्राला श्रद्धेने आपली आदरांजली अर्पण करीत. संध्याकाळी परत ते भिक्षापात्र बाहेर काढले जाई, त्या वेळी त्याच्यासमोर अगरबत्ती पेटवून उपासक आपला आदर व्यक्त करीत असत. ह्या पात्रात अंदाजे दोन 'पेक' पदार्थ राहू शकतील. ते प्रामुख्याने काळ्या रंगाचे असून इतर अनेक रंगही त्यात दिसतात. एकावर एक असलेले त्या पात्राचे चारही थर[3] स्पष्ट दिसतात. जाडीला ते साधारणपणे एक पंचमांश इंच आणि दिसण्यात ते तेजस्वी दिसते.

तथागताच्या पवित्र भिक्षापात्राची पूजा केल्यावर पाउ-यन, सांग-गीन आणि चिह-येन चीन देशाला परत गेले. व्हे-किंग येथे आजारी पडला. त्याची शुश्रूषा करण्यासाठी ताव-चिंगला मागे ठेवून फा-हियान भगवान बुद्धाच्या कपोलधातूचे

१. पूर्वीच्या काळी असे मानले जाई की सर्व जग चार भागात विभागले गेले आहे. दक्षिणेचा भाग म्हणजे जम्बुद्वीप.

२. फा-हियानच्या प्रवासवर्णनावरून असे समजते की, सम्राट कनिष्कानंतर युहशे नावाच्या कोणी विदेशी (शक किंवा हून) राजाने हे भिक्षापात्र येथून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला होता. त्याने एक मोठा हत्ती सजवून त्याच्यावर मोठ्या समारंभाने ते पवित्र भिक्षापात्र ठेवले. पण हत्तीने एक पाऊलसुद्धा पुढे टाकले नाही. तो हत्ती आपले गुढगे टेकून खाली बसला. नंतर त्या राजाने चार चाकांच्या रथात त्या भिक्षापात्राला ठेवले आणि त्या रथाला आठ हत्ती जोडले. परंतु रथाला जोडलेले ते आठही हत्ती पुढे जाईनात. ह्या घटनेत राजा फार खजील झाला आणि तेथेच एक संघाराम स्तूप बांधला.

३ संबोधि ज्ञान प्राप्त झाल्यानंतर चार दिक्पालांनी दिलेली भिक्षापात्रे एकात एक ठेवून तपस्सू आणि भल्लिक ह्या व्यापाऱ्यांनी दिलेले अन्न तथागतांनी सेवन केले. येथे उल्लेख केलेले भिक्षापात्राचे चार थर त्या संदर्भातील आहेत.

दर्शन करण्यासाठी पुढे गेला.

पश्चिम दिशेला सोळा योजने[1] प्रवास केल्यावर फा-हियान नगरहारा देशाच्या सीमेवरील हिल्लो नावाच्या शहरात पोहोचला. तथागतांच्या कपोलधातूचे वर्णन करताना तो म्हणतो, 'ह्या शहरात भगवान बुद्धाच्या कपोलधातूचे चैत्यगृह आहे. ते सर्व सुवर्ण आणि सप्तधातूंनी सुशोभित केले आहे. येथील राजाने तथागतांच्या कपोलधातूबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे आणि तो चोरीला जाण्याच्या भीतीमुळे त्याच्या सुरक्षिततेसाठी आठ विश्वासू माणसांची नेमणूक केली आहे. त्या प्रत्येकाच्या जवळ त्याचे स्वतःचे सील आहे. दररोज पहाटे चैत्यगृहाचे दरवाजे उघडण्याच्या अगोदर ही आठ माणसे त्या चैत्यगृहाचे दरवाजे आणि त्यांना त्यांनी लावलेली सीले व्यवस्थित आहेत की नाहीत हे पाहतात. दरवाजे उघडल्यावर ते आपले हात सुवासिक पाण्याने धुतात आणि नंतर तथागतांचा कपोलधातू चैत्यातून बाहेर काढून एका उंच आसनावर ठेवतात. तथागतांच्या कपाळाचे हाड फिक्कट पिवळ्या रंगाचे आहे. रुंदीला साधारणपणे चार इंच असून डोक्याच्या बाजूला ते भव्य आहे. ते एका वर्तुळाकार करंडकात ठेवले आहे. करंडक मोती आणि इतर मौल्यवान जडजवाहिरांनी सुशोभित केलेला आहे. प्रत्येक दिवशी जेव्हा तथागतांचा कपोलधातु बाहेर काढला जाई तेव्हा त्या चैत्यगृहातील लोक तेथील उंच मनोऱ्यावर चढत आणि मोठा नगारा, शंख आणि झांज वाजवीत. राजा आणि इतर लोक दिवसाची कामे सुरू करण्यापूर्वी प्रथम कपोलधातूचे दर्शन घेत. चैत्यगृहाच्या दरवाजासमोर फुले, अगरबत्ती वगैरे विकणारे लोक आहेत. ज्यांना कपोलधातूला फुले अर्पण करावयाची आहेत किंवा अगरबत्ती लावायची आहे ते ती येथून विकत घेत. चैत्यगृहातील दागोबा साधारणपणे पाच फूट उंच आहे. त्याला दरवाजा असून त्यात कपोलधातू ठेवला जाई. चैत्यगृह चाळीस पावले लांब आणि चाळीस पावले रुंद आहे.'

उत्तरेच्या दिशेने एक योजनाचे अंतर चालून गेल्यावर फा-हियान नगरहारा देशाच्या राजधानीच्या शहरात पोहोचला. येथे पूर्वी बोधिसत्त्वाने दीपंकर बुद्धाला अर्पण करण्यासाठी पाच फुले आणि सुवर्ण नाणी विकत घेतली होती. तेथे तथागताच्या एका दाताचा स्तूप होता. त्याची पूजाअर्चा तथागतांच्या कपोलधातूप्रमाणेच होत असे, असे फा-हियान म्हणतो.

येथून ईशान्य दिशेला एक योजनाचा प्रवास केल्यावर ज्या चैत्यगृहात भगवान बुद्धाची काठी[2] ठेवली होती त्या चैत्यगृहात फा-हियान आला. ही काठी गोशीर्ष चंदनाच्या[1] लाकडाची बनविली होती. सोळा किंवा सतरा फूट लांबीच्या लाकडी

१. जंबुद्वीपातील अंतर योजनाच्या परिमाणात दिले आहे. सैन्याच्या एका दिवसाच्या चालण्याच्या अंतराला 'योजन' असे म्हणतात. पण बौद्धग्रंथात एक योजनाचे अंतर साधारणपणे पाच मैलांचे आहे.

२. हा बहुतेक मानदंड असावा.



पेटीत सुरक्षित ठेवली होती. पुढे चार दिवसांचा प्रवास केल्यावर फा-हियानच्या ठिकाणी तथागतांचे संघाटीवस्त्र ठेवले होते त्या संघारामात आला. फा-हियानच्या प्रवासवर्णनावरून त्या संघारामाच्या आजूबाजूला अंदाजे एक हजार स्तूप बांधले होते.

नगरहारामध्ये हिवाळा घालविल्यावर फा-हियान आणि त्याचे दोन साथीदार दक्षिण हिमालय पर्वत ओलांडून जाऊ लागले. तेथे हिवाळ्यात तसेच उन्हाळ्यातसुद्धा बर्फ असते. वाटेत बर्फाच्या वादळाच्या तडाख्यात ते सापडले. कडाक्याची थंडी असह्य होऊन व्हे-चिंगच्या तोंडातून पांढरा फेस येऊ लागला. 'तुम्ही पुढे जा. माझा अंतःकाळ जवळ आला आहे.' असे म्हणून तेथेच तो मृत्यू पावला. फा-हियानने आणि त्याच्या साथीदाराने व्हे-चिंगची तेथे अंतक्रिया केली आणि ते हिमालयाची दक्षिण पर्वतमाला पार करून लोई किंवा लक्की प्रदेशात पोहोचले. तेथे हीनयान पंथाचे तीन हजार भिक्खू होते. पूर्व दिशेला तीन दिवस प्रवास केल्यावर त्यांनी सिन्धू नदी परत पार केली आणि ते उच्छा नावाच्या प्रदेशात आले. तेथे बुद्ध धम्म उर्जितावस्थेत होता. पुढे अग्नेय दिशेला आठ योजने प्रवास केल्यावर ते मथुरा देशात पोहोचले. वाटेत त्यांना अनेक संघाराम आणि हजारो भिक्खू भेटले.

मथुरेला यमुना नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर वीस संघाराम आणि अंदाजे तीन हजार भिक्खू होते. फा-हियान आपल्या प्रवास वर्णनात लिहितो की, 'भारतात आतापर्यंत भेटलेले सर्वच राजे बुद्ध धम्माला श्रद्धापूर्वक मानणारे होते. भिक्खूंना दान देताना ते आपला राजमुकुट काढीत, मंत्र्यांच्या आणि राजघराण्यातील व्यक्तिंच्या समवेत ते स्वतःच्या हाताने भिक्खूंना जेवण वाढीत आणि मुख्य भिक्खूच्या शेजारी खाली गालिच्यावर बसत असत. भिक्खूच्या समोर ते आसनावर बसत नसत. तथागतांच्या काळापासून भारतात ही प्रथा चालत आली आहे.' मध्यदेशाचे वर्णन करताना फा-हियान म्हणतो, 'दक्षिणेकडील देशाला मध्यदेश[2] असे म्हणतात. येथील हवामान सम आहे. येथे बर्फ किंवा अति कडाक्याची थंडी पडत नाही. लोक सुखी आणि समाधानी आहेत. त्यांना दरडोई कर भरावा लागत नाही. तसेच राज्यकर्त्यांकडून त्यांच्यावर कसलेच बंधन घातले जात नाही. जे सरकारी जमीन पेरतात त्यांनाच शेतसारा भरावा लागतो. लोकांना वाटेल त्या प्रदेशात जाण्याचे किंवा वाटेल तेथे राहण्याचे स्वातंत्र्य आहे. राज्यात फाशीची शिक्षा दिली जात नाही. गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे शिक्षा दिली जाते. जे राजद्रोह करतात त्यांचा फक्त उजवा हात कापला जातो. राजाचे सेवक, रक्षक आणि आश्रित यांना पगार-पेन्शन मिळते. ह्या देशातील लोक हिंसा करीत नाहीत; दारू

१. उत्तम चंदनाच्या लाकडाला गोशीर्ष चंदन असे व्यापारी नाव होते.

२. मध्य देश किंवा मज्झिम देश म्हणजे बिहार, पूर्व उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश. तथागतांनी धम्मज्ञान देण्यासाठी जेथे जास्तीत जास्त काळ घालविला तो प्रदेश.

पीत नाहीत; त्याचप्रमाणे लसूण-कांदा खात नाहीत. ह्याला फक्त एकच अपवाद आणि तो म्हणजे चांडाळांचा. ते 'दुष्ट माणसे' म्हणून ओळखले जातात. त्यांना इतरांपासून दूर वेगळे ठेवले जाते. जेव्हा ते शहरात किंवा बाजारात प्रवेश करतात तेव्हा आपण आलो आहोत हे दुसऱ्यांना समजण्यासाठी लाकडाची काठी आपटून आवाज करतात. अशा तऱ्हेने लोक त्यांना टाळू शकतात. ह्या देशात डुकरे किंवा कोंबड्या पाळल्या जात नाहीत आणि जिवंत प्राणी विकले जात नाहीत. बाजारात दारू विकणारे किंवा मांस विकणारे लोक नाहीत. देवाण-घेवाण करताना कवड्यांचा उपयोग चलनी नाणे म्हणून केला जातो. फक्त चांडाळ, कोळी आणि शिकारी मांस विकतात.

तथागताच्या महापरिनिर्वाणानंतर राजे, श्रेष्ठी, आणि इतर उपासकांनी भिक्खूसाठी विहार बांधले आणि त्या विहारांना शेतजमिनी, बागा, शेतात काम करण्यासाठी शेतकरी आणि जनावरे दान केली. जमिनीचे दस्तऐवज लोखंडी पत्र्यावर कोरले गेले आणि ते राजाच्या एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत असे वंशपरंपरेने हस्तांतरीत केले गेले. ही दानपत्रे नष्ट करण्यास कोणीच धजत नसल्याने अजूनपर्यंत व्यवस्थित आहेत. भिक्खू निवासात चारपाई, बिछाने, पिण्याचे पाणी जेवणखाण्याची व्यवस्था, चीवरे, इत्यादींचा पुरवठा केला जातो. त्यामुळे भिक्खूला कशाचीही उणीव भासत नाहीत. असे सर्वच भिक्खू निवासात आहे. भिक्खू आपला वेळ शीलाचे आचरण करण्यात, धम्मग्रंथांचा अभ्यास करण्यात आणि ध्यान करण्यात घालवितात.

प्रत्येक भिक्खू निवासाजवळ सारिपुत्र, मौद्गलायनम, आनंद त्याचप्रमाणे अभिधम्म, विनय आणि धम्मसूत्रांचे स्तूप बांधलेले आहेत. वर्षावासानंतर एक महिन्याने सर्व उपासक भिक्खूंना दान देण्यासाठी जमतात. भिक्खू त्यांना धम्मज्ञान देतात. धम्मसभा संपल्यावर उपासक सारिपुत्राच्या स्तूपाला फुले अर्पण करतात आणि अगरबत्ती लावतात. सारिपुत्राच्या, मौद्गलायनाच्या आणि काश्यपाच्या जीवनातील प्रसंगावर आधारीत नाटके दाखविली जातात.

बहुतेक भिक्खुणी आनंदाच्या स्तूपाला आदरांजली वाहत, कारण आनंदाच्या आग्रहावरूनच तथागतांनी स्त्रियांना संघात प्रवेश देण्याची अनुमती दिली होती. बहुतेक श्रामणेर राहुलाच्या स्तूपाला आदरांजली देत असत. महायानी पंथांचे उपासक प्रज्ञा पारमिता, मंजुश्री आणि अवलोकितेश्वराला आपली आदरांजली अर्पण करीत. आदरांजली देण्याच्या उत्सवाचे दिवस प्रत्येकासाठी नियुक्त केलेल्या वर्षातील ठराविक दिवशी असत.

## तावतिंस

सिन्धू नदी पार केल्यावर दक्षिणेकडे चाळीस ते पन्नास हजार ली अंतरावर समुद्र आहे आणि हा सर्व प्रदेश सपाट आहे. त्यात मोठे मोठे पर्वत नाहीत किंवा



मोठ-मोठ्या नद्या नाहीत. त्या प्रदेशातून फक्त लहान नद्या नाले वाहतात. मथुरेपासून दक्षिणेकडे अठरा योजने चालून गेल्यावर आपल्या आईला तीन महिने धम्म शिकवून तावतिंस स्वर्गातून ज्या ठिकाणी भगवान बुद्ध उतरले तो संकाश्य प्रदेश लागतो. ज्या ठिकाणी तावतिंस लोकांतून भगवान बुद्ध उतरले होते त्या ठिकाणी सम्राट अशोकाने एक चैत्यगृह बांधले आहे आणि त्यात सोळा फूट उंचीचे बुद्धरूप ठेवले आहे. चैत्यगृहाच्या जवळच अशोकाने बांधलेला तीस हात उंचीचा एक स्तंभ आहे. त्याच्यावर सिंहाची आकृती आहे. स्तंभ काचेसारखा चकचकीत दिसतो. त्याच्या चारही बाजूंना बुद्धाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. ह्या ठिकाणी हीनयानी पंथाचे आणि महायानी पंथाचे मिळून एक हजार भिक्खू आणि भिक्खुणी आहेत ते भोजन एकत्र घेतात. येथील जमीन कसदार असून लोक कल्पनेपेक्षा जास्त सुखी-समाधानी आहेत. येथे पाहुण्यांचे चांगले आदरातिथ्य केले जाते.

संकाश्यपासून पन्नास योजने उत्तरेकडे अग्निदग्ध नावाचे चैत्यगृह आहे. अग्निदग्ध हा एक दुष्ट मनुष्य होता. त्याचे तथागतांनी परिवर्तन केले. पुढे तो अर्हत झाला. ह्या ठिकाणी शंभर लहान लहान स्तूप आहेत. त्याची मांडणी अशी आहे. की प्रयत्न करूनसुद्धा ते नीट मोजता येत नाही. येथे दुसरा एक संघाराम आहे. त्या ठिकाणी सहाशे ते सातशे भिक्खू राहतात. ह्या ठिकाणी एका प्रत्येक बुद्धाची[1] निर्वाणास जाण्याची जागा आहे. तेथे वर्षावास केल्यावर फा–हियानने आग्नेय दिशेस सात योजने प्रवास केल्यावर तो कान्यकुब्ज (कनौज) शहरात पोहोचला. तो म्हणतो, 'हे शहर गंगानदीच्या किनाऱ्यावर आहे. त्यात हीनयानी पंथाचे दोन संघाराम आहेत. शहराच्या पश्चिमेला सहा किंवा सात ली अंतरावर गंगानदीच्या उत्तर किनाऱ्यावर तथागतांनी धम्मप्रवचने दिल्याची जागा आहे. असे म्हटले जाते की, तथागतांनी येथे अनित्यता आणि दुःख ह्या विषयावर प्रवचने केली होती आपले जीवन पाण्यावर उद्भवलेल्या बुडबुड्याप्रमाणे किंवा फेसाप्रमाणे क्षणभंगूर आहे असे तथागतांनी त्या प्रवचनात सांगितले होते.

## श्रावस्तीचे दर्शन

गंगा नदी पार करून दक्षिणेकडे तीन योजने प्रवास केल्यावर फा–हियान हरि नावाच्या एका खेड्यात पोहोचला. तेथे ज्या ठिकाणी तथागतांनी प्रवचने केली. ज्या ठिकाणी ते संक्रमण करीत असत आणि ज्या ठिकाणी ते बसत असत त्या त्या ठिकाणी लोकांनी स्तूप बांधले होते.

पुढे दक्षिणेकडे दहा योजने प्रवास केल्यावर फा–हियान वैशाख देशात आला आणि तेथून ईशान्य दिशेला आठ योजने प्रवास केल्यावर तो कोशल देशातील

---

१. जे स्वतः प्रयत्न करून बुद्ध होतात पण जे दुसऱ्यांना मार्गदर्शन करू शकत नाहीत त्यांना प्रत्येक बुद्ध म्हणतात. असे अगणित प्रत्येक बुद्ध आहेत.

श्रावस्ती येथे पोहोचला. श्रावस्तीचे वर्णन करताना फा–हियान म्हणतो, 'श्रावस्तीची वस्ती विरळ आहे. येथे अंदाजे फक्त दोनशे कुटुंबे राहतात. एके काळी ही नगरी प्रसेनजीत राजाची राजधानी होती. पूर्वी ज्या ठिकाणी महाप्रजापतीचा विहार होता, त्या ठिकाणी आणि सेठ सुदत्ताच्या (अनाथपिंडकाच्या) घराच्या जागेवर स्तूप बांधले आहेत. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी अंगुलीमालाला अर्हतपद प्राप्त झाले, त्या ठिकाणावर आणि जेथे त्याला निर्वाण प्राप्त झाले त्या ठिकाणावर स्तूप बांधले आहेत. एकदा द्वेषाने पेटून पाखंडी ब्राह्मणांनी ही जागा नष्ट करण्याचे ठरविले. पण मोठी मेघगर्जना होऊन गडगडाट झाला आणि विजा चमकू लागल्या. त्यामुळे घाबरून जाऊन त्यांनी आपला बेत रहित केला.

शहराच्या दक्षिण वेशीच्या दरवाजापासून १२०० पावलांवर रस्त्याच्या पश्चिम बाजूस सेठ सुदत्ताने बांधलेला विहार आहे. त्याचा दरवाजा पूर्वेकडे आहे. त्या दरवाजासमोर दोन दगडी स्तंभ आहेत. डाव्या हाताच्या स्तंभावर धम्मचक्र आहे आणि उजव्या हाताच्या स्तंभावर वृषभाची आकृती आहे. समोरच्या तलावातील पाणी स्वच्छ आहे. झाडेझुडपे भरपूर आणि हिरवीगार आहेत. रंगीबेरंगी फुलांमुळे ती जागा अत्यंत मनोहर अशी वाटते. हे स्थळ म्हणजेच जेतवन विहार होय!

जेव्हा भगवान बुद्ध त्यांच्या आईला धम्मप्रवचन देण्यासाठी तावतिंस स्वर्गात नव्वद दिवसांसाठी गेले होते, तेव्हा प्रसेनजीत राजाने भगवान बुद्धांच्या दर्शनासाठी लागलेल्या आतुरतेमुळे भगवान बुद्धांचे रूप गोशीर्ष चंदनाच्या लाकडात करवून घेतले आणि ज्या आसनावर भगवान बुद्ध बसत असत तेथे ते ठेवले. तथागतांचे बनविलेले हे पहिले बुद्धरूप होते त्या बुद्धरूपाचीच नक्कल नंतरच्या पिढ्यांनी केली आहे.

मूळचे जेतवन विहार सात मजली आहे. निरनिराळ्या देशांतील राजेमहाराजांनी आणि उपासकांनी येथे रेशमी कपड्यांच्या झालरी लावून, फुले वाहून आणि पणत्या पेटवून आपापली आदरांजली अर्पण केली आहे. येथे रात्रंदिवस पणत्या जळत असतात. एकदा एका उंदराने पणतीतील जळती वात आपल्या तोंडात धरून पळविली. त्यामुळे आग लागून मूळचा सात मजली विहार आगीत भस्मसात झाला. त्या आगीत तथागतांची चंदनाची मूर्तीसुद्धा भस्मसात झाली असली पाहिजे असे तेथे जमलेल्या उपासकांना वाटून ते खूप दुःखी झाले. पण चारपाच दिवसांनंतर जेव्हा त्यांनी विहाराच्या पूर्वेच्या दालनात प्रवेश केला, तेव्हा चंदनाची तथागतांची मूर्ती सहीसलामत वाचली आहे, हे पाहून त्यांना अतिशय आश्चर्य आणि आनंद वाटला. नंतर सर्वांनी मिळून जेतवनात नवीन दोन मजली विहार बांधला आणि तेथे त्या बुद्धरूपाची प्रतिष्ठापना केली.

## जेतवनात आगमन

जेतवन विहारात आल्यावर फा–हियानला आणि तावो–चेनला भगवान



बुद्धांनी तेथे पंचवीस वर्षावास केले होते, याची आठवण झाली आणि आपण इतक्या दूरच्या देशात जन्मल्याबद्दल वाईट वाटले. अनेक देशांतून त्यांच्याबरोबर प्रवास करीत असलेल्या प्रवाशांपैकी काही आपल्या मायदेशी परत गेले होते आणि काही प्रवास करीत असतानाच रस्त्यात मरण पावले होते. ज्या ठिकाणी पूर्वी तथागतांचे वास्तव्य होते, त्या ठिकाणाकडे पाहून आणि आता तेथे बुद्ध नाहीत ह्याची जाणीव होऊन, त्यांचे हृदय दुःखाने भरून आले. पुढे फा–हियान म्हणतो, 'जेतवन विहाराच्या नैऋत्येला चार ली अंतरावर एक छोटे जंगल आहे. त्याचे नाव 'चक्षु प्राप्ती' असे आहे. येथे भगवान बुद्धानी केलेल्या प्रवचनामुळे पाचशे अंधांना दृष्टी प्राप्त झाली होती. जेतवनात राहाणारे भिक्खू ध्यान करण्यासाठी बऱ्याच वेळेला येथे जात असतात. जेतवन विहाराच्या ईशान्य दिशेला सहा–सात ली अंतरावर विशाखाने भगवान बुद्धासाठी आणि भिक्खूसाठी बांधलेल्या विहाराची जागा आहे. त्या विहाराचे अवशेष अजूनही पाहावयास मिळतात. जेतवन विहाराची बाग विस्तृत आहे. त्या बागेला पूर्वेकडे एक आणि उत्तरेकडे एक असे दोन भव्य प्रवेशद्वारे आहेत. तथागतांनी येथे राहावे म्हणून ह्या बागेतील जागेत सोन्याची नाणी पसरून ती जागा अनाथ पिंडकाने विकत घेतली होती. येथेच पाखंडी लोकांनी तथागतांना बदनाम करण्यासाठी सुंदरीचा खून केला होता.

जेतवन बागेच्या पूर्व दरवाजाच्या उत्तरेस सत्तर पावलांवर रस्त्याच्या पश्चिमेच्या बाजूस एक जागा आहे. तेथे भगवान बुद्धांनी शहाण्णव पाखंडी पंथांच्या अनुयायांबरोबर चर्चा केली होती. हा वाद ऐकण्यासाठी राजा, त्याचे प्रधानमंडळ आणि उपासक जमले होते. त्या वेळी चिंचा नावाची एक स्त्री तेथे आली. तिने आपण गरोदर आहोत असे दाखविण्यासाठी आपल्या पोटावर कपडे बांधले होते. सभेसमोर येऊन ती भगवान बुद्धांना दोष देऊ लागली. पण त्याच वेळी तिच्या पोटावर बांधलेले कपडे सुटले आणि अशा तऱ्हेने ती जिवंत नरकात गेली. त्याच ठिकाणी भगवान बुद्धांना मारण्यासाठी देवदत्ताने आपली नखे विषारी केली होती. नंतरच्या पिढ्यांनी ह्या सर्व जागांवर स्तूप बांधले आहेत. भगवान बुद्धांनी ज्या ठिकाणी पाखंड्यांशी चर्चा केली होती, त्या ठिकाणी एक साठ फूट उंचीचे चैत्यगृह बांधले आहे. त्या चैत्यगृहात पद्मासनातील मुद्रेत एक बुद्धरूप आहे. रस्त्याच्या पूर्वेला ब्राह्मण पाखंड्यांनी बांधलेले अंदाजे साठ फूट उंचीचे देवालय आहे. त्याला 'छायागत' असे नाव आहे.

जेतवनाच्या आजूबाजूला अठ्याण्णव संघाराम आहेत त्यांतील सत्याण्णव संघारामात भिक्खू राहतात. मध्यदेशात पाखंड्यांचे शहाण्णव पंथ आहेत. वर्तमानकाळाबरोबर भविष्यकाळाचेही त्यांना ज्ञान आहे असा त्यांचा दावा आहे. पाखंड्यांचे अनुयायीसुद्धा भिक्षा मागतात पण ते भिक्षापात्र वापरीत नाहीत. तेसुद्धा सत्कृत्ये करतात. प्रवाशांसाठी विश्रांतिस्थाने बांधतात आणि तेथे त्यांच्या जेवण्याची, राहाण्याची इत्यादी व्यवस्था करतात. पण सत्कृत्ये करण्यात त्यांचे उद्दिष्ट बौद्धांच्या-

सारखे नसते.

तेथे देवदत्ताच्या पंथाचेसुद्धा काही अनुयायी आहेत. ते पूर्वीच्या तीन बुद्धांना[1] मानतात पण शाक्यमुनी बुद्धांना मानीत नाहीत.

## कपिलवस्तूकडे प्रयाण

श्रावस्ती शहराच्या आग्नेय दिशेला पन्नास ली अंतर प्रवास केल्यावर फा-हियान ताडवा नावाच्या गावी पोहोचला. येथे काश्यप बुद्धाचा जन्म झाला होता. त्याच्या जन्मस्थळी आणि निर्वाणस्थळी त्याचप्रमाणे जेथे त्याच्या वडिलांची भेट झाली होती त्या ठिकाणी स्तूप बांधलेले होते.

'श्रावस्तीपासून आग्नेय दिशेला बारा योजनांचा प्रवास केल्यावर नापिका नावाचे गाव लागते. तेथे ऋकूचंद बुद्धांच्या जन्माच्या जागेवर आणि निर्वाणाच्या जागेवर असलेले स्तूप आणि विहार, त्याचप्रमाणे उत्तरेकडे एक योजनाच्या अंतरावर कनकमुनीबुद्ध जेथे जन्मले होते आणि जेथे त्यांना निर्वाण मिळाले तेथील स्तूप त्याने पाहिले. त्याच्या पूर्वेला एक योजनापेक्षा कमी अंतर प्रवास केल्यावर फा-हियान कपिलवस्तू शहरात पोहोचला. कपिलवस्तूचे वर्णन करताना तो म्हणतो,' ह्या शहराला कोणी राजा नाही किंवा प्रजा नाही. कारण ह्या शहरात काहीच वस्ती राहिलेली नाही. येथे फक्त काही भिक्खू आणि उपासकांची थोडी कुटुंबे राहतात. शुद्धोदन राजाच्या राजवाड्याच्या भग्नावशेषात एका राजपुत्राच्या आईची मूर्ती आहे. त्या मूर्तीत राजपुत्र पांढऱ्या हत्तीवर बसून त्याच्या आईच्या कुशीत प्रवेश करीत आहे असे दाखविले आहे. ज्या ठिकाणी असीतमुनींनी राजपुत्राला पाहिले त्या ठिकाणी; आनंद आणि इतरांच्या मदतीने ज्या ठिकाणी राजपुत्राने हत्तीला खाली आणले त्या ठिकाणी; तसेच बोधप्राप्ती झाल्यावर ज्या ठिकाणी भगवंतांनी आपल्या वडिलांची भेट घेतली त्या ठिकाणी स्तूप बांधलेले आहेत. जेथे पाचशे शाक्यांनी उपालीला प्रणिपात केला, जेथे प्रजापती गौतमीने संघाटी प्रदान केली, जेथे विरूढकाने शाक्यांचे निर्मूलन केले, त्या सर्व ठिकाणी स्तूप बांधलेले आहेत. शुद्धोदनाच्या शेतात नांगरणी चालू असता झाडाखाली जेथे राजकुमार ध्यान लावून बसला होता, ते शेत शहराच्या ईशान्य दिशेला काही ली अंतरावर आहे. शहराच्या पूर्व दिशेला पन्नास ली अंतरावर लुम्बिनी बाग आहे. ह्या बागेतील तलावात राणी न्हाण्यासाठी उतरली होती. न्हाऊन झाल्यावर तलावाच्या उत्तरेकडून ती वर आली, अंदाजे वीस पावले चालली आणि एका झाडाची डहाळी पकडत असता तिने राजपुत्राला जन्म दिला. त्या वेळी तिचे तोंड पूर्वेकडे होते.' ज्या ठिकाणी कुमार सात पावले चालला आणि जेथे दोन नागराजांनी त्याला न्हाऊ घातले, ती सर्व स्थळे फा-हियानने पाहिली. 'तेथे एक विहीर खांदली आहे. भिक्खू त्या विहिरीचे आणि त्या तलावाचे पाणी पितात,' असे तो म्हणतो. पुढे फा-हियान म्हणतो की, 'कपिलवस्तूचा प्रदेश निर्जन झाला आहे. पांढऱ्या हत्तींमुळे आणि सिंहाच्या भीतीमुळे येथून फारच थोडे लोक प्रवास करतात.'

## रामग्रामचा स्तूप

तथागतांच्या जन्मस्थानापासून पूर्वेला पाच योजने प्रवास केल्यावर रामग्रामचा प्रदेश लागतो. त्या देशाच्या राजाने तथागतांच्या रक्षेचा एक भाग मिळविला होता आणि परत आल्यावर त्याने रामग्रामला त्या रक्षा ठेवण्यासाठी एक भव्य स्तूप बांधला होता. एक नागराजा ह्या स्तूपाची पूजा आणि रक्षण करीत असे. सम्राट अशोकाने आठही स्तूप तोडून ८४,००० नवीन स्तूप करण्याचे ठरविले होते. सात स्तूप तोडल्यावर तो रामग्रामचा आठवा स्तूप तोडण्याच्या उद्देशाने रामग्रामला आला, तेव्हा नागराजाने पूजेचे कलश आणि इतर पात्रे सम्राट अशोकाला दाखविली आणि म्हटले, 'जर तुझे पूजेचे साहित्य ह्यांच्यापेक्षा सुंदर असेल तर हा स्तूप नष्ट करून तू ते घेऊन जाऊ शकतोस. सम्राट अशोकाने पाहिले की ते कलश खरोखरच अप्रतिम आहेत. रामग्रामचा स्तूप नष्ट न करता तो तसाच परत गेला.

एके दिवशी परदेशाचा एक भिक्कू त्या स्तूपाच्या दर्शनासाठी तेथे आला. तेव्हा तेथे एक हत्तींचा कळप येत होता. हत्तींना पाहून भयभीत होऊन तो एका झाडाच्या आड लपला. पण जेव्हा त्याने हत्तींनी त्या स्तूपाला वंदन केलेले पाहिले तेव्हा तो भारावून गेला. त्या स्तूपाची देखभाल करण्यासाठी तेथे कोणी भिक्खू नाही. हे काम हत्तींना करावे लागते हे पाहून भिक्खूंच्या विनयातील नियमांना थोडे शिथिल करून त्याने स्तूपाशेजारी वाढलेले गवत आणि झुडपे कापून तेथील जमीन साफ करून एकसारखी केली. नंतर तेथील राजाला विनंती करून त्याने तेथे एक विहार बांधला आणि स्वतः त्या विहाराचा अधिपती झाला. हे अगदी अलीकडे घडले आहे. त्या विहारात आता भिक्खू राहतात; पण त्या विहाराचा अधिपती नेहमीच श्रामणेर असतो.'

रामग्राम स्तूपाच्या पूर्वेला तीन योजने प्रवास केल्यावर ज्या ठिकाणी राजपुत्राने आपल्या कंथक नावाच्या पांढऱ्या घोड्यासह छंदकाला परत पाठविले ते ठिकाण आहे. तेथेसुद्धा स्तूप बांधला होता. तेथून पुढे त्याच दिशेने प्रवास केल्यावर चार योजनांच्या अंतरावर तो रक्षा स्तूपाजवळ आला. तेथे एक संघाराम होता.

## कुशीनगर

पुढे बारा योजने प्रवास केल्यावर फा-हियान कुशीनगर शहरात पोहोचला.

१. बुद्ध जगाला सन्मार्ग दाखवितात. काही शतकांनी त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा विपरीत अर्थ केला गेल्यामुळे धम्मात विकृती येते आणि समाजाची नीतिमत्ता खालावली जाते. मग पुन्हा जगाला सन्मार्गाचे ज्ञान देण्यासाठी बुद्ध उत्पन्न होतो. येथे पूर्वीच्या ऋकूचंद, कनकमुनी आणि काश्यप ह्या तीन बुद्धांचा उल्लेख आहे.

ह्या शहराच्या उत्तरेला दोन वृक्षांच्या मध्ये हिरण्यवती नदीच्या किनारी उत्तरेकडे तोंड करून तथागतांचे महापरिनिर्वाण झाले. येथे खालील ठिकाणी स्तूप आणि विहार बांधले होते. जेथे तथागतांचा शेवटचा शिष्य सुभद्र याने संघात प्रवेश केला; जेथे सुवर्ण शवपेटिकेमध्ये सात दिवस तथागतांची वंदना केली गेली; जेथे वज्रपाणिने आपले वज्र खाली ठेवले आणि जेथे आठ राजांनी तथागतांच्या रक्षांची विभागणी केली. थोडे भिक्खू आणि काही उपासक सोडले तर हे ओसाड पडलेले शहर फा–हियानने पाहिले.

पुढे आग्नेय दिशेला बारा योजने चालून गेल्यावर तथागतांनी आपले भिक्षापात्र देऊन लिच्छवींना जेथून निरोप दिला होता त्या जागेवर तो पोहोचला. तो म्हणतो, 'तथागत महापरिनिर्वाणासाठी चालले होते. लिच्छवी तथागतांच्या मागे जात होते. महापरिनिर्वाणाच्या जागेपर्यंत तथागतांच्या मागे जाण्याची लिच्छवींची इच्छा होती. परंतु तथागत त्यांना तशी संमती देत नव्हते. तथागतांबद्दल वाटणाऱ्या प्रेमामुळे लिच्छवी परत जात नव्हते. तेव्हा भगवान बुद्धांनी दोघांच्या मध्ये एक खोल दरी निर्माण केली. ती दरी ओलांडून लिच्छवी जाऊ शकत नव्हते. भगवान बुद्धांनी मग त्यांना आपले भिक्षापात्र भेट दिले आणि परत घरी जाण्यासाठी निरोप दिला. त्या जागेवर ह्या घटनेची नोंद केलेला एक पाषाणाचा स्तंभ आहे.'

### वैशालीचे दर्शन

पुढे पूर्वेला पाच योजने प्रवास केल्यावर तो वैशालीला पोहोचला. वैशालीचे वर्णन करताना फा-हियान म्हणतो, 'ह्या शहराच्या उत्तरेला महावन कुटागार आहे तेथे तथागत राहिले होते. जवळच आनंदाच्या रक्षेच्या अर्ध्या हिश्श्यावर स्तूप बांधला आहे. आम्रपालीसुद्धा ह्या नगरात राहात होती. तिने तथागतांसाठी बांधलेल्या स्तूपाचे अवशेष अजूनही पाहावयास मिळतात. शहराच्या दक्षिणेकडे तीन ली अंतरावर रस्त्याच्या पश्चिमेकडे भगवान बुद्धांना राहाण्यासाठी आम्रपालीने संघाला अर्पण केलेली बाग आहे. जेव्हा महापरिनिर्वाणाची वेळ आली, तेव्हा भगवान बुद्धांनी आपल्या अनुयायांसह शहराच्या पश्चिम दरवाजाने वैशाली सोडली. उजवीकडे वळून शहराकडे मागे पाहात ते म्हणाले, 'तथागताचे हे शेवटचे वैशाली दर्शन आहे.'

वैशालीच्या नागरिकांनी तेथे नंतर एक स्तूप बांधला. शहराच्या ईशान्य दिशेला तीन ली अंतरावर 'धनुष्यबाण त्याग' नावाचा एक स्तूप आहे. ह्या स्तूपाशेजारीच एक जागा आहे. तेथे तथागत आनंदाला म्हणाले होते की, 'तीन महिन्यानंतर मी परिनिर्वाणास जाईन.' पण त्या वेळी माराच्या प्रभावामुळे आनंदाची मती बधीर झाली होती. त्यामुळे ह्या जगात आणखी काही काळ तथागतांनी राहावे, अशी त्याने तथागतांना विनंती केली नाही. येथून पूर्वेला तीन किंवा चार ली अंतरावर दुसरा एक स्तूप आहे. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर शंभर वर्षांनी वैशालीचे काही भिक्खू दशशीलात मान्यता नसलेली काही कृत्ये करू लागले आणि भगवान बुद्धांनी ती कृत्ये करण्यास मान्यता दिली होती, असा प्रचार करू लागले. मग दशशीलाचे तंतोतंत पालन करणारे सातशे अर्हत, भिक्खू आणि उपासक जमा झाले आणि त्यांनी विनयांच्या नियमांचे पुन्हा संकलन केले. नंतर त्या ठिकाणी स्तूप बांधला गेला. तो अजूनही पाहावयास मिळतो.



वैशालीहून पूर्वेकडे चार योजने प्रवास केल्यावर पाच नद्यांच्या संगमावर फा-हियान आला. तो म्हणतो की, 'जेव्हा परिनिर्वाणासाठी मगध देशापासून वैशालीकडे आनंद चालला होता, तेव्हा देवांनी अजातशत्रू राजाला त्याबद्दल माहिती दिली. तेव्हा राजा आपल्या सैन्यासह घाईघाईने नदीकिनारी पोहोचला. आनंद येत आहे ही बातमी ऐकून वैशालीचे लिच्छवीसुद्धा त्याच्या स्वागतासाठी नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर आले. हे पाहून आनंदाला वाटले की, जर आपण पुढे गेलो तर अजातशत्रू राजाला वाईट वाटेल आणि परत फिरलो तर लिच्छवींना वाईट वाटेल. म्हणून तो नदीच्या मध्यभागी गेला आणि समाधित्रेताग्निद्वारे परिनिर्वाण पावला. त्याच्या रक्षांचे दोन भाग करून ते नदीच्या दोन्ही बाजूस वाटले गेले. अशा रीतीने प्रत्येक राजाला आनंदाच्या रक्षांचा अर्धा हिस्सा मिळाला आणि त्यांनी त्यांवर स्तूप बांधले.

### मगधाची राजधानी पाटलीपुत्र

नदी ओलांडून दक्षिणेला एक योजन प्रवास केल्यावर फा-हियान मगध देशाच्या पाटलीपुत्र शहरात आला. पाटलीपुत्र ही सम्राट अशोकाची राजधानी होती. 'शहरातील आता पडलेल्या राजवाड्याच्या भिंती आणि कमानी पाषाणाच्या आहेत. त्यांच्यावर इतके सुंदर कोरीव काम केलेले आहे की ते पाहून मन थक्क होऊन जाते!' असे तो म्हणतो.

सम्राट अशोकाच्या धाकट्या भावाला अर्हतपद प्राप्त झाले होते. तो आपला सर्व वेळ गृध्रकूट पर्वतावर घालवीत असे. तेथे त्याला समाधान आणि शांती मिळत असे. त्याच्यासाठी अशोकाने शहरात एक कुटी बनविली होती. फा-हियान पुढे म्हणतो, 'शहरात राधास्वामी नावाचा महायानी पंथाचा एक ब्राह्मण आहे. तो बुद्धिमान असून त्या वेळी प्राप्त असलेले सर्व ज्ञान त्याने मिळविले आहे. तो समाधानी वृत्तीने राहात आहे. हल्लीचा राजा त्याला आपला धम्मगुरू मानतो. त्याचे वय पन्नास वर्षांचे असून सर्व देश त्याला मान देतात. ह्या एका माणसामुळे बुद्धधम्माचा प्रचार होत आहे आणि पाखंडी लोक बुद्धधम्मावर मात करू शकत नाहीत.'

'सम्राट अशोकाच्या स्तूपाशेजारी महायानी पंथाचा एक अतिसुंदर विहार आहे. तेथे हीनयानी पंथाचासुद्धा एक विहार आहे. ह्या दोन्ही विहारात मिळून सहाशे ते सातशे भिक्खू राहातात त्यांचे वर्तन अतिशय वाखाणण्यासारखे आहे. विद्वान भिक्खू आणि इतर विद्वान येथे ज्ञान मिळविण्यासाठी येत असत. ह्या विहा-

रात सर्व भिक्खूंना आणि निष्ठावान महायानपंथीयांना आदरणीय असलेला ब्राह्मण आचार्य मंजुश्री राहात आहे.'

सर्व मध्यदेशात पाटलीपुत्र सर्वांत मोठे शहर आहे. येथील लोक श्रीमंत आणि सुखी आहेत. सत्कृत्ये करण्यात ते एकमेकांशी स्पर्धा करतात. प्रत्येक वर्षी दुसऱ्या महिन्याच्या आठव्या दिवशी ते रथयात्रा काढतात. त्यासाठी ते चार चाकांच्या रथाचा उपयोग करतात. त्या रथावर बांबूच्या साहाय्याने पाच मजली बांधकाम केले जाते. तेव्हा त्या रथाचा आकार पॅगोडासारखा दिसतो. तो रथ उंचीने साधारणपणे वीस फूट असतो. त्याच्यावर पांढऱ्या लोकरीचा कपडा चढविला जातो. अनेक बौद्ध देवदेवतांची चित्रे त्याच्यावर काढली जातात. सोनेचांदी आणि रेशमी झालरींने तो सुशोभित केला जातो. त्याच्या चारी बाजूंना बोधिसत्त्वासह आसनस्थ बुद्धांची बुद्धरूपे ठेवली जातात. अशा तऱ्हेने साधारणपणे वीस रथ तयार केले जातात. प्रत्येक रथाचे आपापले वैशिष्ट्य असते. रथयात्रेच्या दिवशी भिक्खू आणि उपासक जमतात. उपासकांतील काही उपासक गाणे गाण्यासाठी, वाद्ये वाजविण्यासाठी आणि नृत्य करण्यासाठी आलेले असतात. शहरात बुद्धांच्या मूर्तींचे स्वागत करण्यासाठी ब्राह्मण पुढे येतात. मग शहरभर रथयात्रा फिरते. रात्रभर मशाली जळत असतात आणि रात्रभर पूजा चाललेली असते. सर्व बौद्ध देशांमध्ये अशाच प्रकारचा रथयात्रेचा उत्सव साजरा केला जातो.

ह्या देशाच्या श्रेष्ठींनी आणि उपासकांनी शहरात धर्मादाय दवाखाने उघडले आहेत. तेथे सर्व गरीब, निराधार आणि व्यंग असलेले लोक जाऊ शकतात. तेथे त्यांच्या सर्व गरजा पुरविल्या जातात. कोणते अन्न खावयाचे आणि कोणते औषध घ्यावयाचे ते वैद्य सांगतात. बरे झाल्यानंतर ते दवाखान्यातून घरी जाऊ शकतात.

सम्राट अशोकाने सात स्तूप नष्ट करून ८४,००० नवीन स्तूप बांधले. त्याने पहिल्या बांधलेला मोठा स्तूप शहराच्या दक्षिणेस तीन ली अंतरावर आहे. त्याच्यावर चैत्यगृह बांधले आहे. स्तूपाच्या दक्षिणेला एक पाषाणाचा स्तंभ आहे. त्याचा परिघ चौदा किंवा पंधरा फूट असून उंची तीस फुटांपेक्षा जास्त आहे. त्याच्यावरील शिलालेख खालीलप्रमाणे आहे.

'सम्राट अशोकाने जगातील सर्व भिक्खूंना जम्बुद्वीप अर्पण केले. मग त्याने चांदी देऊन ते परत विकत घेतले आणि हे तीन वेळा केले.'

स्तूपाच्या उत्तरेला तीनशे किंवा चारशे पावलांच्या अंतरावर सम्राट अशोकाने बांधलेल्या निरय शहराची जागा आहे. तेथे तीस फूट उंचीचा एक पाषाणाचा स्तंभ आहे. त्या स्तंभावर सिंहाची आकृती आहे. त्या स्तंभावर तो बांधण्याचे कारण, बांधण्याची तारीख, वार आणि वर्ष यांचा शिलालेख आहे.

पुढे आग्नेय दिशेला नऊ योजने प्रवास केल्यावर डोंगराचा एक एकटाच सुळका लागतो. तेथे बुद्धाची मूर्ती असलेले एक लेणे आहे. त्या ठिकाणी बुद्धाला बरे



वाटावे म्हणून शक्राने पंचशीख नावाच्या संगीतकाराला बुद्धासमोर वीणा वाजविण्यास पाठविले होते. त्याच ठिकाणी शक्राने तथागतांना बेचाळीस मुद्यांवर प्रश्न विचारले होते. त्या ठिकाणीसुद्धा एक विहार आहे.

तेथून नैऋत्य दिशेला एक योजन प्रवास केल्यावर तो कलापिनाक (नालग्राम) गावात आला. येथे सारिपुत्राचा जन्म झाला होता आणि येथेच त्याचे परिनिर्वाण झाले होते. येथे बांधलेला स्तूप अजूनही पाहावयास मिळतो असे फा-हियान म्हणतो.

पश्चिम दिशेने पुढे एक योजनाचा प्रवास केल्यावर फा-हियान अजातशत्रू राजाने बांधलेल्या नवीन राजगृह शहरात पोहोचला. येथे दोन विहार होते. शहराच्या वेशीच्या दरवाजाच्या बाहेर तीनशे पावलांवर अजातशत्रू राजाने त्याला मिळालेल्या तथागतांच्या रक्षेसाठी बांधलेला भव्य स्तूप फा-हियानने पाहिला. राजगृहाबद्दल फा-हियान म्हणतो, 'नवीन राजगृह शहर दक्षिणेच्या बाजूने सोडल्यावर पुढे चार ली अंतरावर पाच डोंगरांनी वेढलेल्या भागात प्रवेश होतो. येथे बिंबिसार राजाचे जुने राजगृह शहर होते. ते पूर्व-पश्चिम पाच ते सहा ली रुंद असून दक्षिणोत्तर सात-आठ ली लांब आहे. ह्याच ठिकाणी सारिपुत्र आणि मौद्गल्यायन पहिल्यांदा अश्वजिताला भेटले होते; निर्ग्रंथांनी अग्निकुंड केले होते आणि बुद्धासाठी विष घातलेला भात तयार केला होता; अजातशत्रू राजाने तथागतांना मारण्याच्या इराद्याने काळ्या हत्तीला दारू पाजली होती. ह्या शहराच्या ईशान्य दिशेला आम्रपालीच्या बागेत विहार बांधून जीवकाने तथागतांना आणि त्यांच्या १२५० शिष्यांना दान देण्यासाठी आमंत्रित केले होते. (शहराचे) अवशेष अजून आहेत पण शहर ओसाड पडले आहे.'

जुन्या राजगृह शहराच्या आग्नेय दिशेला पंधरा ली अंतर चालल्यावर तो गृध्रकूट पर्वतावर आला. पर्वताच्या शिखरापासून तीन ली अंतरावर दक्षिणेकडे तोंड असलेली एक गुहा आहे. तेथे तथागत ध्यानस्थ बसत असत. तेथेच अर्हतांना ध्यान करण्यासाठी शेकडो गुहा आहेत. तथागत एकदा आपल्या गुहेसमोर चंक्रमण करीत असता देवदत्ताने वरच्या कड्यावरून एक मोठा दगड खाली सोडला. त्याचा काही भाग पायाला लागून तथागतांच्या पायाच्या पंजाला दुखापत झाली. तो दगड अजूनही तेथे आहे, असे फा-हियान म्हणतो. जेथे तथागतांनी धम्मप्रवचने केली ते सभागृह नष्ट केले गेले आहे. फक्त विटांच्या भिंतींचा पाया आता अस्तित्वात आहे. पर्वताची शिखरे सुंदर आणि दबदार दिसतात. तेथील पाचही डोंगरात ती उंच आहेत.

फा-हियानने नवीन राजगृह शहरात अगरबत्ती, फुले आणि दिव्यासाठी तेल विकत घेतले. तेथील दोन भिक्खूंना विनंती करून त्यांच्या समवेत तो गृध्रकूट पर्वतावर गेला. तेथे त्याने अगरबत्ती आणि दिवे पेटविले, फुले वाहिली आणि भावनावेशाने अश्रू ढाळीत तो म्हणाला:-

'इथे बुद्ध राहात असत. इथे त्यांनी सुरंगम सूत्राचे प्रवचन केले. फा-हियान फार उशिरा जन्मला ; त्यामुळे तथागतांना तो पाहू शकत नाही. तथागतांनी ठेवलेल्या अवशेषांकडे आणि त्यांनी वास्तव्य केलेल्या जागेकडेच फक्त तो पाहू शकतो.' फा-हियानने गुहेच्या समोर सुरंगम सूत्राचे पठण केले. एक रात्र तेथे राहून दुसऱ्या दिवशी तो नवीन राजगृह शहरात परत आला.

जुन्या शहराच्या वेशीच्या उत्तरेकडील दरवाजापासून तीनशे पावलांवर रस्त्याच्या पश्चिमेला करंड वेळूवनातील विहार होता. तो भिक्खूंनी स्वच्छ ठेवला होता. फा-हियान म्हणतो, 'दक्षिणेकडच्या डोंगराच्या पश्चिमेस तीनशे पावलांवर पिप्पल गुहा आहे. भोजनानंतर तथागत तेथे ध्यान करण्यासाठी वसत असत. येथून पुढे पश्चिमेला पाच किंवा सहा ली अंतरावर सप्तपर्णी गुहा आहे. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर पाचशे अर्हतांनी ह्याच जागेत धम्मोपदेशाचे संग्रहीकरण केले होते. ह्या ठिकाणी बांधलेला स्तूप अजूनही अस्तित्वात आहे. पर्वताच्या बाजूने ध्यानासाठी वापरत असलेल्या अर्हतांच्या अनेक गुहा आहेत. जुन्या शहराच्या वेशीच्या उत्तर दरवाजापासून पूर्वेला तीन ली अंतरावर देवदत्ताची गुहा आहे.'

## बुद्धगया ते वाराणसी

येथून पश्चिमेकडे चार योजने प्रवास केल्यावर फा-हियान गयेला पोहोचला. तो म्हणतो की, हे शहर अगदी ओसाड पडले आहे. येथून वीस ली अंतर चालून गेल्यावर ज्या ठिकाणी बुद्धांनी सहा वर्षे कडक तपश्चर्या केली होती त्या ठिकाणी तो पोहोचला. ह्या प्रदेशात भरपूर झाडे होती. पश्चिमेला तीन ली अंतरावर तो एका स्थळी पोहोचला. तेथे एकदा स्नान करीत असता देवांनी एका झाडाची डहाळी खाली करून बुद्धांना पाण्याच्या बाहेर येण्यास मदत केली होती. येथून पुढे दोन ली उत्तरेच्या दिशेने गेल्यावर ज्या ठिकाणी ग्रामिकाच्या मुलींनी बुद्धाला दूध आणि भात अर्पण केला होता त्या ठिकाणी तो पोहोचला. आणखी पुढे दोन ली उत्तरेला गेल्यावर ज्या मोठ्या वृक्षाखाली पूर्वेला तोंड करून दूधभात खाण्यासाठी बुद्ध खडकावर बसले होते त्या ठिकाणी तो पोहोचला. 'ते झाड आणि तो खडक अजूनही तेथे आहे. तो खडक दोन फूट उंच आणि सहा फूट लांब रुंद आहे. मध्य देशातील हवामान समशीतोष्ण असल्यामुळे एखादा वृक्ष कित्तेक हजार वर्षे किंवा दहा हजार वर्षांपर्यंत राहू शकतो' असे फा-हियान म्हणतो.

इथून पुढे ईशान्य दिशेला अर्ध्या योजनावर गेल्यावर ज्या गुहेत बुद्ध पश्चिमेकडे तोंड करून ध्यानस्थ बसले होते त्या ठिकाणी फा-हियान आणि त्याचा साथीदार आला. येथून पुढे नैऋत्य दिशेला अर्ध्या योजनापेक्षा कमी अंतरावर बोधिवृक्ष आहे. फा-हियान म्हणतो, 'बोधिवृक्षापासून तीस पावलांवर देवांनी तथागतांना आसनासाठी कुश गवत अर्पण केले होते. बोधिवृक्षाजवळ पोहोचल्यावर तथागतांनी जमिनीवर कुश गवत पसरले आणि पूर्वेकडे तोंड करून ते बसले. तेव्हा माराने



त्यांना भूरळ घालण्यासाठी उत्तरेच्या दिशेने तीन सुंदर मुलींना पाठविले त्यांची परीक्षा घेण्यासाठी दक्षिण दिशेने आपले सैन्य पाठविले. पण बुद्धांनी आपल्या पायाचा पंजा जमिनीवर रोवला आणि गोंधळामुळे माराचे सैन्य परत फिरले. तर त्या तीन मुलींचे रूपांतर म्हाताऱ्या स्त्रियांत झाले.'

सहा वर्षांच्या तपश्चर्येच्या काळात जेथे जेथे बुद्ध गेले तेथे तेथे सर्व ठिकाणी लोकांनी स्तूप बांधले आहेत आणि बुद्धरूपांची स्थापना केली आहे. हे सर्व आजही पाहावयास मिळते. खालील ठिकाणीसुद्धा लोकांनी स्तूप बांधलेले आहेत. बुद्धत्व प्राप्त झाल्यावर ज्या ठिकाणी सात दिवसांपर्यंत ते बोधिवृक्षाकडे पाहात ज्ञानप्राप्तीच्या सुखाचा आनंद उपभोगीत बसले ; ज्या ठिकाणी बोधिवृक्षाखाली त्यांनी पूर्वपश्चिम चंक्रमण केले ; ज्या ठिकाणी देवांनी बुद्धांना सात दिवस आदरांजली अर्पण करण्यासाठी सप्तधातूंचा ओटा बांधला ; ज्या ठिकाणी आंधळ्या मुचलिंद नागाने बुद्धांच्या भोवती सात दिवस प्रदक्षिणा केली ; जेव्हा ब्रह्म आमंत्रण देण्यास आला होता तेव्हा ज्या ठिकाणी न्यग्रोध वृक्षाखाली बुद्ध चौरस पाषाणावर बसले होते ; ज्या ठिकाणी चार दिक्पालांनी त्यांना भिक्षापात्रे अर्पण केली ; ज्या ठिकाणी पाचशे व्यापाऱ्यांनी त्यांना पीठ आणि मध अर्पण केले आणि ज्या ठिकाणी काश्यप बंधु आणि त्यांच्या हजार शिष्यांना त्यांनी धम्मदीक्षा दिली.

ज्या ठिकाणी बुद्धांना बुद्धत्व प्राप्त झाले, त्या ठिकाणी तीन संघाराम आहेत. त्या सर्वांत भिक्खू राहातात. त्या भिक्खूंना स्थानिक लोक आश्रय देतात आणि त्यांना काहीही उणे पडू नये अशा रीतीने सढळ हाताने दान करतात. विनयांच्या नियमांचे कडकरीत्या पालन केले जाते आणि बुद्धांच्या काळी जसे आदरणीय भिक्खू शिष्टाचार पाळीत त्याचप्रमाणे बसण्या-उठण्यात आणि सभेत पाळावयाचे शिष्टाचार हे भिक्खू पाळतात.

बुद्धांच्या महापरिनिर्वाणापासून चार महत्त्वाच्या स्तूपांची देखरेख चांगल्या तऱ्हेने केली जाते. ज्या ठिकाणी बुद्धांचा जन्म झाला, ज्या ठिकाणी त्यांना बुद्धत्व प्राप्त झाले, ज्या ठिकाणी त्यांनी धम्मचक्र प्रवर्तन सुरू केले आणि ज्या ठिकाणी त्यांचे महापरिनिर्वाण झाले ही ती चार महत्त्वाची ठिकाणे आहेत. तेथील स्तूपांची देखरेख चांगल्या तऱ्हेने केली जाते.

पुढे दक्षिणेला तीन ली प्रवास केल्यावर तो कुक्कुटपाद पर्वताजवळ पोहोचला. येथे काश्यपाचे महानिर्वाण झाले होते. दरवर्षी निरनिराळ्या देशातील उपासक काश्यपाला आदरांजली वाहण्यास येथे येतात. ह्या पर्वतावर झाडे-झुडपे भरपूर वाढली आहेत. तेथे वाघ, सिंह, लांडगे इत्यादी हिंस्र प्राण्यांचे अस्तित्व असल्यामुळे फार काळजीपूर्वक प्रवास करावा लागतो, असे फा-हियान म्हणतो.

फा-हियान आणि त्याचा साथीदार नंतर पाटलीपुत्रला आले. तेथून पश्चिमेच्या दिशेने गंगानदीच्या किनाऱ्याने दहा योजने प्रवास केल्यावर तो अढवी नावाच्या विहारात पोहोचला. येथे एकदा तथागत राहिले होते. तेथून पुढे पश्चिमेला गंगा-

नदीच्या किनाऱ्याने आणखी बारा योजने प्रवास केल्यावर तो काशी देशातील वाराणसी शहरात पोहोचला. ह्या शहराच्या ईशान्येला साधारण दहा ली अंतरावर ऋषिपत्तन-मृगदाव विहार आहे.

ज्ञानप्राप्तीनंतर कौण्डिण्य आणि त्याच्या इतर सोबत्यांनी त्या ज्ञानाचा लाभ घ्यावा म्हणून तथागत इकडे येत होते, तेव्हा ते पाचजण एकमेकांना म्हणाले,

'सहा वर्षांपर्यंत ह्या श्रमण गौतमाने दिवसाला एक तीळ आणि एक तांदळाचा दाणा खाऊन कडक तपश्चर्या केली ; तरीसुद्धा त्याला ज्ञान प्राप्त झाले नाही. आता तो मानसिक आणि शारीरिक बंधने सोडून माणसात राहू लागला आहे. त्याला कसले ज्ञान प्राप्त होऊ शकेल ? तो जर येथे आला तर आपण त्याच्याशी न बोलण्याचा निश्चय करू या.'

पण जेव्हा बुद्ध तेथे आले, तेव्हा उठून त्यांना अभिवादन करावे आणि त्यांचे स्वागत करावे, असे त्या पाचहीजणांना वाटू लागले.

विहाराच्या उत्तरेस साठ पावलांवर एक जागा आहे. तेथे पूर्वाभिमुख होऊन तथागतांनी धम्मचक्र प्रवर्तनाचे पहिले प्रवचन कौण्डिण्याला आणि त्याच्या सोबत्यांना दिले होते. धम्मचक्र प्रवर्तनाच्या जागेपासून उत्तरेस वीस पावलांवर एक जागा आहे. तेथे बुद्धानी मैत्रेय बुद्धाबद्दल भविष्य वर्तविले होते. तेथून दक्षिणेला पन्नास पावलांवर एलापत्र नावाच्या नागाने तथागतांना प्रश्न विचारले होते. ह्या सर्व ठिकाणी बांधलेले स्तूप अजूनही अस्तित्वात आहेत. ऋषिपत्तन येथे दोन विहार आहेत. त्यात भिक्खू राहातात, असे फा–हियान म्हणतो.

पुढे फा-हियान म्हणतो, ' ऋषिपत्तन मृगदाव विहारापासून वायव्य दिशेला तेरा योजनांच्या अंतरावर कौशम्बी देश आहे. येथे गोशीर नावाचा विहार आहे. तथागतांनी एकदा येथे वास्तव्य केले होते. येथे राहाणारे बहुतेक सर्व भिक्खु हीनयान पंथाचे आहेत. येथून पूर्वेला आठ योजनांच्या अंतरावर एक जागा आहे. तेथे बुद्धांनी एका दुष्ट माणसाला धम्मदीक्षा दिली होती. येथील विहारात शंभरापेक्षा जास्त भिक्खू राहात आहेत.

येथून दोनशे योजनांच्या अंतरावर दक्षिणा नावाचा प्रदेश आहे. तेथे एका मोठ्या पर्वतात खोदून काढलेला संघाराम आहे. तो पूर्वीच्या काश्यप बुद्धाचा आहे. तो संघाराम पाच मजल्यांचा आहे. त्याच्या पहिल्या मजल्याचा आकार हत्तीसारखा आहे. त्यात पाचशे लेणी आहेत. दुसऱ्या मजल्यावर चारशे लेणी असून त्याचा आकार सिंहासारखा आहे. तिसऱ्या मजल्याचा आकार घोड्यासारखा आहे. त्यात तीनशे लेणी आहेत. चौथ्या मजल्याचा आकार बैलासारखा असून त्यात दोनशे लेणी आहेत. पाचव्या मजल्याचा आकार कबुतरासारखा आहे. त्यात शंभर लेणी आहेत. वरून एक पाण्याचा झरा वाहात असून त्याचे पाणी पाटाने प्रत्येक लेण्यासमोरून अगदी शेवटच्या मजल्यापर्यंत खेळविले आहे. लेण्याला खडकातून खिडक्या खोदल्या आहेत. त्यामुळे आत भरपूर हवा आणि प्रकाश येण्याची व्यवस्था केली



आहे. लेण्यातील कोणताही कोपरा अंधारात राहात नाही. ह्या संघारामाच्या चारही बाजूंना खडकात खोदून पायऱ्यांच्या शिड्या बनविल्या आहेत. पूर्वीची माणसे ह्या पायऱ्या अगदी सहज चढत-उतरत असत. पण हल्लीची माणसे बुटकी असल्यामुळे त्यांना ह्या पायऱ्या चढण्यास अवघड जाते. ह्या संघारामाचे नाव 'पारवती' म्हणजे पारवा किंवा कबूतर असे आहे. हा प्रदेश ओसाड असून कमी वस्तीचा आहे.

ह्या पर्वतापासून बऱ्याच अंतरावर एक खेडेगाव आहे. त्यातील रहिवासी ब्राह्मण असून पाखंडी मताचे आहेत. ते बुद्धधम्माला मानीत नाहीत.

दक्षिणा प्रदेशाकडे जाणाऱ्या रस्त्यात फार धोके आहेत आणि प्रवाससुद्धा फार खडतर आहे. ज्यांनी ह्या प्रदेशाबद्दल ऐकले आहे आणि ज्यांना त्या प्रदेशात जाण्याची इच्छा आहे त्यांनी तेथील राजाला पैसे किंवा माल सामग्री द्यावी. मग राजा त्यांच्यासाठी मार्गदर्शकांची नियुक्ती करतो. ते मार्गदर्शक प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेतात आणि मार्ग दाखवितात.'

फा-हियान तेथे जाऊ शकला नाही. त्याला लोकांनी जे सांगितले त्याची फक्त ऐकीव माहिती त्याने येथे दिली आहे.

## विनय-ग्रंथांची प्राप्ती

बनारसहून पूर्व दिशेने प्रवास करून फा-हियान आणि त्याचा साथीदार परत पाटलीपुत्र नगरात पोहोचले. फा-हियान विनयांसंबंधीचे ग्रंथ मिळविण्यासाठी जम्बुद्वीपात आला होता. पण उत्तर भारतात हे नियम पिढ्यान-पिढ्या मुखोद्गत करून जतन केले जात असत ; त्यामुळे लिहून ठेवलेले ग्रंथ दुर्मिळ होते. म्हणून फा-हियान त्या ग्रंथाची लिखित नक्कल करू शकत नव्हता. त्याला त्यासाठी मध्य भारतापर्यंत प्रवास करावा लागला. तेथे एक महायानी पंथाच्या विहारात विनयांचे ग्रंथ मिळाले. ते ' महासांघिकां ' चे विनयांचे ग्रंथ होते. तो म्हणतो, ' ह्या विनयांच्या नियमांचे पालन तथागतांच्या वेळी भिक्खू संघ करीत होता. मूळ जेतवन विहारातील विनयांची ही नक्कल होती. जरी अठरा पंथांचे वेगवेगळे विनयाचे नियम होते, तरी सर्व महत्त्वाच्या बाबतीत ते सारखेच होते. अगदी कमी महत्त्वाच्या बाबतीत त्यांच्यात फरक होता. पण हा ग्रंथ अगदी सर्वांगपूर्ण असा आहे.' फा–हियानला सर्वास्तीवाद निकायांच्या नियमांचासुद्धा सात हजार गाथांचा एक ग्रंथ मिळाला. चीनमधील भिक्खू ह्या ग्रंथातील नियमांप्रमाणेच आपले आचरण करतात. ह्या विहारात त्याला ' संयुक्त-अभिधर्म-हृदयशास्त्र ' नावाच्या साधारणपणे सहा हजार गाथा असलेल्या ग्रंथाचीसुद्धा एक प्रत मिळाली. शिवाय दोन हजार पाचशे गाथा असलेल्या निर्वाण सूत्राची, पाच हजार गाथा असलेल्या वैपुल्य परिनिर्वाण सूत्राची आणि महासांघिक- अभिधर्मांची एक एक प्रत मिळाली.

फा-हियानने संस्कृत लिपी आणि भाषा शिकण्यात आणि ह्या ग्रंथांच्या प्रती काढण्यात तीन वर्षे घालविली.

मध्य देशात आल्यावर तेथील विनयांचे उत्तम नियम आणि त्याप्रमाणे दैनिक जीवनात असलेले भिक्खूचे उचित आचरण पाहिल्यावर ताओ-चेनला चीन देशातील विनयाचा अपुरेपणा जाणवू लागला. बुद्धत्व प्राप्त होईपर्यंत त्या देशात परत जन्म येऊ नये असे त्याला वाटू लागले. म्हणून तो चीन देशात परत न जाता जम्बुद्वीपातच कायमचा राहिला. फा-हियान विनयासंबंधीचे ग्रंथ मिळविण्यासाठी मध्य देशात आला होता. ग्रंथप्राप्तीनंतर तो एकटाच परत चीनला जाण्यास निघाला.

## सिंहल देशाकडे प्रयाण

गंगा नदीच्या दक्षिण किनाऱ्याने पूर्वेकडे अठरा योजने प्रवास केल्यावर चंपा देश लागतो. येथे ज्या ठिकाणी बुद्ध राहिले होते; ज्या ठिकाणी त्यांनी चंक्रमण केले होते आणि ज्या ठिकाणी पूर्वीचे चार बुद्ध बसले होते; त्या सर्व ठिकाणी स्तूप बांधलेले फा–हियानने पाहिले. तेथून पूर्वेला जवळजवळ पन्नास योजने प्रवास केल्यावर फा–हियान ताम्रलिप्ति ह्या समुद्राच्या बंदरावर पोहोचला. येथे भिक्खू राहात असलेले चोवीस विहार होते. तेथे बुद्धधम्माची चांगलीच उजितावस्था होती, असे फा–हियानने नमूद केले आहे. येथे धम्मग्रंथांच्या प्रती काढण्यात आणि बुद्धाच्या मूर्तींची चित्रे काढण्यात दोन वर्षे घालविल्यावर फा–हियान एका मोठ्या व्यापारी जहाजात बसून दक्षिणेकडे गेला. हिवाळ्याच्या सुरुवातीच्या काळातील चांगल्या हवामानाचा फायदा घेऊन चौदा दिवसांनी ते जहाज सिंहल देशाला म्हणजे श्रीलंकेला पोहोचले. सिंहल देशातील लोकांनी फा–हियानला सांगितले की, ताम्रलिप्तिपासून सिंहलापर्यंतचा प्रवास साधारणपणे सातशे योजनांचा आहे. सिंहल देशाबद्दल (श्रीलंकेबद्दल) फा–हियान म्हणतो, 'सिंहल देश पूर्व–पश्चिम पन्नास योजनांचा आणि दक्षिण–उत्तर तीस योजनांचा आहे. ह्या देशाच्या आजूबाजूला जवळजवळ १० लहान लहान बेटे आहेत. ह्या बेटांमध्ये मौल्यवान खनिजे आहेत काही ठिकाणी मोती आणि 'मणि' नावाचे रत्न मिळते.'

येथील लोकांचा असा विश्वास आहे की, भगवान बुद्ध येथे आले होते. शहरातील बुद्धाच्या पदचिन्हांवर चारशे फूट उंचीचा एक विशाल रत्नजडित स्तूप बनविला आहे. ह्या स्तूपाशेजारील अभयगिरी संघारामात पाच हजार भिक्खू राहतात. ह्या संघारामात बुद्धवंदना करण्यासाठी एक भव्य सभामंडप आहे. तो सोन्या-रुप्याने आणि रत्नांनी सुशोभित केला आहे. तेथे अंदाजे वीस फूट उंचीची हरितमणीने बनविलेली बुद्धाची मूर्ती आहे. सप्तधातूंमुळे ती मूर्ती प्रकाशमान वाटते त्या मूर्तीच्या उजव्या हातात एक अत्यंत किमती मोती आहे. त्या मूर्तीला कोणी–तरी अर्पण केलेला रेशमाचाच पांढरा चिनी पंखा पाहून फा–हियानला आपल्या मायदेशाची तीव्रतेने आठवण होऊन त्याच्या डोळ्यांत पाणी आले.

मध्य देशातून आणलेल्या बोधिवृक्षाच्या रोपाचा प्रचंड वृक्ष झाला असून तो आता जवळजवळ दोनशे फूट उंच झाला आहे. तो आग्नेय दिशेला झुकला आहे. एखादे वेळेस आपल्या वजनाने तो खाली पडेल अशी भीती वाटून येथील पूर्वीच्या एका राजाने दगडांचा एक मोठा खांब बांधून त्याला आधार दिला आहे. ज्या ठिकाणी बोधिवृक्षाची फांदी त्या खांबावर आधारलेली होती, तेथे मुळे फुटून जमिनीपर्यंत आली आहेत. तेथून निर्माण झालेला बुंधा आता इतका मोठा झाला आहे की, त्याला विळखा घालावयाला चार माणसे कमी पडतात.



ह्या शहरात तथागतांच्या दाताचे एक चैत्यगृह आहे. तिसऱ्या महिन्याच्या मध्यास तो दात उपासकांना दर्शनासाठी बाहेर काढला जातो. त्यापूर्वी दहा दिवस अगोदर राजा एका मोठ्या हत्तीला सजवितो आणि दवंडी देणाऱ्याला हत्तीवर बसवून खालील घोषणा करावयास लावतो.

'तीन असंख्य कल्प बुद्धांनी कडक तपश्चर्या केली. स्वतःची पर्वा न करता त्यांनी आपल्या राज्याचा, बायकोचा आणि मुलाचा त्याग केला. दुसऱ्यांना देण्यासाठी त्यांनी स्वतःचे डोळेसुद्धा काढले. कबुतराला वाचविण्यासाठी स्वतःची मांडी कापली. स्वतःचे डोके दान म्हणून दिले. भुकेलेल्या वाघाला आपले शरीर अर्पण केले. सर्व प्राण्यांच्या सुखासाठी अशी दुःखे स्वतः सहन करून शेवटी बुद्ध झाले. ह्या जगात राहून त्यांनी पंचेचाळीस वर्षे लोकांना धम्मज्ञान दिले. जे थकले होते त्यांना विश्रांती दिली ज्यांची आशा गेली होती त्यांना आधार दिला आणि जेव्हा त्यांनी आपले कर्तव्य बजावले तेव्हा ते निर्वाणास गेले. त्यांच्या निर्वाणाला १४९७ वर्षे झाली आहेत. ह्या अवधीत जगाचा डोळा बंद झाला आहे आणि जिवंत प्राणी आपले दुःख विसरले नाहीत. आजपासून दहा दिवसांनी तथागताचा दात अभयगिरी संघारामात नेला जाईल. जे सत्कृत्ये करू इच्छितात अशा सर्व भिक्खूंनी आणि उपासकांनी रस्ते दुरुस्त करून साफ करावेत. ते सुशोभित करावेत आणि फुले व अगरबत्तींची आदरांजली देण्यास तयार राहावे.'

तथागतांच्या दाताची मिरवणूक फार प्रेक्षणीय असते. जातक कथांतील अनेक रूपे त्या मिरवणुकीत दाखविली जातात. ही रूपे इतकी कौशल्याने केलेली असतात की, ती अगदी जिवंत आहेत असे वाटते. तथागतांचा दात मुख्य रस्त्यावरून मिरवणुकीत आणला जातो. वाटेत उपासक त्याला फुले आणि इतर वस्तू अर्पण करतात. दात अभयगिरी विहारात आल्यावर भिक्खू आणि उपासक त्याच्यापुढे फुले अर्पण करतात, दीप आणि अगरबत्ती पेटवितात आणि इतरही प्रकारे आपला आदर प्रकट करतात. नव्वद दिवसानंतर अभयगिरी विहारातून तथागतांचा दात परत शहरातील विहारात आणला जातो. तेथे तो उपोसथाच्या दिवशी उपासकांना दर्शनासाठी ठेवला जातो.

## परतीचा प्रवास– प्राणावरचे संकट

श्रीलंकेमध्ये फा–हियान दोन वर्षे राहिला. तेथे त्याने महिशासक विनयपिटकाचे दीर्घागम आणि संयुक्तागम हे ग्रंथ, शिवाय संयुक्तपिटकाच्या प्रती मिळ-

विल्या. हे संस्कृत ग्रंथ मिळाल्यावर, दोनशे प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या एका व्यापारी जहाजात बसून तो चीनला परत जाण्यास निघाला. समुद्रावरील प्रवास फारच धोक्याचा असल्यामुळे त्या जहाजाला मागे एक छोटेसे पडाव दोरखंडाने बांधले होते. दोन दिवस प्रवास चांगला झाला. पण तिसऱ्या दिवशी त्यांचे जहाज वादळात सापडले. वादळाच्या तडाख्यामुळे त्यांच्या जहाजाला एक छिद्र पडून जहाजात पाणी शिरू लागले. आपण लहान पडावात जावे असे जहाजातील व्यापाऱ्यांना वाटले. पण त्या पडावात बसलेल्या लोकांनी अगोदरच दोर कापून जहाजापासून पडावाला वेगळे केले होते. तेव्हा त्या व्यापाऱ्यांना वाटू लागले की आपला अंतःकाळ जवळ आला आहे. वजनाने जहाज बुडू नये म्हणून, त्यांनी आपला कमी दर्जाचा माल समुद्रात टाकून दिला. फा–हियाननेसुद्धा आपले काही सामान समुद्रात टाकून दिले हे व्यापारी आपले अमोल ग्रंथ समुद्रात फेकतील ह्या भीतीने त्याने मनातल्या मनात अवलोकितेश्वराची आणि चीनमधील भिक्खूंची प्रार्थना केली. ह्या ग्रंथांना आणि चित्रांना मिळविण्यासाठी त्याने प्राण पणास लावून एवढा दूरचा खडतर प्रवास केला होता. वादळाचा जोर अव्याहतपणे तेरा दिवस चालला होता. शेवटी ते जहाज एका बेटाच्या किनाऱ्यास लागले. तेथे त्याची दुरुस्ती केल्यावर परत पुढे प्रवास सुरू झाला. ह्या प्रवासाचे वर्णन करताना फा–हियानने लिहिले आहे की, समुद्र इतका विशाल आहे की, त्याचा किनारा कोठे आहे हे कळत नाही. सूर्य, चंद्र आणि नक्षत्रांच्या साहाय्याने दिशा ओळखल्या जातात. आकाश मेघाच्छादित झाल्यावर मार्गाची निश्चितता ओळखणे फार कठीण झाले. व्यापारी भयभीत झाले. हळूहळू आकाश निरभ्र झाले आणि खलाशी ठीक मार्गावर आले.' अशा तऱ्हेने नव्वद दिवस प्रवास केल्यावर फा-हियान जावा बेटावर पोहोचला. तेथे त्या वेळी ब्राह्मणी धर्माचा प्रसार झाला होता आणि बुद्धधम्माचे लोक अगदी कमी होते.

जावा बेटात पाच महिने राहिल्यावर फा-हियान दुसऱ्या एका मोठ्या व्यापारी जहाजातून प्रवासास निघाला. त्या जहाजातसुद्धा दोनशे प्रवासी होते. त्यांनी पन्नास दिवसांच्या प्रवासाची तयारी केली होती. साधारणपणे एक महिना प्रवास केल्यावर रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी एकाएकी ढग जमून जोराचे वादळ आणि पाऊस सुरू झाला. खलाशी आणि व्यापारी घाबरून गेले. फा-हियानने परत एकदा अवलोकितेश्वराची आणि चीनमधल्या भिक्खूंची प्रार्थना केली. जेव्हा सकाळ झाली तेव्हा ब्राह्मण आपापसात सल्लामसलत करू लागले. ते म्हणाले,

'जहाजावर बौद्ध भिक्खू आहे म्हणून आपणास अपशकून होत आहे आणि आपणावर संकटे येत आहेत. त्याला आपण बेटाच्या किनाऱ्यावर उतरवू या. एका माणसासाठी आपण आपला जीव धोक्यात का घालावा?'

हे ऐकून फा-हियानचा दाता उपासक म्हणाला, 'जर तुम्ही ह्या भिक्खूला खाली उतरवत असाल तर तुम्हाला मलासुद्धा खाली उतरवावे लागेल किंवा ठार मारावे लागेल. जर त्याला एकट्यालाच खाली ठेवलेत तर मी चीनच्या सम्राटाला



त्याबद्दल कळवीन. आणि तुम्हाला माहीत आहे की, चीनचा सम्राट बौद्धधर्मीय आहे आणि तो भिक्खूंना फार मान देतो.'

हे ऐकल्यावर त्या ब्राह्मणांनी फा-हियानला बेटावर सोडण्याची गोष्ट पुन्हा काढली नाही. संततधार पावसामुळे नावाड्यांनी चुकीच्या दिशेने जहाज चालविले. सतत सत्तर दिवस प्रवास केल्यामुळे त्यांच्याजवळचे अन्नपाणी जवळजवळ संपत आले होते. स्वयंपाकासाठी त्यांना समुद्राचे पाणी घ्यावे लागे. प्रत्येकाच्या वाट्याला फक्त दोन 'पिन्ट' पिण्याचे पाणी मिळे. पुढे तेही मिळेनासे झाले. क्वानचौवपर्यंतच्या पन्नास दिवसांच्या प्रवासाला सत्तरपेक्षा जास्त दिवस लागले आहेत. म्हणजे आपला मार्ग चुकला असला पाहिजे, हे वाटून नावाड्यांनी वायव्य दिशेला जहाज वळविले. त्या दिशेने बारा दिवस प्रवास केल्यावर जहाज चांग-क्वांग प्रदेशाच्या सीमेच्या लाव-शान पर्वताच्या दक्षिण किनाऱ्यावर पोहोचले.

तेथील शासक ले-ए हा बौद्ध होता. जेव्हा त्याला कळले की' भिक्खू मध्य देशातून चित्रे आणि धम्मग्रंथ घेऊन आला आहे, तेव्हा तो स्वतः आपल्या रक्षकाबरोबर बंदरावर आला आणि मोठ्या आदराने फा-हियानचे स्वागत करून त्याला आपल्या निवासस्थानी घेऊन गेला. शिंग-चावला हिवाळा काढल्यावर आपल्या साथीदार भिक्खूकडे चांग-गानला जाण्याची फा–हियानची इच्छा होती. परंतु त्याने हाती घेतलेले कार्य इतके महत्त्वाचे होते की, तो चांग-गानला जाण्याऐवजी दक्षिणेकडे दक्षिण चीनच्या शिंग-कांग ह्या राजधानीच्या शहरी गेला. तेथे त्याची भेट बुद्धभद्र नावाच्या एका भारतीय भिक्खूशी पडली. बुद्धभद्राला फा-हियानने भारतातून आणलेले सर्व ग्रंथ दाखविले आणि त्याच्या मदतीने त्यांचे चिनी भाषांतर सुरू केले.

फा-हियानने आपला प्रवास चांग-गानपासून सुरू केला आणि मध्यदेशाला जाण्यापर्यंत त्याने सहा वर्षे घालविली. मध्यदेशात तो सहा वर्षे राहिला आणि परतीच्या प्रवासात चिंग-चावला येईपर्यंत आणखी तीन वर्षे घालविली. त्याने गोबीच्या वाळवंटापासून जम्बुद्वीपाला पोहोचेपर्यंत जवळजवळ तीस देशातून प्रवास केला. त्याला भेटलेल्या जम्बुद्वीपातील भिक्खूंच्या शुद्धाचरणाचे आणि धम्माचे संपूर्ण वर्णन करता येणे शक्य नाही. पण ते कसे आहे हे सांगण्यासाठी फा-हियानने आपल्या जिवाची बाजी लावून, समुद्रावरील प्रवासातील अनेक धोके पत्करून प्रवास केला. त्रिरत्नाच्या संरक्षणामुळेच इतक्या संकटातून तो सुखरूप प्रवास करू शकला. धर्मशील लोकांना त्याच्या अनुभवाचा फायदा व्हावा म्हणून त्याने हे आपले प्रवास वर्णन बांबू आणि रेशमी कपड्यावर लिहून काढले. ते शिया-यींनचे चक्री वर्ष होते. (इ. स. ४१४).

# २. ह्यू-एन-त्सँग

(प्रवास-काळ इ. स. ६२९ ते ६४५ : जन्म इ. स. ६००, परिनिर्वाण इ. स. ६६४)

---

ह्यू-एन-त्सँगचा जन्म इ. स. ६०० साली चीनमधील एका सुसंस्कृत घराण्यात चीन-लियू येथे झाला. चार भावंडांत तो सर्वात लहान होता. सुरुवातीचे त्याचे शिक्षण घरीच त्याच्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली झाले. लहानपणापासूनच तो अत्यंत तल्लख बुद्धिमत्तेचा होता. तो खूप मन लावून अभ्यास करीत असे. साहित्याची त्याला विशेष आवड होती. म्हणून साहित्याचा अभ्यास तो खूप रस घेऊन करीत असे. पुढे एक अत्यंत उच्च कोटीचा लेखक म्हणून तो जगप्रसिद्ध झाला.

## धम्मप्रचारासाठी भिक्खू बनला

त्याचा एक भाऊ बौद्ध भिक्खू झाला होता. त्याच्याबरोबर लोयांग येथील विहारात जाऊन ह्यू-एन-त्सँग धम्माचा अभ्यास करू लागला. एके दिवशी अचानकपणे लोयांग येथील कमिशनरला तेथून चौदा भिक्खू निवडण्याची राजाज्ञा झाली. निवडलेल्या चौदा भिक्खूंचा त्यांच्या जन्मभरचा सर्व खर्च सरकारी तिजोरीतून व्हावयाचा होता. निवड व्हावी म्हणून शेकडो भिक्खू जमले होते, ह्यू-एन-त्सँग वयाने लहान असल्यामुळे तो निवडणुकीसाठी अपात्र होता. पण निवडणूक कशी होते हे पाहण्यासाठी तो सभामंडपाच्या दरवाजाच्या अगदी जवळ उभा राहिला होता. निवड करणारा कमिशनर माणसांचा पारखी होता, त्याने ह्यू-एन-त्सँगला विचारले, 'तुला तुझी निवड व्हावी असे वाटते काय?' ह्यू-एन-त्सँगने उत्तर दिले, 'होय, इच्छा आहे. पण निवडणुकीसाठी जेवढे कमीत कमी वय लागते तेवढे माझे वय नसल्यामुळे माझी निवड होऊ शकत नाही.' 'भिक्खू बनण्यास तुझा उद्देश काय आहे?' असे जेव्हा कमिशनरने ह्यू-एन-त्सँगला विचारले, तेव्हा त्याने उत्तर दिले की, तथागतांच्या धम्माचा सर्वत्र प्रसार करावा, ह्या एकाच हेतूने मी भिक्खू बनणार आहे.' हा मुलगा पुढे निश्चितपणे फार मोठे धम्मकार्य करील, हे ओळखून त्या कमिशनरने ह्यू-एन-त्सँगची निवड केली.

धम्मग्रंथांच्या अभ्यासात ह्यू-एन-त्सँगने लवकरच इतकी प्रगती केली की, त्याच्याशी वादविवाद करताना आणि त्याची प्रवचने ऐकताना दिसून आलेली



त्याची विद्वत्ता पाहून मोठमोठ्या धम्मपंडितांना अचंबा वाटू लागला! वयाची वीस वर्षे पूर्ण झाल्यावर ह्यू-एन-त्सँगची उपसंपदा झाली. भिक्खू बनल्यावर विनय, सूत्र आणि शास्त्रांचे त्याने पुन्हा अध्ययन केले. धम्माच्या अभ्यासात निर्माण झालेल्या शंकांचे समाधान करून घेण्यासाठी त्याने जवळजवळ सर्व चीनमधील विहारांतील विद्वान आणि मान्यता पावलेल्या भिक्खूंशी चर्चा केली. त्याला दिसून आले की, बुद्धधम्मात अनेक पंथ आहेत आणि प्रत्येक विद्वान भिक्खू आपापल्या पंथाच्या शिकवणीचा पुरस्कार करतो. त्या पंथांच्या तत्त्वांचा अभ्यास केल्यावर त्याला दिसून आले की, निरनिराळ्या पंथांच्या धम्मग्रंथांत फरक आहे. कोणता धम्म ग्रंथ ग्राह्य मानायचा हे त्याला समजेनासे झाले. तेव्हा पश्चिमेच्या देशात (जम्बुद्वीपात) जाऊन चीनमध्ये त्या वेळी अस्तित्वात असलेल्या धम्मग्रंथांतील शंका आलेल्या भागांचे विवरण करून घ्यावे, असा त्याने निश्चय केला. आपल्या शंका स्पष्टपणे मांडता याव्यात म्हणून त्याने 'सप्त-देश भूमिशास्त्र' नावाचा एक ग्रंथ तयार केला. त्या ग्रंथाला आता 'योगाचार भूमिशास्त्र' असे म्हणतात. फा-हियान आणि ची-येन ह्या महापुरुषांनी लोकांच्या मार्गदर्शनासाठी आणि कल्याणासाठी जम्बुद्वीपातून चीनमध्ये धम्मग्रंथ आणले. 'त्यांचे अनुकरण करणे हे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे भविष्यकाळी लोक त्यांचे कार्य विसरणार नाहीत,' असे तो म्हणत असे.

## गुप्तपणे चीनबाहेर

चीनमध्ये त्या वेळी बंडाळी झाली असून 'सुई' वंशाच्या राजाचे राज्य संपुष्टात आले होते. राज्यात अंदाधुंदी माजून राज्यकर्त्यांचे आणि धार्मिक गुरूंचे शिरकाण चालले होते. देशात रक्ताचे पाट वाहात होते. शहरातील घरे जाळली जात होती आणि रस्ते माणसांच्या प्रेतांनी भरून गेले होते. तशातच चीनमध्ये मोठा दुष्काळ पडला. अशा परिस्थितीत वू-टेहने राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली होती आणि आपल्या कर्तबगारीने परिस्थिती हळूहळू काबूत आणली होती. चीनमधून कोणालाही राजकीय कारणासाठी बाहेर जाण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे ह्यू-एन त्सँगने जेव्हा भारतात जाण्यासाठी सम्राटाकडे परवानगी मागितली तेव्हा त्याला चीनच्या बाहेर जाण्याची परवानगी मिळाली नाही. म्हणून ह्यू-एन-त्सँगने चीनच्या बाहेर गुप्तपणे जाण्याचा निश्चय केला. तो दिवसा कोठेतरी लपत असे आणि रात्री प्रवास करीत असे. चीनच्या पश्चिमेच्या सीमेवर असलेल्या क्वा-चाव प्रदेशाच्या गव्हर्नराला सम्राटाने ह्यू-एन-त्सँगला भारतात जाण्याची परवानगी नाकारली आहे हे माहीत नव्हते. जेव्हा ह्यू-एन-त्सँग त्या प्रदेशातील राजधानीत गेला तेव्हा गव्हर्नराने त्याला बोलावून घेतले आणि त्याला सर्वतोपरी मदत केली. पश्चिमेच्या देशाकडे जाण्याचा मार्ग कसा आहे हे ह्यू-एन-त्सँगने विचारल्यावर त्या गव्हर्नराने सांगितले की, 'येथून पन्नास ली अंतरावर हुलू नावाची

नदी आहे. ती नदी इतकी अवखळ आहे की, होडीत बसून तिच्यावरून प्रवास करता येत नाही पण वरच्या भागात ती फारच अरुंद आहे. तेथे एके ठिकाणी नदीवर पूल बांधला आहे. पश्चिमेकडे जाणाऱ्या प्रत्येकाला हा पूल ओलांडून जावे लागते. त्या पुलावर टेहेळणी करणारे अधिकारी असतात. त्या पुलाच्या पलीकडे वेगवेगळ्या पाच तटबंदीवर हे टेहेळणीचे पाच मनोरे आहेत. प्रत्येक दोन तटांमध्ये आणि त्यांच्या मनोऱ्यामध्ये १०० ली अंतर असून मधल्या जागेत ओसाड प्रदेश आहे. तेथे ना झाडी आहे ना पाणी. ह्या पाच मनोऱ्यांच्या पलीकडे मो-किया-येन नावाचे विशाल वाळवंट आहे. त्या वाळवंटाच्या पलीकडे इ-गू नावाचे राज्य आहे.' हे ऐकल्यावर ह्यू-एन-त्सँगला मोठी काळजी वाटू लागली. त्याचा घोडा मेला होता. काय करावे हे त्याला सुचत नव्हते. दुःखी होऊन तो तेथे एक महिना थांबला. त्याच वेळी लियांग-चावहून गव्हर्नराकडे दोन गुप्तहेर आले आणि म्हणाले, ह्यू--एन-त्सँग नावाचा एक भिक्खू पश्चिमेच्या देशाकडे चालला आहे. त्याला थांबवून ठेवण्यासाठी सर्व प्रदेशातील गव्हर्नरांना आज्ञा केली आहे. ही आज्ञा मिळाल्यावर त्या गव्हर्नराने ह्यू-एन-त्सँगची गुप्तपणे भेट घेतली आणि त्याला तावडतोब निघण्याची सूचना केली.

### प्राणावर बेतले

तेव्हापासून ह्यू-एन-त्सँगची काळजी आणखीनच वाढत गेली. त्याच्यावरोबर निघालेल्या दोन श्रामणेरांपैकी एक परत फिरला आणि प्रवासात कष्ट सहन करण्याइतकी मजबूत तब्येत नसल्यामुळे, दुसऱ्याचे मन वळवून त्याला परत पाठविण्यात आले. ह्यू-एन-त्सँगबरोबर वाटाड्या म्हणून येण्यास शरीराने धट्टाकट्टा असलेला एक परदेशी वाटाड्या तयार झाला. दोघांसाठी कसेतरी घोडे मिळवून त्यांनी प्रवासास सुरुवात केली. हुलू नदीच्या पुलाच्या वरच्या बाजूस दहा ली अंतरावर एके ठिकाणी नदी फारच अरुंद होती, तेथे वाटाड्याने लाकडांच्या साहाय्याने कामचलाऊ पूल बांधला. त्याच्यावर झाडांच्या डहाळ्या आणि माती टाकून घोड्यांच्यासह त्यांनी ती नदी पार केली. नदी पार केल्यावर एकमेकांच्यामध्ये साधारणपणे पन्नास पावलांचे अंतर ठेवून ते झोपी गेले. काही वेळाने हातात सुरी घेऊन तो परदेशी वाटाड्या ह्यू-एन-त्सँगकडे येऊ लागला. ह्यू-एन-त्सँगच्या जवळ साधारणपणे दहा पावलांवर आल्यावर तो परत फिरला. त्याचा उद्देश काय आहे, हे न समजल्यामुळे ह्यू-एन-त्सँग आपल्या चटईवर उठून बसला आणि अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाची वंदना म्हणू लागला. ते पाहिल्यावर वाटाड्या परत आपल्या जागेवर गेला आणि झोपला.

सकाळी उठल्यावर निघण्याच्या तयारीला लागताना वाटाड्या ह्यू-एन-त्सँगला म्हणाला, 'पुढचा पल्ला फार दूरचा आणि अत्यंत धोकादायक आहे. वाटेत पाणी किंवा गवत नाही. मनोऱ्याच्या शेजारीच फक्त पाणी आहे. तेथे आपल्याला रात्री



जाऊन पाणी घेऊन पुढे जावे लागेल. पण आपल्याला कोणी पाहिले तर आपण मेलोच म्हणून समजा. तेव्हा आपण परत फिरणे हितावह नाही काय?' ह्यू-एन-त्सँगने परत फिरण्यास स्पष्ट नकार दिला. तेव्हा हातात सुरा घेऊन आणि धनुष्यबाण सज्ज करून वाटाड्याने ह्यू-एन-त्सँगला पुढे होण्यास सांगितले. पण ह्यू-एन-त्सँगने वाटाड्यालाच पुढे जाण्यास सांगितले. काही वेळ पुढे गेल्यावर वाटाड्या थांबला. आणि ह्यू-एन-त्सँगला म्हणाला, 'मला माझ्या कुटुंबाची फार काळजी वाटते. म्हणून ह्या देशाचा कायदा तोडणे मला योग्य वाटत नाही.' तेव्हा ह्यू-एन-त्सँगने वाटाड्याला परत जाण्यास परवानगी दिली. वाटेत नी संकटे आली तरी आपण परत मागे फिरावयाचे नाही ह्या दृढनिश्चयाने ह्यू-एन-त्सँगने एकट्यानेच आपला पुढचा प्रवास सुरू केला. जेव्हा तो पहिल्या मनोऱ्याजवळ आला तेव्हा आपल्याला कोणी पाहील ह्या भीतीने रात्र होईपर्यंत तो एका खड्ड्यात लपून राहिला. काळोख पडल्यावर मनोऱ्याजवळ असलेल्या पाण्याच्या जागेवर जाऊन तो पाणी पिऊन आपली पाण्याची पिशवी भरत होता. इतक्यात सूं सूं करीत एक बाण त्याच्या गुडघ्याजवळून गेला आणि क्षणार्धातच त्याच्या मागोमाग दुसरा एक बाण सुटला. आपण सापडलो गेलो आहोत हे जाणून तो मोठ्याने म्हणाला, 'राजधानीवरून आलेला मी भिक्खू आहे.' तेथे आलेल्या शिपायांनी त्याला त्यांच्या अधिकाऱ्याकडे नेले. तो अधिकारी बुद्धधम्माचा परम उपासक असल्यामुळे त्याने ह्यू-एन-त्सँगला सर्वतोपरी मदत केली आणि पुढे जाऊ दिले. ह्याच घटनेची पुनरुक्ती दुसऱ्या मनोऱ्याजवळ झाली. अशा तऱ्हेने पाचही मनोऱ्यांच्या चौक्या पार केल्यावर त्याने मो-किया-यान वाळवंटातून प्रवासास सुरुवात केली. ह्या वाळवंटातून जाणारा रस्ता आठशे ली लांब आहे. सुमारे शंभर ली अंतर चालून गेल्यावर पाण्याच्या पिशवीतून पाणी पीत असताना त्याची पाण्याची पिशवी खाली पडली आणि पिशवीतील सर्व पाणी वाहून गेले. पुढच्या प्रवासात पाच दिवस पाण्याविना काढल्यामुळे त्याच्या सर्व शरीरातून असह्य उष्णता भासू लागली. शरीर लाही लाही झाले आणि तो मूर्च्छित होऊन पडला. त्याचा घोडा त्याच्या शेजारीच उभा होता. सुदैवाने त्या रात्री एकाएकी थंड हवा आल्याने त्याला थोडी हुशारी वाटू लागली आणि तो सावध झाला. घोड्यावर बसून पुढे प्रवास सुरू केला असता काही अंतरावर गेल्यावर एकाएकी घोड्याने दिशा बदलली आणि तो दुसऱ्या दिशेने जाऊ लागला. काही केले तरी घोडा परत फिरेना. पुढे काही अंतर गेल्यावर समोर हिरवेगार गवत आणि पाणी दिसले. तेथे एक दिवस विश्रांती घेतल्यावर पिशवीत पाणी भरून घेऊन ह्यू-एन-त्सँगने आपला प्रवास परत पुढे सुरू केला. तीन दिवसांच्या प्रवासानंतर ह्यू-एन-त्सँग इ-गू येथे पोहोचला. इ-गूच्या राजाने ह्यू-एन-त्सँगचे चांगले स्वागत केले. इ-गू येथे असताना काव-चांगच्या (तुर्कस्थान) राजाला चीनमधून कोणी विद्वान भिक्खू आला आहे असे समजले. त्याने आपले राजदूत इ-गू येथे पाठवून ह्यू-एन-त्सँगला काव-चांगची राजधानी पिह-ली येथे

येण्याबद्दल फारच आग्रहाचे आमंत्रण पाठविले. ह्यू-एन-त्सँगने उत्तरेच्या दिशेने कागन येथील स्तूप पाहून तर्फानच्या रस्त्याने जावयाचे ठरविले होते. परंतु काव-चांगच्या राजाच्या अति आग्रहाच्या आमंत्रणावरून त्याने आपला मार्ग बदलला.

### पीह–लीचे आदरातिथ्य

काव-चांगच्या अधिकाऱ्यांसह दक्षिणेकडील वाळवंटातून सहा दिवसांचा प्रवास केल्यावर ह्यू एन–त्सँग पीह–ली येथे रात्री पोहोचला. तेथे राजाने, राणीने आणि राजघराण्यातील इतर सर्व मंडळींनी ह्यू-एन-त्सँगचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. ह्यू-एन–त्सँगला अभिवादन करून राजा म्हणाला, 'जेव्हापासून मी तुमचे नाव ऐकले तेव्हापासून मी खाणेपिणे आणि झोप विसरून गेलो. तुमच्या प्रवासाच्या अंतराचा हिशोब करून, तुम्ही आज रात्री येथे याल याची मला खात्री होती. म्हणून माझी बायका–मुले आज झोपी न जाता धम्मसूत्राचे पठण करीत तुमच्या आगमनाची प्रतीक्षा करीत बसले होते.'

पीह–ली येथे दहा दिवस धम्म–प्रवचने केल्यावर ह्यूएन- त्सँगने पुढे जाण्याची परवानगी मागितली असता राजा म्हणाला, 'सु ई सम्राट राज्य करीत होता तेव्हा मी माझ्या गुरूबरोबर सर्व चीन देशामधून प्रवास केला आणि अनेक भिक्खूंशी धम्मचर्चा केली; पण तुमच्या तोडीचा एकही विद्वान भिक्खू मला पाहावयास मिळाला नाही. तुमच्या संगतीत राहून मला स्वर्गीय आनंद, सुख आणि शांती मिळाली आहे. तुम्ही येथे राहून माझ्या प्रजेला धम्मज्ञान दिले तर मी तुमचा जन्माचा ऋणी राहीन आणि जन्मभर तुमच्या गरजा पुरवीत राहीन. आपण माझी विनंती ऐकावी आणि पश्चिमेच्या प्रवासाचा नाद सोडावा. ह्यू–एन–त्सँगने राजाच्या ह्या विनंतीचा स्वीकार केला नाही. तो म्हणाला, 'तुम्ही दाखविलेल्या औदार्या-बद्दल माझ्यासारखा गरीब एकटा भिक्खू कशा तऱ्हेने आभार प्रदर्शित करू शकेल? धम्मदान करावे म्हणून मी ह्या प्रवासास निघालो नाही. माझ्या देशामध्ये धम्मा-विषयी असलेल्या अपूर्ण ज्ञानामुळे; माझ्या देशात असलेल्या धम्मग्रंथातील अपुरे-पणामुळे आणि अन्य धम्मतत्त्वे कोणती याबद्दल माझ्या मनात उद्भवलेल्या शंका-कुशंकामुळे मध्यदेशात स्वतः जाऊन संशोधन करावयाचे मी ठरवले आहे. म्हणून जिवाची पर्वा न करता धम्मतत्त्वांचे आतापर्यंत माहीत नसलेले विवरण जाणून घेण्यासाठी मी पश्चिमेकडे चाललो आहे. धम्मतत्त्वांच्या विवरणाचे मधुर दंवबिन्दू कपिलाप्रमाणेच पूर्वेकडील देशात पडावेत, हा माझा मुख्य हेतू आहे. म्हणून मित्र-प्रेमाच्या अतिरेकाने महाराजांनी मला मार्गात मध्येच थांबून ठेवू नये, अशी विनंती आहे.' काव-चांगच्या राजाने ह्यू-एन-त्सँगला थांबवून ठेवण्याचा खूप आग्रह केला; पण ह्यू-एन-त्सँगने मानले नाही. शेवटी राजाने बळाचा वापर करून ह्यू–एन–त्सँगला कैद करून परत चीनला पाठवून देण्याची धमकी दिली. आपल्याला बळजबरीने थांबवून ठेवण्यात येईल, हे जाणून ह्यू–एन–त्सँगने खाणेपिणे सोडून देऊन सत्याग्रह



सुरू केला. तीन दिवस खाणेपिणे बंद केल्यावर चौथ्या दिवशी राजाने ह्यू-हेन-त्सँगला प्रवासास पुढे जाण्याची परवानगी दिली. जाताना सकाळी थोडे खाऊन जावे अशी विनंती करण्यास राजा विसरला नाही. पण ह्यू–एन–त्सँगला राजाच्या हेतूबद्दल शंका वाटू लागली. तेव्हा राजाच्या सूचनेवरून ते दोघे बुद्धविहारात गेले. तेथे ह्यू-एन-त्सँगला भाऊ मानून राजाने त्याला प्रवासासाठी शुभकामना दिल्या. त्याचबरोबर परत येतांना ह्यू-एन-त्सँगने कमीत कमी तीन वर्षे आपल्या राज्यात राहावे अशी अपेक्षा प्रदर्शित केली. पुढच्या प्रवासाला लागणाऱ्या साधनसामग्रीची तजवीज करण्यासाठी ह्यू-एन-त्सँगने आणखी एक महिना तेथे राहावे आणि आपल्या प्रजेला धम्मज्ञान द्यावे अशीही विनंती राजाने केली.

एक महिन्यानंतर मोठ्या सन्मानाने आणि भावपूर्ण शब्दांत निरोप देताना राजाने ह्यू-एन-त्सँगबरोबर उत्तम कपड्याची वीस चीवरे, बर्फाच्छादित पर्वतावरून प्रवास करताना उपयोगी पडावे म्हणून गरम हातमोजे, पायमोजे, चामड्याचे बूट, थंडीपासून संरक्षण करण्यासाठी तोंड-डोके झाकणारी गरम आच्छादने इत्यादी वस्तू, शिवाय शंभर औंस वजनाचे सोने, चांदी, सॅटीन आणि टफेटा कपड्यांचे पाचशे तागे इत्यादी वीस वर्षांपर्यंत पुरणारी साधनसामग्री, तीस घोडे चोवीस नोकरांच्या-सह दिले, वाटेत येणाऱ्या चोवीस देशांतील राजांना राजपत्रे देऊन, ह्यू-एन-त्सँगला प्रवासात मदत करावी, अशी विनंती त्या राजपत्रांतून केली.

### लुटारूंशी गाठ व हत्याकांड

पुढे प्रवास सुरू केल्यावर वाटेत त्यांना लुटारूंच्या टोळीने गाठले. लुटारूंना जे पाहिजे होते[1] ते दिल्यावर ओ-कि-निच्या राजधानीच्या शहराजवळ ते पोहोचले. बरीच रात्र झाल्यामुळे त्यांनी वाटेतच एका ओढ्याच्या किनारी मुक्काम केला. त्यांच्याबरोबर काही परदेशी व्यापारी मंडळी होती. राजधानीच्या शहरात इतरां-पेक्षा लवकर पोहोचलो, म्हणजे आपल्या मालाला चांगली किंमत येईल, असे वाटून त्यांतील काही व्यापारी मंडळी मध्यरात्रीच पुढे गेली. वाटेत लुटारूंनी त्यांना मारून टाकून त्यांची सर्व चीजवस्तू लुटून नेली. सकाळी जेव्हा ह्यू–एन–त्सँग आणि इतर राहिलेली व्यापारीमंडळी त्या ठिकाणी पोहोचली, तेव्हा त्यांना हे हत्याकांड पाहून अत्यंत दुःख झाले. ओ–कि–नि येथे एक दिवस राहून ह्यू–एन–त्सँग कुचा येथे पोहोचला. तेथे त्याची मोक्षगुप्त[1] नावाच्या विद्वान भिक्खूशी गाठ पडली. लिंग पर्वतावरील बर्फाचा रस्ता अजून खुला झाला नव्हता, म्हणून कुच येथे ह्यू–एन–त्सँगला साठ दिवस राहावे लागले.

---

१. लुटारूंची आणि ह्यू–एन–त्सँग बरोबर असलेल्या माणसांची ताकद सारखीच असावी म्हणून, रक्तपात न करता हा समझोता केला गेला असावा असे वाटते.

पुढच्या प्रवासास निघावयाच्या दिवशी कुचाच्या राजाने ह्यू-एन-त्सँगला उंट, घोडे आणि नोकर अर्पण केले आणि स्वतः दरबारी मंत्र्यांच्यासह राजधानीच्या बाहेर काही अंतर चालत जाऊन आपला ह्यू-एन-त्सँगविषयी वाटणारा आदर प्रदर्शित केला.

पश्चिमेकडे दोन दिवस प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्सँगला अंदाजे २००० तुर्की लुटारू दिसले. कारवां लुटून मिळालेली लूट ते आपसांत वाटून घेते होते. लुटीच्या वाटपाबद्दल जेव्हा त्यांच्यात एकमत होईना, तेव्हा ते आपापसांत मारा-मारी करीत निघून गेले.

### लिग पर्वतावरून

पुढे ९०० ली प्रवास केल्यावर ते लिग पर्वतापर्यंत आले. हा पर्वत त्सुंग-लिग पर्वताचा उत्तरेकडील फाटा आहे. पर्वताची चढण एकदम सरळ असून तो ह्यू-एन-त्सँगच्या शब्दाप्रमाणे ढगापेक्षाही उंच आहे. त्याच्या निर्मितीपासून त्याच्या-वर बर्फाचे थर बसत गेले आहेत. काही ठिकाणी त्याचे रूपांतर हिमनदीत झाले आहे. त्यातील बर्फ हिवाळ्यात किंवा उन्हाळ्यात वितळत नाही. अतिशय प्रखर प्रकाशामुळे डोळे दिपून जातात. त्यामुळे त्यांच्याकडे फार वेळ पाहाणे अशक्य होते. कधी कधी बर्फाचे कडे कोसळून रस्ता बंद होतो. अंगात फरचे कितीही कपडे घातले तरी बर्फामधून वाहणाऱ्या झंझावाती वाऱ्यामुळे कडाक्याच्या चावऱ्या थंडीपासून संरक्षण करणे कठीण होते. झोपायची किंवा जेवणाखाण्याची इच्छा झाली तरी थांबण्यासाठी कोठेच कोरडी जागा सापडत नव्हती.

सात दिवस अशा प्रकारे प्रवास केल्यावर ते पर्वताच्या बर्फाच्छादित भागा-तून बाहेर पडले. त्यांच्याबरोबर असलेले बारा की चौदा लोक भुकेने आणि थंडीने मरण पावले. मरण पावलेल्या बैलांची आणि घोड्यांची संख्या त्यांच्यापेक्षा किती-तरी अधिक होती.

### खानाचा सत्कार

पुढे काही अंतर वायव्य दिशेने प्रवास केल्यावर तो सू-येह ह्या शहरात पोहोचला. तेथे खान ये-हू[3] याने त्याचे अगत्याने स्वागत केले. भारतात जाण्या-पासून परावृत्त करण्यासाठी खान ह्यू-एन-त्सँगला म्हणाला, तो देश अत्यंत उष्ण आहे. येथील पाचव्या महिन्याइतका कडक उन्हाळा तेथे दहाव्या महिन्यात (हिवा-ळ्यात) असतो. तू इतका नाजूक दिसतोस की, त्या हवामानात तू जगू शकणार नाहीस. तेथील माणसे अगदी काळी असून त्यांना शिष्टाचार माहीत नाहीत. त्यांच्याकडे पाहाण्याच्यासुद्धा ते योग्यतेचे नाहीत.' पण खान ह्यू-एन-त्सँगचे मन वळवू शकला नाही. शेवटी निरोप देते वेळी खानाने ह्यू-एन-त्सँगबरोबर वाटेत येणाऱ्या राज्यांच्या राजांना देण्यासाठी प्रशस्ति-पत्रे दिली. शिवाय ह्यू-एन-त्सँगला सॅटीनच्या कपड्याची तांबड्या रंगाची चोवरे आणि दहा ताणे रेशमी कापड दिले.

पुढच्या प्रवासात ह्यू-एन-त्सँग सा-मो-कीन ह्या राज्यात आला. तेथील राजाने त्याचे यथोचित स्वागत केले. तेथे दोन रानटी माणसे त्याचा पाठलाग करू लागली. ह्यू-एन-त्सँग जेव्हा बुद्ध विहारात वंदना करण्यासाठी गेला, तेव्हाही ती दोन माणसे त्याला त्रास देण्यासाठी त्याच्या मागोमाग गेली. हे राजाच्या जेव्हा लक्षात आले, तेव्हा राजाने त्यांना कडक शिक्षा करण्याची आज्ञा केली. परंतु ह्यू-एन-त्सँगच्या विनंतीवरून, त्या माणसांच्या शरीराला अपाय होईल अशी शिक्षा न देता त्यांना फक्त राज्याच्या बाहेर हाकलून दिले गेले. ह्या घटनेमुळे तेथील लोकांच्या मनावर इतका परिणाम झाला की, बऱ्याच लोकांनी ताबडतोब बुद्ध-धम्माचा स्वीकार केला. अशा तऱ्हेने दुष्ट विचारांनी युक्त असलेल्या लोकांच्या हृदयांचे आणि अग्निपूजेसारख्या अनिष्ट प्रथा असलेल्या लोकांचे परिवर्तन करून ह्यू-एन-त्सँगने त्यांना सत्-धम्माकडे वळविले. ह्यू-एन-त्सँग जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने अशा प्रकारे लोकांना बुद्धधम्माची दीक्षा दिली.

तेथून पुढे अनेक दिवसांचा प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्सँग व्हो राज्यात आला. वाटेत त्याला पर्वतातील एका अरुंद खिंडीत असलेल्या एका लोखंडी दर-वाजातून जावे लागले. ह्या दरवाजावर अनेक लोखंडी घंटा टांगल्या होत्या. वारं-वार होणाऱ्या तुर्कांच्या हल्ल्यापासून संरक्षण मिळावे म्हणून ह्या लोखंडी दरवा-जाची योजना केली गेली होती. व्हो देशाच्या राजाच्या मुलीशी खान येह-हूच्या मोठ्या मुलाने लग्न केले होते. व्होच्या राजाचा नुकताच मृत्यू झाला होता. त्या-मुळे ह्यू-एन-त्सँगला तेथे एक महिना थांबावे लागले. तेथे त्याची धर्मसिंह नावाच्या बुद्ध भिक्खूची भेट झाली. धर्मसिंह भारतात धम्मग्रंथांचा अभ्यास करून परत आला होता. गादीवर नवीन बसलेल्या शेखला पाहण्यास आलेल्या लोकांनी ह्यू-एन-त्सँगला ऑक्सस देशाजवळील फो-हो-लो-(Baktra) नावाच्या शहराची माहिती दिली. तेथे असलेल्या तथागतांच्या अनेक अवशेषांमुळे त्या शहराला छोटा राजगृह असे नाव पडले होते. त्या शहराला ह्यू-एन-त्सँगने जरूर जावे असा त्या

---

२. भिक्खू मोक्षगुप्त धम्मग्रंथाचा अभ्यास करण्यासाठी वीस वर्षांपेक्षा जास्त काळ भारतात राहिला होता. ह्यू-एन-त्सँगने त्याच्याबरोबर अनेक विषयांवर चर्चा केली. ह्यू-एन-त्सँगला निरोप देते वेळी मोक्षगुप्त आपल्या शिष्यांना म्हणाला, 'ह्यू-एन-त्सँगशी चर्चा करणे सोपे नाही. भारतात त्याच्याबरोबर चर्चा कर-ण्यास तरुण भिक्खू धजावणार नाहीत.'

३. हा तुर्की खान सुवर्णफुलांनी सुशोभित केलेल्या तंबूत रहात होता. त्याचा तंबू सोन्या-रुप्याच्या कशिदांनी इतका मढविला गेला होता की, त्याच्या प्रकाशाने ह्यू-एन-त्सँगचे डोळे दिपून गेले, असे तो म्हणतो.

लोकांनी आग्रह धरल्यामुळे ह्यू-एन-त्सँग फो-हो-लो कडे गेला. वाल्क येथे ह्यू-एन-त्सँगला शंभर संघाराम दिसले. त्या संघारामात हीनयान पंथाचे तीन हजार भिक्खू होते. तेथे तथागतांचा एक दात, पाण्याचे भांडे आणि जमीन साफ करण्याचा एक झाडू 'नव संघाराम' नावाच्या एका भव्य वैशिष्टयपूर्ण सुशोभित केलेल्या चैत्य-गृहात ह्यू-एन-त्सँगने पाहिला.

वाल्कमध्ये तक्का (पंजाबातील एक भाग) प्रांतातील प्रज्ञाकर नावाचा एक विद्वान भिक्खू होता. ह्यू-एन-त्सँग वाल्कमध्ये एक महिना राहिला. तेथे त्याने विभाषा शास्त्राचा अभ्यास केला. धर्मप्रिय आणि धर्माकर ह्या आणखी दोन विद्वान भिक्खूंची ह्यू-एन-त्सँगशी ओळख झाली. ते भिक्खू हीनयान पंथाच्या त्रिपिटकात पारंगत होते. पण प्रज्ञाकराची बुद्धिमत्ता फार तल्लख होती. हीनयानी पंथाच्या अभिधम्म, कात्यायनकोष इत्यादी धम्मग्रंथांवर त्याचे विशेष प्रभुत्व होते.

## १५० फूट उंच बुद्धमूर्ती

वाल्कहून प्रज्ञाकराच्या बरोबर ह्यू-एन-त्सँग दक्षिण दिशेने बमियान ह्या अफगाणिस्तानातील प्रसिद्ध ठिकाणी गेला. हीनयानी पंथाच्या लोकोत्तरवादी शाखेचे तेथे हजारो भिक्खू होते. महासांघिक शाखेच्या आर्यदास आणि आर्यसेन ह्या दोन भिक्खूंच्या बरोबर राजवाड्यातील बुद्धरूपे पहाण्यासाठी बमियानच्या राजाने ह्यू-एन-त्सँगला बोलावले. ह्यू-एन-त्सँगने बमियानच्या डोंगर-उतारावर असलेली १५० फूट उंचीची उभी बुद्धमूर्ती पाहिली. तेथे एका संघारामात एक हजार फूट लांबीची महापरिनिर्वाण मुद्रेतील भगवान बुद्धाची मूर्तीसुद्धा ह्यू-एन-त्सँगने पाहिली. बमियानहून प्रज्ञाकराच्या बरोबर पंधरा दिवसांच्या प्रवासानंतर ह्यू-एन-त्सँग कपिसा येथे पोहोचला.

कपिसा येथील एका स्तूपाची पडझड झाली होती. बौद्ध भिक्खू त्याची दुरुस्ती करण्यास आतूर होते. ह्यू-एन-त्सँगने त्या स्तूपाचे ऐतिहासिक महत्त्व जाणून स्वतःच्या देखरेखीखाली तेथे उत्खनन केले. उत्खननात सात आठ फुटांवर त्याला तांब्याच्या एका मोठ्या कलशात सोन्याची शेकडो नाणी आणि मोत्यांच्या कित्येक माळा मिळाल्या. त्या द्रव्याच्या सहाय्याने त्याने त्या स्तूपाची दुरुस्ती केली. हा स्तूप चीनच्या हॅन सम्राटाच्या मुलाने बांधला होता. तेथे राजकीय कारणासाठी त्याला ओलीस म्हणून बंदिस्त केले होते अशी आख्यायिका आहे, असे तेथील भिक्खूंनी ह्यू-एन-त्सँगला सांगितले.

ह्यू-एन-त्सँगने कपिसा येथील शा-लो-का विहारात वर्षावास केला वर्षावासाच्या काळात ह्यू-एन-त्सँगने प्रज्ञाकाराबरोबर अनेक वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चा केली. त्या ठिकाणी मनोज्ञघोष, आर्यवर्मा आणि गुणभद्र हे सर्वास्तिवादी शाखेचे विद्वान भिक्खू उपस्थित होते. ह्यू-एन-त्सँगने सर्व पंथांच्या शिकवणीची चर्चा करून सर्वांच्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर दिले. त्यामुळे सर्वांनी त्याच्या विद्व-



त्तेची वाखाणणी केली. कपिसाच्या राजाला चर्चेमुळे फार आनंद झाला. त्याने ह्यू-एन-त्सँगला विशेष भेट म्हणून कशिदा काढलेले रेशमाचे चीवर दान केले. वर्षावास संपल्यावर तुखाराच्या राजाच्या आग्रहावरून प्रज्ञाकर वाल्क येथे परत गेला आणि ह्यू-एन-त्सँगने आपला प्रवास पूर्वेकडे लाम्घान, सरहद्द प्रांत, नगरहारा, गांधार इत्यादी भारतातील देशांकडे सुरु केला.

ह्यू-एन-त्सँग वर्षावासात प्रवास करीत नसे. हे लक्षात घेऊन भारतातील त्याच्या प्रवासाची खालील रूपरेषा आखण्यात आली.

इ. स. ६६० कपिसा येथील शा-लो-का विहारात.
,, ६३१, ६३२ काश्मीर येथे दोन वर्षे मे ६३१ पासून एप्रिल ६३३ पर्यंत.
,, ६३३ पूर्व पंजाबातील चिनाभुक्ती येथे चौदा महिने.
,, ६३४ जालंदर येथे चार महिने
,, ६३५ विजनेर जिल्ह्यातील मनिपूर येथे.
,, ६३६ कनौज येथे भद्रविहारात तीन महिने. विहार सोडल्यावर हिवाळ्यात नदीतल्या चाच्या लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला.
,, ६३७ नालंदा येथे थोडे दिवस राहिल्यावर परत नालंदा येथे पंधरा महिने इ. स. ६४२ साली. सर्व मिळून नालंदा येथील वास्तव्य दोन वर्षांचे.
,, ६३८ मोंघीर जिल्ह्यातील इ-रिना देश विहारात एक वर्ष वास्तव्य.
,, ६३९ कृष्णा नदीवरील अमरावती आणि बेझवाडा येथे बराच काळ.
,, ६४० कांची येथे श्रीलंकेला जाण्यासाठी योग्य वेळेची वाट पहात बराच काळ वास्तव्य.
,, ६४१ दुसऱ्या पुलकेशीच्या राजधानीत. डॉ. फ्लीटच्या मताप्रमाणे नाशिक येथे
,, ६४२ पो-हा-टो देशात कदाचित जम्मू येथे.
,, ६४३ पि-लो-शन्ना. कदाचित मध्यप्रदेशातील इटाहा जिल्ह्यातील बिलसार येथे. ६४३ च्या सुरुवातीचे महिने सम्राट हर्षवर्धनाबरोबर
इ. स. ६४४ खेतान. चीन देशात प्रवेश करण्यासाठी चीनच्या सम्राटाच्या परवानगीची वाट पाहात ह्यू-एन-त्सँगने आठ महिने घालविले. तो इ. स. ६४५ साली चीनमधील चांग-गानला पोहोचला.

मागे लिहिल्याप्रमाणे ह्यू-एन-त्सँग कपिसाहून लाम्घान सरहद्द पार करून नगरहारा येथे पोहोचला. नगरहारा देशाच्या राजधानीपासून दोन ली अंतरावर अशोक राजाने बांधलेला तीनशे फूट उंचीचा एक स्तूप त्याने पाहिला. हिड्डा येथील स्तूपात तथागतांचा कपोलधातू होता.[1] 'तथागतांच्या कपाळाचे हाड एक फूट दोन इंच लांब आहे. हाडाचा रंग पिवळसर पांढरा असून तो जडजवाहिरांनी मढविलेल्या

---

१) विस्तार भयास्तव ह्या किंवा इतर असल्या गोष्टींची पूर्ण माहिती येथे दिली नाही.

करडकात ठेवला आहे' असे ह्यू-एन-त्संग म्हणतो. ह्यू-एन-त्संगने फा-हियान प्रमाणेच तथागतांचे संघाटी चीवर आणि काठी पाहिली. तसेच दीपंकर शहराच्या जवळ असलेल्या नागराजा गोपालाच्या गुहेतील तथागतांची छबी जिवावरचा धोका पत्करून पाहिली.

## गांधारात आगमन

नगरहारापासून आग्नेय दिशेला अंदाज ५०० ली अंतर प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्संग गांधार देशात पोहोचला. तो म्हणतो, 'गांधार देश हा पूर्व-पश्चिम अंदाजे १००० ली असून उत्तर-दक्षिण तो ८०० ली आहे. त्यांच्या पूर्व सीमेला सिन्धू नदी आहे. ह्या देशाची राजधानी पुरुषपूर (पेशावर) साधारणपणे ४० ली परिघाची आहे. येथील राजघराण्याचा अंत झाला असून हल्ली ह्या देशावर कपिसाच्या राजाचे राज्य आहे. शहरे आणि खेडी जवळजवळ ओस पडली आहेत. वस्ती अगदी तुरळक झाली आहे. राजवाड्याच्या एका बाजूला हजार एक कुटुंबांची वस्ती आहे. हा देश सुपीक असून तेथे अन्न-धान्य आणि फळे-फुले विपुल होतात. येथे ऊससुद्धा भरपूर होतो. त्याच्या रसापासून गूळ बनविला जातो. हवा उष्ण आणि दमट आहे. येथे सहसा बर्फ पडत नाही. लोक मनाने मवाळ असून शिक्षणप्रेमी आहेत. बहुतेक सर्वजण पाखण्डी मनाचे आहेत. काही थोडेजण बुद्ध धम्माचे उपासक आहेत. पूर्वीच्या काळापासून आतापर्यंत बुद्धधम्मग्रंथांचे अनेक विद्वान लेखक जम्बुद्वीपाच्या ह्या प्रदेशात निर्माण झाले आहेत. उदाहरणार्थ, नारायण देव, असंग बोधिसत्त्व, वसुबंधू बोधिसत्त्व, धर्मत्रात, मनोहित, भदन्त पार्श्व, इत्यादी. येथे जवळजवळ १००० संघाराम आहेत. ते सर्व ओस पडले आहेत. त्यांच्यात जंगली झुडपांची वाढ झाली आहे. बहुतेक स्तूपांची पडझड झाली आहे. पाखण्डी लोकांची अंदाजे १००० देवळे आहेत. तेथे पाखण्डी लोकांची चिक्कार गर्दी होते.

राजधानीच्या शहरात ईशान्य दिशेला एका पडलेल्या इमारतीचा पाया आहे. पूर्वी येथे तथागतांच्या भिक्षापात्राचा स्तूप होता. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर ते भिक्षापात्र येथे आले होते. येथे बरीच शतके त्याची पूजा चालत असे. आता बऱ्याच देशांचा प्रवास करून ते पर्शियामध्ये गेले आहे.

शहराच्या बाहेर आग्नेय दिशेला आठ किंवा नऊ ली अंतरावर सुमारे १०० फूट उंचीचे एक पिंपळाचे झाड आहे. त्याची छाया घनदाट आहे. पूर्वी येथे चार बुद्ध बसले होते. त्यांच्या मूर्ती ह्या झाडाखाली आहेत. भद्रकल्पामध्ये सुमारे ९९६ बुद्ध येथे बसणार आहेत.

## कनिष्काचा स्तूप

त्या पिंपळाच्या झाडाच्या दक्षिणेला सम्राट कनिष्काने बांधलेला स्तूप आहे.



तथागताच्या निर्वाणानंतर ४०० वर्षांनी कनिष्क गादीवर बसला आणि त्याने सर्व जम्बुद्वीपावर राज्य केले. त्याचा सत्‌धर्मावर किंवा असत् धर्मावर पहिल्यांदा विश्वास नव्हता. बुद्धधम्माला तो अगदीच मामुली मान देत असे. एकदा माळरानावरून फिरत असता त्याला एक पांढरा ससा दिसला. ससा होता त्या जागेपर्यंत, तो गेला पण एकाएकी तो ससा लुप्त झाला. नंतर लाकडाच्या साहाय्याने तीन फूट उंचीचा स्तूप बांधीत असलेला एक धनगराचा मुलगा त्याने पाहिला. राजाने त्याला विचारले, 'तू काय करीत आहेस?' तेव्हा, त्या धनगराच्या मुलाने उत्तर दिले, 'पूर्वी शाक्य बुद्धांनी आपल्या आध्यात्मिक शक्तीने अशी भविष्यवाणी केली होती की, 'ह्या देशामध्ये एक सम्राट राज्य करील. तो एक स्तूप बांधील. त्या स्तूपात माझ्या रक्षेचा बराच भाग ठेवलेला असेल.' आता तो समय आला आहे. पूर्वीच्या भविष्यवाणीकडे तुझे लक्ष वेधण्यासाठी मी स्तूप बांधीत आहे.' सम्राटाने हे ऐकल्यावर त्याला अतिशय आनंद वाटला. तथागतांच्या भविष्यवाणीत आपला निर्देश केला आहे, असा ठाम विश्वास वाटून त्याला स्वतःबद्दल अभिमान वाटला आणि तो बुद्धधम्माचा उपासक झाला. त्या लहान स्तूपाशेजारीच त्याने दगडाचा स्तूप बांधायला घेतला. पण बांधकाम चालू असताना शेजारच्या स्तूपाची उंची कनिष्काने बांधलेल्या स्तूपापेक्षा नेहमीच तीन फुटांनी जास्त होत गेली. शेवटी कनिष्काचा स्तूप ४५० फूट उंचीचा झाला. त्याच्या पायाचा परिघ दीड ली आहे. त्याला पाच मजले असून पहिला मजला १५० फूट उंचीचा आहे. स्तूपावर सोन्याचे पाणी दिलेली तांब्याची पंचवीस धम्मचक्रे आहेत. त्या स्तूपात तथागताच्या रक्षा ठेवल्या होत्या.

भविष्यवाणीप्रमाणे जेव्हा स्तूप सात वेळा आगीत नष्ट होईल आणि सात वेळा परत बांधला जाईल तेव्हा बुद्धधम्माचा लोप होईल. जुन्या मान्यवर लोकांच्या लिखाणावरून आत्तापर्यंत हा स्तूप तीनदा पाडण्यात आला होता आणि तीनदा त्याची दुरुस्ती केली गेली होती. मी जेव्हा पहिल्यांदा येथे आलो होतो तेव्हा नुकताच तो आगीत नष्ट झाला होता. त्याच्या दुरुस्तीचे काम चालू आहे पण ते अजून पूर्ण झालेले नाही.

मोठ्या स्तूपाच्या पश्चिमेला सम्राट कनिष्काने बांधलेला एक जुना संघाराम आहे. त्याचे मनोरे, गच्च्या, मोठमोठे दिवाणखाने वगैरे त्या संघारामात राहणाऱ्या महान विभुतींनी केलेल्या कार्याची ग्वाही देतात. आता जरी तो पडत चालला आहे, तरी त्याचे अप्रतिम शिल्पकाम चटकन लक्षात येते. आता तेथे अगदी थोडे हीनयानी पंथाचे भिक्खू राहात आहेत. पण तो बांधल्यापासून धम्मग्रंथाचे अनेक विद्वान लेखक तेथे राहात होते. तेथे त्यांना अर्हंतपद प्राप्त झाले. त्यांची कीर्ती दूरवर पसरलेली आहे आणि त्यांचे आदरणीय जीवनचरित्र अजूनही अनुकरणीय आहे.

तिसऱ्या मनोऱ्याजवळ भदन्त पार्श्वकाची खोली आहे. ती बऱ्याच वर्षांपूर्वी पडली आहे. पण आठवण म्हणून त्या ठिकाणी त्यांनी एक शिलालेख ठेवला आहे.

भदन्त पार्श्व पहिल्यांदा ब्राह्मण पण्डित होता. पण ऐंशी वर्षांचा झाल्यावर त्याने घर सोडले आणि बुद्ध भिक्खूची चीवरे परिधान केली. गावातील वाह्यात मुले त्याची चेष्टा करीत म्हणत, 'मूर्ख म्हाताऱ्या माणसा, तुला खरोखरच अक्कल नाही. तुला माहीत नाही का की, जे बुद्ध भिक्खू बनतात, त्यांना दोन कामे करावी लागतात. एक म्हणजे ध्यान करणे आणि दुसरे म्हणजे धम्मशास्त्राचे अध्ययन-अध्यापन करणे. आता तू म्हातारा आणि विकलांग झाला आहेस. बुद्ध भिक्खू होऊन धम्मकार्यात तू काय प्रगती करू शकणार?' त्यांच्याकडे दुर्लक्ष करून त्याने प्रतिज्ञा केली की, जोपर्यंत त्रिपिटकाचा खरा अर्थ मला समजत नाही आणि जोपर्यंत मी सहा अभिज्ञा आणि आठ विमोक्ष मिळवीत नाही, तोपर्यंत मी विश्रांती घेणार नाही.' तेव्हापासून ध्यान करण्यात आणि चंक्रमण करण्यात त्याला दिवस अपुरा पडू लागला. दिवसा तो बुद्धधम्मशास्त्राचा अभ्यास करी आणि रात्री विचारांची शृंखला न तोडता तो ध्यान करीत बसे. तीन वर्षातच त्याने त्रिपिटकांचा संपूर्ण अभ्यास केला. ऐहिक सुखाच्या लालसेपासून तो मुक्त झाला आणि त्याने त्रिविद्या[1] मिळविल्या. नंतर लोक त्याला भदन्त पार्श्विक म्हणू लागले आणि त्याचा आदर करू लागले.

पार्श्विकाच्या खोलीच्या पूर्वेला एक जुने घर आहे. तेथे वसुबंधू बोधिसत्त्वाने 'अभिधर्मकोष शास्त्र' लिहिले. त्याच्याबद्दल वाटणाऱ्या आदराने लोकांनी तेथे त्या अर्थाचा एक शिलालेख ठेवला आहे.

## मनोहिताची गोष्ट

वसुबंधूच्या घराच्या दक्षिणेला साधारण पन्नास पावलांवर एक दोन मजली घर आहे. त्या ठिकाणी धम्मशास्त्रामध्ये पारंगत असलेल्या मनोहिताने 'विभाषाशास्त्र' लिहिले. हा विद्वान भिक्खू तथागतांच्या परिनिर्वाणानंतर एक हजार वर्षांच्या काळात झाला होता. लहानपणापासूनच विद्याव्यासंगाकडे त्याची प्रवृत्ती होती. त्यात त्याची तल्लख बुद्धिमत्ता दिसून येत असे. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली होती. धार्मिक वृत्तीची आणि सामान्य माणसे त्याचा मनापासून फार आदर करीत असत. त्या वेळेस श्रावस्तीचा राजा विक्रमादित्य फार प्रसिद्ध झाला होता. सर्व भारतात दररोज पाच लाख सुवर्ण नाणी दान करावीत अशी आज्ञा त्याने त्याच्या खजिनदाराला केली. तो गरीब, अनाथ आणि दुःखी लोकांच्या गरजा भागवीत असे. राज्याचा खजिना संपुष्टात येईल अशी भीती वाटल्यामुळे तो राजाला म्हणाला, 'महाराजाधिराज, तुमची कीर्ती सर्व थरांतील प्रजेत पसरली असून ती वन्य प्राण्यांतही पसरत चालली आहे. जगातील सर्व गरिबांना दररोज पाच लाख सुवर्ण नाणी देण्याची तुम्ही मला आज्ञा केली आहे. तुमचा खजिना अशा तऱ्हेने लवकरच संपुष्टात येईल आणि शेतकऱ्यांवर तुम्हाला नवीन कर लादावे लागतील. मग शेतकऱ्यांचे उत्पन्नही संपुष्टात येईल आणि लोकांमध्ये असंतोष फैलावेल. अशा तऱ्हेने राज्यात बंडाळी निर्माण होईल. दानधर्माबद्दल महाराजांना पुण्य मिळेल, पण सर्वजण माझा तिरस्कार करतील.' त्यावर राजा म्हणाला, 'मी माझ्या उत्पन्नातून गरिबांना मदत करीत आहे. माझ्या फायद्यासाठी अविचाराने देशातील लोकांवर मी कराचा भार टाकणार नाही.' ह्या प्रसंगानंतर काही दिवसांनी एकदा राजा डुकराची शिकार करीत होता. डुकराचा माग चुकल्यावर त्याला बरोबर माग दाखविणाऱ्या माणसाला राजाने एक लाख सोन्याची नाणी दिली. मनोहित (जो एका छोट्या राज्याचा राजा होता.) धम्मशास्त्रांत पारंगत होता. त्याने एकदा त्याच्या डोक्याचे केस कापणाऱ्या माणसाला एक लाख सोन्याची नाणी बक्षीस म्हणून दिली. हे मनोहिताच्या उदार देणगीचे कार्य इतिहास लिहिणाऱ्यांमध्ये मुख्य असलेल्या इतिहासकाराच्या वहीत नोंदले गेले. विक्रमादित्य राजाने जेव्हा हे वाचले तेव्हा मनोहितासारख्या माणसाचे दानकार्य आपल्या बरोबरीचे असावे, ह्या गोष्टीबद्दल त्याला शरम वाटू लागली आणि तेव्हापासून तो मनोहिताचा द्वेष करू लागला. मनोहितामध्ये काहीतरी दोष दाखवून त्याला शिक्षा करावी असे त्याच्या गर्विष्ठ मनाने ठरविले. नंतर त्याने निरनिराळ्या धर्मांच्या १०० विद्वानांना एकत्र बोलाविले आणि त्यांना फर्माविले की, निरनिराळ्या मतप्रणालींची तपासणी करून, त्यांना कितपत स्वातंत्र्य द्यावयाचे, हे मला ठरवावयाचे आहे. तुम्ही त्या दृष्टीने विचारविनिमय करा. चर्चा सुरू झाल्यावर त्याने दुसरे फर्मान काढले. निरनिराळ्या धर्मांचे येथे जमलेले विद्वान त्यांच्या विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध आहेत. श्रमणांनी आणि बुद्धधम्माच्या तत्त्ववेत्त्यांनी आपल्या धम्मतत्त्वांचे समर्थन करावे. जर ते विजयी झाले, तर बुद्धधम्माबद्दल ते आदर उत्पन्न करतील. पण त्यांचा पराभव झाला तर, त्यांना नष्ट करण्यात येईल. (त्यांचे निर्मूलन करण्यात येईल.) मनोहिताने चर्चेत नव्याण्णव पाखण्डी मताच्या विद्वानांचा पराभव केला. आता त्याच्याबरोबर चर्चा करण्यासाठी एक अगदीच सामान्य माणूस उभा केका गेला. त्याच्याबरोबर काहीतरी मामुली विषयावर चर्चा करण्याचा प्रस्ताव मांडला. चर्चेसाठी हा प्रस्ताव मांडताच राजाने आणि तेथे जमलेल्या इतर पाखण्डी माणसांनी 'मनोहित चुकला. त्याने पहिल्यांदा धूर आणि नंतर अग्नी असे म्हणावयास पाहिजे होते' असे म्हणत आरडाओरडा करून गोंधळ करण्यास सुरुवात केली. मनोहिताला त्यांनी बिलकूल बोलू दिले नाही. लोकांच्या अशा तऱ्हेच्या वागण्याने मनोहिताला फार वाईट वाटले. 'पक्षपाती लोकांच्या गराड्यात न्यायाला वाव नाही' अशा अर्थाची एक चिठ्ठी, आपला शिष्य वसुबंधू याला लिहून स्वतःची जीभ चावून घेऊन मनोहित मरण पावला.

त्यानंतर लवकरच विक्रमादित्याचे राज्य संपुष्टात आले आणि दुसऱ्या वंशा-

---

१. त्रिविद्या म्हणजे (१) अनित्यता (२) दुःख आणि (३) अनात्मता यासंबंधीचे सखोल ज्ञान.

त्या राजाचे राज्य सुरू झाले. हा राजा विद्वानांना फार मान देत असे. पूर्वी झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी वसुबंधू राजाजवळ आला आणि म्हणाला, 'महाराज, आपण आपल्या पवित्र अंतःकरणाने आणि मोठ्या न्यायाने राज्य करीत आहात. माझे गुरू मनोहित हे धर्मशास्त्रामध्ये फार पारंगत होते त्यांच्यावर असलेल्या रागामुळे (विक्रमादित्य) राजाने त्यांच्या कीर्तीला हानिकारक वर्तन केले आहे. माझ्या गुरूवर झालेल्या अन्यायाची भरपाई करण्याची माझी इच्छा आहे. मनोहित हा अत्यंत तल्लख बुद्धीचा विद्वान बौद्ध भिक्खू होता हे राजाला माहीत होते. त्याने वसुबंधूच्या प्रस्तावाला अनुमती दिली. ज्यांनी मनोहिताशी वादविवाद केला होता त्या पाखण्डी विद्वानांना राजाने वादासाठी आमंत्रण पाठविले. आपल्या गुरूच्या वादातील विषयांचाच परत प्रस्ताव मांडून वसुबंधूने सर्व पाखण्डी विद्वानांचा पराभव केला.

कनिष्काच्या संघारामाच्या ईशान्य दिशेला ५० ली अंतरावर एक मोठी नदी पार केल्यावर पुष्कलवती नावाचे एक शहर लागते. तेथे सम्राट अशोकाने बांधलेला एक स्तूप आहे. धम्माची शिकवण देण्यासाठी मध्य भारतातून येथे विद्वान भिक्खू आले होते. उदाहरणार्थ– वसुमित्र. त्याने येथे 'अभिधर्म प्रकरण पदशास्त्र' लिहिले.

उत्तरेला चार-पाच ली अंतरावर एक जुना संघाराम आहे. तो आता मोडकळीस आला आहे. तेथे हीनयानी पंथाचे काही भिक्खू राहात आहेत. विद्वान भिक्खू धर्मत्रात याने 'संयुक्ताभिधर्मशास्त्रा'ची निर्मिती येथे केली.

येथून ५० ली अंतरावर एक स्तूप आहे. तेथे हरिती ह्या यक्षिणीला तथागतांनी बुद्धधम्माची दीक्षा देऊन लोकांना त्रास देण्यापासून तिला परावृत्त केले होते. तेथून दोनशे ली आग्नेय दिशेला 'पो-लु-शा' नावाचे शहर आहे. येथे ईश्वर नावाच्या विद्वान बौद्ध भिक्खूने संयुक्त–अभिधर्म–हृदयशास्त्र'[1] नावाच्या ग्रंथाची रचना केली. ह्याच प्रदेशात वेस्सन्तर जातकाची घटना घडली असे म्हणतात.

po–lo–tu–lo सालूतरा ह्या ठिकाणी पाणिणि ऋषींचा जन्म झाला. त्याने (Chingmin-lun) 'व्याकरणम्' लिहिले. पाणिणि लहानपणापासूनच अत्यंत तल्लख बुद्धिमत्तेचा आणि बहुश्रुत होता. लोकांच्या लिहिण्याच्या आणि बोलण्याच्या भाषेत आलेली अशुद्धता काढून टाकून व्याकरणाचे शुद्ध नियम तयार करावेत म्हणून त्याने खूप कष्ट घेऊन भाषेविषयी ज्ञान मिळविले. नंतर व्याकरणाचे नियम तयार करण्याच्या हेतूने मन केन्द्रित करून अव्याहतपणे तपश्चर्या केली. त्याने लिहिलेला व्याकरणाचा ग्रंथ एक हजार श्लोकांचा आहे. प्रत्येक श्लोकामध्ये बत्तीस अक्षरे आहेत. त्या ग्रंथात अक्षरे आणि शब्दाच्या बाबतीत आतापर्यंत माहीत असलेले सर्व काही आहे. हा ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्याने राजाकडे पाठवून दिला. राजा

१. ह्याचे चिनी भाषेतील भाषांतर इ. स. ४२६ साली ईश्वराने केले आहे.



त्या ग्रंथामुळे फार प्रभावित झाला. सर्व राज्यभर त्या ग्रंथातील नियमांचे पालन व्हावे तो ग्रंथ सर्वांनी शिकावा जो कोणी तो ग्रंथ पहिल्यापासून शेवटपर्यंत पाठ म्हणून दाखवील त्याला १०० सुवर्णनाणी बक्षीस देण्यात येतील, असा जाहीरनामा राजाने काढला. तेव्हापासून विद्वानांनी जगाच्या कल्याणासाठी तो ग्रंथ समग्ररीत्या तोंडपाठ करून ठेवला. त्याच कारणासाठी ह्या शहरातील ब्राह्मण त्यांच्या विद्वत्तेसाठी, बहुश्रुतपणासाठी आणि चांगल्या स्मरणशक्तीसाठी प्रसिद्ध आहेत.

सालूतरा शहरात एक स्तूप आहे. त्या ठिकाणी पाणिणिच्या एका ब्राह्मण अनुयायाला एका अर्हताने दीक्षा दिली होती. त्या गावच्या लोकांनी त्या ब्राह्मणाचे अनुकरण केले आणि तेव्हापासून आतापर्यंत त्या गावचे लोक बुद्धधम्माचे पालन करीत आहेत.'

उत्तर खंडापासून उत्तरेकडे सहाशे ली प्रवास केल्यावर, ह्यू–एन–त्संग उद्यान देशात पोहोचला. तेथे सुभवास्तू नदीच्या दोन्ही बाजूंना एक हजार चारशे संघारामात अंदाजे अठरा हजार भिक्खू होते. आता तेथे फारच थोडे भिक्खू राहिले आहेत'[1] असे ह्यू–एन–त्संग म्हणतो.

येथे परंपरागत धम्माचे आणि विनयाचे पालन करणारे धर्मगुप्त, महिशासक, महासांघिक, काश्यपिय आणि सर्वास्तिवादी पंथाचे भिक्खू होते.

उद्यान देशात ह्यू-एन-त्संगने तथागताच्या पदचिन्हाचा खडक, चीवरे धुण्याचा दगड, त्याचप्रमाणे, मैत्रेय बोधिसत्त्वाची एक शंभर फूट उंचीची लाकडाची सोनेरी रंगाची अप्रतिम मूर्ती पाहिली. ही मूर्ती अर्हत माध्यान्तिकाने तयार केली होती.

### तक्षशीलेत आगमन

सिन्धू नदी पार केल्यावर ह्यू–एन–त्संग तक्षशीला येथे आला. तक्षशीला येथे अशी आख्यायिका आहे की, तेथे बोधिसत्त्वाने चन्द्रप्रभा नावाच्या राजाचा जन्म घेतला असता, आपले शिर लोककल्याणासाठी तोडून दिले होते.

सौत्रांतिक शाखेच्या कुमारलब्ध'[2] ह्या विद्वान भिक्खूने येथे अनेक धम्मग्रंथ लिहिले होते. शहराच्या बाहेर पर्वताच्या जवळ शंभर फूट उंचीचा सम्राट अशोकाने बांधलेला एक स्तूप ह्यू–एन–त्संगने पाहिला. राजकुमार कुणालच्या सावत्र आईने

१. इ. स. ५२० साली संग–यून जेव्हा येथे आला होता, तेव्हा हा प्रदेश भरभराटीचा होता, असे त्याने त्याच्या प्रवासवर्णनात लिहिले आहे. कदाचित मिहिरकुलाने हा प्रदेश उजाड केला असावा.

२. ह्यू–एन–त्संग म्हणतो, अश्वघोष पूर्वेकडे, आर्यदेव दक्षिणेकडे, नागार्जुन पश्चिमेकडे आणि कुमारलब्ध उत्तरेकडे, ह्या चार सूर्यांनी सर्व प्राणिमात्रांना प्रकाशमान केले होते.

अन्यायाने कुणालवर' आरोप केल्यावर त्याचे तेथे डोळे काढण्यात आले होते.

### काश्मीरचा प्रवास

तक्षशीलेहून ह्यू-एन-त्संग काश्मीरला गेला. तेथे १०० संघाराम असून ५००० भिक्खू होते. तेथील सम्राट अशोकाने बांधलेल्या चार स्तूपात तथागतांच्या रक्षा होत्या. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर काही वर्षांनी तेथे मध्यान्तिक नावाचा एक विद्वान आणि कर्तबगार भिक्खू होऊन गेला. त्याने काश्मिरात अनेक संघाराम बांधले. सम्राट अशोकाच्या काळात महादेव नावाचा एक अत्यंत विद्वान भिक्खू काश्मिरात होऊन गेला. त्याने अनेक धम्मग्रंथ लिहिले आहेत. सम्राट कनिष्काबद्दल ह्यू-एन-त्संग म्हणतो,

'तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर चारशे वर्षांनी कनिष्क गांधार देशाचा राजा झाला. त्याचे साम्राज्य खूप दूरवर पसरले होते. राज्यकारभारातून त्याला जेव्हा जेव्हा वेळ मिळत असे तेव्हा तेव्हा तो धम्मग्रंथाचा अभ्यास करीत असे. दररोज तो विद्वान भिक्खूना आपल्या राजवाड्यात बोलावून त्यांना धम्माचे तत्त्वज्ञान शिकविण्यास सांगत असे. पण निरनिराळ्या पंथांच्या शिकवणीत त्याला फरक दिसून आला. त्यामुळे त्याच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्या. त्या शंकांचे निरसन कसे करावे ह्याचा काही मार्ग त्याला सापडेना. त्या वेळी भदन्त पार्श्व सम्राट कनिष्काला म्हणाला, 'तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर आतापर्यंत खूप काळ लोटला आहे. निरनिराळ्या शाखेचे अनुयायी आपापल्या शाखा-संस्थापकांचीच शिकवण योग्य आहे असे मानतात. त्यामुळे बौद्धशिकवणीत बरेच मतभेद झाले आहेत' हे ऐकून कनिष्काला फार वाईट वाटले. त्याने त्रिपिटकांचे एकसूत्रीकरण करण्यासाठी एक धम्मसभा बोलावली. त्यात त्रिपिटकाचा गाढा अभ्यास

---

१. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर सुमारे पन्नास वर्षांनी तक्षशीलाच्या लोकांनी बंडाळी केली. ती शमविण्यासाठी बिन्दुसार राजाने मगधाहून सूसीम नावाच्या त्याच्या मोठ्या मुलाला पाठविले. त्यात त्याला यश आले नाही म्हणून मगधच्या बिन्दुसार राजाने त्याच्या लहान मुलाला—अशोकाला तिकडे पाठविले. अशोकाला तक्षशीलेचे लोक तात्काळ शरण आले. बिन्दुसार राजा हयात असताना राजाचा प्रतिनिधी म्हणून अशोक पंजाब प्रांतावर देखरेख करण्यासाठी तक्षशीला येथे काही वर्षे राहिला होता. सम्राट अशोक राज्य करीत असताना तक्षशीलेच्या लोकांनी पुन्हा एकदा बंड उभारले. ते मोडण्यासाठी अशोकाने त्याचा मुलगा कुणाल याला पंजाबात पाठविले. बंड मोडून पंजाबात सुव्यवस्था स्थापल्यावर कुणालला अशोकाने आपला प्रतिनिधी म्हणून पंजाबवर देखरेख करण्यासाठी ठेवले होते. कुणालच्या आईचे नाव पद्मावती, बायकोचे नाव कांचनमाला आणि जिने अन्यायाने आरोप केला होता त्या सावत्र आईचे नाव तिष्यरक्षिता असे होते.



असलेले आणि पाच विद्या' मध्ये पारंगत असलेले अशा ५०० विद्वान अर्हतांनी भाग घेतला. धम्म संगितीचे अध्यक्ष वसुमित्राला करण्यात आले. सम्राट कनिष्काची अशी इच्छा होती की, ह्या संगितीत भाग घेणाऱ्या अर्हतांनी राजगृहाजवळील सप्तपर्णी गुहेजवळ' जाऊन तत्त्वचिंतन करावे. परंतु सर्वच अर्हतांनी असे मत प्रदर्शित केले की, तत्त्वचिंतनासाठी लागणारी शांतता आणि योग्य सोयी (हल्लीच्या राजकीय परिस्थितीमुळे) तेथे मिळणार नाहीत. तरीसुद्धा राजाच्या इच्छेप्रमाणे जागा निवडली जावी. राजा अर्हतांच्याबरोबर ती जागा सोडून दुसरीकडे गेला. तेथे त्याने ग्रंथांची जुळवणी करून विभाषा शास्त्राची रचना करण्यास संघाराम बांधला.

त्या पाचशे अर्हतांनी सर्वांत प्रथम सूत्रपिटकाचे स्पष्टीकरण करणारे उपदेश शास्त्र लिहून काढले. नंतर विनयपिटकाचे स्पष्टीकरण करणारे विनयविभाषाशास्त्र लिहिले आणि त्यानंतर अभिधर्म पिटकाचे स्पष्टीकरण करणारे अभिधर्मविभाषाशास्त्र लिहिले.

आतापर्यंत लिहिला गेलेला कोणताच ग्रंथ ह्या ग्रंथाची बरोबरी करू शकणार नाही. ग्रंथनिर्मिती करताना त्या अर्हतांनी सर्व मुद्याचा सांगोपांग विचार केला. कोणतीही संबंधित गोष्ट त्यांनी विचार न करता सोडून दिली नाही. हा ग्रंथ आता विश्वविख्यात झाला असून सर्व विद्यार्थ्यांचा तो मूलभूत ग्रंथ झाला आहे.

सम्राट कनिष्काने हा ग्रंथ ताम्रपटावर कोरून काढण्याची आज्ञा दिली. ताम्रपत्रावर कोरून काढलेला हा ग्रंथ नंतर एका पाषाणाच्या करंडकात घालून त्यावर त्याने एक स्तूप बांधला आहे.

सम्राट कनिष्कानंतर कृतिय वंशातील लोकांनी येथील सत्ता काबीज केली. त्यांनी भिक्खूंना हाकलून लावले आणि धम्मावर बंदी घातली. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर सहाशे वर्षांनी तुखारा प्रदेशातील हिमतल देशाच्या राजाने कृत्यांच्या राजाचा वध करून बौद्ध भिक्खूना परत मानाने काश्मीरला बोलावले. त्याने संघाराम बांधले आणि धम्माला परत उर्जितावस्था प्राप्त करून दिली. कृत्यांना वाटले की, बुद्ध भिक्खूमुळे त्यांना राज्य गमवावे लागले आणि अपमान सहन करावा लागला. ह्याच कारणासाठी आता कृत्यांचे राज्य चालू असता धम्माचे नीट पालन होत नाही.'

---

१. पाच विद्या म्हणजे (१) शब्दविद्या किंवा संस्कृत व्याकरण, (२) अध्यात्म विद्या म्हणजे बुद्ध धम्माच्या अध्यात्मशास्त्रात पारंगत असणे, (३) चिकित्सा विद्या-औषध, जादूटोणा इत्यादी विषयींची विद्या, (४) हेतुविद्या म्हणजे तर्कशास्त्र आणि (५) शिलास्थानविद्या म्हणजे भूशास्त्र, खगोलशास्त्र, हवामानशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र इत्यादी.

२. राजगृहाजवळील सप्तपर्णी गुहेजवळ काश्यपाच्या अध्यक्षतेखाली दुसरी धम्मसंगिती भरली होती.

## मिहिरकुलाचा भिक्षुसंहार

काश्मीरनंतर पूंच आणि राजापुरीचा प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्सँग टक्का देशाच्या राजधानीत आला. ह्या देशाच्या पूर्वेला विपशा नदी असून पश्चिमेला सिन्धू नदी आहे. काही शतकांपूर्वी ह्या देशात मिहिरकुल नावाच्या राजाने राज्य केले. ह्यू-एन-त्सँगच्या प्रवासवृत्तातून मिहिरकुलाबद्दल पुढील माहिती मिळते.

'मिहिरकुल स्वभावतःच शूर आणि तल्लख बुद्धिमत्तेचा होता. त्याने शेजारचा प्रदेश पादाक्रांत करून आपल्या राज्याला जोडला. राज्यकारभारातून फुरसत मिळेल तेव्हा बुद्ध धम्माचे तत्त्वज्ञान शिकावे असे त्याला वाटले. म्हणून धम्माचे तत्त्वज्ञान शिकविण्यासाठी आपल्याकडे कोणी विद्वान भिक्खू पाठवून द्यावा, अशी बौद्ध संघाकडे त्याने मागणी केली. पण मिहिरकुलाकडे जाण्यास कोणीच भिक्खू तयार होईना ज्यांना काही इच्छा राहिली नव्हती ते समाधानी होते तर ज्यांनी खूप ज्ञानप्राप्ती आणि कीर्ती मिळविली होती, ते राजाच्या कृपेची उपेक्षा करीत होते. राजाच्या नोकरांपैकी एका माणसाने बरीच वर्षे चीवरे परिधान केली होती. तो असामान्य बुद्धिमत्तेचा, बोलका आणि वादविवाद करण्यात हुशार होता. संघाने त्याला राजाकडे पाठविले. तेव्हा राजा म्हणाला, तथागतांच्या धम्माबद्दल मला आदर आहे. भिक्खू संघाने कोठूनही मला धम्म शिकविण्यासाठी एक विद्वान भिक्खू पाठवून दयावा अशी विनंती मी केली होती. मला नेहमी असे वाटत होते की, भिक्खूसंघात अनेक विद्वान भिक्खू असले पाहिजेत. पण आज जे घडले त्याबद्दल मला काय आदर राहावा?' त्याने नंतर फर्मान काढले की, 'सर्व भारतातून भिक्खूंना नष्ट करण्यात यावे आणि त्यांची आठवण राहील अशी कोणतीच गोष्ट शिल्लक ठेवण्यात येऊ नये'

ह्या वेळी मगधाचा राजा बलादित्य[1] होता त्याला बुद्ध धम्माबद्दल आणि बौद्धांबद्दल फार आदर वाटत असे. जेव्हा मिहिरकुलाने बौद्धांवर चालविलेल्या क्रूर अत्याचाराची त्याला माहिती मिळाली, तेव्हा त्याने आपल्या राज्याच्या सीमेवर कडेकोट बंदोवस्त केला आणि मिहिरकुलाला खण्डणी देण्याचे नाकारले त्यामुळे मिहिरकुलाने मोठ्या सैन्याची जमवाजमव करून मगधावर चाल केली. त्या वेळी मिहिरकुल पकडला गेला. पण बलादित्य राजाच्या आईच्या मध्यस्थीमुळे मिहिरकुलाला जिवंत सोडून देण्यात आले त्यानंतर मिहिरकुल काश्मीरच्या राजाकडे आश्रयासाठी गेला. तेथे काश्मीरच्या राजाने त्याला मानाने वागविले. पुढे त्याने काश्मीरच्या राजाला मारून राज्य बळकावले. नंतर कपटाने गांधारच्या राजाला मारून गांधारचे राज्यसुद्धा बळकावले. त्याने गांधारच्या राजघराण्यातील सर्व माणसांना, त्याचप्रमाणे गांधारच्या राजाच्या सर्व मंत्र्यांना मारून टाकून बौद्ध स्थळांचा विध्वंस केला. त्याने स्तूप उखडून काढले आणि संघाराम जाळून टाकले. सर्व मिळून एक हजार सहाशे बौद्ध इमारती नष्ट केल्या. अनेक लढायात मारल्या गेलेल्या सैन्याशिवाय त्याने कैद केलेले नऊ लाख सैनिक होते. त्यापैकी एक तृतीयांश सैन्याला त्याने सिंधू नदीच्या किनाऱ्यावर कंठस्नान घातले दुसरे एक तृतीयांश सैन्य नदीत बुडवून मारले आणि उरलेल्या एक तृतीयांश सैन्याला गुलाम बनवून आपल्या सैन्यात वाटून टाकले. नंतर लूट करून आपल्या सैन्यानिशी तो परत गेला, पण एका वर्षाच्या आतच तो मेला. त्याच्या मरणाच्या वेळेला विजा चमकत होत्या, गारांचा पाऊस पडत होता आणि आकाश काळेकुट्ट झाले होते. धार्मिक माणसांचे असे म्हणणे आहे की, तो सर्वात खालच्या दर्जाच्या नरकात पडला.'

१. बुद्धगुप्त (इ. स. ३४९ ते ३६८) याचा मुलगा तथागतगुप्त आणि तथागतगुप्ताचा मुलगा बलादित्य. त्याचा काळ इ. स. ४२० असावा.



सकल नावाच्या एका गावात एक संघाराम होता. तेथे अंदाजे १०० भिक्खू राहात होते. पूर्वीच्या काळी ह्या ठिकाणी वसुबंधू बोधिसत्त्वाने 'परमार्थ सत्य-शास्त्र' लिहून काढले.'

सकलहून ५०० ली पूर्वेकडे प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्सँग चीनापती देशात आला. येथे दहा संघाराम आणि आठ देवळे होती. ह्यू-एन-त्सँग म्हणतो की, 'पूर्वी सम्राट कनिष्क जेव्हा राज्य करीत होता, तेव्हा त्याचे साम्राज्य फार दूरवर पसरले होते. चीनमधील पीत नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशातील राज्यकर्त्यांनी कनिष्काचे माण्डलीकत्व पत्करून सम्राटाकडे राजघराण्यातील माणसे 'ओलीस' म्हणून ठेवली होती. सम्राट कनिष्काने ओलिसांचा स्वीकार करून विशेष आस्थेने त्यांची देखभाल केली होती. वर्षाच्या तिन्ही हंगामात त्यांना निरनिराळ्या ठिकाणी राहण्याची खास व्यवस्था केली होती. त्यांच्या संरक्षणासाठी आणि तैनातीसाठी त्यांच्या दरवाजाबाहेर चार सैनिकांची नियुक्ती केली होती. ह्या देशात हिवाळ्यात राहण्याची त्यांची व्यवस्था केली होती. त्याच कारणामुळे ह्या देशाला चीनापती असे नाव मिळाले आहे. पूर्वी संबंध भारतात पियर किंवा पीचची झाडे नव्हती. चिनी ओलिसांनी ती भारतात आणली म्हणून येथे पीचच्या झाडाला 'चिनानी' आणि पियरच्या झाडाला 'चिनीराज' असे म्हणतात.'

येथील राजधानीच्या शहराच्या आग्नेय दिशेला ५०० ली अंतरावर तामसवन आहे. तेथे सर्वास्तिवादी शाखेचे ३०० भिक्खू ह्यू-एन-त्सँगच्या वेळी होते. अनेक धम्मशास्त्रांचा निर्माता कात्यायन येथे राहात असे. त्याने 'अभिधर्मज्ञान-प्रस्थानशास्त्र' येथे लिहिले.

तामसवन संघारामापासून १४० ते १५० ली अंतर प्रवास केल्यावर ह्यू-एन त्सँग जालंदर राज्यात आला. तेथे सुमारे ५० संघाराम होते. त्यात हीनयानी आणि महायानी मिळून सुमारे २००० भिक्खू रहात होते. जालंदरमध्ये तीन देवळे होती. तेथे पाखण्डी पाशुपत पंथाचे सुमारे ५०० साधू होते. ह्यू-एन-त्सँगने तेथील नगरधन नावाच्या संघारामात वर्षावास केला. तेथे त्याने चंद्रवर्मा नावाच्या त्रिपिटका-

मध्ये पारंगत असलेल्या भिक्खूजवळ राहून 'प्रकरण–पद-विभाषा-शास्त्रा' चा अभ्यास केला.

### मथुरा

जालंदरहून ईशान्य दिशेला प्रवास केल्यावर तो कुलू प्रदेशात गेला. तेथून ७०० ली अंतर शतद्रू आणि आणखी ८०० ली अंतर परियात्रा ह्या प्रदेशातून प्रवास केल्यावर आणखी ५०० ली प्रवास करून तो मथुरा येथे पोहोचला.

'मथुरा येथे २० संघाराम असून हीनयानी आणि महायानी पंथांचे मिळून सुमारे २००० भिक्खू आहेत. तेथे पाच देवळे असून त्यात निरनिराळ्या पंथांचे साधू राहातात' असे ह्यू-एन-त्संगने नमूद केले आहे.

फा-हियानने पाहिल्याप्रमाणे मथुरा येथे शाक्य तथागतांच्या प्रमुख शिष्यांच्या रक्षा असलेले स्तूप ह्यू-एन-त्संगने पाहिले. त्यांत सारिपुत्र, मौद्गलपुत्र, पूर्ण- मैत्रियानीपुत्र,[१] उपाली, आनंद, राहुल, मंजुश्री, आणि इतर बोधिसत्त्वांचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे.

फा–हियानप्रमाणेच ह्यू-एन-त्संगनेसुद्धा मथुरा येथील स्तूपांच्या उत्सवाचे वर्णन केले आहे. जसे की, 'अभिधर्माला मानणारे सारिपुत्राची पूजा करीत. सूत्रांचे विद्यार्थी पूर्ण मैत्रियानीपुत्राची पूजा करीत. विनयाचा अभ्यास करणारे उपालीची पूजा करीत. भिक्षुणी आनंदाची आणि श्रामणेर राहुलाची पूजा करीत.'

मथुरा शहराच्या पूर्वेला पाच किंवा सहा ली अंतरावर भदंत उपगुप्ताने[२] स्थापन केलेला एक संघाराम होता. तेथे तथागतांची नखे आणि केस जपून ठेवले होते. त्या संघारामाच्या उत्तरेस एक दगडी घर होते. त्याची लांबी रुंदी ३० फूट असून उंची २० फूट होती. तेथे उपगुप्ताने प्रवचन करून एका दांपत्याला अर्हतपद प्राप्त करून दिले, अशा अर्थाचे लिखाण एका लाकडी पट्टीवर ह्यू-एन-त्संगला वाचावयास मिळाले.

मथुरा येथून ह्यू-एन-त्संग स्थानेश्वर आणि श्रुंग ही स्थळे पाहून गंगाकिनारी आला. गंगानदीचे वर्णन करताना ह्यू–एन–त्संग म्हणतो–

'ही नदी तीन–चार ली रुंद असून ती आग्नेय दिशेने वाहते. ज्या ठिकाणी ती समुद्राला मिळते त्या ठिकाणी ती दहा ली रुंद आहे. नदीचे पाणी चवीला गोड आहे. नदीच्या पाण्याबरोबर अत्यंत सूक्ष्म अशी वाळू वाहते. देशातील साधारण

१) पूर्ण मैत्रियानीपुत्र हा महाराष्ट्रातील सोपारा येथील रहिवासी होता.

२) उपगुप्त हा जन्माने शूद्र होता. केवळ सतरा वर्षांचा असताना तो भिक्खू झाला आणि तीन वर्षांनंतर तो अर्हत झाला. त्याने माराचा पराभव करून स्वतः विजय मिळविला. त्याने आपले कार्यक्षेत्र मथुरा येथे निवडले होते. सम्राट अशोकाचा तो समकालीन होता.



पुस्तकात ह्या नदीला 'पवित्र नदी' असे म्हटले आहे. जे ह्या नदीत स्नान करतात, त्यांची पापे धुतली जातात. जे ह्या नदीचे पाणी पितात किंवा त्या पाण्याने नुसते तोंड धुतात, ते सर्व संकटमुक्त होतात आणि जे ह्या पाण्यात मरतात त्यांना तात्काळ स्वर्गात जन्म मिळून सुख उपभोगावयास मिळते. म्हणून सामान्य स्त्री-पुरुष ह्या नदीच्या किनाऱ्यावर नेहमी येत असतात.'

'पण ह्या देशातील पाखंडी लोकांची ही एक अंधश्रद्धा आहे. ती खरी नाही. नंतर जेव्हा देव बोधिसत्त्वाने[१] ह्या सर्वांचा खरा अर्थ समजावून सांगितला तेव्हा लोकांची अंधश्रद्धा कमी होऊ लागली.'

### विभाषाशास्त्राचा अभ्यास

ह्या राज्यात त्रिपिटकांचा गाढा अभ्यास असलेला जयगुप्त नावाचा एक विद्वान भिक्खू होता. म्हणून त्याच्याजवळ सौत्रांतिक शाखेच्या विभाषाशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ह्यू-एन-त्संग येथे संपूर्ण हिवाळा आणि अर्धा उन्हाळा राहिला. नंतर नदी पार करून तो मतिपूर राज्यात आला. ह्या राज्याचा राजा शूद्र होता. तेथे दहा संघाराम असून हीनयानी पंथांच्या सर्वास्तिवादी शाखेचे सुमारे आठशे भिक्खू होते. राजधानीच्या शहरापासून चार किंवा पाच ली अंतरावर एक लहानसा संघाराम होता. तेथे पूर्वीच्या काळी गुणप्रभ नावाच्या विद्वान भिक्खूने 'तत्त्व-सत्यशास्त्र' आणि इतर जवळजवळ शभर धम्मशास्त्रे लिहिली. हा विद्वान भिक्खू मूळचा 'पर्वत' येथील राहाणारा. तो सुरुवातीला महायान पंथाचा अनुयायी होता. पण नंतर हीनयानी पंथाचा पुरस्कर्ता बनला. तो स्वभावाने गर्विष्ठ असल्यामुळे अर्हतपद प्राप्त करू शकला नाही. गुणप्रभाच्या संघारामाच्या दक्षिणेस तीन-चार ली अंतरावर एक संघाराम होता. तेथे हीनयानी पंथाचे सुमारे दोनशे भिक्खू राहात असत. ह्या विहारात संघभद्र नावाचा एक अत्यंत विद्वान भिक्खू राहात होता. तो मूळचा काश्मीरचा रहिवासी होता. सर्वास्तिवादी शाखेचे विभाषाशास्त्र त्याला पूर्णपणे अवगत होते.

त्या वेळी वसुबंधू बोधिसत्त्व ह्यात होते. जे ज्ञान शिकविण्यासाठी शब्द अपुरे पडतात असे शब्दातीत ज्ञान ते ध्यानाच्या माध्यमातून शिकवीत असत. विभाषिका शाखेच्या तत्त्वज्ञानाचे खंडन करण्यासाठी त्यांनी 'अभिधर्मकोषशास्त्र' लिहिले. त्यांची शैली सुरेख आणि निर्दोष असून त्यात मार्मिक सूक्ष्म मुद्यांचे विवेचन असे. संघभद्राने हा ग्रंथ वाचला आणि तो मनात फार अस्वस्थ झाला. त्याने सतत बारा वर्षे संशोधन करून २५,००० श्लोकांत आठ लाख शब्द असलेला 'कोषकारिका शास्त्र' हा ग्रंथ लिहून काढला. हा ग्रंथ अत्यंत परिश्रम घेऊन लिहिला होता. त्यात तत्त्वांचे अतिसूक्ष्म विवेचन होते. ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्याने

१) देव बोधिसत्त्व म्हणजे आर्यदेव. तो मूळचा श्रीलंकेचा असावा.

आपल्या शिष्यांना बोलावून सांगितले की, ' माझे डोळे मिटायच्या आत तुम्ही हा ग्रंथ घेऊन वसुबंधूकडे जा आणि त्याच्याशी वादविवाद करून त्याचे सर्व मुद्दे खोडून काढा. हे काम करण्यासाठी मला म्हाताऱ्याला भाग पाडू नका.'

त्यानंतर संघभद्र त्याच्या तीन-चार शिष्यांसह वसुबंधूच्या शोधात निघाला. त्या वेळी वसुबंधू चेका प्रदेशातील सकल शहरात राहात होते. वसुबंधूने जेव्हा ऐकले की, संघभद्र त्याच्या शिष्यांसह वाद करण्यासाठी येत आहे, तेव्हा त्याने आपल्या शिष्यांना प्रवासाची तयारी करण्यास सांगितले. त्या वेळी त्यांच्या शिष्यांपैकी प्रमुख शिष्य थोडे रागावून म्हणाला, ' तुमचे सद्‌गुण पूर्वी झालेल्या मान्यवंत पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहेत आणि आता तुमच्या विद्वत्तेची कीर्ती फार दूरवर पसरली आहे असे असताना संघभद्राचे नाव ऐकून तुम्ही का घाबरता आहात ? त्यामुळे आम्हाला, तुमच्या शिष्यांना, कमीपणा आला आहे.' त्यावर वसुबंधू म्हणाले, ' मी दुसरीकडे जात आहे त्याचे कारण मी संघभद्राला घाबरलो आहे हे नसून ह्या प्रदेशात संघभद्राच्या मुद्यांच्या उणिवा जाणण्याइतके तीक्ष्ण बुद्धिमत्तेचे कोणी नाहीत हे आहे. तो फक्त माझ्या म्हातारपणाला दोष लावीत बसेल. शास्त्रार्थाची गंभीर चर्चा येथे होणे शक्य नाही. नाहीतर मी त्याला एका शब्दात उडवून लावीन. आपण त्याला मध्य भारतात नेऊ या. तेथे विद्वानांसमोर चर्चा झाल्यावर कोणती तत्त्वे योग्य आणि कोणती तत्त्वे अयोग्य आहेत, ते कळेल. सूकरांच्यापासून सिंह जरी दूर गेला, तरी दोघांमध्ये बलवान कोण आहे, हे सुज्ञ माणसे ओळखतात.'

वसुबंधू मध्य प्रदेशाकडे येत आहे हे कळल्यावर, संघभद्राला आपल्या सर्व शक्ती नष्ट होऊन आपण गर्भगळीत झालो आहोत असे वाटू लागले. त्याने वसुबंधूची क्षमायाचना मागून त्याला लिहिले की, ' तथागतांचे महापरिनिर्वाण झाल्यामुळे त्यांच्या शिष्यांनी निरनिराळ्या शाखांच्या निरनिराळ्या ग्रथांची निर्मिती केली आणि अशा तऱ्हेने प्रत्येक शाखेची निरनिराळी शिष्यपरंपरा निर्माण झाली. त्या शिष्यांनी आपापल्या शाखेचीच शिकवण उचलून धरली. इतर शांखांच्या शिकवणी त्यांनी झिडकारून लावल्या. माझ्या अल्पमतिप्रमाणे, मी माझ्या पूर्वजांच्या शिकवणीस चिकटून राहिलो. विभाषिका शाखेच्या उच्च तत्त्वांचे खंडन करणाऱ्या तुमच्या अभिधर्मकोष ग्रंथाचे वाचन केल्यावर माझी स्वतःची कुवत न जाणता, अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर विभाषिकांच्या तत्त्वांचे समर्थन करण्यासाठी मी हा ग्रंथ लिहिला आहे. माझे शहाणपण थोडे आहे; पण माझा उद्देश पवित्र होता. माझा अंतःकाळ आता जवळ येत चालला आहे. बोधिसत्त्वाने (वसुबंधाने) आपल्या उच्च तत्त्वांचे प्रतिपादन करताना माझा ग्रंथ नष्ट केला नाही आणि तो आहे तसाच ठेवला तर मला माझ्या मरणाचे दुःख वाटणार नाही.' नंतर एका शिष्याला जवळ बोलावून संघभद्राने त्याला ते पत्र आणि आपला ग्रंथ घेऊन वसुबंधूकडे जाण्यास सांगितले. नंतर थोड्याच वेळात संघभद्र मरण पावला.



वसुबंधूने संघभद्राच्या ग्रंथाचे नाव ' न्यायानुसार शास्त्र ' असे ठेवले. संघभद्राचा स्तूप येथून जवळच आमराईत आहे. त्या आमराईच्या शेजारीच विमलमित्र नावाच्या सर्वास्तिवादी शाखेच्या विद्वान भिक्खूचा स्तूप आहे. हा विमलमित्र मूळचा काश्मीरचा रहिवासी होता. त्याने सर्व जम्बुद्वीपभर प्रवास केला होता. तो त्रिपिटकात पारंगत होता.

ह्या राज्याच्या उत्तर सीमेवर गंगा नदीच्या किनारी मायापूर किंवा गंगाद्वार (हरिद्वार)[1] नावाच्या नगरीत नव्वद वर्षांचा मित्रसेन नावाचा एक विद्वान भिक्खू होता. तो गुणप्रभाचा शिष्य असून त्रिपिटकामध्ये पारंगत होता. ' तत्त्व सत्य शास्त्र ' आणि ' अभिधर्म ज्ञान-प्रस्थान ' शास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी ह्यू-एन-त्सँग त्याच्याजवळ अर्धा उन्हाळा आणि नंतर येणारा वर्षावासाचा काळ थांबला.

### कपिथा अर्थात सांकेश्या

नंतर ह्यू-एन-त्सँग ब्रह्मपुरा (गढवाल आणि कुमॉन) देशातून गोविसन (उज्जैनजवळ) देशात आला. तेथून अहिक्षेत्रात (उत्तर पांचाल-रोहिल खंड) आणि पुढे दक्षिणेला २६० ते २७० ली प्रवास केल्यावर वीरसेन प्रदेशात, तेथून पुढे आग्नेय दिशेला २०० ली प्रवास केल्यावर कपिथा[2] येथे आला.

कपिथा येथे चार संघाराम होते. त्यात सम्मतीय शाखेचे साधारणपणे १००० भिक्खू राहात होते. ह्या ठिकाणी दहा देवळेसुद्धा होती. त्यात महेश्वराची पूजा करणारे आणि त्याला बळी अर्पण करणारे पाखंडी साधू राहात असत. शहरापासून २० ली अंतरावर एक अत्यंत सुंदर संघाराम होता. त्याचे बांधकाम करताना कलाकाराने आपल्या कौशल्याचे प्रदर्शन सर्व ठिकाणी केलेले होते. त्या संघारामातील पवित्र बुद्धरूप अत्यंत मनोहर होते ! त्या संघारामात सम्मतीय शाखेचे साधारणपणे १०० भिक्खू राहात असत. संघारामाच्या भोवती राहाणाऱ्या उपासकांची संख्या वरीच मोठी होती. संघारामाच्या आवारात तीन मौल्यवान शिड्या होत्या. त्या अशा तऱ्हेने ठेवल्या होत्या की जणू काही त्यांच्यावरून पूर्वेच्या दिशेला उतरता येईल. हीच ती जागा आहे की, ज्या ठिकाणी तावतिंस स्वर्गातून तथागत उतरले होते. पूर्वीच्या काळी तथागत जेतवनातून स्वर्गात जाऊन आपल्या आईला – मायादेवीला – धम्म शिकविण्यासाठी सद्‌धर्म मंडपात राहिले होते. तीन महिन्यांनंतर परत जम्बुद्वीपावर येण्याची इच्छा झाल्यामुळे देवांचा राजा शक्र याने त्याच्या

---

१) हरिद्वारचे पूर्वीचे नाव मयूर, मायापूर आणि गंगाद्वार असे होते. हरिद्वार हे नाव फार नंतर दिले गेले आहे.

२) सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ वराह मिहिराचा जन्म कपिथा येथे झाला असे इतिहासतज्ज्ञांचे मत आहे. कपिथा म्हणजेच उत्तर प्रदेशातील फरुकाबाद जवळचे सांकेश्या.

अमानवी शक्तीच्या योगाने ह्या मौल्यवान शिड्या उभ्या केल्या होत्या. मधली शिडी शुद्ध सुवर्णाची होती, डाव्या बाजूची शुद्ध स्फटिकाची आणि उजवीकडची शुद्ध रुप्याची होती.

अनेक देवांच्यासमवेत सद्धर्म मंडपातून निघून, तथागत मधल्या शिडीवरून खाली उतरले. हातात चामर धरून उजव्या बाजूच्या शिडीवरून महाब्रह्मराजा खाली उतरला, तर हातात छत्र धरून डाव्या बाजूच्या स्फटिकाच्या शिडीवरून देवांचा राजा शक्र उतरला. तथागत उतरत असताना देवांनी त्यांच्यावर फुले उधळली आणि त्यांच्या स्तुतीची गाणी म्हटली.

ह्यू-एन-त्संग म्हणतो, 'काही शतकांपूर्वी त्या शिड्या तशाच अस्तित्वात होत्या. पण आता त्या पृथ्वीत गडप झाल्या आहेत. शेजारच्या प्रदेशातील राजे लोकांना आता त्या शिड्या पाहाण्याचे आपले भाग्य नाही हे जाणून दुःख वाटले. त्यांनी त्या प्रसंगाची आठवण म्हणून त्या ठिकाणी पाषाणाच्या शिड्या बांधून त्यांच्यावर कलाकुसरीची कामे करविली आहेत. त्या शिड्या अंदाजे सत्तर फूट उंच आहेत. त्यांच्यावर एक विहार बांधला आहे आणि त्या विहाराच्या बाहेर एक बुद्धरूप आहे. दोन्ही बाजूंना ब्रह्म आणि शक्र यांच्या मूर्ती आहेत. त्या मूर्तींची ठेवण अशी आहे की, त्यांच्याकडे पाहिल्यावर, जसे काही स्वर्गातून तथागत खाली उतरत आहेत असे वाटते ! तेथे जवळच सम्राट अशोकाचा सत्तर फूट उंचीचा एक पाषाणाचा स्तंभ आहे. त्याच्यावर सिंह[1] आहे. विहाराच्या शेजारी जेथे तथागत चंक्रमण करीत असत तेथे ५० फूट लांब आणि ७ फूट उंच असे बांधकाम केले आहे. ज्या ठिकाणी तथागतांची पावले पडत असत तेथे पाषाणात कमळाची सुंदर फुले कोरलेली आहेत. ज्या ठिकाणी तथागत स्नान करीत, ज्या ठिकाणी ते ध्यानास बसत असत, तेथेही स्तूप बांधले आहेत.'

कपिथा (सांकिश्या) पासून वायव्य दिशेला साधारणपणे २०० ली अंतर चालून गेल्यावर ह्यू-एन-त्संग कान्य कुब्ज (कन्या कुब्ज= कनौज) येथे पोहोचला. ह्या देशात बौद्ध आणि पाखण्डी लोक साधारणपणे निम्मे निम्मे होते. तेथे १०० संघाराम असून १०,००० भिक्खू आहेत. त्याचप्रमाणे तेथे २०० देवळे असुन अनेक हजार साधू आहेत, असे त्याने नमूद केले आहे.

ह्यू-एन-त्संग म्हणतो, 'कान्यकुब्ज देशाच्या राजधानीचे जुने नाव कुसुमपूर असे होते. एका ऋषीच्या शापामुळे तेथील राजाच्या कन्या कुबड्या झाल्या ; म्हणून त्या नगरीचे नाव कन्याकुब्ज असे पडले आहे.'

---

१) जनरल कनिंगहॅमने कपोथ येथे म्हणजे हल्लीच्या सांकिश्या येथे अशोक स्तंभावर हत्ती असलेला पाहिला. कदाचित ह्यू-एन-त्संगला सोंड तुटलेल्या अवस्थेतील हत्ती दुरून सिंहासारखा दिसला असेल.



## राजा हर्षवर्धन

'हल्लीचा राजा वैश्य आहे. त्याचे नाव हर्षवर्धन असे आहे. दोन पिढ्यांमध्ये तीन राजे झाले वडिलांचे नाव प्रभाकरवर्धन आणि मोठ्या भावाचे नाव राज्यवर्धन असे होते. मोठा भाऊ म्हणून राज्यवर्धन गादीवर बसला आणि मोठ्या न्यायाने राज्य करू लागला. त्या वेळी पूर्वेकडच्या कर्णसुवर्ण प्रांताचा राजा शशांक हा होता. तो नेहमी आपल्या मंत्र्यांना म्हणत असे की, शेजारच्या देशातील राजा गुणवान असेल तर ते आपल्या राज्याला अहितकारक आहे. म्हणून कट करून राज्यवर्धनाला मारण्यासाठी एकदा शशांकाने त्याला आमंत्रण दिले आणि कपटाने त्याचा खून केला. नंतर भण्डी आदि मंत्र्यांच्या सल्ल्यावरून हर्षवर्धन 'कुमार शीलादित्य' हे नाव धारण करून गादीवर बसला. गादीवर बसण्यापूर्वी गंगेच्या किनारी असलेल्या अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाचा त्याने आशीर्वाद घेतला होता. नंतर त्याने सैन्याची जमवाजमव केली. त्याच्याजवळ ५००० हत्ती, २००० घोडदळ आणि ५०,००० पायदळ सैन्य होते. त्याने पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत सर्व देश पादाक्रांत केले. सहा वर्षांनंतर त्याने जम्बुद्वीपातील पाच भागांना आपल्या अधिपत्याखाली आणले. राज्याचा विस्तार झाल्यानंतर त्याने आपल्या सैन्याचाही मोठ्या प्रमाणात विस्तार केला. तीस वर्षांनंतर त्याच्या सैन्याने विश्रांती घेतली आणि सर्वत्र शांततेत तो राज्य करू लागला. तो दानधर्माच्या कार्यात इतका मग्न झाला की, तो आपली तहानभूक विसरला. त्याने आपल्या साम्राज्यात प्राणिहत्या करण्यास बंदी घातली. गंगानदीच्या किनाऱ्यावर अनेक सहस्र १०० फूट उंचीचे स्तूप बांधले. सर्व साम्राज्यात शहरांना आणि गावांना जोडणाऱ्या रस्त्यांवर विश्रांतिस्थाने बांधली. त्या ठिकाणी प्रवाशांसाठी औषधपाण्याची, खाण्याची आणि पिण्याच्या पाण्याची सोय केली प्रत्येक विश्रांतिस्थानावर तीन वैद्यांच्या नेमणुकी करण्यात आल्या. तेथे औषधांचा पुरेसा साठा ठेवण्यात आला. त्यामुळे प्रवाशांची आणि गरीब लोकांची चांगली सोय झाली. बुद्धधम्माच्या सर्व पवित्र ठिकाणी संघाराम बांधण्यात आले.

दर पाच वर्षांनी तो एक मोठी धर्मसभा भरवीत असे. तिला तो 'महामोक्ष परिषद' असे म्हणत असे. तेथे तो आपली सर्व संपत्ती दानधर्मात देत असे. फक्त सैन्याची शस्त्रे दानात दिली जात नसत ; कारण दान करण्यासाठी ती निरुपयोगी असत. दरवर्षी तो आपल्या साम्राज्यातील भिक्खूंची एक सभा बोलावीत असे आणि चर्चासत्र सुरू असताना तीन आठवड्यांपर्यंत त्यांना चार प्रकारचे[1] दान करीत असे. चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या भिक्खूंत जर एखादा खरोखरच विद्वान भिक्खू असला आणि तो विनयाप्रमाणे आचरणात आणि तत्त्वशुद्ध विचारात इतरांपेक्षा विशेष तेजस्वी असला तर सम्राट स्वतः त्याला आपल्या सिंहासनावर बसवीत असे आणि

---

१) चार प्रकारचे दान म्हणजे अन्न, पेय, औषधे आणि चीवरे यांचे दान.

त्याच्याकडून धम्मज्ञान घेत असे. प्रवासात असताना तो नेहमी सर्व प्रकारच्या धर्मीयांना भोजनदान देई. साधारणपणे एक हजार भिक्खूंना आणि पाचशे ब्राह्मणांना भोजनदान मिळे. शीलादित्य राजाच्या औदार्याचे वर्णन करणे म्हणजे सुदानाच्या[१] औदार्याच्या गोष्टी परत सांगण्यासारखे आहे.

राजधानीच्या शहराच्या ईशान्येस सम्राट अशोकाने बांधलेला एक स्तूप आहे. त्या जागेवर तथागतांनी सात दिवस धम्मप्रवचने केली होती. शेजारी दुसरा एक लहान स्तूप आहे. त्यात तथागतांची नखे, केस वगैरे शरीरधातू आहेत. दक्षिणेला गंगानदीच्या किनाऱ्यावर एकमेकांशेजारी तीन संघाराम आहेत. तेथे तथागतांची अतिशय सुंदर बुद्धरूपे (मूर्ती) आहेत. तेथील भिक्खू आदरणीय आणि धर्मशील आहेत त्यांना मदत करण्यासाठी तेथे हजारो उपासक आहेत. तेथील एका विहारात एका मौल्यवान करंडकात साधारणपणे दीड इंच लांबीचा तथागतांचा एक दात आहे. त्याच्या दर्शनासाठी खूप लांबून लोक येतात. सर्वजण एका सुरात वंदना करतात. दररोज खूप गर्दी होत असल्यामुळे तथागतांच्या अवशेषांचे रक्षण करणाऱ्या विश्वस्तांनी तथागतांचा दात पाहण्यासाठी एका मोठ्या सुवर्ण नाण्याची प्रवेश फी ठेवली आहे. तरीसुद्धा खूप मोठ्या संख्येने लोक येतात आणि स्वेच्छेने प्रवेश शुल्क भरून तथागतांच्या दाताचे दर्शन घेतात. प्रत्येक उपोसथाच्या दिवशी तथागतांचा दात असलेला करंडक बाहेर काढून लोकांच्या दर्शनासाठी उंच सिंहासनावर ठेवला जातो. लोक फुले अर्पण करून श्रद्धापूर्वक त्याचे दर्शन घेतात. चैत्यगृहाच्या पुढे उजवीकडे शंभर फूट उंचीचे दोन विहार आहेत. त्यांच्यामध्ये तथागतांची दोन बुद्धरूपे आहेत. ती अत्यंत सुंदर आहेत. एक बुद्धरूप सोन्या-रुप्याचे आहे, तर दुसरे तांब्यांचे (ब्रॉंझचे).

तेथून जवळच आग्नेय दिशेला एक संघाराम आहे. त्याचा पाया दगडांचा असून वरचे बांधकाम विटांचे आहे. इमारत जवळजवळ २०० फूट उंचीची आहे. त्यात ३० फूट उंचीची एक अत्यंत सुंदर ब्रॉंझची मूर्ती आहे. ती रत्नजडित आहे. विहाराच्या चारही भितींवर तथागतांच्या जीवनातील त्याचप्रमाणे जातक कथांतील प्रसंगांचे सुंदर शिल्पकाम केले आहे.

तेथून जवळच दक्षिणेला एक सूर्यमंदिर आहे आणि आणखी पुढे थोड्या अंतरावर एक महेश्वराचे मंदिर आहे. ही दोन्ही देवळे निळ्या रंगाच्या दगडात बांधली आहेत. त्यांचे शिल्प फारच मनोहर आहे. त्यांची लांबी-रुंदी बुद्धविहाराइतकी आहे. त्यांची देखभाल करण्यासाठी प्रत्येकी १०० माणसांची नियुक्ती केली आहे. त्या ठिकाणी होणाऱ्या वाद्यांचा आवाज दिवसा किंवा रात्री थांबत नाही.

---

१) वेस्सन्तर जातकातील राजपुत्राचे नाव सुदान असे आहे. त्याचा येथे निर्देश आहे. अनाथपिंडकाला सुदत्त असेही म्हणतात. पण त्याचा येथे संदर्भ नाही हे वाचकांनी लक्षात घ्यावे.



गंगानदीच्या दक्षिणेला, शहराच्या आग्नेय दिशेला सम्राट अशोकाने बांधलेला २०० फूट उंचीचा एक स्तूप आहे. तेथे सहा महिने प्रवचन करून तथागतांनी 'अनात्मता,' 'अनित्यता,' 'दुःख' आणि 'विशुद्धी' ही धम्मतत्त्वे समजावून सांगितली.'

## अयोध्या

कान्यकुब्जानंतर ह्यू-एन-त्संग अयोध्याला गेला. तेथे १०० संघारामात महायानी आणि हीनयानी पंथांचे मिळून ३००० भिक्खू होते. तेथे १० देवळेसुद्धा होती. त्यात थोडे पाखंडी साधू राहात असत. ते अनेक पंथांचे होते. राजधानीच्या शहरात एक जुना संघाराम होता. तेथे अनेक दशके राहून वसुबंधू[१] बोधिसत्त्वाने थेरवादी पंथाचे त्याचप्रमाणे महायानी पंथाचे अनेक धम्मग्रंथ लिहिले. शेजारीच एका पडलेल्या इमारतीचा पाया होता. तेथे वसुबंधूने अनेक देशांच्या राजांना, प्रतिष्ठित माणसांना, श्रमणांना आणि ब्राह्मणांना धम्मप्रवचन ऐकविली.

शहराच्या दक्षिणेला पाच-सहा ली अंतरावर एक मोठी आमराई होती. तेथे एक जुना संघाराम होता. तेथे असंग बोधिसत्त्वाने धम्माचा अभ्यास केला. ह्याच जागेवर त्याने 'योगाचारशास्त्र,' 'महायान सूत्रालंकार टीका,' 'मध्यांतिक विभाङ्गशास्त्र' इत्यादी धम्मग्रंथ लिहिले.

असंग बोधिसत्त्वाचा गांधारात (पेशावरात) जन्म झाला. तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर एक हजाराच्या मध्यास त्याचा जन्म झाला. त्याने लहानपणीच धम्माचा गाढा अभ्यास केला होता. भिक्खू झाल्यावर महासांघिकाच्या विनयाप्रमाणे तो राहू लागला. पण नंतर मतपरिवर्तन होऊन तो महायानींचा अनुयायी झाला. त्याचा भाऊ वसुबंधू हा सर्वास्तिवादी शाखेचा अनुयायी होता. त्याने आपल्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेने आणि व्यासंगाने खूप प्रसिद्धी मिळविली होती. असंगाचा शिष्य बुद्धसिंह हा होता. त्याची बुद्धिमत्ता अगाध होती. त्याचे आचरण आदर्श होते आणि त्याची कीर्ती सर्वत्र पसरली होती.

वर नमूद केलेल्या ग्रंथाशिवाय असंगाने इतर अनेक ग्रंथ लिहिले. उदाहरणार्थ, 'महायान-संपरिग्रह-शास्त्र,' 'प्रकरणार्थवाचाशास्त्रकारिका,' 'अभिधर्मशास्त्र,' 'विद्यामात्रशात्र,' 'कोष-शास्त्र' इत्यादी.

## नरबळींची शिकार

अयोध्येहून ह्यू-एन-त्संग हयमुखाला जाण्यासाठी बोटीतून पूर्वेकडे प्रवास करू लागला. बोटीत साधारणपणे ऐंशी प्रवासी होते. अंदाजे १०० ली प्रवास केल्यावर, नदीच्या दोन्ही बाजूंना अशोकवृक्षांचे घनदाट अरण्य लागले. तेथे दहा-

---

१) वसुबंधूचा मोठा भाऊ असंग हा होता.

बारा बोटीत नदीवरचे चाचे लोक दबा धरून बसले होते. त्यांनी ह्यू-एन-त्सँगच्या बोटीवर हल्ला केला आणि लुटालूट केली. कोणाच्या अंगावर जडजवाहीर किंवा मौल्यवान वस्तू आहे की नाही हे पाहण्यासाठी त्यांनी सर्वांच्या शरीराची झडती घेतली

हे चाचे लोक दुर्गादेवीचे भक्त होते. प्रत्येक वर्षी शरदऋतुत ते एका सुडौल शरीराच्या पुरुषास बळी देत असत. ह्यू एन-त्सँगकडे पाहून हा बळी देण्यास अगदी योग्य आहे, असा विचार करून त्यांनी ह्यू-एन-त्सँगला बळी देण्याच्या जागेवर नेले. ह्यू-एन-त्सँगच्या सहप्रवाशांनी त्याला सोडून द्यावे अशी चाच्यांना खूप विनंती केली. काहींनी तर ह्यू-एन-त्सँगऐवजी स्वत: बळी जाण्याची तयारी दाखविली. पण चाच्यांनी त्यांचे ऐकले नाही. ह्यू-एन-त्सँगला एका दगडमातीच्या चबुतऱ्याला बांधले. दोन चाच्यांनी आपल्या तलवारी बाहेर काढल्या आणि ह्यू-एन-त्सँगच्या शरीरात ते त्या खुपसणार इतक्यात, ह्यू-एन-त्सँगने त्यांना मैत्रेय बोधिसत्त्वाची वंदना करण्यासाठी वेळ मागितला. मैत्रेय बोधिसत्त्वाला आठवून आपल्याला परत ह्याच देशात जन्म यावा आणि जे लोक दुष्कृत्य करीत आहेत, त्यांना धम्मज्ञान देण्याची संधी मिळावी त्यामुळे ते सत्कृत्ये करण्यास प्रवृत्त होतील आणि त्यांना सद्गती मिळेल अशी त्याने इच्छा प्रगट केली. नंतर ह्यू-एन-त्सँगने मैत्रेय बोधिसत्त्वावर आपले ध्यान केंद्रित केले इतक्यात एकाएकी ढग जमले आणि सोसाट्याचा वारा वाहू लागला. त्या वाऱ्याचा वेग इतका वाढला की शेजारची एकदोन झाडे उन्मळून खाली पडली. सगळे लोक भयभीत झाले. चाच्यांच्या पुढाऱ्याने ह्यू-एन-त्सँग कोठून आला आहे असे त्याच्या सहप्रवाशांना विचारले. तेव्हा त्यांनी त्याला सांगितले की, तो महाचीन देशातून आला आहे. राजेमहाराजे त्याचा फार मान करतात. त्याला बळी दिला तर महापातक होईल. तेव्हा चाच्यांनी ह्यू-एन-त्सँगची क्षमा मागितली. ह्यू-एन-त्सँगने त्यांना, जे लोक खून, लूटमार. बळी देण्याचे आणि इतर दुष्कृत्ये करतात, त्यांना अविचि नरकात जन्म मिळतो असे सांगितले. हे जीवन चमकणाऱ्या विजेसारखे किंवा सकाळी पडणाऱ्या दवबिंदूसारखे क्षणभंगूर आहे. ह्या क्षणभरच्या जीवनासाठी असंख्य वर्षे अविचि नरकात खितपत पडण्याचे कार्य का करावे ?' असा उपदेश केला.

हे ऐकल्यावर चाच्यांनी नतमस्तक होऊन आपण आतापर्यंत चूक करीत होतो ह्याची कबुली दिली आणि येथून पुढे सत्कार्य करण्यात जीवन घालविण्याची प्रतिज्ञा केली. त्यांनी आपली सर्व हत्यारे गंगानदीत टाकली. लुटलेल्या सर्व वस्तू ज्याच्या त्याला परत दिल्या आणि ह्यू-एन-त्सँगकडून त्रिशरण आणि पंचशीलांची दीक्षा घेतली.

## प्रयाग ते वैशाली

पुढे ह्यू-एन-त्सँगने प्रयाग, कौशाम्बी, श्रावस्ती, कपिलवस्तू, लुंबिनी, रामग्राम, कुसिनारा, सारनाथ असा प्रवास केला.



कौशाम्बी येथे तथागत ह्यात असतानाच कौशाम्बीच्या उदयन राजाने बनविलेले साठ फूट उंचीचे चंदनाचे बुद्धरूप त्याने पाहिले. ते एका दगडात बांधलेल्या विहारात होते कौशाम्बी येथे वसुबंधूने 'विद्यामात्रसिद्धिशास्त्र' आणि असंगाने 'प्रकरणार्यवाचा-शास्त्र-कारिका' नावाचे ग्रंथ लिहिले.

विशाखा येथे २० संघाराम आणि हीनयानी पंथाच्या सम्मतीयशाखेचे साधारणपणे ३००० भिक्खू होते. ह्या ठिकाणी पूर्वीच्या काळी अर्हत देवशर्मन, अर्हत गोप आणि धर्मपाल बोधिसत्त्व यांनी अनेक धम्मग्रंथ लिहिले. तथागत येथे सहा वर्षे राहिले होते.

श्रावस्ती येथे शेकडो संघाराम होते. तेथे सम्मतीय शाखेचे हजारो भिक्खू वास्तव्य करीत होते. तथागत असताना प्रसेनजित राजा येथे राज्य करीत होता. त्याच्या राजवाड्याच्या भग्नावस्थेतील खुणा अजूनही पाहावयास मिळतात. तथागतांची मावशी भिक्षुणी प्रजापतीचा विहार असलेली जागा जवळच आहे. सुदत्ताने (अनाथपिण्डकाने) बांधलेला जेतवन विहार येथे होता. भगवान बुद्ध तावतिंस स्वर्गात गेले असता उदयन राजाने चंदनाचे बुद्धरूप केले आहे, हे ऐकून प्रसेनजित राजाने बनविलेले बुद्धरूप अजूनही पहावयास मिळते, असे ह्यू–एन–त्सँग म्हणतो.

लुंबिनी[1] येथे स्तूपशेजारील सम्राट अशोकाचा स्तंभ ह्यू–एन–त्सँगने पाहिला. तो दगडी असून त्याच्यावर दगडात कोरलेला घोडा आहे. कोणीतरी दुष्टाने तो स्तंभ मध्ये तोडून जमिनीवर पाडला आहे, असे ह्यू–एन–त्सँग म्हणतो.

कुशीनारा[2] येथील अशोकस्तंभावर महापरिनिर्वाणाबद्दल माहिती दिली आहे. परंतु त्याच्यावर तारीख–वार–सन लिहिलेले नाही. तथागतांच्या जन्मदिवसाबद्दल, निरनिराळ्या पथांत एकवाक्यता नाही, असे ह्यू–एन–त्सँग म्हणतो. काही पंथांच्या म्हणण्याप्रमाणे तथागतांच्या परिनिर्वाणाला १२०० वर्षे झाली. काहींच्या मते १३०० वर्षांपेक्षा जास्त वर्षे झाली काहींच्या मते १५०० पेक्षा जास्त, तर काहींच्या मते फक्त ९०० वर्षे झाली असे म्हणतात.

वैशाली येथे आम्रपालीच्या जुन्या घरात भिक्खुणी महाप्रजापती आणि इतर भिक्खुणींचे परिनिर्वाण झाले, अशी नोंद ह्यू–एन–त्सँगने केली आहे.

वैशालीपासून दक्षिणेला गंगानदी पार केल्यावर ह्यू–एन–त्सँग मगध राज्यात

---

१. लुंबिनी बागेत तथागतांचा जन्म झाला. सुप्रबुद्धाच्या बायकोचे नाव लुंबिनी होते. तिच्यावरून ह्या बागेला ते नाव पडले असावे. भगवान बुद्धांची आई मायादेवी ही सुप्रबुद्धाची मुलगी होती.

२. कपिलवस्तू, लुंबिनी, रामग्राम, कुशिनारा आणि सारनाथ येथील स्थळांचे वर्णन फा-हियानच्या प्रवासवर्णनाप्रमाणेच थोड्याफार फरकाने ह्यू–एन–त्सँगने केले आहे.

आला. तो म्हणतो, 'ह्या राज्याचा परिघ ५००० ली असून लोक गुणवान आणि शिक्षणप्रेमी आहेत. तेथे सुमारे ५० संघाराम असून १०,००० भिक्खू आहेत. ते बहुतेक महायानी पंथाचे आहेत. ह्या देशाची राजधानी पाटलीपुत्र ही सम्राट अशोकाची राजधानी होती. पाटलीपुत्राचे पूर्वीचे नाव कुसुमपूर असे होते. येथील एका विहारात तथागतांची पदचिन्हे असलेला दगड आहे. तो एक फूट आठ इंच लांब आणि सहा इंच रुंद आहे. प्रत्येक पदचिन्हावर एक हजार आरी असलेले चक्र आणि पायाच्या प्रत्येक बोटाच्या चिन्हांवर स्वस्तिकाची खूण आहे. शिवाय पुष्पे, करंडक, मासे इत्यादी खुणा आहेत. प्रकाशामुळे त्या चमकतात.

जुन्या शहराच्या आग्नेय दिशेला पडझड झालेला कुक्कुटाराम नावाचा संघाराम आहे. येथे १००० भिक्खूंची संगिती[1] भरली होती. सम्राट अशोकाने त्यांच्या चार गरजा पुरविल्या होत्या.'

## बोधिवृक्षाचे दर्शन

पाटलीपुत्राहून ह्यू–एन–त्संग नैऋत्येला सहा सात योजने गेल्यावर तो तिलडूक येथील संघारामात आला आणि तेथून दक्षिणेकडे १०० ली प्रवास करून बोधिवृक्षाकडे आला.

ह्यू–एन–त्संग म्हणतो, 'बोधिवृक्षाच्या भोवती विटांची उंच आणि भक्कम भिंत बांधून त्यांचे संरक्षण केले आहे. पूर्व–पश्चिम भिंत लांब आहे; पण उत्तर-दक्षिण भिंत अरुंद आहे. मुख्य दरवाजा निरंजना नदीकडे पूर्वेला आहे. दक्षिणेकडचा दरवाजा फुलांनी युक्त असलेल्या तलावाकडे आहे. पश्चिमेकडून पर्वताचे संरक्षण आहे. उत्तरेकडच्या दरवाजाने एका मोठ्या संघारामात जाता येते. येथे अनेक पवित्र स्थळे, विहार आणि स्तूप आहेत. राजांनी, मंत्र्यांनी श्रीमंत माणसांनी आणि इतरांनी, श्रद्धेने आणि त्यांच्या धार्मिक कृत्याची निरंतर आठवण रहावी म्हणून ती बांधली आहेत. येथे असलेले वज्रासन विश्वाचा मध्यबिंदू आहे. ते शंभर पावलांच्या परिघाचे आहे. वज्र म्हणजे भक्कम, अविनाशी, कोणताही आघात सहन करू शकणारे. ते जर एवढे भक्कम नसते तर, ज्याने वज्रसमाधी घेतली आहे त्याला कोणीच आधार देऊ शकला नसता. ते जर एवढे भक्कम नसते तर पृथ्वी आधारहीन झाली असती. ही जागा ज्ञाननिधी किंवा बुद्धिमंद म्हणूनही ओळखली जाते. जरी सर्व पृथ्वी पायापासून हादरली तरी ही जागा हलणार नाही.

आजच्या काळापासून शंभर किंवा दोनशे वर्षांनी मानवी मूल्ये कमी झाल्यावर बोधिवृक्षाजवळ वज्रासन दिसणार नाही.

बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर येथील पवित्र जागेची सीमा ठरविण्यासाठी अनेक राजांनी उत्तरेला आणि दक्षिणेला अवलोकितेश्वर बोधिसत्वाच्या मूर्ती

१. पाटलीपुत्र येथे भरलेली ही तिसरी धम्मसंगिती.



ठेवल्या आहेत. असे म्हटले जाते की, जेव्हा ह्या मूर्ती पृथ्वीत अदृश्य होतील तेव्हा बुद्ध धम्माचा लोप होईल. दक्षिणेकडची मूर्ती छातीपर्यंत जमिनीत गेली आहे.

जेव्हा बुद्ध हयात होते, तेव्हा बोधिवृक्षाची उंची खूप होती. पण दुष्ट राजांनी बऱ्याच वेळेला तो तोडून नष्ट केल्यामुळे, त्याची उंची आता फक्त पन्नास फूट आहे. ह्या वृक्षाखाली बसून बुद्धांनी पूर्ण ज्ञान मिळविले, म्हणून त्याला बोधिवृक्ष म्हणतात. बोधिवृक्ष पिंपळाचे झाड आहे. त्याची साल पिवळट पांढरी असून पानांचा रंग गर्द हिरवा आहे. ती चमकदार आहेत. वैशाखी पौर्णिमेला येथे देशोदेशीचे राजे, मंत्री आणि इतर लोक येऊन त्या वृक्षाच्या मुळांवर दूध ओततात आणि त्याच्यापुढे पुष्पे अर्पण करून दिवे पेटवितात.

ह्यू–एन–त्संगने त्या वृक्षाला पंचांग प्रणिपात केला. दुःखाश्रू ढाळीत आणि हुंदके देत तो म्हणाला, 'जेव्हा तथागतांना अनुत्तर बोधि मिळाली तेव्हा ह्या भवचक्रात मी कोणत्या परिस्थितीत होतो, हे मला माहीत नाही; पण आता ह्या मूर्तिपूजेच्या काळात मी येथे आलो आहे. माझ्या अकुशल कर्मांच्या व्याप्तीबद्दलची मला आता जाणीव झाली आहे, म्हणून मला दुःख होत आहे.'

तो पुढे म्हणतो, 'अलीकडच्या काळात शशांक राजाने बुद्ध धम्माचे फार नुकसान केले. द्वेषाने पेटून त्याने विहारांचा नाश केला. बोधिवृक्षाला मुळापासून खणून काढण्यासाठी जमिनीतून पाणी लागेपर्यंत त्याने तेथे खणले. परंतु त्या वृक्षाच्या मुळांच्या शेवटापर्यंत तो जाऊ शकला नाही. मग त्या वृक्षाला संपूर्णपणे नष्ट करण्यासाठी त्याने त्या जागेवर उसाचा रस शिंपडला आणि त्याला आग लावली. त्या वृक्षाचा काहीही मागमूस राहू नये अशी त्याची इच्छा होती.

काही महिन्यांनंतर जेव्हा मगधाचा राजा पूर्णवर्मा ह्याने ही बातमी ऐकली, तेव्हा त्याला फार दुःख झाले. दीर्घ निश्वास टाकून तो म्हणाला, 'शहाणपणाचा सूर्य मावळल्यानंतर, बुद्धाचा हा वृक्ष सोडल्यास दुसरे काहीच उरले नाही आणि आता त्यांनी तोसुद्धा नष्ट केला. आध्यात्मिक जीवनाचा आता कोणता आधार राहिला आहे?' नंतर त्याने पंचांग प्रणिपात करून एक हजार गाईंच्या दुधाने त्या वृक्षाची मुळे धुतली. लवकरच तो वृक्ष दहा फूट उंच झाला. परत तो तोडला जाईल अशी भीती वाटून त्या वृक्षाभोवती त्याने चोवीस फूट उंचीची एक भक्कम भिंत बांधली. त्या वृक्षाच्या भोवती आता वीस फूट उंच भिंत आहे.

बोधिवृक्षाच्या पूर्वेला १६० किंवा १७० फूट उंचीचा एक विहार आहे. समोरच्या बाजूने त्या विहाराच्या पायाची रुंदी वीस पावलांपेक्षा थोडी जास्त आहे. इमारत निळसर विटांची असून त्याच्यावर चुन्याचा गिलावा केला आहे. सर्व माळ्यावरील खोबण्यात सोनेरी मूर्ती आहेत. इमारतीच्या चारही बाजूंवर अतिशय सुंदर कलाकुसरीची कामे केली आहेत. एके ठिकाणी मोत्यांच्या माळा दाखविल्या आहेत, तर दुसरीकडे स्वर्गीय ऋषींच्या मूर्ती आहेत. सर्वत्र सोनेरी रंगाचे मंगल कलश आहेत. पूर्वेच्या बाजूला एक अनेक मजली मंडप आहे. त्याच्यावर काढलेल्या

प्रकृतिकन्यांच्या मूर्ती एकावर एक अशा तीन मजल्यापर्यंत आहेत. त्याच्या तुळघा,
खांब आणि दरवाजे सोनेरी आणि चंदेरी रंगाच्या कलाकुसरीच्या कामाने सुशो-
भित केलेले आहेत. मधूनमधून माती आणि रत्ने यांचा उपयोग शोभा वाढविण्या-
साठी केला आहे. त्या अंधुक गूढ मंडपाच्या तिन्ही मजल्याच्या मंडपांना दरवाजे
आहेत. बाहेरच्या दरवाज्याच्या उजव्या आणि डाव्या बाजूस पडव्या आहेत. डाव्या
बाजूच्या खोलीत अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाची मूर्ती आहे आणि उजव्या बाजूच्या
खोलीत मैत्रेय बोधिसत्त्वाची मूर्ती आहे. त्या मूर्ती रुप्याच्या आहेत. प्रत्येक मूर्तीची
उंची दहा फूट आहे.

आता जेथे विहार आहे, तेथे पूर्वी अशोक राजाने एक लहानसा विहार
बांधला होता. नंतर एका ब्राह्मणाने तेथे मोठ्या प्रमाणात हा विहार बांधला.
पहिल्यांदा हा ब्राह्मण बुद्धधम्माला मानीत नसे; पण नंतर तो त्रिरत्नांना शरण
गेला. मोठ्या भावाने विहार बांधला तर धाकट्या भावाने विहारासमोरील तलाव
बांधला. त्या दोघांनी नंतर खूप मोठा धार्मिक विधिसमारंभ केला. त्याचा लगेच
परिणाम झाला. मोठा भाऊ एका राजाचा मोठा मंत्री झाला. आपल्या सर्व मिळ-
कतीचा तो दानधर्म करीत असे.

मूर्तिकाराने बुद्धाची भूमिस्पर्श मुद्रेतील एक सुंदर मूर्ती बनविली. मूर्तीचा
उजवा पाय मांडीवर आहे. डावा हात मांडीवर ठेवला आहे. उजवा हात खाली
जमिनीकडे झुकला आहे. पूर्वेकडे तोंड करून मूर्ती ठेवली आहे. ती दिसायला
गौरवपूर्ण आणि जिवंत अशी वाटते. पर्यंक चार फूट दोन इंच उंच आणि बारा
फूट पाच इंच रुंद आहे. मूर्तीची उंची अकरा फूट पाच इंच आहे. दोन गुडघ्यां-
मधील अंतर आठ फूट आठ इंचाचे आहे. दोन खांद्यामधील अंतर सहा फुट दोन
इंच आहे. बुद्धाची सर्व प्रतीके व्यवस्थित दाखविली आहेत. चेहेऱ्यावरील मैत्रीची
भावना जिवंत माणसासारखी दिसते. फक्त उजव्या छातीचा काही भाग अजून
संपूर्णरीत्या तयार करावयाचा राहिला होता. छातीवर जेथे अजून काम शिल्लक
राहिले होते, तेथे त्यांनी गळ्यातील रत्नांच्या माळा ठेवल्या होत्या. डोक्यावर फार
किमती रत्नांचा किरीट घातला होता

शशांकराजाने बोधिवृक्षाचा नाश केल्यावर ही मूर्ती फोडण्यासाठी तो येथे
आला होता. पण ह्या मूर्तीचे मैत्रीमय स्वरूप पाहिल्यावर काय करावे ह्याचा तो
निश्चय करू शकला नाही. आपल्याबरोबर असलेल्या लोकांसह तो तसाच परत
निघाला. वाटेत तो त्याच्या एका अधिकाऱ्याला म्हणाला, 'आपण बुद्धाची ती मूर्ती
काढून टाकून, तेथे महेश्वराची मूर्ती बसविली पाहिजे.' त्या अधिकाऱ्याला अशा
तऱ्हेची आज्ञा मिळाल्यावर तो फार घाबरला आणि मनात म्हणाला, 'मी जर
बुद्धाची मूर्ती नष्ट केली, तर अनेक कल्पे मला दुःख भोगावे लागले. आणि राजाच्या
आज्ञेचे मी पालन केले नाही तर तो मला हालचाल करून ठार मारील. शिवाय,
तो माझ्या कुटुंबाचा नाश करील. मी आज्ञेचे पालन केले तरी, आणि नाही केले



लागेल.'
तरी, कुठल्याही परिस्थितीत मला दुःखच भोगावे
विचारांती, बुद्धधम्मावर विश्वास ठेवणाऱ्या एका माणसाला त्याने मदती-
साठी बोलावून घेतले. त्या माणसाच्या मदतीने त्या अधिकाऱ्याने बुद्धाच्या मूर्ती-
समोर विटांची एक भिंत बांधली बुद्धाची मूर्ती अंधारात राहिल्यामुळे त्याने तेथे
एक दिवा तेवत ठेवला. नंतर त्याने भिंतीवर त्या महेश्वर देवाचे एक चित्र काढले.
अशा तऱ्हेने काम संपल्यावर त्याने राजाला खबर दिली. ते ऐकल्यावर राजा गर्भ-
गळीत झाला. त्याच्या अंगावर फोड आले आणि त्याचे मास झडू लागले. नंतर,
थोड्याच दिवसात तो मेला. राजा मेल्यावर त्या अधिकाऱ्याने बुद्धासमोर बांधलेली
भिंत पाडली. आत मूर्ती जशीच्या तशी होती. ती मूर्ती इतकी सुंदर आहे की, जणू
काही ती एखाद्या अति मानवी शक्तीने बनविली आहे! ती अंधाऱ्या खोलीत ठेवली
आहे. तेथे दिवे आणि मशाली जळत ठेवल्या जातात. पण त्या मूर्तीच्या प्रतिका-
त्मक पवित्र खुणा पाहावयाच्या असतील, तर त्या खोलीत जाऊन कोणी पाहू शक-
णार नाही. सकाळच्या वेळी एका मोठ्या आरशाच्या साहाय्याने आत प्रकाश
टाकून मूर्तीची ती प्रतीके पाहाता येणे शक्य आहे![1]

## नालंदा

बुद्ध गया येथे वास्तव्य केल्यावर दहाव्या दिवशी ह्यू-एन-त्सँग नालंदाला
जाण्यास निघाला. तेथील भिक्खू संघाने त्याला सोबत करण्यासाठी चार-पाच
भिक्खूंची निवड करून पाठविले होते. सात योजने प्रवास केल्यावर तो नालंदा
संघारामाच्या एका शेतातील घरात आला. ज्या ठिकाणी ते घर होते त्या गावात
भदन्त मौद्गल्यायनाचा जन्म झाला होता. येथे थोडा वेळ विश्रांतीसाठी थांबल्यावर
दोनशे भिक्खू आणि हजारो उपासक त्याला भेटण्यास आले. त्यांच्याबरोबर त्यांनी
फुले, छत्र्या, मानदंड, वगैरे आणले होते. अशा तऱ्हेने ह्यू-एन-त्सँगने नालंदात
प्रवेश केला.

नालंदाबद्दल ह्यू-एन-त्सँग म्हणतो, 'असे म्हटले जाते की, नालंदा शहराच्या
दक्षिणेला एक पाण्याचा तलाव आहे. त्यात नालंदा नावाचा एक नाग राहात असे.
त्या तलावाच्या किनाऱ्यावर संघाराम बांधला आहे. म्हणून त्याला 'नालंदा संघा-
राम' असे म्हटले जाते. असेही म्हणतात की, बोधिसत्त्वाने येथे एका मोठ्या

---

१. बुद्ध गया येथे सापडलेल्या शिलालेखाचे भाषांतर सर चार्लस विल्कीन्स
याने केले आहे. त्यावरून बुद्ध गया येथील प्रसिद्ध बुद्धमंदिर अमरकोषाने बांधले
आहे. विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी तो एक होता. त्याने 'अमरकोष'
हा सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. जनरल कनिंगहॅमच्या मताप्रमाणे हे सुप्रसिद्ध
बुद्धमंदिर फा-हियानच्या नंतर आणि ह्यू-एन-त्सँगच्या पूर्वी बांधले गेले. हा जन-
रल कनिंगहॅमचा अंदाज बरोबर दिसतो.

देशाच्या राजाचा जन्म घेतला होता. त्याने आपल्या राजधानीचे शहर येथे बांधले होते. तो खूप दान करून गरजवंतांच्या गरजा भागवीत असे आणि गरिबांना मदत करीत असे. त्याच्या ह्या सद्‌गुणामुळे, त्याला 'नालंदा' म्हणजे 'अव्याहतपणे दान देणारा' असे लोक म्हणू लागले. म्हणूनच येथील संघारामास 'नालंदा' असे म्हणतात.

पूर्वी येथे एक आमराई होती. ती पाचशे व्यापाऱ्यांनी दहा लाख सुवर्ण नाणी देऊन विकत घेतली आणि तथागतांना अर्पण केली. तथागतांनी येथे तीन महिने धम्म-ज्ञान दिले होते. त्यामुळे त्या व्यापाऱ्यांना आणि इतरांना अर्हतपद प्राप्त झाले.

तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर काही वर्षांनी शक्रादित्य नावाचा एक राजा ह्या देशात होऊन गेला. तो त्रिरत्नांचा (बुद्ध, धम्म आणि संघ) फार आदर करीत असे. त्याचे आचरण तथागतांच्या धम्माप्रमाणे असे. शुभ लक्षणांनी युक्त अशा ह्या जागेची निवड करून, त्याने येथे एक संघाराम बांधला. संघारामाच्या पाया खोदणीचे काम चालू असताना एका नागाला दुखापत झाली. त्या वेळी तेथे निर्ग्रंथांचा (जैनांचा) एक प्रख्यात ज्योतिषी उपस्थित होता. त्याने नालंदाविषयी खालील भविष्य लिहून ठेवले आहे.

'ही जागा अत्युत्तम आहे. ह्या ठिकाणी जर संघाराम बांधला, तर निश्चितच तो फार प्रख्यात होईल. सर्व जम्बुद्धीपात तो एक आदर्श संघाराम होईल. एक हजार वर्षांपर्यंत त्याची भरभराट होईल. विद्यार्थ्यांना येथे सर्व प्रकारचे शिक्षण मिळेल. परंतु ह्या नागाला जखम झाल्यामुळे, बऱ्याच लोकांचा येथे रक्तपात होईल.'

शक्रादित्याचा मुलगा बुद्धगुप्त राजा शक्रादित्यानंतर गादीवर बसला. त्याने आपल्या पित्याचे सत्कृत्य पुढे चालू ठेवले. पहिल्या संघारामाच्या दक्षिण दिशेला त्याने आणखी एक संघाराम बांधला. त्याच्यानंतर, गादीवर आलेल्या त्याच्या मुलाने–तथागत राजाने—त्याच्या पूर्वेस दुसरा एक संघाराम बांधला. तथागत राजानंतर बलादित्य राजा गादीवर बसला. त्याने ईशान्य दिशेला एक संघाराम बांधला. संघाराम बांधून पूर्ण झाल्यावर बलादित्य राजाने एक मोठा समारंभ करून दूरदूरच्या भिक्खूंना आमंत्रण दिले. त्या समारंभात भाग घेण्यासाठी दोन चिनी भिक्खुसुद्धा आले होते. काही वर्षांनी आपले राज्य मुलाच्या हाती सोपवून देऊन बलादित्य राजाने पिवळी चीवरे परिधान केली. पण त्याचे मन शांत झाले नाही. तो म्हणत असे की, 'पूर्वी मी सर्व सत्ताधीश राजा होतो. सर्वात जास्त मान मला मिळत असे. पण आता मी श्रामणेर बनलो आहे. भिक्खू संघात सर्वात खालची जागा मला मिळाली आहे.' भिक्खू संघाकडे त्याने अशी कैफियत केल्यावर संघाने नियम केला की 'जे श्रामणेर अजून भिक्खू झाले नाहीत, त्यांना त्यांच्या वयाच्या मानाने स्थान द्यावे.' सर्व जम्बुद्धीपात फक्त हाच संघाराम असा आहे की, ज्या ठिकाणी अशा तऱ्हेचा नियम आहे.



बलादित्याचा मुलगा वज्र ह्याने गादीवर आल्यावर पश्चिमेच्या दिशेला एक संघाराम बांधला. त्याच्यानंतर मध्य भारतातील एका राजाने त्याच्या उत्तरेस एक मोठा संघाराम बांधला. शिवाय त्याने ह्या सर्व संघारामाभोवती एक उंच भिंत बांधून त्याला एक मोठा दरवाजा बांधला.

अनेक राजांनी नालंदा येथील बांधकाम केलेले आहे. कलाकारांनी आपले शिल्पकलेचे सारे कौशल्य येथे पणाला लावले आहे. त्यामुळे येथील वास्तुशिल्प मनाला मुग्ध करणारे झाले आहे. कलाकुसरीची कामे केलेली विहारांची शिखरे आणि अत्यंत मनोहर शिल्पकाम केलेले मनोरे यांच्यामुळे या परिसराभोवती एक प्रकारचे दैवी वातावरण निर्माण झाले आहे. टेहेळणीचे मनोरे इतके उंच आहेत की, जणू काही ते आकाशात लुप्त झालेत, तर वरचे मजले ढगापेक्षाही उंच असल्या-सारखे वाटत !

संघारामाच्या परिसरात ठिकठिकाणी असलेले स्वच्छ नितळ पाण्याचे तलाव, त्यांच्यात असलेली नीलकमळांची आणि रक्तवर्णाच्या कनकांची फुले आणि समो-वती सर्वत्र असलेली गर्द छायेची हिरवीगार आम्रवृक्षांची झाडे यांमुळे, तेथील वातावरण स्वर्गीय वाटत असे !

ज्या ठिकाणी भिक्खू राहात असत त्या इमारती चार मजल्यांच्या होत्या. प्रत्येक मजल्यावर सुशोभित गच्च्या असून त्यांचे खांब मोतिया रंगाचे किंचित लाल-सर असे होते. छतांना लावलेल्या विशिष्ट प्रकारच्या आच्छादनामुळे रंगीबेरंगी प्रकाश परावर्तीत होत असे.

जंबुद्धीपात हजारो संघाराम आहेत. पण हा संघाराम त्याच्या सौंदर्यामुळे आणि भव्यतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे १०,००० भिक्खू आणि उपासक अभ्यास करीत असतात. ते महायानी पंथाच्या तत्त्वज्ञानाचा, त्याचप्रमाणे हीनयानी पंथाच्या अठरा शाखांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतात. इतकेच नाही तर वेद आणि इतर ग्रंथ, तसेच हेतुविद्या, शब्दविद्या, चिकित्साविद्या, अथर्ववेद (जादूविद्या), सांख्य तत्त्वज्ञान आणि इतर विद्या यांचा अभ्यास करतात. येथे साधारणपणे १००० विद्वान वीस धम्मशास्त्रे आणि सूत्रे समजावून सांगू शकतात; ५०० विद्वान तीस धम्मग्रंथांचे आणि ह्यू–एन–त्संग धरून १० विद्वान पन्नास धम्मग्रंथांचे विश्लेषण करून शिकवू शकतात. फक्त महास्थविर शीलभद्र एकटेच सर्व धम्मग्रंथांचे विश्ले-षण करून शिकवू संशकतात. घारामात एकाच वेळेला १०० वर्ग चालू असतात. विद्यार्थी आपला वेळ मुळीच न दवडता आत्मीयतेने विद्यार्जनात मग्न असतात.

येथे येणारे सर्वच भिक्खू आणि इतर विद्यार्थी स्वाभाविकपणे उदात्त आचार-विचारांचे असल्यामुळे, ह्या संघारामाच्या गेल्या सातशे वर्षांच्या इतिहासात एक-दाही येथे बेशिस्तीचा प्रसंग घडला नाही.

येथील राजा भिक्खूंचा फार आदर करतो. त्याने ह्या संघारामाला शंभर गावांचे इनाम दिले आहे. त्यातील दोनशे गृहपती संघारामासाठी जवळजवळ प्रत्येक

दिवशी शेकडो पोती तांदूळ आणि अनेक मण दूध, तूप यांचा पुरवठा करतात. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना आपल्या चार गरजांसाठी इतरत्र पाहावे लागत नाही आणि अभ्यासात मन केंद्रित करून त्यांना धम्मग्रंथात पारंगत होता येते.

येथे असणारे हजारो भिक्खू आपल्या विद्वत्तेबद्दल प्रसिद्ध आहेत. शेकडो भिक्खूंची कीर्ती फार दूरवर पसरली आहे. त्यांचे आचरण शुद्ध आणि अनुकरणीय आहे. विनयाच्या नियमांचे ते काटेकोरपणे पालन करतात. संघारामची शिस्त फार कडक आहे आणि सर्व भिक्खू त्या शिस्तीचे पालन करतात. जम्बुद्वीपातील सर्व देशवासी त्यांचा आदर करतात, येथे रात्रंदिवस गंभीर धम्मचर्चा चाललेली असते. तरुण आणि वयस्कर भिक्खू धम्मचर्चेमध्ये भाग घेतात आणि प्रश्नांची उकल करण्यासाठी एकमेकांना मदत करतात. जे त्रिपिटकांतील धम्मचर्चेत भाग घेऊ शकत नाहीत त्यांना मान मिळत नाही. देशातील निरनिराळ्या नगरांतून अनेक विद्वान भिक्खू येथे धम्मचर्चा करण्यासाठी येतात. त्यामुळे त्यांची कीर्ती फार दूरवर पसरत जाते. काही लोक आपण नालंदाहून आलो आहोत असे खोटेच सांगून खोटा मान मिळवितात. दुसरीकडच्या भिक्खूंना नालंदा संघारामात प्रवेश करावयाचा असेल, तर प्रवेश देण्यापूर्वी द्वारपाल त्यांना काही अवघड प्रश्न विचारतो. (त्यांची प्रवेश-परीक्षा घेतो) बऱ्याच लोकांना नीट उत्तरे देता येत नाहीत. (ते प्रवेश–परीक्षेत नापास होतात) अशांना संघारामात प्रवेश मिळविण्यासाठी जुन्या आणि नव्या धम्मग्रंथांचा चांगला अभ्यास केला पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांना संघारामात प्रवेश मिळविण्याची इच्छा आहे त्यांनी चर्चेमध्ये आपली लायकी सिद्ध केली पाहिजे. जे नापास होतात आणि ज्यांना यश मिळते त्यांचे अंदाजे प्रमाण सातास दहा असे आहे. आपल्या शुद्ध आचरणामुळे, व्यासंगी वृत्तीमुळे, खडतर तपश्चर्येमुळे आणि तल्लख बुद्धिमत्तेमुळे येथे प्रसिद्ध पावलेल्या विभूतींची मालिका खूपच मोठी आहे. उदाहरणार्थ–धर्मपाल, चंद्रपाल, गुणमती, स्थिरमती, प्रभामित्र, जिनमित्र, ज्ञानचंद्र, शीघ्रबुद्धा, शीलभद्र इत्यादी. ह्यांतील प्रत्येकाने खूप मोठी ग्रंथनिर्मिती केली आहे.

महास्थविर शीलभद्रांची भेट झाल्यानंतर ह्यू–एन–त्सँगची बलादित्य राजाच्या विहारात बुद्धभद्रांबरोबर रहाण्याची व्यवस्था करण्यात आली. हा विहार चार मजली होता. तेथे सात दिवस राहिल्यावर ह्यू–एन–त्सँग बोधिसत्त्व धर्मपालांच्या शेजारी राहावयास गेला.

तो पुढे म्हणतो, 'संघारामात आणि संघारामाच्या आसपास अनेक पवित्र स्थळे आणि लक्षात घेण्यासारख्या इतर गोष्टी आहेत. त्यांचा निर्देश करणे येथे शक्य होणार नाही.

सम्राट शीलादित्य येथे एक पितळेच्या धातूचे चैत्यगृह बांधत आहे ते अजूनही पूर्ण झाले नाही. इमारत पूर्ण झाल्यावर ती १०० फूट उंच होईल.

संघारामाच्या हद्दीवरच्या भिंतीबाहेर साधारणपणे दोनशे पावलांवर तथागतांची तांब्याची (ब्रांझची) एक ऐंशी फूट उंचीची उभी मूर्ती आहे. ती ज्या



विहारात आहे त्या विहाराची उंची सहा मजली इमारतीइतकी आहे. ह्या विहाराच्या उत्तरेस दोन किंवा तीन ली अंतरावर विटांनी बांधलेला एक भव्य विहार आहे. त्यात 'तारा' ची एक उंच मूर्ती आहे. ती मूर्ती दिसायला अद्वितीय अशी आहे. इथे वर्षातून एकदा सात दिवस उत्सव चालतो. त्या वेळेला धूप लावून हजारोंच्या संख्येने लोक येतात.

संघारामापासून आठ किंवा नऊ ली अंतरावर कुलिक (कोलित) नावाचे एक खेडे आहे. तेथे सम्राट अशोकाने एक स्तूप बांधला आहे. ह्या ठिकाणी मौद्गल्य पुत्राचा जन्म झाला होता. त्या खेड्याशेजारीच दुसरा एक स्तूप आहे. तेथे मौद्गल्यपुत्राला निर्वाण प्राप्त झाले होते. मौद्गल्यपुत्राचा जन्म एका ब्राह्मण कुटुंबात झाला होता तो सारिपुत्राचा जिवलग मित्र होता. सारिपुत्र वादविवादात निष्णात होता, तर मौद्गल्यायनाची आकलनशक्ती आणि चिकाटी प्रशंसनीय होती. दोघांची बुद्धिमत्ता असामान्य होती. दोघांची ध्येयधोरणे एकसारखीच होती. दोघानी संसाराचा त्याग करून संजयाचे शिष्यत्व पत्करले होते. सारिपुत्राची भेट अर्हत अश्वजिताशी झाली आणि त्याच्याकडून सारिपुत्राला बुद्धधम्माची ओळख झाली. परत आल्यावर त्याने मौद्गल्यायनाला धम्माबद्दल झालेली माहिती सांगितली. नंतर २५० अनुयायासह ते दोघे तथागतांना शरण गेले.

सारिपुत्राचे जन्मगाव कपिलनाक, येथून जवळच आहे. तेथेच त्याला निर्वाण प्राप्त झाले होते. सम्राट अशोकाने तेथे एक स्तूप बांधला आहे.'

## राजगृह

काही दिवस नालंदा येथे राहिल्यावर ह्यू-एन–त्सँग राजगृहाला गेला. राजगृहाचे जुने नाव 'कुशागरपूर' असे होते. तेथे देवदत्ताच्या सांगण्यावरून अजातशत्रू राजाने तथागतांना मारण्याच्या हेतूने धनपाल[१] नावाच्या हत्तीला दारू पाजून सोडले होते; ती जागा ह्यू–एन–त्सँगने पाहिली. तेथे एक स्तूप बांधला आहे. ज्या ठिकाणी सारिपुत्राला अश्वजित भेटला होता, ती जागासुद्धा ह्यू-एन-त्सँगने पाहिली. आपल्या जुन्या घराशेजारी जीवकाने तथागतासाठी बांधलेले आणि अजून अस्तित्वात असलेले सभागृह त्याने पाहिले.

राजगृहाच्या ईशान्येला १४-१५ ली अंतरावर असलेल्या गृध्रकूट पर्वतावर ह्यू एन त्सँग गेला आणि खाली येऊन त्याने वेळूवन पाहिले. येथे तथागतांनी विनयाचे नियम बनविले होते. तेथेच अजातशत्रू राजाने त्याच्या हिश्शाला आलेल्या

१. ह्या हत्तीचे नाव थेरवादी ग्रंथात आणि महायानी ग्रंथात निरनिराळे दिले आहे. नालागिरि हत्ती तथागतांच्या मैत्रीभावनेमुळे नतमस्तक झाला तेव्हा त्याच्यावर लोकांनी सुवर्ण नाणी आणि दागिने उधळले म्हणून त्याचे नाव धनपाल असे पडले.

तथागतांच्या रक्षेवर स्तूप बांधला होता.

वेळूवनाच्या नैऋत्येला पाच–सहा ली अंतरावर पर्वताजवळ एक बाग आहे. बागेत एक मोठा सभामंडप आहे.[1] तेथे महाकाश्यपाच्या अध्यक्षतेखाली पहिली धम्मसंगिती भरली होती. तेथेच त्रिपिटकांचे संस्करण झाले आणि त्रिपिटकांच्या ताडपत्रावर लिहिलेल्या प्रती काढण्यात आल्या. ह्या सांगितीला स्थविरांची संगिती असे म्हणतात.

येथून पश्चिमेला २० ली अंतरावर अशोक राजाने बांधलेला एक स्तूप आहे. त्या ठिकाणी महासांघिकांची संगिती भरली होती त्यांनी सुत्तपिटक, विनयपिटक, अभिधम्मपिटक, खुद्दकपिटक आणि धारनी पिटक अशा पाच पिटकांचे संस्करण केले.[2]

ह्या संगितीत भिक्खू आणि उपासकमुद्धा उपस्थित होते म्हणुन ह्या सांगितीला महासांघिक असे म्हणतात.

ह्यू–एन-त्सँगने नवीन राजगृह पाहिल्यावर तो परत नालंदा येथे आला आणि शीलभद्रांकडून योगाचारशास्त्र शिकला.

नालंदा येथील वास्तव्यात ह्यू-एन-त्सँगने तीन वेळा योगशास्त्रावरील विवेचन ऐकले. एकदा न्यायानुसारशास्त्र, दोनदा हेतुविद्याशास्त्र आणि शब्दविद्याशास्त्र, तीनदा प्रज्ञामूलशास्त्रटीका आणि शत–शास्त्रटीका यांच्यावरचे विवेचन ऐकले. कोष, विभाषा आणि शतपदाभिधर्मशास्त्रांचे विवेचन त्याने काश्मीरमध्ये पूर्वीच ऐकले होते; पण त्याच्या काही शंकांचे निरसन करून घेण्यासाठी त्या शास्त्रांचे विवेचन त्याने पुन्हा नालंदा येथे ऐकले नंतर त्याने संस्कृत व्याकरणाचा पूर्ण अभ्यास केला.

## हिरण्य प्रदेश

नालंदा सोडल्यावर तो हिरण्यपर्वत देशात गेला. वाटेत त्याने कपोतिक संघाराम पाहिला. तेथील विहारात अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाची एक मोठी चंदनाची मूर्ती होती. त्या मूर्तीच्या हातावर लांबून फुले किंवा फुलांच्या माळा टाकून आपले भविष्य अजमावण्याची अंधश्रद्धा येथे प्रचलित होती. ह्यू एन-त्सँगने सुद्धा मूर्तीच्या हातावर फुलांच्या माळा टाकून आनंद मिळविला.

हिरण्य प्रदेशात दहा संघाराम असून ४००० भिक्खू होते. ते बहुतेक सर्व सर्वास्तिवादी शाखेचे होते.

---

१. ही जागा सप्तपर्णी गुहेजवळ आहे.

२. सर्वसामान्य असे म्हटले जाते की, महासांघिकांची संगिती-जिला दुसरी संगिती असे म्हटले जाते—ती वैशाली येथे भरली होती. ह्यू–एन-त्सँगने येथे निराळे मत प्रदर्शित केले आहे



काही वर्षांपूर्वी सीमेवरच्या एका राजाने तेथील राजाला पादाक्रांत केले आणि राजधानीचे शहर भिक्खूंना दिले शिवाय त्याने तेथे तीन मोठे संघाराम बांधले. प्रत्येक संघारामात १००० भिक्खूंची व्यवस्था होती. तेथे तथागत आणि क्षान्तिसिंह नावाचे दोन प्रख्यात बंधू होते. ते दोघेही सर्वास्तिवादी शाखेचे होते. त्यांच्याजवळ एक वर्ष राहून ह्यू-एन-त्सँगने विभाषा, न्यायानुसारशास्त्र आणि इतर शास्त्रांचा अभ्यास केला.

शहराच्या दक्षिणेला एक स्तूप होता. त्या ठिकाणी तथागतांनी तीन महिने धम्मज्ञान दिले होते बकूल नावाच्या यक्षाला तेथेच तथागतांनी दीक्षा दिली होती.

येथून ३०० ली अंतरावर पूर्वेला चंपा प्रदेश लागतो. तेथे दहा संघाराम असून हीनयानी पंथाचे ३०० भिक्खू होते. हिरण्य देशात आणि चंपा देशात खूप हत्ती, गेंडे आणि काळ्या रंगाचे बिब्बे वाघ आहेत. हत्तींचा उपयोग वाहनासाठी केला जातो. तेथे खूप हत्ती असल्यामुळे येथील राजाच्या सैन्यात हत्तीदळाचा खूप मोठा भरणा असे.

नंतर पुढे पूर्वेला काजूधीर, पुन्द्रवर्धन, कर्णसुवर्ण, कामलंका (पेगू) वगैरे प्रदेशात जाऊन ह्यू-एन-त्सँग परत ओरिसाकडे आला. कर्णसुवर्ण येथील वैशिष्टयपूर्ण गोष्ट म्हणजे तेथील दहा संघारामात हीनयानी पंथाच्या सम्मतीय शाखेच्या ३०० भिक्खूंशिवाय त्याला इतर दोन संघाराम दिसले. तेथील भिक्खू देवदत्ताच्या शिकवणीप्रमाणे दूध किंवा तूप घेत नसत.

ओरिसाच्या उत्तरेस असलेल्या उद्र देशात १०० संघाराम असून १०,००० भिक्खू होते. कलिंग देशात (ओरिसात) दहा संघारामात ५००० भिक्खू होते. ते सर्व स्थविर शाखेचे होते. तेथे पूर्वी खूप लोकसंख्या होती. परंतु एका ऋषीच्या शापामुळे तेथील सर्व लहानथोर नष्ट झाले. आता दुसऱ्या प्रदेशातील लोकांनी तेथे वास्तव्य करण्यास सुरुवात केली आहे. तरीसुद्धा अजून येथील लोकवस्ती विरळच आहे असे ह्यू एन-त्सँग म्हणतो.

## दक्षिण कोशल

कलिंग देशाच्या राजधानीपासून (राजमहेन्द्रीपासून) १८०० ली अंतर वायव्येला प्रवास केल्यावर ह्यू–एन–त्सँग दक्षिण कोशल[1] देशात आला. तो म्हणतो,

'ह्या देशाच्या सीमेवर पर्वतांची रांग आहे. येथे बऱ्याच ठिकाणी घनदाट अरण्ये आणि माळराने आहेत. राजधानीचे शहर ४० ली परिघाचे आहे. जमीन कसदार असून सुपीक आहे. अन्नधान्याचे उत्पन्न भरपूर होते. नगरे आणि खेडी जवळजवळ आहेत. लोकसंख्या भरपूर आहे. माणसे उंच असून रंगाने काळसर आहेत. स्वभावाने काहीशी रांगडी आहेत. ती शूर पण उतावीळ आहेत. येथे बौद्ध आणि पाखंडी लोक राहातात. ते तल्लख बुद्धीचे आणि अभ्यासू वृत्तीचे आहेत. राजा क्षत्रिय कुळातील आहे. तो बुद्धधम्माला फार मान देतो. त्याच्या सद्गुणांची

आणि प्रजेवरच्या प्रेमाची कीर्ती दूरवर पसरली आहे. येथे साधारणपणे १०० संघाराम आहेत. त्यात महायान पंथाचे जवळजवळ १०,००० भिक्खू आहेत. येथे देवाची देवळे साधारणपणे सत्तर आहेत. त्यात निरनिराळ्या पंथांचे पाखंडी लोक जातात.

शहराच्या दक्षिणेला जवळच एक जुना संघाराम आहे. त्याच्या शेजारी सम्राट अशोकाने बांधलेला एक स्तूप आहे. तथागतांनी पूर्वी तेथे धम्मप्रवचन करून लोकांना धम्ममार्ग दाखविला होता. त्या संघारामात नागार्जुन बोधिसत्त्व राहात असे. त्या वेळच्या ह्या देशाच्या राजाचे नाव सद्वाह (सातवाहन) असे होते. तो नागार्जुनाचा फार आदर करीत असे. नागार्जुनाच्या कुटीभोवती त्याने (नागार्जुनाच्या संरक्षणासाठी) पहारेकऱ्यांची व्यवस्था केली होती!

एकदा नागार्जुनाशी धम्मचर्चा करण्यासाठी देवबोधिसत्त्व[२] सिंहल देशाहून (श्रीलंकेहून) आला. आपण आल्याबद्दल नागार्जुनाला कळव असे त्याने द्वारपालाला सांगितले. द्वारपालाने त्याप्रमाणे नागार्जुनाला सांगितले. नागार्जुनाला सिंहल देशाच्या देवबोधिसत्त्वाबद्दल माहिती होती. त्याने पाण्याने काठोकाठ भरलेले एक पात्र द्वारपालाच्या हातात देऊन ते देवाच्या पुढे धरण्यास सांगितले. देवाने पाणी पाहिल्यावर किंचित काल मौन धरले आणि नंतर त्या पाण्यात एक सुई टाकली. द्वारपाल ते पात्र घेऊन परत आत गेला आणि त्याने घडलेला वृत्तांत नागार्जुनाला

---

१. श्रावस्ती आणि अयोध्या ह्या जिल्ह्यांचा मिळून झालेला कोशल देश आणि दक्षिण कोशल देश हे वेगळे आहेत. दक्षिण कोशल किंवा कोसल देश ओरिसाच्या नैऋत्येस असून महानदीच्या वरच्या बाजूच्या उपनद्यांच्या आणि गोदावरीच्या उत्तरेकडील उपनद्यांच्या खोऱ्यांचा त्यात समावेश होतो.

ह्या दक्षिण कोसल देशाची राजधानी कोणती होती, ह्याबद्दल वाद आहे. जनरल कनिंगहॅमच्या मताप्रमाणे दक्षिण कोसल देश म्हणजे वऱ्हाड किंवा गोंडवन प्रांत असा आहे. म्हणून त्याच्या मताप्रमाणे ह्यू–एन–त्सँगने वर्णन केलेली दक्षिण कोसलची राजधानी चांदा असावी. चांदा शहराभोवती पूर्वीच्या काळी संरक्षणास लागणारी भक्कम भित होती. राजमहेन्द्रीपासून चांदा शहर २९० मैल आहे, नागपूर, अमरावती आणि एलिचपूर येथेसुद्धा कदाचित दक्षिण कोसलची राजधानी असावी असे जनरल कनिंगहॅमला वाटत होते. पण ही तीन शहरे राजमहेन्द्रीपासून फार दूर आहेत. पण पाच ली म्हणजे एक मैल असे प्रमाण धरल्यास राजमहेन्द्रीपासून नागपूर आणि अमरावती हे अंतर १८०० ते १९०० ली भरेल. अमरावती येथे विद्वान भिक्खू दूरच्या देशातून येऊन राहात असत. एका मैलाला सहा ली असे प्रमाण धरून वैरगढ किंवा भंदक की शहरे कोसलच्या राजधानीची ठिकाणे असावीत असा अंदाज फर्ग्युसनने केला आहे.

२. अनेक धम्मशास्त्रांचा लेखक आर्यदेव ह्याला ह्यू-एन-त्सँग फक्त देव किंवा देवबोधिसत्त्व असे म्हणतो.



सांगितला. ते ऐकून नागार्जुन म्हणाला, अशा विद्वान माणसाला तावडतोब आदराने प्रवेश दिला पाहिजे. द्वारपालाने ह्या निःशब्द संभाषणाचा अर्थ काय आहे, असे नागार्जुनाला विचारले. तेव्हा नागार्जुन म्हणाला, 'पात्राच्या आकारमानाप्रमाणे पाणी जागा व्याप्त करते. त्यात असलेल्या पदार्थाप्रमाणे ते स्वच्छ किंवा अस्वच्छ असते. ते पात्राच्या कानाकोपऱ्यात जाते. स्वच्छ आणि नितळ असूनही त्याची खोली अगाध असू शकते. पाणी पाहिल्यानंतर देवाने त्याची तुलना व्यासंगाने मिळविलेल्या माझ्या ज्ञानाशी केली आणि पाण्यात सुई टाकून असे सूचित केले की, माझ्या ज्ञानाचा शोध तो थेट तळापर्यंत जाऊन घेऊ शकतो. अशा माणसाशी धम्मचर्चा केल्यास माझ्यानंतर तो निश्चितच धम्माची ज्योत प्रज्वलित ठेवू शकेल. ह्या असामान्य माणसाला आदराने तावडतोब घेऊन ये.' नागार्जुनाचा शिष्य म्हणून बरीच वर्षे देव ह्या संघारामात राहिला.

नागार्जुन बोधिसत्त्वाला औषधांची चांगली माहिती होती. एक प्रकारचे चूर्ण घेऊन त्याने आपले आयुष्य बरेच वाढविले होते. त्या औषधामुळे म्हातारपणातसुद्धा त्याचे मन किंवा शरीर थकले नव्हते. सिद्वाह राजासुद्धा[१] हे औषध खाऊन बरीच वर्षे जगला होता. त्या राजाचा धाकटा मुलगा आपल्या आईला म्हणाला, 'मी केव्हा राजा होणार ?' तेव्हा त्याची आई त्याला म्हणाली, 'मला तशी चिन्हे दिसत नाहीत. तुझे वडील आता अनेक वर्षे राजे आहेत. त्यांची इतर मुले आणि नातवंडे वृद्धत्वामुळे केव्हाच मेली आहेत. नागार्जुनांना माहीत असलेल्या औषधाचा हा परिणाम आहे. ज्या दिवशी नागार्जुन बोधिसत्त्व परिनिर्वाणास जातील त्या दिवशी तुझ्या वडिलांचापण अंत होईल. नागार्जुन सर्वज्ञ आहेत. मैत्री आणि करुणेने ते सर्वांवर प्रेम करतात. प्राणिमात्रांच्या कल्याणाकरिता ते आपले शरीर आणि जीवन देऊ शकतील. तेव्हा त्यांच्याकडे जा आणि त्यांचे शिर माग. मग तुझी इच्छा पूर्ण होईल.'

आईच्या सांगण्यावरून राजाचा मुलगा नागार्जुनाकडे गेला. त्याला पाहून द्वारपाल घाबरून पळून गेला नागार्जुन त्या वेळेस चंक्रमण करीत होता. राजाच्या मुलाला पाहून नागार्जुन बोधिसत्त्व थांबला आणि म्हणाला, 'ही आता संध्याकाळची वेळ आहे. अशा सांजवेळी तू इतक्या घाईघाईने भिक्खूकडे का आला आहेस ? काही अपघात तर झाला नाही ना ? की येणाऱ्या काही अरिष्टामुळे घाबरून जाऊन इतक्या घाईने तू इकडे आला आहेस ?'

राजपुत्र म्हणाला, 'मी माझ्या आईशी ऋषिमुनींनी केलेल्या त्यागासंबंधी बोलत होतो. माझ्या आईने दहा प्रदेशांतील सुगतांनी आणि तीन कल्पांतील तथागतांनी लोकांच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पण केल्याची उदाहरणे दिली.

---

१) हा सातवाहन राजा यज्ञश्री सातकर्णी होय. त्याला पत्ररूपाने लिहिलेला नागार्जुनाचा 'सहृल्लेखा' हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

त्यांनी आपले शरीर भुकेलेल्या प्राण्याची भूक शमावी म्हणून त्यांना खाण्यासाठी दिले ; कबूतराचे संरक्षण करण्यासाठी आपली मांडी कापून दिली. चंद्रप्रभा राजाने आपले शिर ब्राह्मणाला दिले आणि मैत्रिबल राजाने भुकेलेल्या यक्षाला आपले रक्त दिले[1] अशा प्रकारच्या त्यागाची सर्वत्र उदाहरणे सांगणे कठीण आहे. तुम्ही त्यांच्याप्रमाणे महान आहात. माझ्या स्वार्थासाठी मी तुमचे शिर मागत आहे.' हे ऐकल्यावर नागार्जुन म्हणाला, तू म्हणतोस ते खरे आहे. आपले जीवन प्रतिध्वनी-सारखे किंवा पाण्यावरच्या बुडबुड्यासारखे अनित्य आहे. त्याचा चार प्रकारच्या योनीतून[2] सहा प्रकारच्या लोकात[3] सतत उद्‌भव आणि व्यय होत असतो. प्राणि-मात्राच्या इच्छेविरुद्ध मी काहीही करीत नाही. मी माझे जीवन दिले तर राजा-चाही अन्त होईल. ह्याबद्दल राजपुत्राचे काय म्हणणे आहे. राजाला निर्वाणाचा मार्ग कोण दाखविणार ?'

ह्यावर राजपुत्र काहीही न बोलता उभा राहिला. तेव्हा तलवारीने कापावा तसा दर्भाच्या वाळलेल्या पानाने नागार्जुनाने आपला गळा कापला. त्याचे शिर शरीरापासून खाली पडले. हे पाहून राजपुत्र पळून गेला आणि राजा परत आला. द्वारपालाने राजाला पहिल्यापासून सगळा वृत्तांत सांगितला. हे ऐकून राजाला इतके वाईट वाटले की, ऐकत असतानाच तो दुःखातिशयाने मरण पावला.'

'आग्नेय दिशेला साधारणपणे ३०० ली अंतरावर ब्रह्मगिरी पर्वत आहे. सातवाहन राजाने तो पर्वत खोदून त्यात नागार्जुन बोधिसत्त्वासाठी एक संघाराम तयार केला आहे. त्या संघारामाला जाण्यासाठी दहा ली अंतरापर्यंत भुयारातून मार्ग काढला आहे. तो संघाराम पाच मजली आहे. प्रत्येक मजल्यावर चार सभा मंडप असून एक चैत्यगृह आहे. त्या प्रत्येक चैत्यगृहात माणसाच्या उंचीइतकी बुद्धाची अत्यंत कलाकौशल्यपूर्ण अशी सोन्याची रूपे आहेत. पर्वताच्या वरच्या शिखरावरून पाण्याचा झरा वाहतो. त्याचे पाणी संघारामाच्या सर्व मजल्यावरच्या विहारासमोरून वाहात जाते.

राजाने १००० भिक्खूंना तेथे राहाण्यासाठी बोलाविले होते. नागार्जुनाने संघारामाच्या पाचव्या मजल्यावर धम्मग्रंथांचे ग्रंथालय केले होते. ब्राह्मणांना खालचा मजला राहाण्यासाठी दिला होता. मधले तीन मजले भिक्खूंना राहाण्यासाठी दिले होते. काही वर्षांनी आपले आपापसातले भांडण घेऊन भिक्खू राजाकडे गेले. ह्या संधीचा फायदा घेऊन ब्राह्मणांनी संघाराम नष्ट केला आणि त्या जागेची अशा

१) ही सर्व उदाहरणे जातक कथांतील आहेत.

२) Oriparous, Viviparous, born from spawn and by transmission.

३) १) देवलोक, २) मनुष्यलोक, ३) असूरलोक, ४) प्रेतलोक, ५) प्राणिलोक ६) नरकलोक.



तऱ्हेने तटबंदी केली की, भिक्खू तेथे परत जाऊ शकले नाहीत. तेव्हापासून तेथे कोणीही बौद्ध भिक्खू गेला नाही. त्या पर्वताकडे दुरून पाहिले तर लेण्यात जाण्याचा मार्ग सापडणे शक्य नाही. अलीकडे जर कोणी आजारी पडला तर बाहेरच्या वैद्याला त्याच्या तोंडावर बुरखा घालून आत नेले जाते आणि त्याच तऱ्हेने त्याला बाहेर आणले जाते. त्यामुळे, आत जाण्याचा रस्ता कोणालाही कळत नाही.'

येथून ९०० ली अंतर जंगलातून प्रवास केल्यावर आंध्र प्रदेश लागतो.

आंध्र देशाची राजधानी विंगिला आहे असे ह्यू-एन-त्संगने लिहिले आहे. तेथे त्याने खूपच उंच आणि भव्य स्तूप पाहिला. तो अर्हंत अचलाने बांधला होता. त्या स्तूपाच्या आग्नेय दिशेला २० ली अंतरावर एका पर्वत शिखरावर दुसरा एक स्तूप आहे. तेथे जिन बोधिसत्त्वाने 'न्यायद्वारतर्कशास्त्र' किंवा 'हेतुविद्याशास्त्र' लिहिले.

आंध्र देशाच्या राजधानीपासून दक्षिणेला १००० ली प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्संग धनकाकटाला[1] पोहोचला. तेथे त्याने पूर्वशील आणि अपरशील[2] पर्वतातील खोदून काढलेले संघाराम पाहिले.

अनेक धम्मग्रंथांचा लेखक भावविवेक येथे होऊन गेला. त्याचा स्तूप राज-धानीच्या शहराजवळील पर्वतावर होता.

## द्राविड देश

नंतर ह्यू-एन त्संग चोल देशाहून द्राविड देशातील कांचीपुर येथे आला.

१) अमरावती, नाशिक, कार्ले इत्यादी ठिकाणच्या शिलालेखांत धनकाकटाच्या भिक्खूंचा आणि उपासकांचा उल्लेख आहे.

२) अपरशील म्हणजेच अमरावतीचा स्तूप असे फर्ग्युसनने सिद्ध केले आहे. हा स्तूप बेझवाड्याच्या पश्चिमेला १७ मैलांवर आहे. धनीकोटचा जुना किल्ला अमरावतीच्या पश्चिमेला फक्त एक मैल अंतरावर आहे. इ. स. १७९६ साली राजा व्यंकटगिरी नायडूच्या नोकरांना ह्या महत्त्वाच्या स्तूपाचा प्रथम शोध लागला. तेव्हापासून इ. स. १८१६ पर्यंत राजाच्या लोकांनी त्या स्तूपातील संगमरवरी शिल्पाची आणि इतर बांधकामास उपयोगी पडणाऱ्या सामानाची लुटालूट करून स्तूपाचा खूप विध्वंस केला. कर्नल मॅकेंझीने तो स्तूप इ. स. १७९७ साली पाहिला होता. नंतर पुन्हा मॅकेंझी तेथे १८१६ साली गेला. ह्या स्तूपाचा अशा तऱ्हेने होत असलेला विध्वंस पाहून त्याला वाईट वाटले. त्याने तेथे थोडे उत्खनन केले. नंतर तेथे इ. स. १८४० साली सर वॉल्टर इलियटने उत्खनन करून पश्चिमेचा दरवाजा शोधून काढला. इ. स. १८८२-८३ साली उत्खनन करून डॉ. जेम्स बर्जेसने एक शिलालेख शोधून काढला. त्या शिलालेखावरून इ. सनाच्या दुसऱ्या शतकात किंवा त्याच्या अगोदर तो स्तूप बांधला गेला असला पाहिजे हे सिद्ध होते.

द्राविड देशात साधारणपणे १०० संघाराम असून १०,००० भिक्खू होते. ते सर्व महायानी पंथातील स्थविर शाखेचे होते तेथे ८० देवळे असून पाखंडी त्याचप्रमाणे निग्रंथांची लोकसंख्यासुद्धा बरीच होती. पूर्वीच्या काळी ह्या देशात तथागत बऱ्याच वेळा आले होते. त्यांनी येथील लोकांना धम्मज्ञान दिले, तेव्हा खूप लोकांनी बुद्ध-धम्म स्वीकारला होता. त्याची आठवण म्हणून येथे सर्व पवित्र ठिकाणी सम्राट अशोकाने स्तूप बांधले आहेत धर्मपाल बोधिसत्त्व कांचीपूर शहराचा मूळचा रहिवासी होता. तो येथील राजाच्या एका मंत्र्याचा मोठा मुलगा होता. लहानपणापासूनच त्याची तल्लख बुद्धिमत्ता दिसून येत होती. तो जेव्हा तरुण झाला तेव्हा त्याला राजाने आणि राणीने आपल्या घराण्यातील एका राजकन्येशी विवाह करण्यास सांगितले. लग्नाच्या मेजवानीच्या दिवशी संध्याकाळी तो फार दुःखी-कष्टी झाला. कारण संसारात राहून वेळ घालवू नये, असे त्याला वाटत असे म्हणून तो बुद्धरूपाच्या पुढे ध्यान लावून बसला. नंतर कांचीपूर येथून गुप्त रीतीने दूर जाऊन तो एका पर्वतातील संघारामात दडून बसला. तेथे भिक्खूंनी त्याला पाहिल्यावर झालेला सर्व वृत्तांत त्याने भिक्खूना सांगितला आणि संघात आपणास प्रवेश द्यावा अशी त्यांना विनंती केली. भिक्खू संघाने त्याची विनंती मान्य करून त्याला संघात प्रवेश दिला. मध्यंतरी राजाने त्याचा शोध लावण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी माणसे पाठविली होती. तो भिक्खू झाला आहे असे ऐकून, राजाचा त्याच्याविषयी असलेला आदर द्विगुणित झाला. धर्मपालाने अनेक धम्मग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी 'शब्दविद्यासंयुक्तशास्त्र' हा ग्रंथ २५,००० श्लोकांचा आहे. 'शतशास्त्रवैपुल्यम्', 'विद्यामात्र सिद्धी' आणि 'न्याय-द्वार-तारकशास्त्र' यांच्यावरील टीकात्मक ग्रंथ, इत्यादी अनेक ग्रंथ धर्मपालाने लिहिले आहेत.

कांचीपूर हे शहर समुद्रकिनाऱ्यावर वसले आहे. तेथून बोटीने तीन दिवसांचा प्रवास केला असता सिहल देशात (श्रीलंकेत) पोहोचता येते. नुकताच सिहल देशाच्या राजाचा मृत्यू झाला होता. त्या देशात दुष्काळ पडला होता आणि एकंदरीत अराजकता माजली होती. तेथून बोधिमेघेश्वर आणि अभयदानास्त्र नावाचे दोन प्रसिद्ध भिक्खू इतर ३०० भिक्खूंसह कांचीपूर येथे आले होते. त्यांनी श्रीलंकेला तूर्त न जाण्याचा सल्ला ह्यू-एन-त्संगला दिला.

द्राविड देश सोडल्यावर उत्तरेकडे २००० ली प्रवास केल्यावर ह्यू-एन-त्संग कोंकणपुरास आला (इ स. ६४०). तो म्हणतो, 'ह्या प्रदेशाचे क्षेत्रफळ अंदाजे ५००० ली आहे. राजधानीचे[1] क्षेत्रफळ अंदाजे ३२ ली आहे. जमिनीचा कस उत्तम आहे जमीन नियमितपणे लागवडीखाली आणली जात असून लोक उत्साही आणि चपळ आहेत. रंगाने ते काळे आहेत. त्यांचे शिष्टाचार रांगडे आणि काहीसे उग्र

१. कोंकणपुरा ह्या देशाची राजधानी कोणती ह्याबद्दल विद्वानांत एकमत नाही. कोणी अनागुंडी किंवा म्हैसूर म्हणतात, तर कोणी गोळकोण्डा म्हणतात.



आहेत. त्यांना शिक्षणाबद्दल प्रेम असून बुद्धिमत्तेबद्दल आणि सद्गुणांबद्दल आदर आहे. तेथे साधारणपणे १०० संघाराम आणि १०,००० भिक्खू आहेत. ते हीनयान आणि महायान या दोन्ही पंथांचा अभ्यास करतात त्यांना देवाबद्दलही खूप आदर आहे. देवांची शेकडो देवालये आहेत. तेथे निरनिराळ्या पंथांचे लोक एकत्र राहातात.

राजवाड्याशेजारी एक मोठा संघाराम आहे. तेथे ३०० भिक्खू राहात असून ते सर्व विद्याव्यासंगाळुळे आदरणीय आहेत. ह्या प्रदेशात एक मोठा विहार आहे. त्याची उंची १०० फुटांपेक्षा जास्त आहे. त्या विहारात सर्वार्थसिद्ध या राजाचा मुकुट आहे. त्याची उंची दोन फुटांपेक्षा कमी असून तो रत्नजडित आहे. तो एका रत्नजडित पेटीत ठेवला आहे. उपोसथाच्या दिवशी बाहेर काढून त्याला सिंहासनावर ठेवला जाई त्या वेळी त्याचा प्रकाश दिसत असे.

शहराच्या जवळच एक संघाराम आहे. त्याच्यामध्ये असलेल्या विहाराची उंची अंदाजे ५० फूट आहे. त्या विहारात मैत्रेय बोधिसत्त्वाची चंदनाची मूर्ती आहे. त्या मूर्तीची उंची अंदाजे २० फूट आहे. उपोसथाच्या दिवशी ही मूर्तीसुद्धा प्रकाशमान होते. ही मूर्ती अर्हत Wen-rh-pin-i ने[1] बनवून घेतली.

शहराच्या उत्तरेस जवळच ताडाच्या झाडांचे वन आहे. त्याचे क्षेत्रफळ ३० ली आहे. त्या झाडांची पाने लांब-रुंद असून ती चकचकीत आहेत. जम्बुद्वीपात सर्वत्र ह्या पानांचा उपयोग लिहिण्यासाठी करतात. त्या जंगलात एक स्तूप आहे. तेथे पूर्वीचे चार बुद्ध बसले आणि सभोवती फिरले त्याच्या खुणा अजूनही आहेत. शहराच्या पूर्वेस जवळच एक स्तूप आहे. तो पायापासून जमिनीत खचला आहे. तरीसुद्धा ३० फूट जमिनीवर दिसतो. फार पूर्वीपासून चालत आलेली आख्यायिका अशी आहे की, तेथे तथागतांचे काही अवशेष आहेत आणि धार्मिक कार्यक्रमाच्या दिवशी तेथून अगम्य प्रकाश दिसतो. पूर्वीच्या काळी जेव्हा तथागत ह्यात होते तेव्हा त्यांनी येथे प्रवचने दिली; आपली दैवी शक्ती दाखविली आणि अनेक लोकांना बुद्धधम्माची दीक्षा दिली. शहराच्या नैऋत्य दिशेस जवळच अशोक राजाने बांधलेला १०० फूट उंचीचा एक स्तूप आहे. तेथे अर्हत श्रुतिविंशति कोटीने अगम्य शक्ती दाखवून अनेक लोकांना धम्माची दीक्षा दिली. त्या स्तूपाशेजारी एक संघाराम होता. आता त्याचा फक्त पाया दिसत आहे. हा सुद्धा वर सांगितलेल्या अर्हंताने बांधला होता.

## मो-हो-ला-छिया अर्थात महाराष्ट्र

येथून वायव्य दिशेला गेले असता खूप मोठे जंगल लागते. तेथील हिंस्र प्राणी आणि डाकू लोकांच्या टोळ्यांपासून प्रवासी लोकांना भय असते. ह्याप्रमाणे २४००

१. सॅम्युअल बीलने वर दिलेले नाव कात्यायनाचा शिष्य अर्हंत सोनाकुटीकन्नाचे असावे असा अंदाज केला आहे.

ते ६५०० ली प्रवास केल्यावर आपण महाराष्ट्र (मो-हो-ला-छिया) देशात येतो (इ. स. ६४१).

ह्या देशाचा परिघ अंदाजे ५,००० ली आहे. राजधानीचे शहर[1] एका मोठ्या नदीच्या पश्चिमेला आहे. ते साधारणपणे ३० ली परिघाचे आहे.

जमीन कसदार असून सुपीक आहे. तिची मशागत वेळेवर केली जाते आणि तिच्यातून भरपूर पीक निघते. हवामान उष्ण आहे. लोक इमानदार आणि सरळ स्वभावाचे आहेत. ते शरीराने उंच असून वागायला कडक आणि खुनशी वृत्तीचे आहेत. त्यांना मदत करणाऱ्याबद्दल ते कृतज्ञता दाखवितात. त्यांच्या शत्रूशी ते कठोर असतात. त्यांचा कोणी अपमान केला तर जीव पणाला लावून ते बदला घेतात. संकटात असलेल्या कोणी त्यांची मदत मागितली तर मदत करण्याच्या तत्परतेत ते स्वतःला विसरतात. जर त्यांना सूड घ्यावयाचा असला तर ते त्यांच्या शत्रूना पहिल्यांदा ताकीद देतात. दोघांनी हातात शस्त्रे घेतल्यावर ते एकमेकांवर भाल्याने हल्ला करतात. (पराभव पावल्यामुळे) जेव्हा त्यांतील एक पळून जाण्याच्या तयारीत असतो, तेव्हा दुसरा त्याचा पाठलाग करू लागतो. पण शरण आलेल्यांना ते मारीत नाहीत. युद्धात सेनापती हरला तर त्याला ते शिक्षा करीत नाहीत. पण त्याला चोळीबांगडी घालावयास देतात आणि अशा तऱ्हेने (लांछनामुळे) तो स्वतःचा जीव घेण्यास प्रवृत्त होतो. ह्या देशात शेकडो योद्धे निर्माण होतात. जेव्हा त्यांना युद्धावर जावयाचे असते, तेव्हा ते दारू पिऊन स्वतःला झिंगवून घेतात आणि नंतर एक भालाधारी योद्धा दहा हजार माणसांना युद्धासाठी आव्हान देतो. एखाद्या योद्ध्याने कोणाला मारले तर येथील कायद्याप्रमाणे त्याला शिक्षा होत नाही. जेव्हा जेव्हा ते लढाईला जातात; तेव्हा तेव्हा ते पुढे ढोल वाजवितात. शिवाय ते हत्तींना दारू पाजून झिंगवितात. लढाईसाठी त्यांना बाहेर काढल्यावर ते स्वत: त्यांची दारू पितात आणि नंतर एका मोर्च्याने तुफानी हल्ला करून शत्रूची धूळधाण करतात. यामुळे कोणताच शत्रू त्यांच्यासमोर टिकत नाही. ह्या योद्ध्यांमुळे आणि हत्तींमुळे येथील राजा शेजारपाजारच्या राजांना मान देत नाही. तो क्षत्रिय कुळातला आहे. त्याचे नाव पुलकेशी[2] आहे. त्याच्या योजना आणि कार्यक्षेत्र

१. महाराष्ट्राच्या राजधानीचे शहर कोणते याबद्दल बरेच अंदाज व्यक्त केले गेले आहेत. मार्टीनच्या म्हणण्याप्रमाणे ते देवगिरी किंवा दौलताबाद असावे. पण ते नदीकिनारी नाही. जनरल कनिंगहॅमच्या मते, ते कल्याण असावे. कल्याणच्या पश्चिमेस कॅलास नदी वाहते. पण ते भडोचच्या दक्षिणेला आहे, पूर्वेला नाही. फर्ग्युसनच्या म्हणण्याप्रमाणे ते टोका, फूलमांबा किंवा पैठण असावे. काहींच्या मते, ते तापी किंवा गिरणा नदीच्या किनारी असावे; तर काहींच्या मते ते नाशिक असावे असे आहे.

२. हा दुसरा पुलकेशीन् (इ. स. ६१९ ते ६४२).



विशाल आहेत. त्याच्या सत्कृत्यांची ख्याती दूरदूरच्या लोकांना झाली आहे. त्याची प्रजा त्याच्या आज्ञेचे संपूर्ण शरणागतीने पालन करते. हल्ली शीलादित्य राजाने पूर्वेपासून पश्चिमेपर्यंतचे देश जिंकून घेतले आहेत. पण फक्त ह्या देशाचे लोक त्याला अजून शरण गेलेले नाहीत. त्याने भारतातल्या पाच देशांचे सैन्य गोळा केले आहे आणि सर्व देशांतील सेनापतींना बोलावले आहे. ह्या देशातील लोकांना शिक्षा करून त्यांना शरण आणण्यासाठी त्याने सर्व सूत्रे स्वतः आपल्या हाती घेतली आहेत पण अजून त्याने (शिलादित्याने) त्यांच्या (महाराष्ट्राच्या) सैन्याला जिंकले नाही.

हे इतके त्यांच्या सवयीबद्दल. येथील माणसे शिक्षणप्रेमी असून ते पाखंडी, त्याचप्रमाणे, बुद्धधम्माच्या ग्रंथांचा अभ्यास करतात. येथे अंदाजे १०० संघाराम असून १००० च्या आसपास भिक्खू आहेत. ते महायान आणि हीनयान पंथाचे आहेत. तेथे देवांची १०० देवळे आहेत. त्या देवळात निरनिराळ्या पंथाचे लोक रहातात.

राजधानीच्या शहरात आणि शहराबाहेर जेथे पूर्वी चार बुद्ध बसले आणि फिरले त्या जागेवर खूण म्हणून पाच स्तूप आहेत. ते अशोकराजाने बांधले आहेत. ह्याशिवाय दगड आणि विटांनी बांधलेले येथे इतके स्तूप आहेत की त्यांचे वर्णन करणे कठीण आहे. शहराच्या दक्षिणेस जवळच एक संघाराम आहे. तेथील विहारात अवलोकितेश्वर बोधिसत्त्वाची पाषाणाची मूर्ती आहे. तिची दिव्यशक्ती खूप मोठी आहे इतकी की, ज्यांनी तिची पूजा केली त्यांच्यातील बऱ्याच लोकांच्या इच्छा पूर्ण झाल्या.

ह्या देशाच्या पूर्व सीमेवर एक मोठा पर्वत आहे. त्या पर्वताला अनेक उंच उंच शिखरे, खडकांचे सुळके आणि तासून काढल्यासारखे कडे आहेत. त्या पर्वतात एका अंधाऱ्या दरीत एक संघाराम बांधला आहे. त्याचे भव्य मंडप आणि मंडपातील बाजूचे येण्याजाण्याचे मार्ग खडकातून आत लांबवर खोदलेले आहेत. असे मजल्यावर मजले आहेत. मागे उंच शिखरे आणि पुढे पाणी वाहात असलेली दरी आहे. हा विहार अर्हत अचराने बांधला आहे.

हा अर्हत पश्चिमेकडील प्रदेशात राहाणारा होता. त्याची मेलेली आई कोणत्या स्थितीत पुन्हा जन्मलेली आहे हे त्याने पाहिले. तेव्हा त्याला दिसून आले की तिला ह्या जन्मात स्त्रीचे शरीर प्राप्त झाले आहे. सत्य जाणून घेण्याच्या दृष्टीने आणि तिच्या कुवतीप्रमाणे तिला दीक्षा देण्याच्या हेतूने अर्हत इथे आला. अन्नाची भिक्षा मागण्यासाठी तो गावातून फिरत असता ज्या घरात त्याच्या पूर्वजन्मातील आईचा, मुलगी म्हणून पुनर्जन्म झाला होता तेथे तो आला त्या वेळी एक तरुणी बाहेर आली. त्याच क्षणी तिच्या स्तनांतून दूध निघून खाली ठिपकू लागले. तिच्या मैत्रिणींनी हे दृश्य पाहिल्यावर ते अभागी लक्षण आहे असा विचार त्या करू लागल्या. तेव्हा अर्हताने त्यांना तिच्या पूर्वजन्माची कथा सांगितली.

ह्याप्रमाणे त्या मुलीला (अर्हतपदाचे) फळे मिळाले. तिने त्याला जन्म दिला आणि त्याचे संगोपन केले. ह्या उपकारांची जाणीव होऊन आणि तिची परत भेट घेण्याच्या इच्छेच्या झालेल्या पूर्तीची जाणीव होऊन त्या अर्हताने हा संघाराम बांधला. संघारामातील मोठा विहार अदाजे १०० फूट उंच आहे. त्याच्यावर खडकाचा छत आहे. मध्ये बुद्धाची पाषाणाची जवळजवळ ७० फूट उंचीची मूर्ती आहे. त्या मूर्तीवर एकावर एक असे कशाचाही आधार नसलेले पाषाणाचे सात छत्र आहेत. प्रत्येक दोन छत्रांमध्ये अंदाजे तीन फुटांचे अंतर आहे. जुन्या आख्यायिकेप्रमाणे अर्हताच्या व्रताच्या शक्तीमुळे ते अधांतरी राहिले आहेत. असेही म्हटले जाते की, अर्हताच्या दिव्यशक्तीमुळे ते अधांतरी राहिले आहेत.

दुसरे काही लोक म्हणतात की, ते जादूटोण्यामुळे अधांतरी राहिले आहेत. पण आश्चर्यकारक रीतीने ते अधांतरी राहण्याचे काय कारण आहे, ह्याचे विश्वसनीय उत्तर अजूनही मिळाले नाही. विहाराच्या खडकाच्या चारही भिंतीवर तथागतांना बुद्धत्व प्राप्त होण्यासाठी अनेक जन्मांत करावी लागणारी सत्कृत्ये आणि त्यासाठी घ्यावे लागणारे बोधिसत्त्वाचे जन्म तसेच निर्वाण प्राप्त होताना दिव्य अनुभूतीचे दर्शन घडविणारी निरनिराळी रंगीत चित्रे काढली आहेत. ही चित्रे अगदी बिनचूक काढली असून अत्यंत सुंदर आहेत.[1]

संघारामाच्या बाहेर उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे उजव्या आणि डाव्या हाताला दगडी हत्ती कोरलेले आहेत. असे म्हटले जाते की, कधी कधी हे हत्ती मोठ्याने ओरडतात आणि त्या वेळी सर्व बाजूची जमीन हादरते. प्राचीन काळी जीन बोधिसत्त्व[2] ह्या संघारामात थांबत असे.'

## भडूच–माळवा–वल्लभी

येथून साधारणपणे १००० ली पश्चिमेला प्रवास केल्यावर आणि नर्मदा नदी पार केल्यावर ह्यू–एन–त्संग भडूचला पोहोचला. तो म्हणतो, 'हे राज्य २४०० ते २५०० ली परिघाचे आहे. राजधानीच्या शहराचा परिघ २० ली आहे. येथील जमीन क्षारयुक्त आहे. झाडीझुडपे अगदी विरळ आहेत. समुद्राचे पाणी उकळून त्यातून मीठ तयार करतात. समुद्र हे त्यांचे उत्पन्नाचे एकमेव साधन आहे

१. ह्याच लेखकाचा 'महाराष्ट्रातील बुद्धधम्माचा इतिहास,' त्रिरत्न ग्रंथमाला, पुणे ह्यांचे प्रकाशन, १९८१ आवृत्तीचे पान ५८ पाहावे.

२. जीन बोधिसत्त्व ह्याने हेतुविद्याशास्त्र म्हणजे तर्कशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. तो इ. स. ५५० पूर्वी पण इ. स. ४५० नंतर झाला असला पाहिजे. इ. स. ५५७ ते ५६९ सालात त्यांचे दोन ग्रंथ परमार्थाने चिनी भाषेत अनुवादित केले आहेत अशी माहिती नानजिओच्या संदर्भ–ग्रंथ सूचीत ११७२ आणि १२५५ ह्या नंबरांवर मिळते.



हवामान उष्ण आहे. हवेत नेहमी वादळ होत असते. येथील लोक थंड आणि उदास आहेत. ते कपटी आणि दुष्ट स्वभावाचे आहेत. त्यांच्यात अभ्यासू वृत्ती नाही. धम्माकडे आणि इतर मार्गाकडे ते सारख्याच दृष्टीने पाहातात. येथे साधारणपणे दहा संघाराम असून ३०० भिक्खू आहेत. ते महायानी पंथाच्या स्थविर शाखेचे आहेत. येथे दहा देवळेसुद्धा आहेत. तेथे निरनिराळ्या पंथांचे लोक जातात.'

येथून नैऋत्येला साधारण २००० ली प्रवास केल्यावर ह्यू–एन–त्संग माळवा प्रांतात गेला. ह्या प्रांताच्या राजधानीच्या शहराचे[1] संरक्षण दक्षिणेच्या आणि पूर्वेच्या बाजूने मही नदीमुळे होते असे तो म्हणतो. पुढे ह्यू–एन–त्संग म्हणतो, 'भारतात दोन प्रदेश विद्याव्यासंगाबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत. ते म्हणजे आग्नेय दिशेला असलेला माळवा प्रांत आणि नैऋत्य दिशेला असलेला मगध प्रांत.'

येथील लोक सदगुणांचा आणि सुसंस्कृतपणाचा फार आदर करतात. ते बुद्धिवादी असून अत्यंत व्यासंगी आहेत. पाखंडी लोक आणि बौद्ध एकमेकांत मिळून मिसळून राहतात. येथे साधारणपणे १०० संघाराम असून त्यात हीनयानी पंथाच्या सम्मतीय शाखेचे २००० भिक्खू राहातात. येथे १०० देवळे असून त्यात निरनिराळ्या पंथांचे लोक जमतात. त्यात पाशुपताचे साधू प्रामुख्याने जास्त आहेत.

साठ वर्षांपूर्वी येथे शीलादित्य नावाचा एक राजा होऊन गेला. तो सद्गुणांचा भोक्ता असून स्वतः फार विद्वान होता. तो प्रजेवर मुलाप्रमाणे प्रेम करीत असे. पहिल्यापासूनच तो त्रिरत्नांचा (बुद्ध-धम्म-संघ) फार आदर करीत असे. गादीवर बसल्यापासून मरणापर्यंत तो कधीही रागावला नाही की त्याच्या तोंडून कधीही अपशब्द आला नाही. दरवर्षी तो 'मोक्ष परिषद' भरवीत असे. त्या वेळी भिक्खूंना बोलावून त्यांना चार 'चार वस्तू' चे आणि इतर मुबलक दान देत असे. ही प्रथा अजूनही ह्या राज्यात चालू आहे. आपल्या राजवाड्याशेजारी कलाकौशल्याने पूर्ण असा अप्रतिम बुद्धविहार त्याने बांधला आणि त्यात सात बुद्धरूपे ठेवली.

कच्छ देशात दहा संघाराम आणि १००० भिक्खू आहेत. ते महायानी आणि हीनयानी ह्या दोन्ही पंथांचे आहेत.

वल्लभी देशाने माळवा देशाच्या राजाचे मांडलिकत्व पत्करले आहे. येथे १०० संघाराम असून ६००० भिक्खू आहेत. ते हीनयानी पंथाच्या सम्मतीय शाखेचे आहेत. येथे देवांची शेकडो देवळे आहेत. तथागत येथे आले होते म्हणून सम्राट अशोकाने येथे पवित्र ठिकाणी स्तूप बांधले आहेत. येथील राजा माळव्याच्या शीला-

१. राजधानीच्या शहराचे संरक्षण पूर्वेच्या आणि दक्षिणेच्या किंवा आग्नेय दिशेने मही नदीमुळे होते. ह्यावरून गुजरातमधील डुंगरपूरच्या आसपास ही राजधानी असली पाहिजे. जनरल कनिंगहॅमच्या मताप्रमाणे धारापूर हे राजधानीचे शहर असावे.

दित्य राजाचा पुतण्या आणि कान्यकुब्जाच्या शीलादित्य राजाचा (सम्राट हर्षाचा) जावई आहे. त्याचे नाव (ध्रुवसेन) असे आहे. तो उतावळ्या स्वभावाचा असून त्याचे शहाणपण आणि राजकारणातले ज्ञान उथळ आहे. दरवर्षी सात दिवस सभा बोलावून तो भिक्खूंना दान करतो. शहरापासून जवळच एक मोठा संघाराम[1] आहे तो अर्हत अचराने बांधला. त्यात बोधिसत्त्व गुणमती आणि बोधिसत्त्व स्थिरमती राहत असत. त्यांनी अनेक धम्मग्रंथ लिहून खूप कीर्ती मिळविली.

आनंदपूर येथे १० संघाराम असून जवळजवळ १,००० भिक्खू आहेत. त्याचप्रमाणे सौराष्ट्र येथे ५० संघाराम असून महायान पंथाच्या स्थविर शाखेचे ३००० भिक्खू आहेत.

जुनागड जवळच्या पर्वतावर असलेल्या संघारामाचेही वर्णन ह्यू-एन-त्संगने केले आहे. त्याने त्या पर्वताचे नाव 'उज्जन्त' असे लिहिले आहे.

नंतर गुर्जर, राजस्थान, सिंध, मुलतान वगैरे प्रांतांतून प्रवास करून ह्यू-एन-त्संग काश्मिरातील पर्वत ह्या ठिकाणी आला. ह्यू-एन त्संग म्हणतो, ' येथे जिनपुत्राने ' योगाचार्यभूमिशास्त्र-कारिका ' आणि इतर धम्मग्रंथ लिहिले. येथेच विद्वान ग्रंथकर्ते भद्ररुची आणि गुणप्रभा यांनी पहिल्यांदा धम्मदीक्षा घेतली होती.'

ह्या ठिकाणी दोन-तीन विद्वान भिक्खू असल्यामुळे ह्यू-एन-त्संग तेथे दोन वर्षे राहिला. तेथे त्याने ' मूलाभिधर्म-शास्त्र, ' ' सद्धर्म-समपरिग्रह-शास्त्र ' आणि ' प्रशिक्षा-सत्य-शास्त्र ' ह्या सम्मतीय शाखेच्या ग्रंथांचा अभ्यास केला. नंतर मगधाच्या मार्गाने तो नालंदा येथे परत आला. तेथे शीलभद्राविषयी वाटत असलेला आदर व्यक्त केल्यावर, नालंदापासून पश्चिमेला तीन योजने अंतर असलेल्या तिलडक ह्या संघारामात तो गेला. तेथे प्रज्ञाभद्र नावाचा सर्वास्तिवादी शाखेचा एक विद्वान भिक्खू राहात होता. तो त्रिपिटकांमध्ये, शब्दविद्येत, हेतुविद्याशास्त्रात आणि इतर शास्त्रांत पारंगत होता. त्याच्याजवळ दोन महिने राहून ह्यू एन-त्संगने आपल्या अनेक शंकांचे निरसन करून घेतले. नंतर परत तो यष्टीवनात गेला. तेथे सुरतेचा एक क्षत्रिय जातीचा उपासक कुटुंब करून राहात होता. त्याचे नाव जयसेन असे होते. त्याने अनेक धम्मग्रंथ लिहिले आहेत. त्याने भद्ररूचीजवळ हेतुविद्याशास्त्र आणि स्थिरमतीजवळ शब्दविद्याशास्त्र शिकले होते. पुढे त्याने अनेक महायानी आणि हीनयानी पंथाच्या आचार्यांजवळ शिक्षण घेतले. परत शीलभद्राजवळ तो योगशास्त्र शिकला. शिवाय त्याने वेद, खगोलशास्त्र, भूमिती, गणित, वैद्यकशास्त्र इत्यादींचा अभ्यास केला आणि त्यात तो पारंगत झाला. मगधाचा राजा पूर्णवर्मा आणि शीलादित्य राजाने त्याला देऊ केलेली देणगी-जहागिरी त्याने स्वीकारली नाही. या भिक्खूजवळ दोन वर्षे राहून ह्यू-एन-त्संगने विद्या-मात्र-सिद्धी शास्त्र आणि इतर अनेक शास्त्रांचा अभ्यास केला. शिवाय त्याने योग आणि हेतुविद्याशास्त्रात आलेल्या

१. हेच ते सुप्रसिद्ध वल्लभी विश्वविद्यालय.



शंकांचे निरसन करून घेतले.

वर्षाच्या पहिल्या महिन्यात गयेतील बोधिसंघारामात असलेली त्या उपासकांच्या दर्शनासाठी ठेवली जाई म्हणून ह्यू-एन-त्संग जयसेनाबरोबर तथागताचे अवशेष पाहाण्यास गयेला गेला. नंतर शीलभद्राच्या सूचनेवरून ह्यू-एन-त्संगने सिंहरश्मीशी वादविवाद करून त्यात त्याचा पराभव केला. सिंहरश्मीने माध्यमिकांच्या ' प्रज्ञामूलशास्त्रा ' तील आणि ' शत-शास्त्रा ' तील तत्त्वप्रणालींचा पुरस्कार केला होता ; तर ह्यू एन-त्संगने योगाचाराच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. वाद संपल्यावर ह्यू-एन-त्संगने ' ह्युई-त्सुङ्ग ' नावाचा ग्रंथ लिहून असे प्रतिपादन केले की, दोन्ही तत्त्वप्रणाली एकच आहेत. त्यात फारसा मतभेद नाही. हा ग्रंथ त्याने शीलभद्राला अर्पण केला. तो शीलभद्राला खूप आवडला.

दक्षिण भारतातील एका राजाच्या पदरी एक विद्वान ब्राह्मण होता. त्याचे नाव प्रज्ञागुप्त असे होते. तो बुद्धधम्मातील सम्मतीय शाखेच्या तत्त्वज्ञानात पारंगत होता. त्याने महायान पंथाविरुद्ध ७०० श्लोकांचा एक ग्रंथ लिहिला. शीलादित्य राजा जेव्हा ओरिसा येथे गेला होता, तेव्हा त्या ब्राह्मणाने तो ग्रंथ शीलादित्य राजाला दाखविला. शीलादित्य राजाने वादविवाद करून त्या ग्रंथातील तत्त्वांचे मूल्यमापन व्हावे अशी सूचना केली आणि वादविवाद करण्यासाठी विद्वानांना पाठवून द्यावे असा खलिता नालंदा येथे शीलभद्राकडे पाठविला.

सम्राटाचा निरोप मिळाल्यावर वादविवादासाठी शीलभद्राने सागरमती प्रज्ञारश्मी, सिंहरश्मी आणि ह्यू-एन-त्संगची निवड केली. पण लगेच नंतर शीलादित्य राजाचा दुसरा खलिता आला. त्यात लिहिले होते की, माझ्या पहिल्या विनंतीप्रमाणे विद्वानांना तातडतोब पाठवून देण्याची घाई करू नये. त्यांना थांबू देत. त्यांना नंतर काही दिवसांनी पाठविले तरी चालेल.

काही दिवसांनी ' लोकातीय ' शाखेचा एक पाखंडी विद्वान नालंदा येथे वाद करण्यासाठी आला. त्याने चाळीस प्रबंध लिहून संघारामाच्या दरवाजावर लटकावले आणि अशी घोषणा केली की, जर आतील कोणाही एकाने ह्यातील तत्त्वाचे खंडन केले तर मी त्याच्या विजयासाठी माझे शिर देईन.

बरेच दिवस गेले तरी कोणीही हे आव्हान स्वीकारले नव्हते. तेव्हा ह्यू-एन-त्संगने आपल्या एका सेवकातर्फे दरवाजावर लावलेल्या त्या लिखाणाचे तासपत्र तोडून फाडून पायाखाली तुडविले. तेव्हा त्या ब्राह्मणाला राग आला. त्याने त्या सेवकाला विचारले, ' तू कोण आहेस ? ' तो सेवक म्हणाला, ' मी महायान देवाचा सेवक आहे.' ब्राह्मणाने ह्यू-एन-त्संगची कीर्ती अगोदरच ऐकली होती त्यामुळे त्याचे नाव ऐकताच तो ब्राह्मण मनात घाबरला. ह्यू-एन-त्संगने त्याला आत बोलावले आणि त्याच्याशी वादविवाद सुरू केला. वादविवादाला साक्षी म्हणून तेथील सर्व विद्वानांना बोलावण्यात आले होते. चर्चेत ह्यू-एन-त्संगने भूत, निर्ग्रंथ कापालिक, जुटीक किंवा चुडीक, सांख्य, वैशेषिक इत्यादी मतप्रणालींना खोडून काढले

आणि त्या पाखंडीचा पराभव केला पाखंडीने कबूल केले की, आपला पराभव झाला आहे आणि आपण त्याच्या शब्दाप्रमाणे वागण्यास तयार आहे. तेव्हा ह्यू-एन-त्सँग म्हणाला, 'आम्ही शाक्यपुत्र माणसाला मारावे ह्या भावनेने कधीच वागत नाही. तू आता माझा दास बन आणि माझी शिकवण घे.'

ब्राह्मणाला त्यामुळे आनंद झाला. ज्यांनी वाद ऐकला त्यांना ह्यू-एन-त्सँग-बद्दल कौतुक वाटले आणि त्यांनी त्याची तोंड भरून स्तुती केली.

आणि आता ओरिसाला वाद-विवाद करण्यास जाण्याची इच्छा झाल्यामुळे ह्यू-एन-त्सँगने महायान पंथाच्या तत्त्वांना खोडून काढणाऱ्या त्या ७०० श्लोकांच्या ग्रंथाविषयी ब्राह्मणास विचारले. तेव्हा ब्राह्मणाने सांगितले की, 'मी त्या ग्रंथाचा पाच वेळा अभ्यास केला आहे.' ह्यू-एन-त्सँग म्हणाला की, 'मला ह्या पाखंडी ग्रंथाबद्दल काहीच माहीत नाही ; तेव्हा मनात काहीही न ठेवता तू मला शिकव.' तेव्हा ब्राह्मण म्हणाला, 'आपण मध्यरात्रीपर्यंत थांबू या ! इतरांच्यासमोर मी तुला शिकविलेले चांगले दिसणार नाही.' ह्याप्रमाणे ह्यू-एन-त्सँगने त्या ब्राह्मणाकडून त्या ७०० श्लोकांचा ग्रंथ चांगला समजून घेतला. नंतर ह्यू-एन-त्सँगने त्यावर १६०० श्लोकांचा ग्रंथ लिहून पहिल्या ग्रंथातील प्रमेयांना खोडून काढले. त्याच्या नव्या ग्रंथाला त्याने 'पाखंडयांचे खंडण' असे नाव दिले.

हा ग्रंथ त्याने शीलभद्राला दाखविला. तेथील सर्व विद्वानांनी तो वाचल्यावर 'ह्यातील मुद्द्यांचे कोण खंडण करू शकेल !' असे त्यांनी उद्गार काढले. नंतर ह्यू-एन-त्सँगने ब्राह्मणाला दास्यातून मुक्त केले.

मुक्त झाल्यावर ब्राह्मणाला अतिशय आनंद झाला. तो तावडतोब कामरूपाला (आसामला) गेला आणि कुमारराजा[1] जवळ त्याने ह्यू-एन-त्सँगची मुक्त कंठाने स्तुती केली. कुमारराजाने ह्यू-एन-त्सँगची माहिती ऐकल्यावर त्याला बोलावून घेण्यासाठी तातडीने नालंदाला दूत पाठविले.

## परतीचा विचार

मध्यंतरीच्या काळात वज्र नावाचा निर्ग्रंथाचा एक विद्वान श्रमण ह्यू-एन-त्सँगला भेटला. त्याने 'ह्यू एन-त्सँग परत सुखरूपपणे स्वदेशी जाईल ; त्याला खूप मान मिळेल आणि तो आणखी दहा वर्षे जगेल' असे भविष्य सांगितले.

निर्ग्रंथांच्या (जैनांच्या) मुनीने भविष्य वर्तविल्याप्रमाणे ह्यू-एन-त्सँग आता परत चीनला जाण्याचा विचार करू लागला. नालंदाच्या भिक्खूंना हे जेव्हा समजले तेव्हा ते ह्यू-एन-त्सँगचे मन वळविण्याचा अनेक परीने प्रयत्न करू लागले. त्यात त्यांना यश आले नाही. तेव्हा ह्यू-एन-त्सँगला घेऊन ते शीलभद्राकडे गेले. शील-

१) आसामच्या भास्कर वर्मा राजाला ह्यू-एन-त्सँग कुमारराजा ह्या नावाने प्रेमाने संबोधतो.



भद्राने ह्यू-एन-त्सँगला विचारले की, त्याने परत जाण्याचा हा निर्णय का घेतला ? तेव्हा ह्यू-एन त्सँग उत्तरला, 'हा देश बुद्धांचे जन्मस्थळ आहे. तेव्हा ह्या देशाबद्दल जिव्हाळा न वाटणे ही एक अशक्य कोटीतील गोष्ट आहे. पण ह्यू-एन-त्सँगचा ह्या देशात येण्याचा उद्देश धम्मज्ञान मिळवून त्याचा फायदा आपल्या देशबांधवांना देण्याचा होता. तुम्ही एवढे महान असूनही मला योगाचार्य-भूमि-शास्त्र शिकविण्याचा आणि माझ्या शंकाकुशंकांचे समाधान करण्याचा माझ्यावर अनुग्रह केलात. आपल्या धम्माच्या पवित्र धम्मस्थळांचे मी दर्शन घेतले आणि धम्माच्या निरनिराळ्या शास्त्रांच्या तत्त्वज्ञानाचे विवरण अनेक विद्वानांकडून ऐकले. त्यामुळे माझा खूप फायदा झाला आहे आणि मला अतिशय आनंद वाटत आहे. आता परत जाऊन भाषांतरे करावीत आणि मी ऐकले ते लोकांना समजावून सांगावे, म्हणजे हे ज्ञान मिळाल्यामुळे तेसुद्धा माझ्याप्रमाणेच तुमचे उपकृत होतील. ह्या कारणासाठी परत जाण्यात आता विलंब करू नये असे मला वाटते.'

शीलभद्र आनंदित होऊन म्हणाला, 'हे बोधिसत्त्वाला शोभतील असे विचार आहेत. तुझी इच्छा पूर्ण होईल असे मला वाटते. तुझ्या परतीच्या प्रवासाच्या तयारीसंबंधी मी तजवीज करण्यास सांगतो.'

पण यानंतर दोन दिवसांनीच कामरूपाच्या (आसामच्या) कुमारराजाच्या (भास्कर वर्माच्या) दूतांनी येऊन शीलभद्राला एक खलिता दिला. त्यात लिहिले होते की, 'चीनहून आलेल्या महान भिक्खूला पाहाण्याची तुमच्या शिष्याची इच्छा आहे. तरी त्याला इकडे पाठवून देण्याची कृपा करावी.'

हे पत्र वाचून शीलभद्र भिक्खूसंघाला म्हणाला, 'कुमारराजाने ह्यू-एन-त्सँगला आमंत्रण दिले आहे. पण हीनयान पंथीयांशी चर्चा करण्यासाठी शीलादित्य राजाकडे जाण्यास त्याला प्रवृत्त करण्याचे आपण अगोदरच कबूल केले आहे. ह्यू-एन-त्सँग कुमारराजाकडे गेला आणि शीलादित्य राजाने ह्यू-एन-त्सँगबद्दल विचारले, तर ह्यू-एन-त्सँगला शीलादित्य राजाकडे आपण कसे पाठवू शकू ? तेव्हा कुमारराजाकडे त्याला न पाठविलेलेच बरे' असा विचार करून शीलभद्राने राजदूतांतर्फे असा निरोप पाठविला की, 'चीनचा भिक्खू आपल्या देशाला परत जाण्यासाठी उतावीळ झाला आहे. म्हणून राजाची इच्छापूर्ती करता येणे शक्य नाही.'

हा निरोप वाचल्यावर कुमारराजाने शीलभद्राकडे परत निरोप पाठविला की, 'जरी चीनचा भिक्खू परत जाण्यास उत्सुक असला तरी थोड्या दिवसांकरिता त्याला तुमच्या शिष्याकडे पाठवून द्यावे. त्याच्या परत जाण्यासंबंधी काहीच अडचण येणार नाही. ही माझी नम्र विनंती तुम्ही मान्य करा आणि त्याला पाठविण्याचे नाकारू नका.'

शीलभद्राने राजाचा प्रस्ताव मान्य केला नाही. तेव्हा राजाला राग येऊन त्याने खालील मसुद्याचा खलिता शीलभद्राला व्यक्तिगत पाठविला.

'तुमचा शिष्य सामान्य माणसाप्रमाणे ऐहिक सुखात पडल्यामुळे बुद्धधम्मात

असलेली हृदयपरिवर्तनाची शक्ती अजूनही त्यांच्यात आलेली नाही. मी जेव्हा ह्या परदेशी भिक्खूबद्दल ऐकले, तेव्हा आता माझ्यातील धम्मभावनेचा लवकरच विकास होईल असे वाटून माझे मन पुलकीत झाले. पण जगाने अज्ञानाच्या अंधकारात नेहमीच राहावे, अशी जणू काही तुमची इच्छा आहे, म्हणून तुम्ही त्याला इकडे पाठविण्याचे नाकारले. सर्व जगाला निर्वाण प्राप्त करून देण्याची हीच तुमची रीत आहे काय ? गुरूबद्दल स्वाभाविकपणे असलेला आदर दाखविण्याठी आणि गुरू-प्रेमामुळे मी आपणाकडे परत हा विनंतीचा खलिता दूतांतर्फे पाठवीत आहे. तो जर आला नाही, तर तुमचा शिष्य स्वत:च्या दुष्ट प्रवृत्तींना मोकळीक देईल. अली-कडेच शशांकराजाने बुद्धधम्माचा नाश केला आहे आणि बोधिवृक्ष मुळांपासून उपटून काढला आहे. तुमच्या शिष्याकडे अशी ताकद नाही असे माझ्या गुरूंना वाटते काय ? जर आवश्यक असेल तर मी माझ्या सैन्याला आणि हत्तींना तयार करीन आणि तुफानाप्रमाणे येऊन त्या नालंदा संघारामाचा शेवटच्या कणापर्यंत विध्वंस करीन. ह्याचा विचार करून योग्य पावले टाकणे तुम्हाला हितावह आहे.'

## कामरूप देशात

हे पत्र वाचल्यावर शीलभद्र ह्यू–एन–त्सँगला म्हणाला, 'तो राजा शीलवान आहे. पण त्याचे मन कोवळे आहे. त्याच्या राज्यत बुद्धधम्म फार दूरवर पसरलेला नाही. जेव्हापासून त्याने तुझे नाव ऐकले आहे तेव्हापासून त्याला तुझ्याबद्दल आत्मीयता वाटू लागली आहे. कदाचित ह्या जन्मात तू त्याचा जिवलग मित्र व्हावेस असे वाटते. तेव्हा तू नीट विचार कर आणि जा. जगाच्या कल्याणासाठी तू भिक्खू बनला आहेस. कदाचित तुला मिळालेली ही एक अत्युत्तम संधी असेल. ज्याप्रमाणे झाडाचे खोड तोडले की, फांद्या आपोआप खाली पडतात, त्याप्रमाणे त्या देशात गेल्यावर तू फक्त राजाच्या मनाचा धम्माच्या दिशेने विकास कर, म्हणजे प्रजेला आपोआप धम्माची गोडी लागेल. तू जर गेला नाहीस तर कदाचित मोठे अरिष्ट येईल. तेव्हा हा थोडासा त्रास घेण्यास तू मागे पुढे पाहू नकोस.'

शीलभद्राच्या ह्या उपदेशानंतर ह्यू–एन–त्सँग राजदूताबरोबर कामरूपला गेला. त्याला पाहून राजाला अतिशय आनंद झाला. आपल्या मंत्र्यांच्या समवेत त्याने त्याचा आदरपूर्वक स्वागत–समारंभ केला आणि नंतर त्याला आपल्या राजवाड्यात घेऊन गेला. कुमारराजाने ह्यू–एन–त्सँगसाठी दररोज संगीत आणि मेजवाणीचा बेत केला. ह्याप्रमाणे एक महिन्यापेक्षा जास्त काल गेला. दरम्यान 'कांगयोधा'वर स्वारी करून परत आल्यावर शीलादित्य राजाला ह्यू–एन–त्सँग कुमारराजाकडे आहे ह्याची माहिती मिळाली तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, 'मी त्याला (ह्यू–एन–त्सँगला) अनेक आमंत्रणे पाठवूनसुद्धा तो इकडे आला नाही. मग तो आता तिकडे कसा गेला आहे?' तेव्हा, शीलादित्य राजाने 'ताबडतोब चीनच्या भिक्खूला पाठवून देण्याची कृपा करावी' अशी दूतांतर्फे



कुमारराजाला विनंती केली.

त्यावर कुमारराजाने उत्तर दिले, माझे शिर घेऊ शकता; पण तूर्त ह्यू–एन–त्सँगला पाठविता येत नाही.' कुमारराजाकडून हे उत्तर मिळाल्यावर शीला-दित्य राजाला फार राग आला. तो आपल्या अधिकाऱ्यांना म्हणाला, 'कुमारराजा मला तुच्छतेने पाहतो आहे. केवळ एका भिक्खूसाठी तो अशी उद्धट भाषा कशी वापरू शकतो?' रागाच्या भरात त्याने एका दूतातर्फे कुमारराजाला निरोप पाठ-विला, 'ताबडतोब शिर पाठव. मला ते लवकर मिळावे म्हणून ते आणण्यासाठी हा दूत पाठविला आहे.'

आपण शीलादित्य राजाला पाठविलेल्या निरोपात त्यातील मूर्खपणाच्या भाषेविषयी कुमारराजाला आता चिंता वाटू लागली. त्याने आपल्या सैन्याला तयार केले. २०,००० हत्ती आणि ३०,००० बोटी सैन्यासह गंगानदीच्या मार्गाने तो ह्यू–एन–त्सँगला घेऊन, शीलादित्य राजाने जेथे छावणी टाकली होती तिकडे निघाला. जेव्हा तो काजूरगीर येथे आला, तेव्हा त्याने आपल्या अधिकाऱ्यांशी सल्लामसलत केली. नंतर गंगानदीच्या उत्तर किनाऱ्यावर एका तंबूत ह्यू–एन–त्सँगला ठेवून तो आपल्या मंत्र्यांसमवेत शीलादित्य राजाच्या भेटीस गेला. त्याला पाहून शीलादित्य राजाला फार आनंद झाला. कुमारराजाला ह्यू–एन–त्सँगबद्दल वाटणारे प्रेम माहीत असल्यामुळे, शीलादित्याने पहिल्यासारखी धमकावणीची भाषा वापरली नाही. पण फक्त चीनचा भिक्खू कोठे आहे, अशी चौकशी केली. तेव्हा कुमारराजाने सांगितले की, तो एका तंबूत विश्रांती घेत आहे. तेव्हा शीलादित्याने विचारले, 'तो तुमच्याबरोबर का आला नाही?'

कुमारराजाने उत्तर दिले, 'महाराज सद्‌गुणांचे चाहते आहेत. त्यांना धम्मा-बद्दल प्रेम आहे. तेव्हा त्यांनी त्याला भेटीसाठी आमंत्रण पाठविल्यास बरे होईल.'

शीलादित्य म्हणाला, 'ते ठीक आहे. आता तुम्ही तुमच्या छावणीत परत जाऊ शकता. उद्या मी स्वत: तिकडे येईन.' कुमारराजा परत गेल्यावर तो ह्यू–एन–त्सँगला म्हणाला, 'जरी राजा 'उद्या येईन' असे म्हणाला असला तरी तो आज रात्रीच येईल अशी मला शंका वाटते.'

रात्रीच्या पहिल्या प्रहरी शीलादित्य राजा खरोखरच आला. कुमारराजाच्या माणसांनी कुमारराजाला सांगितले की नदीवर हजारो मशाली पेटल्या आहेत आणि ढोलांचे आवाज ऐकू येत आहेत. कुमारराजाने ताबडतोब आपल्या माणसांना मशाली पेटविण्यास सांगितले आणि तो स्वत: आपल्या मंत्र्याना बरोबर घेऊन शीलादित्याच्या भेटीला पुढे गेला. शीलादित्य राजा जेव्हा कोठेही जात असे, तेव्हा त्याच्याबरोबर ढोल वाजविणारी माणसे असत. शीलादित्याच्या प्रत्येक पावलाच्या गतीने ती ढोलावर ठेका धरीत असत.[1] फक्त शीलादित्य राजासाठी

---

१. ही प्रथा जपानी बुद्धसंघामध्ये अजूनही आहे.

ही प्रथा होती. इतर राजांना तशी मुभा नव्हती. ह्यू-एन-त्सँगजवळ आल्यावर शीलादित्य राजाने ह्यू-एन-त्सँगपुढे गुडघे टेकून, पायावर फुले अर्पण करून, त्याला वंदन केले. नंतर अनेक श्लोकांत[1] ह्यू-त्सँगची स्तुती करून त्याला विचारले, 'तुमच्या शिष्याने तुम्हाला अनेक वेळा आमंत्रणे पाठविली होती. त्या विनंतीप्रमाणे तुम्ही का आला नाहीत?'

ह्यू-एन-त्सँग उत्तरला, 'ह्यू-एन-त्सँग फार दूरच्या देशांवरून बुद्धधम्मासाठी आणि योगभूमि-शास्त्र शिकण्यासाठी आला आहे. जेव्हा तुमची आज्ञा मिळाली, तेव्हा शास्त्रांचा माझा अभ्यास पूर्ण झाला नव्हता आणि म्हणूनच राजाज्ञेचे पालन मी करू शकलो नाही.'

राजाने परत विचारले, 'आपण चीन देशाहून आला आहात. चीनच्या एका राजाची स्तुती काव्यातून आणि नाटक-संगीत-नृत्य इत्यादि माध्यमांतून केली जाते असे तुमच्या शिष्याने ऐकले आहेत. हा चीनचा राजा कोणता? आणि ह्या स्तुतीत पात्र होण्यासाठी त्याने काय सत्कृत्ये केली, हे अजूनही मला कळाले नाही.'

ह्यू-एन-त्सँगने उत्तर दिले, 'आमच्या पूर्वीच्या सम्राटांचा चीन हा देश आहे. पूर्वी आमच्या सम्राटाला वंशपरंपरागत सिंहासनावर बसण्यापूर्वी त्सीन देशाचा सम्राट म्हणत असत. पण आता त्याला स्वर्गीय सम्राट असे म्हणतात. मागच्या वंशाच्या शेवटच्या सम्राटाचा अंत झाल्यावर लोकांना संरक्षणकर्ता राजा नव्हता. देशात बंडाळी माजली होती. सर्वत्र अंदाधुंदी चालू असल्याने अनेक निरुपद्रवी माणसांची हत्या चालली होती. तेव्हा, त्सीनच्या सम्राटाने त्याच्या असामान्य शक्तींच्या साहाय्याने मैत्री आणि करुणेने प्रेरित होऊन राज्यात सुव्यवस्था आणली आणि दुष्टांना शिक्षा केली. त्यामुळे आठ राज्यात शांतता नांदू लागली आणि दहा हजार राजांनी त्याचे मांडलिकत्व पत्करले. त्याने त्रिरत्नांना शरण जाऊन सहृदयतेने सर्व प्राणिमात्रांची काळजी घेतली. त्याने प्रजेवरील करांचा बोजा कमी केला. गुन्हेगारांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेत सौम्यपणा आणला. त्यामुळे प्रजेला सुख आणि शांती मिळाली. त्याने केलेल्या सर्व सत्कृत्यांचा पाढा वाचणे शक्य नाही.'

शीलादित्य, 'फारच उत्तम! अशा धार्मिक सम्राटाची प्रजा सुखी असणारच. बरे; आता तुमच्या शिष्याला परत गेले पाहिजे. उद्या आपणास आणण्यासाठी मी माणसे पाठवीन. त्या वेळी आपण थकलेले नसाल अशी मला आशा आहे.'

अशा प्रकारे ह्यू-एन-त्सँगचा निरोप घेऊन शीलादित्य राजा आपल्या तंबूकडे परत गेला.

दुसऱ्या दिवशी दूत आणि कुमारराजाबरोबर ह्यू-एन-त्सँग शीलादित्याच्या

१. शीलादित्य राजा स्वत: प्रतिभावान कवी होता. त्याने दोन-तीन काव्यात्मक नाटके लिहिली आहेत.



छावणीकडे गेला. शीलादित्य राजाचा तंबू म्हणजे फिरत्या राजवाड्यासारखा होता. त्या राजवाड्याजवळ पोहोचताच ह्यू-एन-त्सँगचे स्वागत करण्यासाठी वीस सेवकांबरोबर सम्राट स्वत: बाहेर आला. आत गेल्यावर थोडा फलाहार झाला. तो चालू असताना मधुर संगीत चालू होते. सर्वत्र फुले विखुरलेली होती. फलाहारानंतर सम्राटाने ह्यू-एन-त्सँगला विचारले, 'मी असे ऐकले आहे की, दुसऱ्यांची मते खोडून काढण्यासाठी आपण एक ग्रंथ लिहिला आहे. तो कोठे आहे?'

ह्यू-एन-त्सँगने ग्रंथ दिल्यावर सम्राटाने त्याचे नीट निरीक्षण केले. ग्रंथ पाहून आनंदित होऊन सम्राट उपस्थित असलेल्या मानकऱ्यांना म्हणाला, 'मी असे ऐकले आहे की, जेव्हा सूर्योदय होतो, तेव्हा काजव्यांच्या प्रकाशाचा लोप होतो आणि जेव्हा आकाशात गडगडाट होतो, तेव्हा चिनी हातोड्याचा आवाज ऐकू येत नाही. त्याचप्रमाणे ह्यू-एन-त्सँग ज्या तत्त्वांचा पुरस्कार करीत आहे, त्याच्यापुढे दुसऱ्या तत्त्वप्रणालींचा प्रभाव पडत नाही. त्याच्याविरुद्ध एकही शब्द काढण्यास विद्वान धजत नाहीत.'

सम्राटाला एक अत्यंत बुद्धिमान बहीण (राजश्री) होती. ती सम्मतीय शाखेच्या तत्त्वज्ञानात प्रवीण होती. ती सम्राटाच्या पाठीमागे बसली. तिने ह्यू-एन-त्सँगला जेव्हा महायान पंथाच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करताना ऐकले, तेव्हा तिला इतका आनंद झाला की, तिने ह्यू-एन-त्सँगची मुक्त कंठाने स्तुती केली.

त्याच दिवशी सम्राटाने ह्यू-एन-त्सँगच्या ग्रंथावर चर्चा करण्यासाठी सर्व विद्वानांना आमंत्रण पाठवून कान्यकुब्जमध्ये धम्मसभेसाठी बोलाविले. नंतर हिवाळ्याच्या सुरुवातीला गंगानदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला प्रवास करून ह्यू-एन-त्सँग सम्राटाबरोबर नव्वद दिवसांनी कान्यकुब्ज येथे पोहोचला. तेथे भारतातील अठरा देशांचे राजे, हीनयान आणि महायान पंथाचे तीन हजार भिक्खू, शिवाय तीन हजार ब्राह्मण आणि निर्ग्रंथांचे विद्वान आले होते. त्यांच्याशिवाय नालंदा विश्वविद्यालयातून साधारणपणे एक हजार विद्वान भिक्खू आले होते, तेथे जमलेले सर्व विद्वान आपापल्या परीने साहित्यात, तत्त्वचिंतनात आणि वादविवाद करण्यात प्रसिद्ध होते. त्यांच्याबरोबर त्यांचे अनुयायीसुद्धा आले होते. काही हत्तीवर बसून आले होते; तर काही रथातून, काही पालखीतून काही चांदव्यातून आले होते. वसंतऋतूचा हा दुसरा महिना होता.

सम्राटाने पूर्वीच दोन मंडप बांधण्यास सांगितले होते. एक बुद्धरूपासाठी आणि दुसरा सभेसाठी. ते मंडप सुंदर, तसेच एक हजार माणसे सहज बसू शकतील इतके विशाल होते. मंडपांपासून सम्राटाची छावणी साधारणपणे पाच ली अंतरावर होती. ह्या छावणीत त्याने सोन्याचे बुद्धरूप ठेवले होते. सम्राटाच्या छावणीपासून मोठ्या मंडपापर्यंत सुशोभित केलेले अनेक मंडप होते, त्यातून संगीतकार निरनिराळ्या वाद्यांच्या साहाय्याने कर्णमधुर सूर काढीत होते. एका मोठ्या हत्तीला सजवून त्याच्यावर रत्नजडित अंबारी ठेवली गेली. नंतर त्या अंबारीत

शीलादित्य राजा स्वतः शक्रासारखा पेहेराव करून बुद्धरूपाला ठेवण्यात आले. कुमारराजा स्वतः ब्रह्मराजासारखा पेहेराव करून आणि हातात चौरी घेऊन आणि हातात छत्र धरून बुद्धरूप असलेल्या हत्तीच्या अनुक्रमे उजव्या आणि डाव्या बाजूने हत्तीवर बसून निघाले. त्या दोघांनी देवांसारखे राजमुकुट, फुले आणि रत्नजडित रेशमी फिता परिधान केल्या होत्या. प्रत्येक पावलागणिक ते बुद्धरूपावर फुले उधळीत होते. ह्यू-एन-त्संग, इतर राजे, त्यांचे मंत्री आणि निरनिराळ्या पंथांचे मुख्य धम्मगुरु ह्यांचे तीनशे हत्ती त्यांच्यामागून चालले होते. ही मिरवणूक सकाळीच निघाली होती. मंडपाजवळ आल्यावर सर्वजण खाली उतरले आणि बुद्धरूपाला मंडपात नेण्यात आले.

सम्राटाने बुद्धरूपापुढे सुवर्णपात्रे, सुवर्णदंड, तीन हजार सुवर्ण नाणी आणि फुले अर्पण केल्यावर इतरांनी आपापल्या कुवतीप्रमाणे बुद्धरूपाला आदरांजली वाहिली. नंतर सम्राटाने ह्यू-एन-त्सँगला आपल्याजवळ आसनावर बसवून चर्चेचा विषय नमूद केला. नालंदातील 'मिङग-हैन' नावाच्या श्रमणाला ह्यू-एन-त्सँगचा ग्रंथ सर्वांस दाखविण्यास सांगितले. नंतर मंडपाच्या बाहेरील दरवाजावर खालील अर्थाचा फलक लावण्यात आला.

'ह्या ग्रंथातील एक शब्दही शहाणपणाचा नाही (चुकीचा आहे), असे जर कोणी दाखवून दिले किंवा ह्या ग्रंथातील मुद्यासंबंधी वादविवाद करून लेखकाचा जर कोणी पराभव केला तर, प्रतिवादीच्या इच्छेप्रमाणे मी माझे शिर बक्षीस देईन.'

त्या रात्रीपर्यंत वाद करण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. त्यामुळे शीलादित्य राजाला आनंद झाला आणि त्या दिवशीची सभा त्याने बरखास्त केली.

दुसऱ्या दिवशीही पहिल्याप्रमाणेच बुद्धरूपाला मिरवणुकीतून नेण्यात आले. पाचव्या दिवसापर्यंत ह्यू-एन-त्सँगशी वादविवाद करण्यासाठी कोणीच पुढे आले नाही. पण सम्राटाला ह्यू-एन-त्सँगची हत्या करण्याच्या कटाची माहिती मिळाली, तेव्हा त्याने, 'जर कोणी ह्यू-एन-त्सँगच्या शरीराला इजा करण्याचा प्रयत्न केला, तर ताबडतोब त्याचे मुंडके उडविले जाईल आणि कोणी त्याच्याविरुद्ध बोलले, तर त्याची जीभ छाटली जाईल. पण त्याच्याशी वादविवाद करणाऱ्याला किंवा धम्मसभेत भाग घेणाऱ्याला भिण्याचे काहीच कारण नाही' असे फर्मान काढले.

अठरा दिवस सभेत चर्चासत्र चालले होते. त्या काळात ह्यू-एन-त्सँगशी वादविवाद करण्यास कोणीही पुढे आले नाही. तेव्हा शीलादित्य राजाने ह्यू-एन-त्सँगला अत्यंत आदराने १०,००० सुवर्ण नाणी, ३०,००० चांदीची नाणी आणि १०० किमती चीवरे अर्पण केली, त्याचप्रमाणे जमलेल्या इतर राजांनी त्याला मौल्यवान जवाहीर अर्पण केले. पण ह्यू-एन-त्सँगने त्यातले काहीच घेतले नाही. ह्यू-एन-त्सँगची इच्छा नसतानासुद्धा त्याची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली ही प्रथा भारतात असल्यामुळेच ह्यू-एन-त्सँगला शीलादित्य राजाच्या आणि इतरांच्या आग्रहाला मान द्यावा लागला. महायान पंथाच्या उपासकांनी त्याला 'महायानदेव'



अशी पदवी दिली तर हीनयान पंथाच्या उपासकांनी त्याला 'मोक्षदेव'[1] अशी पदवी दिली.

अठराव्या दिवशी रात्री मंडपाला आग लागली आणि आगीत एक मंडप भस्मसात झाला. दुसऱ्या मंडपाकडे आग फैलावू लागली तेव्हा सम्राट म्हणाला, 'मी माझ्या देशाची संपत्ती दानधर्मात दिली आहे आणि पूर्वीच्या राजांचे अनुकरण करून, कुशल कर्मे करून माझी आध्यात्मिक उन्नत्ती साधण्याचा प्रयत्न केला आहे. पण माझ्या अपुऱ्या प्रयत्नांना फळ येत नाही. अशा संकटांमुळे जीवनात काही अर्थ उरला नाही.' नंतर जळती अगरबत्ती हातात घेऊन तो म्हणाला, 'माझ्या पूर्वीच्या सत्कर्मांमुळे मी जम्बुद्धीपावर राज्य करीत आहे. माझ्या सत्कर्मांचे फळ म्हणून ह्या अग्नीचा नाश होऊ दे. नाहीतर मला मरू दे.' असे म्हणून तो दरवाजाच्या दिशेने निघाला आणि त्याच वेळेला आग विझली.

हे दृश्य पाहून तेथे जमलेल्या मांडलिक राजांचा सम्राटाविषयीचा आदर आणखीच वाढला. तेव्हा सम्राट म्हणाला, 'ह्या घटनेमुळे तथागतांच्या वचनाच्या सत्यतेची कमीत कमी जाणीव तरी होते. पाखंडी आणि इतर लोक वस्तुमात्रांच्या नित्यतेबद्दल ठामपणे बोलत असतात. पण आपल्या धम्मगुरूंच्या शिकवणीप्रमाणे चराचर प्राणिमात्र अनित्य आहेत. माझ्या हेतूप्रमाणे माझे धार्मिक कार्य झाले आहे. ह्या विध्वंसामुळे तथागतांच्या शिकवणीवरचा माझा विश्वास द्विगुणित झाला आहे. ह्यामुळे मला खूप आनंद होत आहे. दुःख होत नाही.'

नंतर राजांच्या समवेत तो पूर्वेकडे गेला आणि स्तूपावर चढला. वर चढल्यानंतर त्याने चौफेर पाहिले. परत पायऱ्या उतरत खाली येत असता एका पाखंडी माणसाने खंजीराने त्याच्यावर हल्ला केला. ह्या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सम्राट प्रथम दचकला. पण झटकन थोड्या पायऱ्या वर चढून आणि खाली वाकून त्याने हल्लेखोराला पकडले. ह्या एकदम झालेल्या हल्ल्याने तेथे असलेले इतर लोक इतके घाबरून गेले होते की, सम्राटाच्या मदतीला कसे जावे हेसुद्धा त्यांना समजले नाही.

हल्लेखोराला तात्काळ मारावे अशी राजेलोकांची इच्छा होती. पण शीलादित्य राजाने भीतीचा लवलेशही न दाखविता आणि आपल्या चेहेऱ्यावरचे भाव न बदलता तसे न करण्याविषयी त्यांना सांगितले आणि स्वतः हल्लेखोराला विचारले, 'मी तुला काय त्रास दिला होता म्हणून असे कृत्य करण्यास तू प्रवृत्त झालास?' हल्लेखोर उत्तरला, 'महाराजाधिराज, आपण कोणाविषयीही पक्षपात केला नाही. साम्राज्यातील आणि बाहेरील प्रजा सुखी आहे. मी स्वत. मूर्ख आणि बेअक्कल आहे. माझ्याच्याने कोणतीच मोठी गोष्ट घडली नाही. पाखंडी लोकांनी केलेल्या माझ्या

---

१. सॅम्यूअल बीलने आपल्या इंग्रजी भाषांतरात 'मोक्षदेव' हाच शब्द वापरला आहे.

स्तुतीमुळे मला भुरळ पडली आणि त्यांच्या आग्रहाला मी बळी पडलो. मी राजद्रोह केला आहे.'

सम्राटाने विचारले, पण पाखंडी लोकांनी हा दुष्ट कट करण्याचे कारण काय?' हल्लेखोराने उत्तर दिले, 'महाराज, तुम्ही देशोदेशींच्या लोकांना बोलाविले. श्रमणांना दानधर्म करण्यात आपला सगळा खजिना घालविला. बुद्धाची सोन्याची मूर्ती बनविली. पण लांबून आलेल्या पाखंडी लोकांकडे क्वचितच लक्ष दिले गेले. त्यामुळे त्यांची मने कलुषित झाली आणि त्यांनी माझ्यासारख्या हलकट माणसाला हे कृत्य करण्यास गळ घातली.'

सम्राटाने नंतर प्रत्यक्षपणे पाखंडी लोकांना आणि त्यांच्या अनुयायांना विचारले. त्या ठिकाणी ५०० प्रख्यात ब्राह्मण होते. सम्राटाने भिक्खूंचा फार आदर केल्यामुळे त्यांच्या मनात मत्सर उत्पन्न झाला होता. जळत्या बाणांच्या साहाय्याने त्यांनी मंडपाला आग लावली होती. त्यांची अशी योजना होती की, आगीपासून बचाव करण्यासाठी धावपळ सुरू होऊन गोंधळ माजला की त्या गोंधळाचा फायदा घेऊन राजाचा खून करावयाचा. तो प्रयत्न असफल झाल्यामुळे ह्या माणसाला त्यांनी लाच दिली. त्याने एका अरुंद रस्त्याजवळ दबा धरून राहून सम्राट जवळ येताच मोका साधून त्याचा खून करायचा असा त्यांचा कट होता.

राजमंत्र्यांनी आणि मांडलिक राजांनी तेथे जमलेल्या पाखंडी लोकांना नष्ट करावे असा सल्ला सम्राटाला दिला. सम्राटाने पाखंडी लोकांच्या म्होरक्यांना शिक्षा दिली आणि बाकीच्यांना क्षमा केली. तेथे जमलेल्या ५०० ब्राह्मणांना हद्दपार केले. सर्व गोष्टींची निरवानिरव झाल्यावर सम्राट परत राजधानीत गेला.

## प्रयागची महामोक्ष परिषद

दुसऱ्या दिवशी स्वदेशी परत जाण्याची परवानगी घेण्यासाठी ह्यू–एन–त्सँग सम्राटाकडे गेला. तेव्हा दर पाच वर्षांनी प्रयाग येथे करीत असलेल्या दानधर्माची[1] माहिती सम्राटाने त्याला दिली. सम्राटाला गादीवर बसून आता तीस वर्षे झाली होती. आतापर्यंत पाच महामोक्ष परिषदा झाल्या आहेत आणि सहावा समारंभ आता लवकरच होणार आहे, अशी माहिती देऊन ह्यू–एन–त्सँगने तो समारंभ पाहाण्यासाठी थांबावे अशी त्याला विनंती केली. सम्राटाच्या सूचनेवरून ह्यू–एन-त्सँग सम्राटाबरोबर प्रयागला गेला.

ह्यू-एन-त्सँग म्हणतो, 'महामोक्ष परिषद जेथे भरते ते पटांगण दोन नद्यांच्या मध्ये संगमाजवळ आहे. उत्तरेला गंगा नदी असून दक्षिणेला यमुना नदी आहे. हे मैदान चौदा–पंधरा ली परिघाचे असून अगदी सपाट आहे. येथे दान दिल्याने पुण्य

१. सम्राट हर्षवर्धन प्रयाग येथे दर पाच वर्षांनी करीत असलेल्या दानधर्माच्या समारंभाला 'महामोक्ष परिषद' असे म्हटले जाते.



लागते अशी फार पूर्वीपासून समजूत आहे. तेथे सम्राटाने प्रत्येक बाजू एक हजार पावले लांब असलेला एक चौरस मंडप बांधविला. त्यामध्ये सोने, चांदी, मोती, लाल, इन्द्रमणी, नीलमणी इत्यादींनी भरलेला खजिना ठेवण्यासाठी खोल्या बांधल्या गेल्या. रेशमी आणि सुती कापड, तसेच सुवर्ण आणि चांदीची नाणी ठेवण्यासाठी दुसऱ्या खोल्या बांधण्यात आल्या. मंडपाच्या बाहेर भोजनालयाची जागा आणि एक हजार माणसे राहू शकतील एवढी मोठी धर्मशाळा बांधण्यात आली.

मोक्षासाठी भारतातील निरनिराळ्या प्रदेशांतून श्रमण, निर्ग्रंथ, पाखंडी, गरीब, निराश्रित, परित्यक्त आणि दुःखी लोकांना दान घेण्यासाठी येण्याबद्दल सूचना देण्यात आली होती. तेथे अंदाजे ५,००,००० लोक जमले होते.

शीलादित्य राजाने गंगा नदीच्या उत्तरेला, दक्षिणेच्या[1] ध्रुवभट्ट राजाने संगमाच्या पश्चिमेला आणि कुमारराजाने यमुनेच्या दक्षिणेला अशा आपल्या छावण्या लावल्या होत्या.

पहिल्या दिवशी त्यांनी बुद्धरूपाची प्रतिष्ठापना करून दान केले. दुसऱ्या दिवशी अदित्य देवाची प्रतिष्ठापना करून दान केले. तिसऱ्या दिवशी ईश्वर देवाची प्रतिष्ठापना करून दान दिले गेले. चौथ्या दिवशी १०,००० भिक्खूंना दान देण्यात आले. त्यांच्या शंभर रांगा लावण्यात आल्या होत्या. प्रत्येकाला शंभर सुवर्ण नाणी, एक मोती, चीवर आणि भोजन दान देण्यात आले.

पाचव्या पाळीच्या वेळी ब्राह्मणांना दान देण्यात आले. ते सतत वीस दिवस चालू होते. सहावी पाळी पाखंडी लोकांची होती. त्यांना दहा दिवसांपर्यंत दान देण्यात आले. नंतर दान मागण्याच्या इच्छेने जे लांबून आले होते त्यांची पाळी आली. त्यांना सतत दहा दिवस दान देण्यात आले. आठवी पाळी गरीब दीन-दुबळ्यांची आली. त्यांना सतत एक महिना दान देण्यात आले.

अशा तऱ्हेने ह्या दानसत्रात पाच वर्षांत जमा झालेली सर्व संपत्ती संपली. हत्ती, घोडे आणि सैनिकांची आयुधे-जी राज्यात सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक आहेत-अशा गोष्टी सोडून बाकी काहीच राहिले नाही. सम्राटाने आपल्या अंगावरची आभूषणे, जडजवाहीर, गळ्यातल्या माळा, कानांतील बाळ्या, बाजूबंद, राजमुकुटातील रत्ने, कपडे, वगैरे सर्व काही दानात देऊन टाकले. नंतर त्याने आपल्या बहिणीला एक साधे जुने वस्त्र मागितले. ते परिधान करून त्याने बुद्धाची पूजा केली तो म्हणाला, 'ह्या सर्व संपत्तीचा आणि खजिन्याचा साठा करताना तो सुरक्षित नाही, अशी मला भीती वाटत असे. पण ती सर्व संपत्ती आता दानधर्मात दिल्यामुळे तिचा योग्य विनियोग झाला आहे असे मला वाटते. भविष्यातही मानवाच्या कल्याणासाठी अशा तऱ्हेने दान देण्यात माझ्या संपत्तीचा उपयोग होवो आणि मला दशबलाची (बुद्धाची) शक्ती प्राप्त होवो.'

१. गुजरातमधील वलभी.

हे दोन भव्य समारंभ संपल्यावर तेथे जमलेल्या राजांनी आपले द्रव्य देऊन सम्राटाची आभूषणे, शिरस्त्राण, राजदरबारी पोशाख वगैरे विकत घेऊन ते सम्राटाला दिले.

ह्यू-एन-त्सँगने आता पुन्हा सम्राटाकडे स्वदेशी जाण्याची परवानगी मागितली. तेव्हा आणखी काही दिवस थांबावे असा शीलादित्याने आग्रह केला. कुमारराजाला ह्यू-एन त्सँगबद्दल फारच आदर वाटत होता. तो म्हणाला, 'जर माझ्या राज्यात आपण राहिलात आणि माझे धम्मदान स्वीकारलेत, तर मी आपल्यासाठी शंभर संघाराम बांधीन.' ह्यू-एन-त्सँग परत जाण्यासाठी आता फारच आतूर झाला होता. आणखी दहा दिवस राहून त्याने पुन्हा परत जाण्याचा विषय सम्राटाकडे काढला. पहिल्यांदा आणखी काही दिवस राहाण्याचा आग्रह सम्राटाने केला. पण जेव्हा त्याने पाहिले की, आता आणखी राहाण्यास ह्यू-एन-त्सँग तयार नाही, तेव्हा त्याने ह्यू-एन-त्सँगला विचारले, 'तुम्ही कोणत्या मार्गाने जाण्याची इच्छा करीत आहात. समुद्रमार्गाने जाण्याची इच्छा असेल तर मी माझ्या सेवकांना तुम्हा-बरोबर येण्याची आज्ञा देतो.' ह्यावर ह्यू-एन-त्सँगने उत्तरेच्या मार्गाने जाण्याची इच्छा प्रदर्शित केली.

मग सम्राट म्हणाला, 'आपणास कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे?'

ह्यू–एन–त्सँग उत्तरला, 'मला काहीही नको.'

सम्राट म्हणाला, 'अशा तऱ्हेने आपणास जाऊ देता येणार नाही.'

नंतर सम्राटाने आणि कुमारराजाने सुवर्ण नाणी आणि इतर गोष्टी देऊ केल्या. पण ह्यू-एन-त्सँगने त्यातले काहीही घेतले नाही. फक्त कुमारराजाकडून पावसापासून संरक्षण करण्यास योग्य असा एक कातडी कोट घेतला. अशा तऱ्हेने ह्यू-एन-त्सँगने सम्राट हर्षाचा आणि भास्करवर्माचा निरोप घेतला. त्याला निरोप देण्यासाठी ते दोघे ह्यू-एन-त्सँगबरोबरच बरेच अंतर चालून गेले. ह्यू एन-त्सँगने बरोबर घेतलेले ग्रंथ आणि मूर्ती यांचे संरक्षण करण्यासाठी उत्तरेकडील देशाच्या उधीत नावाच्या राजाने आपले सैनिक ह्यू-एन-त्सँगच्या बरोबर दिले होते. प्रवासाची गती हळूहळू चालली होती. म्हणून शीलादित्य राजाने नंतर उधीत राजाच्या सैनिकांबरोबर एक मोठा हत्ती आणि मार्गात खर्चासाठी म्हणून ३,००० सुवर्ण नाणी आणि १०,००० चांदीची नाणी दिली.

## मायदेशी प्रयाण

निरोप घेतलेल्या दिवसापासून तीन दिवसानंतर शीलादित्य राजा कुमारराजा आणि ध्रुवभट्टराजाबरोबर परत ह्यू-एन-त्सँगकडे आला आणि त्यांनी त्याचा शेवटचा निरोप घेतला. ह्यू-एन-त्सँगला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी चार मार्गदर्शकांची नियुक्ती केली. अशा मार्गदर्शकांना ते 'महातार' असे म्हणतात. सम्राटाने शुभ्र सुती कपड्यांवर काही खलिते लिहिले आणि त्यांच्यावर तांबड्या मेणाने



शिक्कामोर्तब केले. मार्गात येणाऱ्या देशांतील प्रत्येक राजाला ते खलिते देण्यासंबंधी 'महातारां' ना सूचना केली. त्यामुळे अगदी चीन देशाच्या सीमेपर्यंत मार्गात येणाऱ्या प्रत्येक देशाच्या राजाने ह्यू–एन–त्सँगच्या प्रवासासाठी वाहनांची आणि इतर गोष्टींची सोय केली.

उधीतराजाबरोबर ह्यू-एन-त्सँग निघाला. वाटेत वीरशना येथे सिंहप्रभा आणि सिंहचंद्र यांच्याबरोबर धम्मचर्चा करण्यासाठी तो दोन महिने थांबला. त्यांच्याबरोबर ह्यू-एन-त्सँगने 'कोष सम्परिग्रह-शास्त्र' आणि 'विद्या-मात्र-सिद्धि-शास्त्र' या धम्मग्रंथांवर चर्चा केली दोन महिन्यांनंतर पुढे प्रवास चालू ठेवून तो उधीतराजाच्या राजधानीच्या जालंदर नगरात आला. तेथे एक महिना राहिल्यावर उधीतराजाच्या संरक्षक सैनिकांबरोबर तो तक्षशीला येथे पोहोचला.

वाटेतील डोंगराळ प्रदेशात लुटारूंच्या टोळ्या आहेत, असे त्याला कळल्यावर पहिल्यांदा पुढे तो एका भिक्खूला पाठवीत असे. लुटारूंची टोळी भेटलीच तर तो भिक्खू, 'आम्ही फार दूरच्या देशातून धम्मज्ञान घेण्यासाठी आलो आहोत. आता आमच्याबरोबर काही धम्मग्रंथ, काही मूर्ती आणि पवित्र अवशेष सोडून दुसरे काहीही नाही. म्हणून तुम्ही आमचे दानपती व्हा आणि आमचे संरक्षण करा' असे म्हणत असे नंतर ह्यू-एन-त्सँग इतरांच्याबरोबर मागून जात असे. अशा तऱ्हेने लुटारूंच्या टोळ्यांपासून त्याने आपला बचाव केला.

तक्षशीला येथे पोहोचल्यावर काश्मीरच्या राजाने ह्यू-एन-त्सँगला आमंत्रण पाठविले. पण हत्तीवर खूप सामान असल्यामुळे आणि त्यांच्यासह जाण्याचा मार्ग कठीण असल्यामुळे ह्यू–एन–त्सँग काश्मीरला गेला नाही. तक्षशीला येथे सात दिवस राहिल्यावर त्याने पुढील प्रवास सुरू केला. तीन दिवसांच्या प्रवासानंतर ते सिंधू नदीच्या किनाऱ्यावर पोहोचले. सिंधू नदी तेथे ५-६ ली रुंद होती. ग्रंथ, मूर्ती इत्यादी सामान आणि सहप्रवासी बोटीत चढवले. ह्यू-एन-त्सँगने हत्तीवर बसून नदी पार केली. सामानाची बोट नदीच्या मध्यावर आल्यावर, एकाएकी वादळ उत्पन्न होऊन, नदीच्या पाण्यवर मोठमोठ्या लाटा निर्माण झाल्या. बोट जोरजोराने हिंदळू लागली. एकदा तर जवळजवळ बोट बुडालीच असे वाटले. ग्रंथांचे रक्षण करणारा मनुष्य घाबरूनच नदीत पडला. पण सहप्रवाशांनी त्याला वाचविले. पण पन्नास ग्रंथांच्या प्रती आणि निरनिराळ्या फुलझाडांची कलमे, बी–बियाणे नदीत पडून नष्ट झाली. एवढे सोडले तर बाकीच्या सर्व वस्तू सुरक्षितपणे नदीपार झाल्या.

त्या वेळी कपिसाचा राजा उत्तरखांडमध्ये राहात होता. ह्यू-एन-त्सँग परत आल्याचे कळाले म्हणून त्याचे स्वागत करण्यासाठी तो स्वतः सिन्धू नदीच्या किनारी आला होता. तो म्हणाला, 'मी असे ऐकले आहे की, भदन्तांचे बरेच ग्रंथ नदीच्या पाण्यात पडून नष्ट झाले. आपण भारतातून फळे आणि फुलझाडांची कलमे तर आणली नव्हती ना?' जेव्हा ह्यू-एन-त्सँगने त्याचे होकारात्मक उत्तर दिले, तेव्हा कपिसाचा राजा म्हणाला, 'तेच कारण आहे. फार पूर्वीपासून जो कोणी फुल-

ज्ञाडांची कलमे आणतो त्याच्यावर असाच प्रसंग येतो'.

कपिसाच्या राजाबरोबर राजधानीच्या शहरात आल्यावर नष्ट झालेल्या ग्रंथांची भरपाई करण्यासाठी उद्यान देशात काश्यपीय शाखेच्या त्रिपिटकांच्या प्रती मिळविण्यासाठी ह्यू-एन-त्संगने दूत पाठविले. कपिसाच्या राजधानीत ह्यू-एन-त्संग पन्नास दिवस राहिला. तेथे त्याला भेटण्यासाठी खूप दूरचे अंतर असूनसुद्धा काश्मीरचा राजा आला होता.

तेथून ह्यू-एन त्संग चीनच्या दिशेने प्रवास करू लागला. वाटेतील देशांच्या राजांनी आणि उपासकांनी त्याचे खूप आदरातिथ्य केले.

ह्यू-एन-त्संगला आपला देश सोडून जाण्यासाठी चीनच्या सम्राटाने परवानगी दिली नव्हती. म्हणून खोतानला आल्यावर त्याने चीनच्या सम्राटाला खालील अर्थाचे पत्र पाठविले.

'पूर्वी ज्या महापुरुषांनी भगवान बुद्धांच्या धम्माचा शोध घेण्यासाठी आपले जीवन व्यतीत केले ते किती महान होते! त्यांच्या श्रमाचे मोजमाप आम्ही कसे करू शकतो? त्यांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. चीनमध्ये जो बुद्धोपदेश पोहोचला तो अपूर्ण होता. त्याला पूर्णत्वाने जाणण्यासाठी मी (इ. स. ६३० साली) अनेक संकटांना तोंड देऊन गुप्तरूपाने भारतात गेलो. मी विस्तृत वाळवंटातून, बर्फाने नेहमी आच्छादलेल्या पर्वत शिखरावरून, अत्यंत धोकेबाज घाटातून आणि भयंकर उष्ण हवेच्या प्रदेशातून प्रवास केला आहे.

चांग-शानच्या पवित्र शहरापासून निघून मी नवीन राजगृह शहरापर्यंत पोहोचलो. ह्याप्रमाणे मी ५०,००० ली पेक्षा जास्त प्रवास केला आहे. निरनिराळ्या देशांतील लोकांचे हजारो प्रकारचे रीतिरिवाज आणि पेहेराव पाहून, अनेक संकटांना तोंड देऊन मी परत आपल्याकडे येऊन सम्राटाला वंदन करीत आहे.

माझा संकल्प पूर्ण झाल्यामुळे माझे मन प्रफुल्लित झाले आहे. मी गृध्रकूट पर्वत पाहिला. बोधिवृक्षाची पूजा केली. अशा स्थळांना पाहिले की, जी पूर्वी कोणीही पाहिली नव्हती अशी पवित्र वाणी ऐकली आहे की, जी पूर्वी कोणीही ऐकली नव्हती. मी माझ्या धर्मात्मा सम्राटासाठी उच्च सन्मान आणि प्रशंसा मिळविली आहे.

माझ्या प्रवासात मी निरनिराळ्या राज्यांत सतरा वर्षे घालविली आणि आता प्रयागहून निघून कपिसा देशातून त्सुंग-लिंग पर्वत आणि पामीरचे पठार पार करून खोतान येथे आलो आहे.

सामान वाहून नेण्यासाठी जो आमच्याबरोबर मोठा हत्ती होता तो पाण्यात नष्ट झाला आहे.[१] माझ्याबरोबर आणलेल्या अनेक ग्रंथांना वाहून नेण्यासाठी अजूनपर्यंत आम्हाला यश आले नाही. त्यामुळे वाहनांच्या अभावी खोतान येथे मला

१. हा हत्ती खोतान येथे अपघाताने मरण पावला.



राहावे लागले आहे. सम्राटांना प्रत्यक्षपणे अभिवादन करून माझा आदर व्यक्त करण्याची माझी इच्छा लवकर पूर्ण होवो''

## अपूर्व स्वागत

ह्यू-एन-त्संगचे पत्र वाचल्यावर सम्राटाला फार आनंद झाला. त्याने ताबडतोब खोतान येथे राहत असलेल्या आपल्या अधिकाऱ्याला आज्ञापत्र देऊन ह्यू-एन त्संगला चीनच्या राजधानीपर्यंतच्या प्रवासाची सर्व तऱ्हेची तजवीज करण्याची आज्ञा केली. जेव्हा ह्यू-एन-त्संग कालव्याच्या मार्गाने परत चीनमध्ये पोहोचला, तेव्हा तेथे त्याचे भव्य स्वागत करण्यात आले. त्या दिवशी राजधानीत सुट्टीचा दिवस मानण्यात आला. त्याच्या स्वागतासाठी लोकांनी इतकी गर्दी केली होती की, त्या गर्दीत आपण चिरडून जाऊ, असे वाटून ह्यू-एन-त्संगने ती रात्र कालव्यावरच घालविली. इतके भव्य असे स्वागत आतापर्यंत कोणाचेही झाले नव्हते.

ह्यू-एन-त्संगने भारतातून आपल्याबरोबर खालील अमूल्य गोष्टी चीनमध्ये आणल्या होत्या.

१) तथागतांच्या रक्षांचे १५० अंश.

२) मगध राज्यातील प्राग्बोधि पर्वतातील नाग गुहेमध्ये असलेल्या तथागतांच्या छबीवरून तयार केलेले एक सोन्याचे बुद्धरूप. तीन फूट तीन इंच उंचीचे एक प्रकाशमान पर्यंकावरील हे बुद्धरूप ऋषिपत्तन मृगदाव विहारात धर्मचक्रप्रवर्तनाच्या वेळी असलेल्या प्रवचन मुद्रेत होते.

३) तीन फूट पाच इंच उंच असलेल्या प्रकाशमान पर्यंकावर असलेले एक चंदनाचे बुद्धरूप. कौसंबीच्या उदयन राजाने बनविलेल्या चंदनाच्या बुद्धरूपासारखे हे बुद्धरूप होते.

४) तावतिंस लोकांतून कपिथा देशात शिडीवरून उतरत असलेले एक दोन फूट नऊ इंच उंचीच्या प्रकाशमान पर्यंकावर असलेले बुद्धरूप.

५) मगध देशातील गृध्रकूटपर्वतावर 'सद्धर्मपुण्डरिक' आणि इतर सूत्रांचे प्रवचन करीत असलेल्या मुद्रेतील चार फूट उंचीच्या स्फटिकासारख्या पारदर्शक प्रयंकावर असलेले चांदीचे बुद्धरूप.

६) नगरहारा येथील छबीसारखे दिसणारे तीन फूट पाच इंच उंचीच्या पारदर्शक पर्यंकावर असलेले बुद्धरूप.

७) वैशाली येथील, तथागत धम्मदीक्षा देत असलेल्या मुद्रेतील, एक फूट पाच इंच उंचीच्या पारदर्शक पर्यंकावर असलेले एक चंदनाचे बुद्धरूप.

८) महायान पंथाचे २२४ सूत्र (ग्रंथ), १९२ शास्त्रे; स्थविरवादी शाखेचे सूत्र, विनय आणि शास्त्र मिळून १५ ग्रंथ; सम्मतीय शाखेचे १५ ग्रंथ; महीशासक शाखेचे २२ ग्रंथ; सर्वास्तिवादी शाखेचे ६७ ग्रंथ; काश्यपीय शाखेचे १७ ग्रंथ; धर्मगुप्त शाखेचे ४२ ग्रंथ; हेतुविद्याशास्त्राचे ३६ ग्रंथ; शब्दविद्याशास्त्राचे १३ ग्रंथ

आणि इतर काही ग्रंथ असे सर्व मिळून ६५७ ग्रंथ वीस घोड्यांवरून आणले होते.

चीनच्या सम्राटाने देऊ केलेली मानाची दरबारी नोकरी न स्वीकारता ह्यू-एन-त्सँगने आपल्याबरोबर आणलेल्या ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर करण्याचे काम सुरू केले.

इ. स. ६४७ साली त्याने (१) बोधिसत्त्वपिटक सूत्राचे, (२) बुद्ध-भूमि-शास्त्राचे, (३) शतमुखी-धारणीचे आणि इतर काही भाषांतरे केली.

इ. स. ६४८ साली त्याने आणखी पंधरा ग्रंथांचे भाषांतर केले आणि सम्राटाच्या आज्ञेवरून 'सी-यू-की' ह्या नावाचे आपले प्रवासवृत्त लिहून काढले.

इ. स. ६५० साली ताई-त्सुंग सम्राट मरण पावला आणि त्याचा मुलगा काओ-त्सुंग गादीवर आला. तेव्हापासून जीवनाच्या अंतापर्यंत ह्यू-एन-त्सँग आपला सर्व वेळ भाषांतराच्या कामात आणि धम्मप्रवचनाच्या कामात घालवू लागला.

त्याने एकूण ७४ ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद केला. त्यांतील एकट्या 'महाप्रज्ञापारमितासूत्र' ह्या ग्रंथात २००,००० (दोन लाख) श्लोक आहेत. आपल्यानंतर हे भाषांतराचे काम अव्याहतपणे चालू राहावे म्हणून त्याने कर्तबगार आणि विद्वान भिक्खूंची शिष्यपरंपरा निर्माण केली.

इ. स. ६५२ साली ह्यू-एन-त्सँगने भारतातील स्तूपांच्या आकारासारखा एक १८० फूट उंचीचा स्तूप बांधला. तेथे त्याने भारतातून आणलेले ग्रंथ आणि बुद्धरूपे ठेवली. इ. स. ६५४ साली बुद्ध गयेतील महाबोधि विहारातून भिक्खू ज्ञान प्रभा, भिक्खू प्रज्ञादेव आणि इतर भिक्खूंनी, भिक्खू धर्मवर्धनबरोबर पाठविलेले एक पत्र, थोडे पांढरे कापड आणि एक स्तोत्र ग्रंथ ह्यू-एन-त्सँगला मिळाले. ह्यू-एन-त्सँगनेसुद्धा चीनमधून येणाऱ्या काही प्रवाशांबरोबर आपल्या भारतीय मित्रांसाठी काही भेटवस्तू पाठविल्या आणि सिन्धू नदी पार करताना नदीत बुडालेल्या ग्रंथांची सूची देऊन शक्य असल्यास त्या ग्रंथांच्या प्रती चीनला पाठविण्याची विनंती केली.

भाषांतराच्या कामाबरोबरच ह्यू-एन-त्सँगने बुद्धाची आणि बोधिसत्त्वाची अनेक चित्रे काढली होती. शिवाय त्याने स्वतःच्या हस्ताक्षरात सूत्रांच्या प्रती काढल्या होत्या. इ. स. ६६४ साली सर्व सूत्रांचे पठण झाल्यावर त्याने डोळे बंद केले आणि मैत्रेय बोधि सत्त्वाची स्तोत्रे गात शांतपणे परिनिर्वाण प्राप्त केले. त्या वेळी त्याचे वय ६४ वर्षांचे होते.

## ३. इ-त्सिंग

(प्रवास-काळ इ. स. ६७१ ते ६९५. जन्म इ. स. ६३५, परिनिर्वाण इ. स. ७१३)

---

इ-त्सिंगचा जन्म इ. स. ६३५ साली फान-यंग येथे म्हणजे हल्लीच्या बैजिंग जवळच्या चौ-चौ जिल्ह्यात झाला. इ. स. ६४१ साली सहा वर्षांचा असताना तो शान-तुंग येथील ताई पर्वतावरील विहारात शिकण्यासाठी गेला. त्याचे सुरुवातीचे शान-युई आणि हुई-ह्सी नावाचे शिक्षक होते. त्यांनी बहुतेक इ-त्सिंगला त्या काळच्या साहित्याची ओळख करून दिली असावी. त्यामुळे भिक्खू बनण्याकडे त्याचा कल होऊ लागला.

इ-त्सिंग बारा वर्षांचा असताना त्याचे एक गुरू शान-युई-यंग यांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याला फार दुःख झाले. तेव्हापासून इतर साहित्याचा अभ्यास बाजूला ठेवून तो बुद्धधम्मशास्त्राच्या अभ्यासात पूर्णपणे मग्न होऊ लागला. वयाच्या चौदाव्या वर्षी त्याने प्रव्रज्या घेतली. त्याच्या प्रवासवर्णनात त्याने लिहिले आहे की, 'मी अठरा वर्षांचा असतानाच भारतयात्रेचा निश्चय केला होता.' पण वयाच्या सदतिसाव्या वर्षापर्यंत त्याला भारतयात्रेचा प्रारंभ करता आला नाही. मधला एकोणीस वर्षांचा काळ त्याने बुद्धधम्माचा अव्याहतपणे अभ्यास करण्यात घालविला. उपसंपदा घेण्यास लागणाऱ्या कमीत-कमी वयोमर्यादेप्रमाणे विसाव्या वर्षी त्याने उपसंपदा घेतली. त्याच दिवशी हुई-ह्सी ह्या त्याच्या उपाध्यायाने त्याला बुद्धोपदेशावर दृढ निष्ठा ठेवण्याविषयीचे महत्त्व सांगितले आणि त्याचबरोबर बुद्धोपदेशाचा विपरीत अर्थ लावणाऱ्यांपासून सावध राहण्याची सूचना केली. इ-त्सिंगच्या उपाध्यायाने खूप परिश्रम घेऊन इ-त्सिंगला बुद्धधम्माची शिकवण दिली.

उपसंपदा घेतल्यावर पाच वर्षांनी इ. स. ६५४ ते ६५८ पर्यंतचा काळ इ-त्सिंगने फक्त विनयाचा अभ्यास करण्यात घालविला. त्यात त्याने खूपच प्रगती केली. विनयाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर इ-त्सिंगच्या गुरूने त्याला विनयावर धम्मदेशना करण्यास सांगितले. धम्मसभेत ओळख करून देताना, 'चीन देशात उपलब्ध असलेल्या विनयपिटकात पूर्णपणे पारंगत' असे इ-त्सिंगविषयी उद्गार त्याच्या गुरूने काढले.

विनयपिटकाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर पर्वतावरील विहारात राहात असता,

तेरा धुतांगांपैकी काही धुतांगांचे अनुष्ठान करून, त्याने धम्मसूत्रांचा अभ्यास सुरू केला. पुढे त्याच्या उपाध्यायाच्या सांगण्यावरून अभिधम्मपिटकासंबंधी असंगाने लिहिलेल्या दोन धम्मशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी तो पूर्ववूई येथे गेला. नंतर वसुबधूच्या 'अभिधर्मकोषा'चा आणि धर्मपालाच्या 'विद्यामात्रसिद्धि' ह्या धम्म-ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी तो पश्चिमेच्या राजधानीच्या चांग–आन नावाच्या शहरी गेला.

चांग-आन येथील आपल्या वास्तव्यात त्याने उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या ह्यू-एन-त्सँगला पाहिले असले पाहिजे. त्याचप्रमाणे सम्राटाच्या विशेष आज्ञेवरून ह्यू-एन-त्सँगची निघालेली भव्य अंत्ययात्राही इ-त्सिगने पाहिली असली पाहिजे. कारण इ-त्सिग चांग-आनला असतानाच इ. स. ६६४ साली ह्यू एन-त्सँगचे परिनिर्वाण झाले होते.

कदाचित ह्यू-एन-त्सँगच्या महान व्यक्तिमत्त्वाने, तसेच त्याला मिळत असलेले यश आणि सन्मान ह्याने प्रभावित होऊन, इ-त्सिगने भारतयात्रा करण्याचा अनेक वर्षांचा आपला संकल्प पूर्ण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. भारत त्या वेळी बौद्ध-ग्रंथांचे आगर होते. इ-त्सिगच्या चरित्रलेखकाच्या सांगण्यावरून इ-त्सिगने ह्यू-एन-त्सँगला आणि फा-हियानला आपले आदर्श पुरुष मानले होते. तो इ. स. ६७० सालापर्यंत म्हणजे भारताच्या यात्रेस निघण्यापूर्वी एक वर्षापर्यंत चांग-आनला होता.

वाचक इ-त्सिगचे प्रवासवृत्त त्याच्याच खालील शब्दांत वाचणे पसंत करतील.

### बोधिवृक्ष दर्शनाची ओढ

'मी, इ-त्सिग हिसि-एन-हेङ्ग कालाच्या पहिल्या वर्षी (इ. स. ६७०) अभ्यास करीत होतो आणि व्याख्याने ऐकत होतो. त्या वेळी माझ्याबरोबर धम्म-शास्त्राचे उपाध्याय पिङग-पूचे निवासी चू-ई, लँ-चौव्चे निवासी हूङग-ई आणि दुसरे दोन तीन भदंत होते. आम्ही सर्वांनी भारतात जाऊन गृध्रकूटला जाण्याचा आणि बोधिवृक्षाचे दर्शन घेण्याचा निश्चय केला. परंतु चू-ईला त्याच्या मोहाने पिङग-पूकडे आकर्षित केले. कारण, तेथे त्याची म्हातारी आई होती आणि हूङग-ईला किङग-निङग येथे ह्यू-एन-चान मिळाल्यावर त्याने आपला विचार सुखावती नावाच्या विहाराकडे वळविला. ह्यू-एन-कुएन कुङग-तुङगपर्यंत आला. परंतु दुसऱ्यां-प्रमाणे त्यानेही आपला पूर्वीचा संकल्प बदलला. त्यामुळे मला फक्त त्सिन-चोऊच्या शन-हिङग नावाच्या एका तरुण भिक्खूबरोबर भारतयात्रेस निघावे लागले.

दिव्य भूमीचे (चीनचे) माझे जुने मित्र अशा प्रकारे दुर्भाग्याने माझ्यापासून वेगळे होऊन आपापल्या मार्गाने गेले. परंतु आतापर्यंत भारतात एकही नवीन परिचित मला मिळाला नव्हता. त्या वेळी जर मी माघार घेतली असती, तर माझी इच्छा कधीच पूर्ण झाली नसती. चार प्रकारच्या दुःखांचे[1] अनुकरण करून मी दोन श्लोक रचले.



'माझ्या प्रवासात मी हजारो स्थित्यंतरातून गेलो.
दुःखाच्या सूक्ष्म तंतूंनी माझ्या विचारांना शेकडो ठिकाणी गुंडाळले.
ह्याचे काय कारण होते ? कृपा करून केवळ माझ्या शरीराच्या छायेला
भारताच्या पाच देशातून फिरू दे.
आणि माझ्या मनाला धीर देण्यासाठी–
एक कसलेला सेनापती शत्रू सैन्याला रोखू शकतो.
पण मनुष्याच्या संकल्पाला थांबविणे कठीण आहे.
जर मी थोड्या काळच्या जीवनात दुःखित झालो
आणि नेहमी त्याचीच चर्चा करायला लागलो,
तर मी असंख्य[2] काळ कसे गुजारू शकेन ?'

प्रवासाला निघण्यापूर्वी राजधानीहून मी माझ्या जन्मगावी (चो-चौ) आलो. माझे उपाध्याय हूई- ह्सी यांच्याकडून मी खालील शब्दांत मार्गदर्शन मागितले- 'भदन्त, मी लांबच्या प्रवासाला जाऊ इच्छितो. कारण मी जे आतापर्यंत पाहिले नाही, ते पाहिले तर मला खूप मोठे पुण्य लाभेल. आपण आता वृद्ध झाला आहात. तेव्हा तुमचा उपदेश घेतल्याशिवाय मी माझा हेतू साध्य करू शकणार नाही.' त्यांनी उत्तर दिले, 'ही तुला मिळालेली सुवर्णसंधी आहे. ती तुला परत मिळणार नाही. योग्य विचारांती केलेला हा तुझा संकल्प ऐकून मला खूप आनंद झाला आहे. (तू परत आलेला पाहण्यासाठी) मी जगलो-वाचलो तर, तुझ्या प्रकाश-किरणांना पाहून, मला खूप आनंद होईल. निःसंकोचाने जा. मागे राहिलेल्या गोष्टींकडे वळून पाहू नकोस. तुझा तीर्थयात्रेचा संकल्प मला निःसंदेह पसंत आहे. शिवाय धम्माच्या समृद्धीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, हे एक अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य आहे. संशयाला बिलकूल थारा देऊ नकोस.'

प्रवासाला निघताना मी माझ्या दिवंगत गुरूच्या (शान-युईच्या) समाधी-जवळ गेलो आणि त्यांची प्रवासासाठी परवानगी मागितली. त्या वेळी समाधीच्या आसपासची झाडे इतकी वाढली होती की, प्रत्येक झाडाचा बुंधा जवळजवळ एका हाताच्या परिघाचा झाला होता. आजूबाजूला जंगली गवत वाढले होते. जरी चेतनामय जग आपल्याला अदृश्य आहे, तरीसुद्धा माझे गुरू माझ्यासमोर उपस्थित असते, तर मी त्यांचा जसा सन्मान केला असता, तसाच मी त्यांचा सन्मान केला. प्रदक्षिणा घालून आणि प्रत्येक दिशेकडे पाहून मी त्यांना माझ्या तीर्थयात्रेच्या संकल्पासंबंधी सांगितले. मी त्यांची आध्यात्मिक सहायता मागितली. त्या दयाळू

---

१) ह्या नावाची चङग-हङग (इ. स. ७८-१३६) ह्या कवीची एक कविता आहे.

२) असंख्य काळः– बोधिसत्त्व दान, करुणा इत्यादी पारमितांचा अभ्यास तीन असंख्य काळापर्यंत करीत असतो. इ-त्सिगने इथे त्याचा निर्देश केला आहे.

भदन्तांनी माझ्यावर केलेल्या उपकाराची परतफेड करण्याची मी इच्छा प्रगट केली.
हि सयेन-हेङ्ग कालाच्या दुसऱ्या वर्षी (इ. स. ६७१) मी याङ्गफू येथे वर्षावास केला. शरद ऋतूच्या सुरुवातीला (सातव्या महिन्यात) कोङ्ग चोऊचा फेङ्ग-ही-सयाओ-चुअन नावाच्या सम्राटाच्या राजदूताची आणि माझी अचानक भेट झाली. त्याच्या साहाय्याने मी कङ्ग-तुङ्ग नगरात आलो. तेथे जहाजातून (दक्षिणेकडे) जाण्यासाठी मी एका इराणी जहाज मालकाला भेटण्याची तारीख ठरविली. पुन्हा राजदूताचे आमंत्रण स्वीकारून, मी क्वांग-चौव येथे गेलो. तेथे दुसऱ्यांदा तो माझा दानपती झाला. त्याचे धाकटे बंधू हिसया-ओ-तन् आणि हिसया-ए-चेन हे दोन्ही राजदूत होते. त्यांनी, श्रीमती निङ्ग आणि श्रीमती पेन, ह्या त्यांच्या परिवारातील सर्वांनी, मला दान देऊन अनुगृहीत केले.

त्यांनी मला उच्च प्रतीच्या वस्तू आणि खाण्याचे उत्तम पदार्थ दिले. प्रत्येक-जण त्याच्या प्रयत्नांची शिकस्त करीत होता. असे करताना समुद्र-प्रवासात मला कोणत्याच गोष्टीची उणीव पडू नये, याची ते दक्षता घेत होते. तरीसुद्धा, भयानक देशात मला काही त्रास होईल, याचे त्यांना भय वाटत होते. आई-वडिलांचे जसे आपल्या मुलावर निःसीम प्रेम असते, तसे त्यांचे माझ्यावर प्रेम होते. लहान मुलाला लागणारी वस्तू आई-वडील जसे लगेच देतात, तसे ते माझ्या गरजा पुरवीत होते. ते सर्व माझे आश्रयदाते बनले आणि त्यांनी मला श्रेष्ठ भूमीच्या प्रवासाची साधन-सामग्री दिली.

पवित्र भूमीच्या यात्रेच्या दृष्टीने मी जे काही करू शकलो, ते सर्व फेङ्ग परिवारामुळेच. त्यांच्याशिवाय, लिन-नान येथील भिक्खूंना आणि उपासकांना आमच्या वियोगामुळे वाईट वाटले. उत्तरेच्या प्रदेशातील विद्वानांना आमच्या वियोगामुळे वाईट वाटले. कारण, त्यांना असे वाटत होते की ते आम्हाला परत पाहू शकणार नाहीत.

### प्रवासाची सुरुवात

त्या वर्षाच्या (इ. स. ६७१) अकराव्या महिन्यात 'हमयी' आणि 'चेन' राशींच्याकडे तोंड करून आणि पन-यू (कङ्ग–तुङ्ग) आपल्या ठीक पाठीमागे टाकून आम्ही प्रवास सुरू केला. कधी कधी माझ्या विचारांना मी दूर असलेल्या बनारसशेजारील मृगदाय अरण्याकडे पाठवीत होतो; तर कधी कधी, गयेजवळ असलेल्या कुक्कुटगिरी पर्वतावर पोहोचण्याच्या आशेने मी सुखावत होतो.

ह्या वेळेला पहिली पावसाची हवा सुरू झाली आणि आमचे जहाज लाल दक्षिण[1] समुद्राकडे वळले. जहाजावर शंभर हात दोर दोन दोन हातांच्या अंतरावर बांधून वरून लटकाविले गेले.[2] 'ची' राशीपासून आम्ही वेगळे होण्याच्या ऋतूच्या

१) दक्षिणेचा रंग लाल आणि उत्तरेचा रंग काळा मानला गेला आहे.

२) ही तयारी जहाजाला डोलकाठी लावण्यासाठी केली गेली.



सुरुवातीला, प्रत्येकी पाच (?) लांबी असलेली शिडांची जोडी, काळी उत्तर दिशा पाठीमागे ठेवून लावली गेली. अथांग खोलीच्या समुद्रातून प्रवास करताना पाण्याचे मोठमोठे फुगार समुद्रात पाण्याचे पर्वत असल्यासारखे भासत होते. विस्तीर्ण खाडी-तून प्रवास करताना समुद्राच्या मोठमोठ्या लाटा आकाशाला भिडत होत्या.

प्रवासाला सुरुवात होऊन वीस दिवस झाले नाहीत तोच जहाज भोजला पोहोचले. मी तेथे उतरलो आणि तेथे सहा महिने राहून शब्दविद्या (संस्कृत व्याकरण) शिकलो. तेथील राजाने मला थोडी मदत केली आणि मलय देशाला पाठविले. आता त्या देशाला 'श्री भोज' असे म्हटले जाते. तेथे मी आणखी दोन महिने थांबलो आणि नंतर कच येथे गेलो. येथे बाराव्या महिन्यात राजाच्या जहाजातून मी पूर्व भारताच्या दिशेने प्रवासास सुरुवात केली. कचपासून उत्तरेच्या दिशेने दहा दिवसांपेक्षा जास्त दिवस प्रवास केल्यावर आम्ही नग्न लोकांच्या देशात पोहोचलो. पूर्व दिशेला दृष्टी टाकल्यावर एक दोन चिनी मैलांच्या अंतराचा विस्तार असलेला किनारा आम्हाला दिसला. तेथे नारळाच्या आणि सुपारीच्या सुंदर झाडांच्या मनोहर वृक्षराजीशिवाय आम्हाला काहीच दिसले नाही. जेव्हा तेथील रहिवाशांनी आमच्या जहाजाला येताना पाहिले, तेव्हा ते मोठ्या उत्साहाने आपल्या छोट्या होड्यांत बसले. त्यांची संख्या पुरी शंभर होती. त्यांनी नारळ, केळी, वेताच्या आणि बांबूच्या बनविलेल्या वस्तू बरोबर आणल्या आणि आमच्या वस्तूं-बरोबर अदलाबदल करण्याची इच्छा प्रदर्शित केली. जी वस्तू ते बदल्यात घेऊ इच्छित होते, ती एकमात्र वस्तू म्हणजे लोखंड. दोन बोटाइतक्या आकारमानाच्या लोखंडाच्या तुकड्यासाठी पाच दहा नारळ त्यांच्याकडून मिळत असत. पुरुष पूर्णपणे नागडे होते, तर स्त्रियांनी आपल्या शरीराला काही पानांनी झाकले होते. जर गंमत म्हणून व्यापाऱ्यांनी त्यांना कपडे दिले तर हात हालवून जणू काही ते सांगत होते की, आम्ही त्याचा उपयोग करीत नाही.

मी असे ऐकले आहे की, हा देश शू-चुआनच्या नैर्ऋत्य दिशेला आहे. ह्या द्वीपात लोखंड बिलकुल मिळत नाही. सोने आणि चांदीसुद्धा दुर्मिळ आहे. येथील लोक केवळ नारळ (नाळीकेर) आणि कंदमुळांवरच निर्वाह करतात. येथे भाताचे पीक जास्त होत नाही. म्हणून ज्या वस्तूला ते सर्वात मौल्यवान असे मानतात ती वस्तू म्हणजे 'लोह,' ज्याचा अर्थ लोखंड असा आहे. हे लोक काळे नाहीत. ते मध्यम उंचीचे आहेत ते वेताच्या वर्तुळाकार पेट्या बनविण्यात कुशल आहेत. त्यात त्यांची बरोबरी दुसरा कोणताच देश करू शकणार नाही. जर कोणी वस्तूंची अदलाबदल करण्यास नकार दिला तर ते काही विषारी बाण सोडतात. एकाच बाणात प्राण जाण्याची शक्यता असते.

येथून साधारणपणे अर्धा महिना वायव्य दिशेने प्रवास केल्यावर आम्ही ताम्रलिप्तीला पोहोचलो. ही भारताची दक्षिण सीमा आहे. येथून महाबोधि आणि नालंदा साठ योजनांपेक्षा जास्त अंतरावर आहे. हि-सएन-हेङ्ग काळाच्या चौथ्या

वर्षातील (इ. स. ६७३) दुसऱ्या महिन्याच्या आठव्या दिवशी मी तेथे पोहोचलो. पांचव्या महिन्यात पश्चिमेच्या दिशेने मी प्रवासास सुरुवात केली. मला अधूनमधून साथीदार मिळत होते.

## खडतर प्रवास आणि प्राणसंकट

महायानप्रदीप¹ मला ताम्रलिप्तीत पहिल्यांदा भेटला. त्याच्याबरोबर मी वर्षाचा काही भाग राहिलो. येथे मी ब्रह्म भाषा (संस्कृत) शिकलो आणि शब्दविद्येचा अभ्यास केला. शेवटी मी गुरु तेङ्ग (ता-चेङ्ग-तेङ्ग) यांच्याबरोबर सरळ पश्चिमेला जाणाऱ्या मार्गाने निघालो. आमच्याबरोबर शेकडो व्यापारी मध्य भारतात चालले होते. महाबोधि विहारापासून दहा दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर आम्ही एक मोठा पर्वत आणि नंतर लागणारा दलदलीचा प्रदेश पार केला. हा घाट भयानक असून चढण्या-उतरण्यासाठी अवघड आहे. येथून अनेक माणसांबरोबरच प्रवास करणे आवश्यक आहे. एकटयाने कधीही प्रवास करू नये. ह्या वेळेला माझ्यावर– इ-त्सिंगवर– हंगामी ऋतूत येणाऱ्या रोगाने आक्रमण केले होते. माझे शरीर थकले होते आणि मी निर्बल झालो होतो. व्यापाऱ्यांच्या मागे जाण्याचा मी प्रयत्न केला. परंतु थाकत असल्यामुळे आणि अशक्त शरीरामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यास मी असमर्थ झालो होतो. जरी मी खूप प्रयत्न केला आणि त्यांच्याबरोबर चालण्याची इच्छा केली तरी पाच चिनी मैल चालण्यासाठी मला शंभर वेळा विश्रांती घ्यावी लागत होती. प्रवासात निघालेले नालंदाचे वीस भिक्खू होते. त्यांच्याबरोबर पूजनीय भदन्त तेङ्गसुद्धा होते. ते सर्व पुढे निघून गेले. मी फक्त एकटाच मागे राहिलो होतो आणि त्या भयानक पाऊलवाटेने कोणीही बरोबर नसताना चाललो होतो. संध्याकाळच्या वेळी जेव्हा सूर्य अस्ताला चालला होता, तेव्हा पर्वतातील काही लुटारू प्रकट झाले. धनुष्याला बाण लावून मोठमोठयाने ओरडत येऊन ते माझ्याकडे खुनशी नजरेने पाहू लागले आणि एकेकजण माझा अपमान करू लागले. पहिल्यांदा त्यांनी माझी संघाटी घेतली आणि नंतर त्यांनी माझे आंतर्वस्त्र घेतले. माझ्याजवळ जेवढे कमरबंद आणि पट्टे होते, ते सर्व त्यांनी काढून घेतले. त्या वेळी माझ्या मनात विचार आला की खरोखर जगाचा शेवटचा निरोप घेण्याची वेळ जवळ आली आहे. पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची माझी इच्छा आता पूर्ण होणार नाही. जर त्यांनी आपल्या तीक्ष्ण भाल्यांनी मला भोसकले

१) महायानप्रदीप हा ह्यु एन-त्सॅंगचा एक शिष्य होता. त्याने द्वारवती, पश्चिम सयाम, सिंहल आणि दक्षिण भारताची यात्रा केली. परत ताम्रलिप्ती येथे येऊन तो बारा वर्षे राहिला. तो संस्कृत भाषेत निपुण होता त्याच्याबरोबर इ-त्सिंग नालंदा, वैशाली आणि कुशिनारा येथे गेला. त्याचे परिनिर्वाण कुशिनगर येथे झाले.



असते, तर चिरकालापासून मनात योजलेले कार्य मी कधीच पूर्ण करू शकलो नसतो. भारतात अशी अफवा होती की, जेव्हा ते गोऱ्या रंगाच्या माणसास पकडतात तेव्हा देवापुढे बळी देण्यासाठी ते त्याला ठार करतात. जेव्हा मला ह्या गोष्टीची आठवण आली, तेव्हा माझी भीती दुपटीने वाढली. मी (संधी साधून) एका चिखलाच्या खड्ड्यात घुसून माझे सर्व शरीर चिखलाने काळे केले, स्वतःला पानांनी झाकले आणि काठीच्या साहाय्याने हळूहळू चालू लागलो. त्या दिवसाची संध्याकाळ झाली पण विश्रांतिस्थळ अजून दूर होते. रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी मी आपल्या साथीदारांकडे जाऊन पोहोचलो. मी स्पष्टपणे ऐकले की गावाच्या बाहेर जाऊन पूजनीय तेङ्ग मला मोठमोठयाने हाका मारीत होते. जेव्हा आम्ही एकमेकांना भेटलो, तेव्हा सद्गदित होऊन त्यांनी मला एक संघाटी–वस्त्र दिले. मी माझे शरीर एका तलावातील पाण्याने धुतले आणि नंतर आम्ही गावात आलो.

## नालंदातील दहा वर्षे

त्या गावापासून काही दिवस उत्तरेच्या दिशेने प्रवास केल्यावर आम्ही पहिल्यांदा नालंदा येथे आलो. आम्ही मूलगंधकुटीपुढे वंदना केली आणि नंतर गृध्रकूटपर्वतावर चढलो. तेथे आम्ही ते स्थळ पाहिले, जेथे चीवर ठेवले होते. त्यानंतर आम्ही महाबोधि विहारात पोहोचलो आणि वास्तविक बुद्धरूपाच्या पुढे वंदना केली. शन-तुङ्गच्या भिक्खूंनी आणि उपासकांनी दिलेल्या सुंदर रेशमी वस्त्रांचे मी तथागतांच्या आकारमानाप्रमाणे एक काषाय बनविले आणि स्वतःच्या हातांनी ते बुद्धरूपावर चढविले. पू चे विनयगुरु ह्यू-एन यांनी माझ्याबरोबर पाठविलेले हजारो (छोटे छोटे) छत्र मी त्यांच्यातर्फे चढविले. त्साओचे ध्यानगुरु अन–ताओ यांनी मला बोधीच्या पुढे वंदना करण्यास सांगितले होते. त्यांच्या नावाने मी हे कर्तव्य पार पाडले. एकाग्रचित्त होऊन श्रद्धा आणि आदरपूर्वक मी पंचांग वंदना केली. चीन देशातील धर्मधातु असलेल्या प्रदेशातील सर्व सचेतन प्राणिमात्रांना चार प्रकारचे¹ भरपूर लाभ मिळावेत असा पहिल्यांदा माझ्या मनात विचार आला. पूजनीय मैत्रेय बुद्धाला भेटण्यासाठी नागवृक्षाखाली मला साधारण पुनर्योग व्हावा, म्हणजे मला धम्माप्रमाणे तंतोतंत वागता येईल आणि नंतर जे जन्मातून मुक्त करते ते ज्ञान मिळेल (ज्यामुळे निर्वाण प्राप्त होईल). मी सर्व पवित्र स्थानांची पूजा करण्यास गेलो. मी वैशालीत एका घराजवळून गेलो ज्याला चीनमध्ये 'फन–चंग'¹ असे म्हणतात. नंतर मी कुशीनगरला पोहोचलो. प्रत्येक ठिकाणी माझे हृदय श्रद्धापूर्ण आणि आदरयुक्त होत होते. मी मृगदाव येथे गेलो आणि कुक्कुटपदगिरीवर चढलो. नालंदा विहारात मी दहा वर्षे राहिलो. (बहुतेक इ. स. ६७५

१. चार प्रकारचे लाभ म्हणजे (१) अन्न (२) पेय (३) वस्त्र आणि (४) औषधे.

ते ६८५ पर्यंत). चुई-कुङ्ग काळाच्या पहिल्या वर्षी (इ. सं. ६८५) मी बू-हिङ्ग' पासून दूर झालो.

धम्मग्रंथ मिळविल्यावर मी आलेल्या मार्गाने परत येण्यासाठी निघालो. नंतर मी ताम्रलिप्तीला आलो. तेथे पोहोचण्यापूर्वी परत एकदा लुटारूंच्या एका मोठ्या टोळीने मला गाठले. त्यांच्या तलवारीपासून मी माझ्या शरीराची सुटका मोठ्या मुश्किलीने केली आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी माझा जीव जिवंत ठेवला. नंतर मी तेथून जहाजात बसलो आणि कचजवळून गेलो. जे भारतीय धम्म-ग्रंथ मी माझ्याबरोबर आणले होते, ते ५,००,००० श्लोकांपेक्षाही जास्त श्लोकांचे होते. त्यांचा जर चिनी भाषेत अनुवाद केला, तर एक हजाराहून जास्त ग्रंथखंड होतील. त्यांना घेऊन मी आता भोजमध्ये थांबलो आहे.

साधारणपणे भारतातील मध्यदेशापासून सीमा प्रदेशापर्यंत (प्रत्यंतक) पूर्वेला आणि पश्चिमेला तीनशे योजनांपेक्षा जास्त अंतर आहे. दक्षिण आणि उत्तरेच्या दिशेने, प्रत्यंतकांचे अंतर चारशे योजनांपेक्षा जास्त आहे. जरी मी स्वत: सर्व सीमा पाहिल्या नाहीत आणि त्यांचे मोजमाप घेतले नाही, तरी चौकशी केल्यावर मला हे कळले आहे. ताम्रलिप्ती भारताच्या पूर्व सीमेच्या दक्षिणेला चाळीस योजनांच्या अंतरावर आहे. तेथे पाच-सहा विहार आहेत. लोक धनवान आहेत. तिचा संबंध पूर्व भारताशी आहे. ती महाबोधि आणि श्रीनालंदापासून साधारणपणे साठ योजने अंतरावर आहे. चीनला परत जाताना आम्ही ह्याच ठिकाणाहून जहाजात बसतो. येथून आग्नेय दिशेने दोन महिने प्रवास केल्यावर आम्ही कचला पोहोचतो. त्या वेळेपर्यंत भोजहून तेथे जहाज येत असते. हे साधारणपणे वर्षाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या महिन्यात होत असते. परंतु सिंहलद्वीपला जाण्याची इच्छा करणाऱ्याला नैऋत्य दिशेने जावे लागते. असे म्हटले जाते की, ते द्वीप सातशे योजने अंतरावर आहे. आम्ही हेमंत ऋतूपर्यंत कचमध्ये थांबलो. नंतर जहाजात बसून दक्षिणेच्या दिशेने गेलो आणि एक महिन्यानंतर मलय देशात पोहोचलो. तो आता भोज झाला आहे. त्याच्या माण्डलिकत्वाखाली कित्येक राज्ये आहेत. पोहोचण्याची वेळ

---

२. फन-चंग म्हणजे १० हात लांब आणि १० हात रुंद असलेले वैशालीमधील एक घर. ते तथागतांच्या समकालीन विमलकीर्तीचे होते, असे मानण्यात येत असे. वन ह्यू-एन-त्से हा शीलादित्याकडे (सम्राट हर्षाकडे) चीनचा मुख्य राजदूत होता. त्याने आपल्या वैशालीच्या प्रवासात ह्या घराचे मोजमाप घेऊन ते दहा हात लांब आणि दहा हात रुंद आहे असे नमूद केले (काश्यप). ह्या कारणामुळे नंतर त्याचे नाव 'फन-चंग' असे पडले. नंतर मुख्य भिक्खू असलेल्या कोणत्याही खोलीला हे नाव दिले जात असे. आता चीनमधल्या कोणत्याही विहाराला 'फन-चंग' असे म्हणतात.

३. नालंदापासून सहा योजने दूर पूर्वेला असलेले एक स्थळ.



साधारणपणे पहिल्या किंवा दुसऱ्या महिन्यातील आहे. आम्ही तेथे ग्रीष्म ऋतूच्या मध्यापर्यंत थांबून, जहाजाने उत्तरेच्या दिशेने निघालो. साधारणपणे एक महिन्या-नंतर आम्ही कङग-फू (कङग-तुङग) ला पोहोचलो. तोपर्यंत वर्षाचा अर्धा भाग संपलेला होता.

जेव्हा आम्हाला कुशलकर्मांच्या शक्तीचे साहाय्य मिळते, तेव्हा प्रवास असा सुरळीत आणि सुखकर होतो. जणू काही आपण बाजारातून जात आहोत! पण उलटपक्षी, जर आपल्याजवळ कुशलकर्मांच्या शक्तीचा साठा नसेल, तर बऱ्याच वेळेला आपल्याला संकटांना तोंड द्यावे लागते. जसे की, एखाद्या तरुण मुलाला डाकूंच्या टोळीला तोंड द्यावे लागावे. मी अशा तऱ्हेने थोडक्यात प्रवासाचा मार्ग आणि स्वदेशागमनाचे वर्णन केले आहे. मला आशा आहे की, बुद्धिमान माणसे ज्ञान वाढवतील.

दक्षिण सागरात असलेल्या बेटांचे अनेक राजे-महाराजे बुद्धधम्मावर श्रद्धा ठेवतात आणि धम्माप्रमाणे आचरण करतात. त्यांचे मन कुशलकर्मांचा (पुण्याचा) साठा करण्याकडे लागलेले असते. तटबंध असलेल्या भोजनगरीत बुद्ध भिक्खूंची संख्या १००० हून जास्त आहे. ते अभ्यासू असून विनयाप्रमाणे शुद्ध आचरण करतात. मध्यदेशातील भिक्खूप्रमाणेच ते अस्तित्वात असलेल्या सर्व विषयांचा अभ्यास आणि संशोधन करतात. आचरणांचे नियम आणि विधिसमारंभ मुळीच वेगळे नाहीत. धम्मदेशना (धम्म-उपदेश) ऐकण्यासाठी आणि मूळ धम्मग्रंथांचा अभ्यास करण्या-साठी कोणा एखाद्या चिनी भिक्खूला मध्य भारतात जावयाचे असेल तर त्याने इथे एक-दोन वर्षे राहून, योग्य आचरणांचा अभ्यास करून मग पुढे मध्यदेशात गेलेले फायद्याचे होईल.

## इच्छेविरुद्ध परतीचा प्रवास

क्वाङग-चौव (क्वाङग-तुङग) ला एका व्यापाऱ्यातर्फे परिचय-पत्र पाठ-विण्यासाठी मी भोजनदीच्या मुखावर असलेल्या एका जहाजावर गेलो. माझ्या मित्रांना भेटून कागद, ब्रह्म-भाषेत असलेल्या सूत्रांची नक्कल करण्यासाठी वापरात येत असलेल्या शाईचे खडू आणि ग्रंथांच्या प्रती करणाऱ्या लेखकाला देण्याकरिता बिदागी मागण्यासाठी सांगत होतो. बरोबर त्याच वेळेला अनुकूल हवा सुरू झाल्या-मुळे व्यापाऱ्याने आपल्या जहाजाची शिडे पूर्णपणे उभारली आणि अशा तऱ्हेने (जरी माझी स्वदेशाला जाण्याची इच्छा नव्हती तरी) मला परत आणले गेले. जरी मी थांबायला सांगितले असते तरी थांबण्याचे कोणतेच साधन नव्हते. ह्या-वरून मला असे वाटते की, कर्मामुळेच अशा गोष्टी घडतात आणि आम्हा मान-वांना त्यांचे आयोजन करता येत नाही. युङग-चुङग काळाच्या पहिल्या वर्षाच्या (इ. स. ६८९) सातव्या महिन्याच्या विसाव्या दिवशी, आम्ही कुङग फू येथे पोहो-चलो. येथे मला परत सर्व भिक्खू आणि उपासक भेटले. एकदा चिह-चिहच्या

विहातात सभेमध्ये मी निश्वास टाकून म्हणालो, 'मी प्रथम पश्चिमेच्या देशात (भारतात) धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने गेलो होतो. परत येऊन दक्षिण सागरातील बेटात थांबलो. जरी मी (भारतामधून) आणून भोजमध्ये ठेवलेल्या त्रिपिटकांतील श्लोकांची संख्या ५,००,००० आहे, तरी अजूनही काही धम्मग्रंथांची उणीव आहे. ह्या परिस्थितीत मला परत तेथे जाणे आवश्यक आहे, पण मी आता वयाने पन्नास वर्षांपेक्षा जास्त (पंचावन्न) झालो आहे. घोंगावत येणाऱ्या लाटांना परत एकदा पार करताना, दऱ्याखोऱ्यातून दौडणारा पांढरा घोडा थांबणार नाही.[1] आणि माझ्या शरीराच्या दुर्गाच्या बुरुजांचे संरक्षण करणे कठीण होईल. जर प्रातःकाळच्या दंवबिंदूंची सुकण्याची वेळ अचानक आली तर ते ग्रंथ कोणाकडे सुपूर्त केले जातील? पवित्र धम्मग्रंथ खरोखर अमूल्य रत्न आहेत. तर माझ्याबरोबर येऊन कोण त्याचा सांभाळ करू शकेल? त्या धम्मग्रंथांत असलेल्या शिकवणीचे भाषांतर करण्यासाठी आम्हाला एका योग्य माणसाची जरुरी आहे.'

## योग्य मित्र लाभला

सभेत एकमताने मला सांगितले की, 'येथून जवळच चङग फू (साल गुप्त) नावाचा एक भिक्खू आहे. तो बरीच वर्षे विनयाचा अभ्यास करीत आहे. अगदी लहानपणापासून त्याने आपले आचरण निर्दोष आणि स्वच्छ ठेवले आहे. जर आपणाला तो मिळाला, तर तो आपला अगदी उत्तम साथीदार होईल.' जेव्हा मी हे शब्द ऐकले, तेव्हाच मला वाटले की, कदाचित तो माझ्या आवश्यकतेची पूर्तता करु शकेल. नंतर मी पर्वतावरच्या विहारात त्याला पत्र पाठविले. त्यात प्रवासाच्या तयारीचे स्थूलमानाने वर्णन केले होते. त्याने माझे पत्र उघडून वाचल्यावर त्याच क्षणी माझ्याबरोबर येण्याचा निर्णय केला. रूपकात्मकरीत्या असे म्हणता येईल की, लियाओ तुङ्ग नगरावर केलेल्या एकाच हल्ल्याने तीन शूर सेनापतींची हृदये गर्भगळीत केली किंवा हिमालय पर्वताच्या एका छोटचा श्लोकाने महर्षीला त्याच्या दृढनिश्चयापासून परावृत्त केले.[2] जेथे तो राहात होता तेथील शांत वातावरणातील निर्झर आणि देवदाराची वृक्षराजी त्याने आनंदाने सोडली. आम्ही आमच्या छोटचा छच्या झुकविल्या आणि (कंन्फुशियसप्रमाणे) मित्रभावाने गप्पागोष्टी केल्या. आम्ही दोघांनी आमची पाचही अंगे धम्मासाठी अर्पण केली होती. म्हणून आमची मैत्री इतकी वाढली की, आम्ही दोघांनी एकमेकांच्या जवळ आमची हृदये संपूर्णपणे

१. एक चिनी उपमा—मानवी जीवन इतक्या लवकर संपते, जसे सफेद घोडा भरकन दरी ओलांडून जातो.

२. हिमालय पर्वत आणि लियाओ तुङ्ग नगर प्रसिद्ध आहेत. पण ह्या-संकेतामागे काय गर्भितार्थ आहे ते कळत नाही. त्याचप्रमाणे ह्या रूपकांचा काय अर्थ आहे तेही कळत नाही.



उघडी केली जसे काही आम्ही पूर्वकाळापासून मित्र होतो. जरी ह्यापूर्वी मी त्याला कधीही पाहिले नव्हते, तरी मला पाहिजे होता, अगदी तसाच मनुष्य अकस्मातपणे मला मिळाला होता. एका शांत रात्री आम्ही दोघांनी आपल्या भावी कार्याबद्दल गंभीरपणाने विचार केला. तेव्हा चेङग— फू मला म्हणाला, 'जेव्हा सद्‌गुण सद्‌गुणांना भेटू इच्छितात, तेव्हा कोणत्याही मध्यस्थाशिवाय ते एकमेकांना भेटतात आणि जेव्हा वेळ परिपक्व झालेली असते, तेव्हा तिला कोणीही रोखू शकत नाही. तर मग आपल्याबरोबर त्रिपिटकांचा प्रचार करण्याचा आणि भविष्यासाठी सहस्र दीपक प्रज्वलित करण्यात साहाय्य होण्याचा आदरयुक्त प्रस्ताव मी करू काय?' त्यानंतर आम्ही विहाराचे मुख्य किएन आणि इतरांचा निरोप घेण्यासाठी हिसया पर्वतावर गेलो. किएनला योग्य वेळी कसे आचरण करावयाचे ते माहीत होते. त्याने त्याप्रमाणेच आचरण केले. त्याच्याजवळ आम्हाला फार काळ अडकवून ठेवण्याची त्याची कधीच इच्छा नव्हती. त्याची भेट आम्ही घेतली आणि आम्ही जो काही विचार केला होता तो त्याला सांगितला. तो त्याने पसंत केला आणि आम्हाला साहाय्य केले. त्याला स्वतःला काय लागेल, ह्याची तो कधीच काळजी करीत नसे. परंतु दुसऱ्यांच्या गरजा भागविण्यात तो नेहमीच तप्तर असे. आम्हाला काहीच कमी पडू नये म्हणून, त्यानेसुद्धा आमच्याबरोबर प्रवासाची तयारी केली. त्याच्याशिवाय कङग—तुङगच्या सर्व भिक्खूंनी आणि उपासकांनी आम्हाला आवश्यक वस्तू दिल्या.

## पुन्हा एकदा भोज देशात

नंतर वर्षाच्या (इ. स. ६८९) अकराव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी आम्ही एका व्यापारी जहाजातून निघालो. पन-यु पासून विशाल सागर पार करून भोजला जाण्याच्या इराद्याने आम्ही चंपाच्या दिशेने गेलो. सर्व प्राणिमात्रांसाठी आम्ही शिडचा व्हावे, किंवा दुःखसागरातून पार होण्यास त्यांना मदत व्हावी, म्हणून आम्ही नौकायान बनावे. जरी आमचा प्रवास भरकन झाला आणि त्यामुळे आम्हाला आनंद वाटला तरी प्रवासात मध्येच बुडू नये असे आम्हाला वाटत होते.

मी, इ-त्सिग श्रीभोजमध्ये ता—त्सिनना भेटलो.[1] (तो इ. स. ६८३ साली आला होता.) मी त्याला विनंती केली की, भारतात विहार बांधण्यासाठी सम्राटापासून मदत मागण्याकरिता त्याने स्वदेशी जावे. जेव्हा त्याला वाटले की, सम्राटाने ही विनंती मान्य केली तर धम्मकार्यासाठी खूप धम्मलाभ होईल, तेव्हा त्याने आपल्या प्राणाची मुळीच पर्वा न करता, विशाल महासागराला पुन्हा पार करण्याचे

१. इ-त्सिगच्यानंतर चङ्ग-कू, ताको-हुङग आणि आणखी दोन भिक्खू श्रीभोजला गेले. त्यांनी भोजमध्ये तीन वर्षे सूत्रांचा अभ्यास केला. ताओ-हुङग त्या वेळी (इ. स. ६८९) वीस वर्षांचा होता. जेव्हा इ-त्सिगने हा प्रवासवृत्तांत लिहिला तेव्हा तो तेवीस वर्षांचा होता.

स्वीकारले. तिएन-शोऊ काळाच्या तिसऱ्या वर्षाच्या (इ. स ६९२) पाचव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी चिङग अनला (सि-अन-फू) परत जाण्यासाठी तो एका व्यापारी जहाजात बसला. आता मी त्यांच्याबरोबर अनेक सूत्रांचा आणि शास्त्रांचा नवीन अनुवाद दहा ग्रंथखण्डांमध्ये, 'नन-हैं-चि-कुएई-नै-फा-चुअन' हा वृत्तांत चार खण्डांमध्ये आणि 'ता-तङग-सि-यू-क-फा-काओ-सेङग-चुअन (वृत्तांत)' दोन ग्रंथखण्डांमध्ये पाठवीत आहे.'

इ-त्सिगच्या जीवनचरित्रावरून असे दिसून येते की, तो पंचवीस वर्षे म्हणजे इ. स. ६७१ ते ६९५ पर्यंत परदेशात राहिला. त्याने तीसपेक्षा जास्त देशांचा प्रवास केला. इ. स ६९५ साली तो परत चीनला गेला. तेव्हा त्या वेळची सम्राज्ञी वू-हाऊ हिने इ-त्सिगचे बहुमानाने स्वागत केले. इ-त्सिगने आपल्याबरोबर चारशे बौद्धग्रंथ नेले होते. त्यांचे पांच लाख श्लोक होतील. शिवाय तथागतांच्या वज्रासनाचे हुबेहूब चित्र त्याने चीनमध्ये नेले होते.

इ. स. ७०० ते ७१२ पर्यंत इ-त्सिगने २३० खण्डांत ५६ ग्रंथांचा अनुवाद केला. ह्या ग्रंथांमध्ये अनेक महत्त्वाची सूत्रे आणि शास्त्रे आहेत. इ-त्सिगला बुद्ध-धम्मातील मूलसर्वास्तिवाद शाखेची विशेष ओढ असल्यामुळे, त्याने अनुवाद केलेल्या ग्रंथांत मूलसर्वास्तिवादी ग्रंथांचा विशेष भरणा आहे. चीनमध्ये धम्मशास्त्रांचा अर्थ लावण्यात त्याला शिक्षानन्द, ईश्वर, इत्यादी नऊ भारतीय भिक्खूंचे साहाय्य मिळाले. इ-त्सिगचे परिनिर्वाण इ. स. ७१३ साली झाले. तेव्हा तो एकोणऐंशी वर्षांचा होता. त्रिपिटकाच्या ग्रंथसूचीच्या प्रस्तावनेत सम्राट चुङग-त्सुङगचा याने इ-त्सिगचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला आहे.

श्रीभोज येथून इ. स. ६९२ साली ता-त्सीन ह्याच्याबरोबर चीनला पाठविलेल्या ग्रंथांमध्ये इ-त्सिगने स्वतः लिहिलेला 'नन-हैं-चि कुएन नै-फा-चुअन' म्हणजे 'दक्षिण समुद्रातील देशातून पाठविलेला आचरणासंबंधीच्या नियमांचा वृत्तांत' ह्या नावाचा एक ग्रंथ होता.

हा ग्रंथ लिहिण्यात चीनमधील विनयांच्या नियमांत घुसलेल्या चुका दुरुस्त करण्याचा इ-त्सिगचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे ह्या ग्रंथात त्या वेळच्या भिक्खूंच्या विनयाच्या नियमांविषयी, विशेष करून मूलसर्वास्तिवाद शाखेच्या नियमांविषयी बरीच माहिती देण्यात आली आहे. पण त्याचबरोबर ह्या ग्रंथात साहित्य, संस्कृती, ऐतिहासिक घटना, इत्यादींची इतकी माहिती मिळते की, हा ग्रंथ त्या वेळच्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारे एक महत्त्वाचे साधन बनला आहे. इ-त्सिगच्या ह्या ग्रंथात चाळीस प्रकरणे असून त्यांत जेवण्या-खाण्याचे कपड्यालत्त्याचे, औषधोपचाराचे, इतकेच काय, पण थोरामोठ्यांशी कसे वागायचे, उपोसथाच्या दिवशी काय करावयास पाहिजे, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे नाते कसे असावे, एखादा मनुष्य मृत झाल्यास कसे वागावे इत्यादींसंबंधीचे बारीकसारीक रीतिरिवाज आणि विधिनियम लिहिले आहेत. अर्थात त्यात मूलसर्वास्तिवादी शाखेच्या दृष्टिकोनाची



छाप पडली आहे.

ह्या ग्रंथातील चौतिसावे प्रकरण भारतातील शिक्षणपद्धतीबद्दल आहे. इ-त्सिगच्या ग्रंथात किती उपयुक्त माहिती आहे हे वाचकांना कळावे म्हणून नमुन्यादाखल ह्या चौतिसाव्या प्रकरणाचा गोषवारा खाली दिला आहे.

'तथागतांच्या एका उच्चारात जगाच्या तीन हजार भाषांतील ज्ञान आहे.'

'परमार्थ सत्य' हे शब्दातीत आहे पण 'संवृति सत्य' शब्दांनी सांगता येणे शक्य आहे. संवृति सत्याला काही लोक 'भौतिक सत्य' असे म्हणतात. पण त्यामुळे मूळचा अर्थ संपूर्णपणे स्पष्ट होत नाही. सर्वसाधारण वस्तू त्यांचे सत्य स्वरूप लपवितात किंवा झाकतात असा त्याचा अर्थ आहे. उदाहरणार्थ, मातीचे मडके. खऱ्या अर्थाने ती फक्त माती असते. पण लोक त्याला मातीचे भांडे असे म्हणतात. संगीतातील सर्व सुरांत फक्त आवाज असतो. ह्या सर्व आत्मनिष्ठ काल्पनिक गोष्टी आहेत. अविद्येमुळे प्रज्ञेवर आवरण आलेले असते आणि त्यामुळे वेगवेगळ्या वस्तूंचे अस्तित्व आपणास कल्पनेत दिसते. उदाहरणार्थ, एखाद्याला वाटते की तेथे साप आहे. पण खरोखर त्याच्यासमोर दोरखंड पडलेले असते. अशा तऱ्हेने दोरीला साप आहे अशी चुकीची कल्पना केल्यामुळे त्याला सत्य ज्ञान प्राप्त होत नाही. अशा तऱ्हेने सत्य झाकल्यामुळे त्याला 'संवृति सत्य' असे म्हणतात.

## शब्दविद्या

'व्याकरणाला संस्कृतमध्ये शब्दविद्या असे म्हणतात. पाच विद्यांपैकी[1] ती एक विद्या आहे. शब्द म्हणजे आवाज आणि विद्या म्हणजे शास्त्र. भारतात त्याला सर्वसाधारणपणे व्याकरण असे म्हणतात. संस्कृत व्याकरणावर पाच महत्त्वाचे ग्रंथ आहेत. ते म्हणजे १) सिद्धिरस्तु २) पाणिनिसूत्र ३) धातुसूत्र ४) अष्टधातु, मुण्डक शास्त्र आणि उनादिसूत्र ह्यांचा मिळून झालेला एक ग्रंथ आणि ५) वृत्तिसूत्र किंवा काशिका वृत्ति.

सिद्धिरस्तु हा ग्रंथ संस्कृत व्याकरणाची तोंडओळख करून देणारा आहे सहा वर्षांच्या मुलांना तो शिकविला जातो. वृत्तिसूत्र किंवा काशिकावृत्ति हा ग्रंथ पाणिनिसूत्रावरील टीकात्मक ग्रंथ आहे. तो १८,००० श्लोकांचा आहे. पंधरा वर्षांच्या विद्यार्थ्यांना तो शिकविण्यास सुरुवात करतात आणि सतत पाच वर्षे अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना तो आत्मसात होतो.

सर्व ग्रंथ मुखोद्गत केले पाहिजेत. पण हा नियम फक्त हुशार विद्यार्थ्यांच्या बाबतीत आहे. इतरांनी आपापल्या इच्छेप्रमाणे मार्ग आक्रमण करावा.

---

१. पाच विद्या म्हणजे १) शब्दविद्या किंवा व्याकरण २) शिल्पस्थानविद्या किंवा कला ३) चिकित्साविद्या किंवा वैद्यक शास्त्र ४) हेतुविद्या किंवा तर्कशास्त्र आणि ५) अध्यात्मविद्या किंवा तत्त्वज्ञान.

विद्यार्थ्यांनी आळसात क्षणभरही वेळ न दवडता परिश्रमपूर्वक रात्रंदिवस अभ्यास केला पाहिजे. कन्फुशियसने 'यि–किंग' या ग्रंथाचे वाचन इतक्या वेळा केले की, त्या ग्रंथाचे लेदर बाइंडिंग तीन वेळा बदलावे लागले. विद्यार्थ्यांनी कन्फुशियसचे किंवा युई–शिहचे अभ्यासाच्या बाबतीत अनुकरण करावे. युई–शिह अेक ग्रंथ शंभर वेळा वाचीत असे.

वृत्तिसूत्र हा ग्रंथ जयादित्य ह्या विद्वानाने लिहिला आहे. तो फार कर्तृत्ववान होता. त्याचा व्यासंग फार दांडगा असे. तो अेकपाठी होता. त्रिरत्नांवर (बुद्ध, धम्म आणि संघ) त्याची श्रद्धा असून त्याने खूप कुशल कर्मे केली होती. त्याचे परिनिर्वाण होऊन आता जवळजवळ तीस वर्षे झाली आहेत (इ. स. ६६१–६६२). ह्या ग्रंथाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी हेतुविद्या (तर्कशास्त्र), अभिधर्मकोष (बुद्धतत्त्वज्ञान) इत्यादी विषयांचा अभ्यास सुरू करतात. न्याय-द्वार-तारक-शास्त्राचा[1] अभ्यास केल्यावर ते योग्य अनुमान काढण्यास शिकतात. जातकमाला शिकल्यावर त्यांची आकलनशक्ती वाढते. अशा तऱ्हेने अभ्यास केल्यावर ते बहुतेककरून मध्य-प्रदेशातील नालंदा येथे किंवा पश्चिम भारतातील वलभी येथे दोन किंवा तीन वर्षे पुढील अभ्यास करतात. चीन देशातील चीन–मा, शिह-चू, लिङ्ग-मिन आणि चुह-ली येथील विश्वविद्यालयांसारखी ही दोन विश्वविद्यालये प्रसिद्ध आहेत. विद्वान आणि ख्यातनाम पंडित येथे येतात. तेथे ते योग्य आणि अयोग्य तत्त्वांची चर्चा करतात. सुज्ञ विद्वानांनी त्यांच्या मतप्रणालीची प्रशंसा केल्यावर त्यांच्या विद्वत्तेची कीर्ती सर्वत्र पसरते. नंतर स्वतःच्या बुद्धिमत्तेची कसोटी देण्यासाठी ते राजदरबारी जातात आणि तेथे ते आपल्या तीक्ष्ण शास्त्राची (बुद्धिमत्तेची) चमक दाखवितात. अशा तऱ्हेने त्यांना राज्यकारभारात मानाची जागा मिळते. चर्चेत आपल्या विरोधी पक्षाचा पराभव केल्यावर त्यांची कीर्ती सर्वत्र पसरते. त्यांना जमीन इनाम मिळते आणि राजदरबारी त्यांचा मान वाढतो. मान्यतेची खूण म्हणून त्यांचे सुप्रसिद्ध नाव त्यांच्या उंच दरवाजावर शुभ्र रंगात लिहिले जाते.'

## थोर विभूती

'भिक्खू सर्व विनयांच्या ग्रंथांच्या अभ्यासाशिवाय सूत्रांचा आणि शास्त्रांचा अभ्यास करतात. उकळत्या पाण्यात टाकल्यावर बर्फ जसा ताबडतोब वितळून जातो, त्याचप्रमाणे वादविवादात पाखंडी लोकांचा ते चुटकीसरशी पराभव करतात. अशा तऱ्हेने सर्व जम्बुद्वीपात ते प्रसिद्ध पावतात आणि लोकांत त्यांना आदर मिळतो. तथागतांचा मार्ग अनुसरून लोकांना ते निर्वाणाचा मार्ग दाखवितात. प्रत्येक पिढीत असे ख्यातनाम विद्वान फक्त एक किंवा दोन आहेत. ते सूर्य–चंद्रा-

१. हा ग्रंथ तर्कशास्त्राची ओळख करून देणारा असून तो नागरगुण ह्याने लिहिला आहे. इ-त्सिगने त्याचे चिनी भाषेत भाषांतर केले आहे.



सारखे प्रतिभावान आहेत. नागार्जुन, आर्यदेव, अश्वघोष हे पूर्वीच्या काळातील; वसुबंधू, असंग, संघभद्र, भावविवेक हे मधल्या काळातले; आणि जिन, धर्मपाल धर्मकीर्ती, शीलभद्र, सिंहचन्द्र, स्थिरमति, गुणमति, प्रज्ञागुप्त, गुणप्रभा, जिनप्रभा किंवा परमप्रभा हे अलीकडच्या काळातले आहेत.

ह्या महान विभूतींत धार्मिक किंवा इतर सद्गुणांची कोणतीच कमी नव्हती. त्यांचे जीवन शुद्ध असून त्यांना कसल्याच गोष्टीचा लोभ नव्हता. अशा तऱ्हेच्या शुद्ध चारित्र्याची माणसे पाखंडी लोकांत आणि इतरांत क्वचितच पाहावयास मिळतात.

भदंत जिनानंतर[1] धर्मकीर्तीने तर्कशास्त्रात आणखी सुधारणा केली. गुणप्रभाने विनयपिटकाच्या अभ्यासात लोकांना पुन्हा गोडी लावली. गुणमतीने ध्यानाच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले आणि प्रज्ञागुप्ताने विरोधी मतांचे खंडण करून लोकांना तत्त्वज्ञान समजावून सांगितले. विशाल सागरात जेथे फक्त देवमासे राहू शकतात, अशा ठिकाणीसुद्धा तेजस्वी रत्ने आपले सुंदर रंग प्रकाशित करतात. अति उंच सुगंधित पर्वताशिखरावरसुद्धा (गंधमादन) जशा औषधी वनस्पती आपल्या गुणांचा आविष्कार करतात, त्याचप्रमाणे विशाल आणि व्यापक बुद्धधम्माचा अंगीकार करणाऱ्यांमध्ये अनेक सद्गुणी माणसे दिसून येतात.

ही माणसे कोणत्याही विषयावर सहज बसल्या जागी ग्रंथ लिहू शकतात. अशी माणसे सहाशे श्लोकांचा ग्रंथ फक्त एकदाच ऐकून लक्षात ठेवू शकतात. अशा माणसांना युई–शिहप्रमाणे ग्रंथाचे शंभर वेळा वाचन करण्याची काय गरज? ही कपोलकल्पित कथा नसून मी स्वतः अशी माणसे जम्बुद्वीपात पाहिली आहेत. एकदा वाद करण्यासाठी एका पाखंड्याने सहाशे श्लोकांचा एक ग्रंथ रचला. सभेत चर्चेच्या वेळी धर्मपालाने तो फक्त एकदाच ऐकला आणि लक्षात ठेवला.

ब्राह्मणांना सर्व भारतात फार मान मिळतो. ते इतर लोकांत मिसळत नाहीत. साधारणपणे १,००,००० श्लोक असलेल्या चार वेदांना ते पवित्र मानतात.

भारतात विद्वत्ता मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे पाठांतर करून बुद्धीची वाढ करता येते आणि दुसरे म्हणजे ग्रंथलेखनाने स्वतःची मतप्रणाली प्रस्थापित करता येते.

काश्यप मातंग आणि धर्मरक्षित[1] ह्यांनी पूर्व चीनच्या लो ह्या राजधानीत बुद्धधम्माची शिकवण दिली. परमार्थाची[1] कीर्ती तर चीनच्या दक्षिण समुद्रापर्यंत (नानकिंग प्रांत) पसरली होती आणि कुमारजीव[1] ह्याने सद्धर्म (बुद्धधम्म) सर्वत्र पसरविला. नंतर भदंत ह्यू–एन–त्संगने त्याच्या स्वतःच्या देशात धम्मप्रचाराचे कार्य केले. अशा तऱ्हेने पूर्वीच्या काळी आणि हल्लीसुद्धा विद्वानांनी बुद्ध-

१. ह्यू–एन–त्संगच्या प्रवास–वर्णनावरून जीन बोधिसत्त्व महाराष्ट्रातील अजंठा येथील लेण्यात काही दिवस राहात होता. तो जीन बोधिसत्त्व म्हणजेच भदंत जिन. ह्याने तर्कशास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत.

धम्माचा प्रकाश सर्वत्र पसरविला.

पश्चिमेच्या देशात (भारतात) हल्लीच्या काळी खालील विभूती राहात आहेत. मगधातल्या तिलंधा संघारामात ज्ञानचंद्र, नालंदामध्ये रत्नसिंह, पूर्व भारतात दिवाकर मित्र आणि अगदी दक्षिणेकडील जिल्ह्यात तथागतगर्भ. श्रीभोजमध्ये (सुमात्रामध्ये) राहाणारा शाक्यकीर्ती ह्याने ज्ञानवृद्धीसाठी सर्व भारतभर प्रवास केला आहे आणि हल्ली तो श्रीभोजमध्ये आहे.

मला ह्या विभूतींकडून ज्ञान मिळाल्यामुळे अतिशय आनंद होत आहे.'

इ–त्सिगच्या 'नन-है-चि-कुएन-नै फा-चुअन' ह्या ग्रंथातून जयादित्य, वामन, भर्तृहरी आणि धर्मपाल ह्या विद्वान बौद्धांनी लिहिलेल्या शब्दविद्येच्या म्हणजे संस्कृत व्याकरणाच्या ग्रंथांची माहिती मिळते.

वृत्तिसूत्र किंवा काशिकावृत्ति हा ग्रंथ जयादित्य आणि वामन या दोघांनी मिळून लिहिला. जयादित्याचे परिनिर्वाण साधारणपणे इ. स. ६६१–६६२ साली झाले. धर्मपाल नालंदा विश्वविद्यालयाचा मुख्य होता. त्याच्यानंतर ह्यू–एन–त्सँग आला. त्या वेळेस शीलभद्र नालंदा विश्वविद्यालयाचा मुख्य होता.

भर्तृहरीशास्त्र, वाक्यपदीय इत्यादी ग्रंथांचा कर्ता भर्तृहरी, ह्याचे परिनिर्वाण साधारणपणे इ. स. ६५१–६५२ साली झाले. भर्तृहरीशास्त्र २५,००० श्लोकांचे असून त्यात व्याकरण, मानवी जीवनाची मूल्ये. त्याचप्रमाणे अनेक राजघराण्यांच्या उदयाचा आणि लोपाचा इतिहास लिहिला आहे. भर्तृहरी 'विद्यामात्र' तत्त्वज्ञानात अत्यंत कुशल असून त्याने आपल्या ग्रंथात 'हेतू आणि उदाहरण' यांचा फार कौशल्याने उपयोग केला आहे. तो सर्व भारतात फार प्रसिद्ध होता. इ–त्सिग म्हणतो, भर्तृहरीच्या विद्वत्तेची कीर्ती सर्वत्र पसरली होती. त्रिरत्नांवर त्याची परमश्रद्धा होती. पण त्याचे मन स्थिर नव्हते. एकदा घरदार सोडून तो अनागारिक झाला. पण काही काळाने तो परत उपासक बनला. अशा तऱ्हेने तो सात वेळा भिक्खू झाला आणि सात वेळा उपासक झाला.

इ–त्सिगने हे स्पष्टरीत्या प्रतिपादन केले आहे की, दोन्ही 'यानां 'मध्ये फारसा

---

२. काश्यप मातंग आणि धर्मरक्ष हे इ. स. ६७ मध्ये चीनला गेले. त्यांनी बुद्धधम्माचे अनेक ग्रंथ चिनी भाषेत भाषांतरित केले आहेत. इ. स. ६७ पासून म्हणजे काश्यप मातंगाच्या आगमनापासून चीनमध्ये सम्राटाच्या अनुमतीने बुद्धधम्माच्या प्रचारास सुरुवात झाली असे मानण्यात येते. परंतु त्यापूर्वीच बृद्धधम्माचा प्रवेश चीनमध्ये झाला असला पाहिजे असे विद्वानांचे मत आहे.

३. परमार्थ इ. स. ५४८ साली चीनमध्ये गेला. त्याने ३१ संस्कृत बौद्धग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले आहे.

४. कुमारजीव इ. स. ४०१ साली चीनमध्ये गेला. त्याने ५० संस्कृत बौद्धग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले आहे.



फरक नाही. 'महायान आणि हीनयान यांचे विनयांचे नियम सारखेच आहेत, दोन्ही यानांत निषिद्ध असलेल्या गोष्टींत बिलकूल फरक नाही. फरक इतकाच की, महायानात बोधिसत्त्वाची पूजा केली जाते आणि महायान सूत्राचे पठण केले जाते. बुद्ध धम्माच्या हीनयान आणि महायान शाखा, वास्तविक, तथागतांच्या आर्य सत्याचीच शिकवण देतात. दोन्ही आपणास निर्वाणाच्याच मार्गाने नेतात. दोन्हीत राग, लोभ, मद, मत्सर इत्यादी विकारांचा नाश करण्याचा हेतू असतो. त्यामुळे निर्वाणाचा मार्ग सुलभ होतो. मग दोघांत फरक काय?' असा प्रश्न इ–त्सिग विचारतो. तो पुढे म्हणतो की, 'दोघांतील गुणदोष दाखवून विचारांच्या गोंधळात आपण पडू नये. दोन्ही शाखांप्रमाणे भारतात शिक्षण दिले जाते आणि त्याप्रमाणे आचरण केले जाते. कारण महत्त्वाच्या बाबतीत दोघांत काहीच फरक नाही.'

## ग्रंथ-सूची


Beal Samuel — Si-yu-ki, Buddhist Records of the Western World, translated from the Chinese of Hiuen Tsiang (A. D. 629). Trubher & Co. London 1884.

Beal Samuel and Shaman Hwui Li — The Life of Hiuen-Tsiang with an introduction containing an account of the works of I-Tsing. Trubher & Co. London 1884.

Hardy R. Spence — A manual of Buddhism. London 1860.

Legge J. A. — A Record of the Buddhistic Kingdoms. Being an account by the Chinese Monk Fa-hien of travels in India and Ceylon (AD 399-414) in search of Buddhist Books of Discipline. Translated and annotated with a Corean recension of the Chinese Text, Oxford 1886.


Li Yung-hsi — A Record of the Buddhist Countries by Fa-hien. This English translation of Fa-hien's Record of the Buddhist countries has been made by the San-Shih Buddhist Institute, Peking to commomorate the 2500 th anniversary of Buddha's Nirvan. Publishers :- The Chinese Buddhist Association, Peking 1957.

Mayer — Manual

Max Muller, F. — India : What Can It Teach Us, London 1883.

Max Muller, F. (ed.) — Sacred Books of the East.

Takakusu J. — A Record of the Buddhist Religion as practised in India and Malay Archipelago. A. D. 671-695 by I-Tsing, Oxford 1896.

**बुद्ध–धम्मासाठी आपल्या प्राणांची बाजी लावून**
**बुद्धभूमीच्या दर्शनासाठी आलेल्या**
**चिनी धम्मवीरांची अजोड शौर्यगाथा!**

चीनच्या बादशहाकडे पुन्हा चीनप्रवेशाची परवानगी मागताना ह्यू–एन–त्सँगने लिहिले आहे की,

"... विद्येच्या शोधार्थ दूर दूर जाणाऱ्या प्राचीन थोर गुरुजनांचा जर आपण गौरव करतो, तर संसारपाशातून मुक्त करण्यास समर्थ असणाऱ्या बौद्धांच्या लाभदायी धम्माच्या पवित्र पदचिन्हांचे आणि त्रिपिटकातील अद्‌भुत पदांचे संशोधन करणाऱ्यांचा केवढा गौरव केला पाहिजे ! ..."

"...चेंग-क्युआँ शकाच्या तिसऱ्या वर्षाच्या चौथ्या महिन्यात (म्हणजे इ. स. ६३० मध्ये) धैर्याने संकटांना आणि अडथळ्यांना तोंड देत गुप्तपणे मी भारताचा रस्ता धरला. मी मोठमोठी वाळवंटे पार केली. सुळक्यासारखे उंच बर्फाच्छादित पर्वतकडे चढून गेलो, लोहद्वाराच्या निमुळत्या मार्गातून कसाबसा बाहेर पडलो, तप्त समुद्राच्या प्रचंड लाटांजवळून गेलो– अशा रीतीने मी हजारो मैल प्रवास केला ..."


– ह्यू-एन-त्सँग

**मूल्य ३० रु.**



भगवान गौतम बुध्दांच्या पदस्पर्शाने पवित्र असलेल्या ठिकाणची

रजि.नं. नाशिक/००००४११/२०१९



# सद्धम्म बुध्दगया सहल



पर्यटन अनलॉक







प्रत्येकी रू. ९,९९९/-

## प्रत्येक महिन्यात...













१) **बुध्दगया :** (भगवान गौतम बुध्दांना ज्ञान प्राप्तीचे ठिकाण) (बोधी वृक्ष, महाबोधी विहार, ८० फुट बुध्द मुर्ती, जापनीज बुध्द विहार, थाई बुध्द विहार, श्रीलंका बुध्द विहार, तिबेटीयन बुध्द विहार, भुतान बुध्द विहार)

२) **सुजाता महल :** (भगवान गौतम बुध्दांना सुजाताने खीर दिलेले ठिकाण)

३) **तपोभूमी (धुङ्गेश्वरी पर्वत) :** (भगवान गौतम बुध्दांनी ६ वर्षे तपस्या केली)

४) **राजगीरी :** (शांती स्तुप, जापनीज बुध्द विहार)

५) **नालंदा विश्व विधापीठ :** (जगातील सर्वात पहिले व मोठे विश्वविद्यालय)

६) **वैशाली :** (१०,००० शिष्यांना भगवान गौतम बुध्दांनी उपदेश केला) (बुध्द स्तुप, अशोक स्तंभ)

७) **केसरिया स्तुप :** (भगवान गौतम बुध्द येथे आरामासाठी थांबले होते) (जगाचा सर्वात मोठा स्तुप)

८) **कुशीनगर :** (भगवान गौतम बुध्दांचे महापरिनिर्वानाचे ठिकाण) मान्मार पॉगोडा, चायना बुध्द विहार, थाई बुध्द विहार, रामाभार स्तुप, तिबेटीयन बुध्द विहार, जापनीज बुध्द विहार)

९) **लुंबिनी :** (नेपाल) (भगवान गौतम बुध्दांचे जन्मस्थळ)

१०) **श्रावस्ती :** (भगवान गौतम बुध्दांनी २५ वर्ष वर्षावास केला) ( जेतवन, आंगुली माल गुफा)

११) **सारनाथ :** (भगवान गौतम बुध्दांनी ५ भिक्षुंना उपदेश केला) धामेक स्तुप, श्रीलंका बुध्द विहार, चायना बुध्द विहार, तिबेटियन बुध्द विहार, ४० फुट बुध्द मुर्ती, जापनीज बुध्द विहार, कोरीया बुध्द विहार

१२) **लखनऊ :** (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य दिव्य स्मारक)

१३) **कपील बस्तू (राजमहाल)**

* सुविधा : ज्यामध्ये रेल्वे स्लिपर टिकीट, एल.सी.डी. (AC) लक्झरी बस सेवा व राहण्याची उत्तम व्यवस्था (१ रूम मध्ये फक्त ४ व्यक्ति) व उत्तम प्रकारचे दर्जेदार जेवण तसेच बुकींगसाठी रू. ४०००/-, उर्वरीत रक्कम (दर महिना द्यावी.) बुकींग करतांना आधारकार्डची झेरॉक्स व दोन फोटो जमा करावेत.

**ग्रुप सहलीचे नियोजन कमीत-कमी दरात केले जाईल.**

**वर्षातून ९ वेळा बुध्दगयेला जाणारी देशातील एकमेव संस्था सद्धम्म सहल**

## सुवर्ण संधी - अतिशय कमी खर्चात दर्जेदार सहल

सद्धम्म सहल मागचा एकच उद्देश आपल्या समाज बांधवांना भगवान गौतम बुद्धांच्या पदस्पर्शाने पवित्र असलेल्या ठिकाणांची भेट व्हावी हाच उद्देश...

**बुकींग साठी संपर्क**

**सम्राट नामदेव सोनवणे 8087778403**

**सद्धम्म हॉलिडे, नाशिकरोड नाशिक**